म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 223

# दृष्टिकोण

पां. वा. गाडगीळ

दि. वा. निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
संग्रहालय/वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. २१० | विभाग निबंध | क्रमांक ३८ |

पुस्तकाचें नांव माझा दृष्टिकोण.
लेखक पां. वा. गाडगीळ.

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006471

म. ग्रं. सं.
निबंध

राजकीय लेखसंग्रह

किंमत ३ रुपये

ग्रं.नं.

# माझा दृष्टिकोन

पां. वा. गाडगीळ

संपादक : “ लोकमान्य ” दैनिक, मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रथमावृत्ति

REFBK-0006471

किंमत ३ रुपये ] ★ [ १५-९-४४

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

प्रकाशक
रामचंद्र शंकर पटवर्धन,
व्यवस्थापक, य. गो. जोशी-प्रकाशन,
६२३ सदाशिव, पुणें २.

## —आणि 'माझा दृष्टिकोन !'

माझे स्नेही श्री. पां. वा. गाडगीळ यांचें "माझा दृष्टिकोन" हें पुस्तक मीं प्रकाशनार्थ घेतलें त्या वेळीं "या पुस्तकाला तुम्हींच प्रस्तावना लिहायला पाहिजे!" असली भयंकर अट श्री. गाडगीळ घालतील याची मला अजीबात कल्पना नव्हती. माझ्याकडे पाहण्याचा माझे मित्र श्री. गाडगीळ यांचा हा 'दृष्टिकोन' मला कांहीं 'स्वागतार्ह' वाटला नाहीं–पण त्यांचा शब्द मोडण्याचें मला धाडसही होईना–मीं प्रस्तावना लिहायचें कबूल केलें आणि जेव्हां प्रस्तावनेविषयीं विचार करूं लागलों, तेव्हां श्री. गाडगीळ यांनीं मलाच प्रस्तावना लिहायला कां सांगितली हें माझ्या लक्षांत आलें !

मीं आतांपर्यंत श्री. पां. वा. गाडगीळ यांचीं सात पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्या पुस्तकांचे खपाचे आंकडे, लोकमत, त्या पुस्तकांवर आलेले अभिप्राय–गाडगीळ भेटले म्हणजे मी त्यांना सांगत होतों–कळवीत होतों–पण त्यांच्या सातही पुस्तकांवरचा माझा अभिप्राय मीं त्यांना अद्याप कळविला नाहीं ! मला वाटलें, मी गाडगीळ यांचीं पुस्तकें एका पाठोपाठ छापतों आहे–हाच माझा त्यांच्या पुस्तकांवरचा अभिप्राय नव्हे का? पण श्री. गाडगीळ यांनीं असा (गैर)समज करून घेतला असावा, कीं त्यांचीं मीं आतांपर्यंत प्रसिद्ध केलेलीं सातही पुस्तकें वाचलीं नसावीं आणि माझ्या प्रामाणिकपणावर श्री. गाडगीळ यांचा थोडासा विश्वास असल्यामुळें, "पुस्तकाला प्रस्तावनाच लिहायला सांगितली, कीं निदान हें तरी पुस्तक संपूर्ण वाचलें जाईलच" या भरंवशावर किंवा या भरंवशानें श्री. गाडगीळ यांनीं मला 'दृष्टिकोना'ला प्रस्तावना लिहायला सांगितली. अर्थात् संपूर्ण पुस्तक न वाचतांसुद्धां—प्रस्तावना लिहितां येईल हें वर्तमानपत्रसृष्टींत 'लोकमान्या' सारख्या प्रमुख दैनिकाचें संपादकत्व चालविणाऱ्या गाडगीळांना ऐकून किंवा सांगोवांगीं माहीत नसेल हें कसें शक्य आहे? पण मी तसें करणार नाहीं ही त्यांची खात्री–आणि मीं तसें केलेंही पण नाहीं !

" माझा दृष्टिकोन " हें पुस्तक मीं समग्र वाचून पाहिलें. हें पुस्तक वाचीत असतांना श्री. पां. वा. गाडगीळ हे स्वतःच बोलत आहेत आणि मी फक्त ऐकण्याचें काम करीत आहे, असें मला पुस्तक वाचीत असतांना सारखें वाटूं लागलें.

श्री. गाडगीळ आणि मी–यांच्या भेटींत नेहमीं असें होतें. कोणत्याही विषयावरील कोणाताही मुद्दा आपण गाडगिळांपुढें टाकावा, कीं क्षणार्धांत त्या मुद्द्याच्या सगळ्या बाजू हेरून गाडगीळ त्या मुद्द्यांचें भराभर विवेचन करूं लागतात. लवकरच त्या विषयांत त्यांची तंद्रीही लागते. आपण सहज गप्पा मारीत आहोंत हेंही ते विसरतात! त्यांच्या मनासमोर मला वाटतें, लगेच ' लोक-समुदाय ' दिसूं लागतो; आणि त्या समुदायाला आपलें मत पटविणें–आपला दृष्टिकोन समजावून सांगणें–हें एक पवित्र आणि तातडीचें कर्तव्य आहे. अशा कर्तव्यकठोर बुद्धीनें ते बोलूं लागतात. त्यांचा आवाज हळूहळू चढूं लागतो–आणि त्याबरोबर प्रत्येक शब्दामागील त्यांची तळमळ पटूं लागते.

—त्यांच्या त्या एरवींच्या बोलण्यांतील आवेशाचेंसुद्धां खरें कारण म्हणजे श्री. गाडगीळ यांच्या वृत्तींतला अभिजात प्रामाणिकपणा हें होय.

प्रामाणिकपणाचें फार मोठें बळ त्यांच्याजवळ आहे हें त्यांच्या विरोधकांनाही कबूल करावें लागेल.

प्रामाणिक माणसाला–विशेषतः राजकारणांत–मतभेदाचे हल्ले वारंवार पत्करावे लागतात आणि मग कित्येक वेळा मताच्या अभिनिवेशामुळें 'प्रामाणिकपणा'चे इतके हाल होतात, कीं बिचारा प्रामाणिकपणाच पुष्कळ वेळा बाजूस पडतो, आणि मतें आणि मतभेद मिजास मारीत राहतात.

'माझा दृष्टिकोन' हें पुस्तक वाचून त्याला " प्रस्तावनेसारखें कांहीं तरी " लिहिण्याचें मीं ठरविलें तें श्री. गाडगिळांच्या प्रामाणिकपणाच्या सामर्थ्याचें फळ आहे! श्री. गाडगीळ यांच्यासारखीं माणसें अशीं असतात, कीं तीं त्यांच्या मतापेक्षां 'मनानेंच' आपल्यावर सत्ता गाजवितात. श्री. गाडगीळ यांचा हा " माझा दृष्टिकोन " वाचीत असतां मला वरील विधान पदोपदीं आढळून आलें!

" माझा दृष्टिकोन " हे पुस्तक उघड उघड श्री. गाडगीळ यांच्या

राजकीय लेखांचें पुस्तक आहे. राजकारण या विषयास श्री. गाडगीळ यांनीं आपलें आयुष्य ऐन तरुणपणीं वाहून घेतलें आहे. आणि त्यांच्या नांवाला आज जी प्रतिष्ठा आली आहे त्यावरून श्री. गाडगीळ आतां मुरलेले राजकीय कार्यकर्ते आहेत हेंही निर्विवाद आहे.

राजकीय कार्यक्षेत्राशीं माझा प्रत्यक्ष संबंध श्री. गाडगीळ किंवा माझे मित्र श्री. शि. ल. करंदीकर इत्यादींच्या मैत्रीपेक्षां जास्त नाहीं. तरीही श्री. गाडगीळ यांच्या 'राजकीय लेखना'स प्रस्तावना लिहिण्याचें मीं मान्य केलें. प्रस्तावनेची ही प्रस्तावना श्री. गाडगीळ यांच्याच शब्दांत पुरी करतों "केवळ विचार करण्याची थोडीशीं संवय असलेला एक सामान्य नागरिक या नात्यानें मी या जगड्व्याळ विषयाची चर्चा येथें करणार आहे!" म्हणजे मी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणार आहे!

'माझा दृष्टिकोन' या पुस्तकांतील लेखांतून श्री. गाडगीळ यांनीं प्रचलित राजकारणांतील अनेक प्रश्नांविषयीं आपलीं मतें इतक्या स्पष्टपणें मांडलीं आहेत, कीं तीं वाचून आपल्यालाही अशीं कांहीं मतें असायला हरकत नाहीं असें मला वाटूं लागलें. आज सगळीकडे गांधी-जिना, कॉंग्रेसचें धोरण, अखंडत्व-त्रिखंडत्व हे शब्द ऐकूं येतात. वृत्तपत्रांतील बाजारभाव वाचूं लागले तरीसुद्धां याविषयींच्या एखाद्या मताचा हल्ला डोळ्यांवाटे आपल्या मेंदूवर होतोच. अशा वेळीं श्री. गाडगीळ यांचा दृष्टिकोन किती स्पष्ट आणि स्वच्छ आहे हें जास्त कळून येतें.

युद्धाविषयीं कॉंग्रेसचा दृष्टिकोन सांगतांना चालू युद्ध—ही आणि—हीच मोठी संधि आहे हें आग्रहानें सांगितलें आहे. नवें जग, नवीं तत्त्वें—मग तीं या देशाच्या बाबतींतलीं असोत वा इतर ठिकाणचीं असोत—यांची जी काय नवी घडण व्हायची आहे ती या महायुद्धाच्या तापल्या तव्यावरच होणार. आपल्याला जे कांहीं हातपाय हालवायचे असतील ते या युद्धकालांतच हालवले पाहिजेत, हें साध्या व्यावहारिक माणसालाही वाटूं लागलें आहे. मोठमोठीं माणसेंही कांहींशा गडबडीनें धावूं लागल्यासारखीं दिसतात. कोणी युद्ध-सहकार्यासाठीं जमवाजमव करतो; तर कोणी महायुद्धाची संधि साधून ताणून धरावें अशी योजना आखतो. युद्धकार्यांत जिव्हाळा पाहिजे म्हणून कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्याचें वचन मागितलें. श्री. गाडगीळ यांनीं आपल्या

अभ्यासाचें-परिशीलनाचें फल म्हणून या प्रश्नांची चर्चा केली आहे. आपल्या सहकार्यांचा बाजारभाव पाहून आपलें बळ वाढविण्याची हीच संधि आहे, अडचणीपासून भरपूर फायदा घेण्यासाठीं, अडचण दीर्घकाल वाढावी आणि जपानचें साहाय्य घेण्याचा विचारही मनांत न आणतां आपण आपली संघटना वाढवावी. संघटनेची जरूर संरक्षणाच्या वेळीं वाटते. संरक्षणाची काळजी वाढविणारा हा युद्धकाल आपल्याला समर्थ करील. आपल्या सहनशीलतेची आणि संघटनेची ही कसोटी आहे. सरकार कोंडी फोडायला तयार नाहीं हें आपल्या पथ्यावरच पडायला पाहिजे असें त्यांचें विवेचन वाचून मी संतुष्ट झालों. माझ्या मतांमध्यें त्यामुळें काय घडामोड झाली हें मीं अद्याप तपासून पाहिलें नाहीं ! श्री. गाडगीळ यांच्या लिहिण्यांतील सुबोधता, कळकळ, स्पष्टवक्तेपणा आणि याहूनही प्रसंशनीय असा प्रामाणिकपणा या सर्वांचा सहवास "माझा दृष्टिकोन" वाचतांना मला मिळाला म्हणून मी संतुष्ट झालों.

लोकनायक अणे व महात्मा गांधी यांच्यावर लिहितांना श्री. गाडगीळ यांनीं भीष्म आणि श्रीकृष्ण यांना तुलनेसाठीं घेऊन फार मोठा व्याप पत्करला असें प्रारंभीं वाटलें-पण शेवटीं अणे व गांधी या दोघांच्या वृत्तींतील व मतांतील भेद कसे अभेद्य आहेत हें स्पष्ट करतांना श्री. गाडगीळ यांनीं त्या पौराणिक दाखल्याचा फारच चातुर्यानें उपयोग केला आहे ! आचार्य जावडेकरांच्या विषयीं नितांत आदर, "माझें लेखक-जीवन" या आपल्या पहिल्याच लेखांत व्यक्त करणारे श्री गाडगीळ "ब्रह्मविद्या व नीतिशास्त्र" या विषयावर लिहूं लागले आणि मला वाटलें 'ब्रह्मविद्येवर' आतां गाडगीळ 'सोशॅलिस्ट' हल्ला चढवणार. मग पहिल्याच लेखांतील जावडेकरांच्या आदराचें काय होणार? पण याही लेखांत श्री. गाडगीळ यांच्या मताची कुठेंही तारांबळ झालेली नाहीं. 'ब्रह्मानंदाच्या' इम्रतीला न बुजतां, व्यावहारिक दृष्टीनें जगांत वावरणारांना त्या 'चिंतनानंदाशीं' कांहींही कर्तव्य नाहीं असें श्री. गाडगिळांनीं ठणठणीतपणें बजावलें आहे! सज्जनांना होणारा 'अंतर्नाद' हा भ्रम असूं शकतो-आणि लबाड लोक ढोंग करून 'थोतांड' माजवूं शकतात हें श्री. गाडगीळ यांचें म्हणणें आचार्य जावडेकरांच्या पुढेंच काय, पण प्रत्यक्ष महात्मा गांधींच्या पुढेंही त्यांनीं अनेकवार निर्भीडपणें मांडलें आहे !

आध्यात्मिक 'मॉनर्की'विरुद्ध व त्यांतून वाढणाऱ्या हुकूमशाहीविरुद्ध

श्री. गाडगीळ यांना वाटणारी चीड “ अहिंसावादाचें भवितव्य ” या लेखांत चांगलीच व्यक्त झाली आहे. महात्मा गांधींच्या राजकारणांतील गूढवाद म्हणजे कार्यकारणविचारसरणीचा अभाव—हताश दैववादास कारण झाला आहे असें आपलें मत श्री. गाडगीळ यांनीं स्पष्ट मांडलें आहे. आणि इतका तीव्र मतभेद दाखविणाऱ्या श्री. गाडगिळांच्या मनांत या नापसंतीबरोबरच गांधींच्या अहिंसावादाविषयीं अत्यंत दृढ श्रद्धा आहे हेंही याच पुस्तकांत दिसेल. श्री. गाडगीळ यांच्या अत्यंत स्वच्छ विचारसणीचें हें फल आहे असे मला वाटतें. एखाद्या व्यक्तीच्या आदराच्यापायीं अनेक बुद्धिवंतांची बुद्धि त्या व्यक्तीपुढें पांगळी ठरते हें मी पाहतों तेव्हां श्री. गाडगिळांच्याविषयीं मला जास्तच आदर वाटूं लागतो.

पण निःशस्त्र प्रतिकार, अहिंसावाद हाच जनतेच्या हातीं असलेला एकमेव मार्ग आहे. कोणत्याही देशांतल्या जनतेला दिवसेंदिवस आणि अखेरशेवटीं हाच मार्ग पत्करावा लागणार आहे, हेंही सांगतांना श्री. गाडगीळ गांधीं-विषयीं आपली तक्रार विसरलेले नाहींत. श्री. गाडगीळ शास्त्रीय दृष्टीनें असें पटवून देतात कीं, शस्त्रास्त्रें वापरण्याची परवानगी असली तरी हल्लीं जगांतील शस्त्रांचें शास्त्र इतकें प्रचंड होत चाललें आहे कीं, तें फक्त मोठाले सत्ताधीशच सांभाळू शकतील ! राजसत्ता जीं शस्त्रें बाळगते तीं शस्त्रें प्रजेला बाळगण्याची परवानगी मिळाली तरी, प्रजा बाळगूं शकणार नाहीं. अंतर्गत संघटनेनेंच प्रजेला अखेर आपला लढा जिंकावा लागतो, हें श्री. गाडगीळ यांनीं अनेक उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. राष्ट्राराष्ट्रांतील युद्धें हीं वस्तुतः वर्गयुद्धेंच होत. कारखानदारांना माल खपविण्यासाठीं देश पाहिजे असतात व त्यामुळें युद्धें उत्पन्न होतात हें गाडगीळ यांचें विवेचन त्यांचेंच ‘ समाजवादाचा ओनामा ’ हें पुस्तक न वाचतांही समजेल इतक्या खुलासेवार केलें आहे. कारखानदार—भांडवलवाले यांनीं स्वार्थासाठीं केलेल्या अनन्वित पापांचीं त्यांनीं ठिकठिकाणीं टिपणें केलीं आहेत तरीसुद्धां त्या कारखानदार-भांडवलदारांविषयींचा त्वेष व्यक्त करतांना ते गाफीलपणानें कम्युनिस्टांच्या हातावर टाळी देत नाहींत !

कम्युनिस्ट ! ‘हिंदी कम्युनिस्टांची चूक कोणती ?’ या लेखांत श्री. गाडगीळ यांनीं “ कम्युनिस्टांचें ” काय भेसूर चित्र रंगविलें आहे—आणि त्याच लेखाच्या

शेवटीं कम्युनिस्टांच्या अंगच्या प्रशंसनीय गुणांची यादी—आणि समारोपांत कम्युनिस्टांवर हा केलेला प्रहार—त्यांच्याविषयींच्या तळमळीनेंच केल्याचा निर्वाळा! असेंसुद्धां वाटतें कीं हें सर्व श्री. गाडगीळ यांनीं लिहिलें आहे म्हणून प्रत्यक्ष कम्युनिस्टसुद्धां मनापासून वाचतील! दुसऱ्या एखाद्या लेखकानें जर असें धाडस दाखविलें असतें तर श्री. गाडगीळ यांनींच वर्णन केलेली 'कम्युनिस्ट' ट्रीटमेंट त्या अन्य लेखकाला मिळाली असती!

कम्युनिस्टांबद्दल—हिंदी कम्युनिस्टांबद्दल श्री. गाडगीळ यांना विलक्षण चीड असली तरी कम्युनिस्टांमधील 'संघटनातंत्राचें' महत्त्व हेंच देशान्य भवितव्याच्या दृष्टीनें उपयोगी पडणारें आहे हें श्री. गाडगीळ यांनीं "अहिंसावादाचें भवितव्य" वर्तवितांना सांगितलें आहे!

धंदेवाईक क्रांतिकारक पाहिजेत, हौशी देशभक्त आतां निरुपयोगी ठरले आहेत असें श्री. गाडगीळ आवेशानें प्रतिपादीत आहेत. असे धंदेवाईक क्रांतिकारक विद्यार्थि-वर्गांतून तयार केले पाहिजेत. प्रौढपणीं व्यवसाय संभाळून देशसेवा करणारे पुढारी, कोणत्याही कार्याची परंपरा टिकविण्यास अपुरे पडतात हें आतां सामान्य माणसालाही कळूं लागलें आहे! श्री. गाडगीळ यांनीं आजच्या लोकसेवकांची कसून तपासणी केली आहे—आणि त्यांना त्यांच्या कार्याची पावती देऊन मोकळें करावें आणि तरुणांनीं त्यांच्या जागा घ्याव्या हें श्री. गाडगीळ यांनीं कोणाच्याही मोठेपणाचें दडपण न बाळगतां सांगितलें आहे!

या पुस्तकात श्री. गाडगीळ यांनीं पाकिस्तानविषयीं बरेंच लिहिलें आहे. 'पाकिस्तान' दिलें तरी घेतां येणार नाहीं, हें श्री. गाडगीळ यांनीं सविस्तर दाखविलें आहे. कोणत्याही भावनेच्या आहारीं न जातां त्यांनीं पाकिस्तानच्या योजनेंतील दोष व अव्यवहार्यता उघड केली आहे. परंतु या ग्रंथांतील श्री. गाडगीळ यांचे विचार वाचून श्री. गाडगीळ आतां येत्या एक दोन महिन्यांत काय लिहितील तें वाचण्यास मी अतिशय उत्सुक आहे.

श्री. गाडगीळ यांच्याविषयीं अल्पपरिचयांतही आपुलकी वाटावी आणि परिचय वाढविण्याविषयीं उत्कंठा वाटावी—भेटीसाठीं उत्सुक व्हावें हेंच श्री. गाडगीळ यांच्यांतील मुख्य आकर्षण आहे. श्री. गाडगीळ यांचीं

मतें राजकारणाच्या वादविवादांत गर्जत आहेत. तेथें त्यांचा शेअरबाजार चालू आहे. माझ्यासारख्याला त्या बाजारांतील शेअरपेक्षां तेथील गिल्लाच फक्त ऐकूं येतो; पण त्या गोंधळांतही माझे स्नेही श्री. गाडगीळ यांचा आवाज ऐकला कीं मला थांबावेंसें वाटतें. श्री. गाडगीळ यांचें आणि माझें नातें त्यांच्या राजकीय मतांपेक्षां फार खोल अशा अंतःकरणांत रुजलें आहे. नाहीं तर त्यांच्या या 'दृष्टिकोनाला' प्रस्तावना लिहिण्याच्या त्यांच्या आग्रहाला मी कशाला बळी पडलों असतों ? श्री. गाडगीळ यांची दृष्टि जेथें खिळली आहे–त्या प्रांतापासून मी इतका दूर आहे कीं, मला फक्त त्या प्रांतांत श्री. गाडगीळ यांची आकृति दिसते. श्री. गाडगीळ हे त्यांच्या दृष्टिकोनांतून जें जग पाहतात तें वाचकांच्या सोईसाठीं मी प्रसिद्ध करीत आहे. मला त्या जगापेक्षां श्री. गाडगीळ यांच्यामधील अथांग माणुसकी –प्रामाणिकपणा आणि सीधेपणा याच गोष्टी जास्त प्रिय आहेत. त्या इतक्या प्रिय आहेत कीं, श्री. गाडगीळ यांच्यापेक्षांही अगदीं विरुद्ध विचारसरणीच्या माणसाच्या अंगांतही त्या दिसल्या तरी त्याही व्यक्तीबद्दल आणि त्याच्या लिखाणाबद्दल मला श्री. गाडगीळ यांच्याइतकाच जिव्हाळा वाटेल ! आणि म्हणूनच प्रत्येकाच्या वृत्तींत मनस्वी अंतर असूनसुद्धां सानेगुरुजी, शि. ल. करंदीकर आणि पां. वा. गाडगीळ यांच्या लेखनाची आणि चारित्र्याची माझ्यावर फार मोठी मोहिनी आहे–हा माझा दृष्टिकोन !

पुणें, ता. ९।९।१९४४ } यशवंत गोपाळ जोशी

★

# स मा रो प

गेल्या १२।१४ वर्षांत मीं लिहिलेल्या अनेक लेखांपैकीं कांहींचा हा संग्रह आहे. परिशिष्टांतील 'धर्मविषयक संवाद' मीं वीस वर्षांपूर्वींच लिहिला. एका वेळीं मला त्या विषयानें फार व्यथा दिली. पण आतां मीं तो विषय डोक्यांतून काढून टाकला असल्यानें तो परिशिष्टांत घातला आहे.

'गांधीवादावरील क्ष किरण' हा संवाद गांधींची टवाळी करण्यासाठीं लिहिला नाहीं. तर गांधींच्या विचारांचें वास्तव स्वरूप समजावें म्हणून लिहिला आहे. दहा वर्षांपूर्वींचें तें लिखाण कितपत खरें ठरलें हें वाचकांनीं तपासून पाहावें. माझी अहिंसावादासंबंधींचीं मतें वेगळ्या लेखांत आलींच आहेत.

चालू युद्धावरच यांतलें पुष्कळसें लेखन आहे. युद्ध तर संपत आलें असें म्हणतात. तथापि जगांत ब्रिटिशांना जबर प्रतिस्पर्धी या वेळीं शिल्लक राहणार असल्यानें जगांतील युद्धें फार काळ थांबून राहणार नाहींत व युद्धपरिस्थिति कायमच राहणार आहे. माझ्या मतें हा 'नित्ययुद्धा'चा कालखंड असून जगांतील साम्राज्यशाही संघटना मोडून जाईपर्यंत हा 'नित्ययुद्धा'चा कालखंड कायम राहील. या विषयाची विशेष चर्चा आतां येथें शक्य नाहीं.

या लेखसंग्रहास 'माझा दृष्टिकोन' असें नांव दिलें, याचें कारण, माझा म्हणून एक विशेष दृष्टिकोन या लेखांत आहे असें मला वाटतें हें होय. तो दृष्टिकोन मार्क्सचा आहे असेंही मला वाटतें; पण मार्क्सवादाबद्दलचा कोणी मक्तेदार हरकत घेईल तर त्याजशीं भांडण नको म्हणूनही 'माझा दृष्टिकोन' हें नांव संग्रहास दिलें आहे.

तरुण, कॉंग्रेसवादी व क्रांतिप्रवण कार्यकर्त्यास या दृष्टिकोनांतून मार्गदर्शन मिळेल अशी अपेक्षा आहे. कागद-महागाईच्या या काळांत य. गो. जोशी यांनीं हें ओझें उचललें व माझ्या विनंतीप्रमाणें समग्र पुस्तक वाचून त्यांनीं जी प्रस्तावना लिहिली तीबद्दलही त्यांचे आभार मानतों. हे लेख लिहिण्याची ज्यांनीं मला प्रथम संधि दिली व नंतर प्रसिद्धीस परवानगी दिली त्यांचाही मीं आभारी आहें. तसेंच राजगुरु प्रेसचेही आभार मानतों.

पां. वा. गाडगीळ

# अनुक्रमणिका


१ माझें लेखक-जीवन १
२ ब्रह्मविद्या आणि नीतिशास्त्र ८
३ हिंदी कम्युनिस्ट पक्षाची चूक कोणती? १८
४ आधुनिक भारतांतील कृष्ण आणि भीष्म ३५
५ समाजवादच कां हवा! ४९
६ सोशॅलिझमचा सूड! ५७
७ मालकी हक्काची गरज संपली ६१
८ आंतरराष्ट्रीय राजकारणांतील वर्गीय दृष्टि ६७
९ कॉंग्रेसची घटना-समितीची मागणी ७७
१० क्रिप्स आणि कॉंग्रेस-समेट अशक्य कां झाला? ८६
११ पाकिस्तान आणि मध्य युरेशियन मुसलमानी साम्राज्य ९६
१२ जिनांचें पाकिस्तान व कम्युनिस्टांचा स्वयंनिर्णय १०९
१३ कॉंग्रेस-वर्किंग-कमिटीचा सर्वोत्तमनिर्णय ११९
१४ वर्ध्याच्या रणांगणावरील उभय पक्षांचें स्वरूप १२५
१५ मलायांतील पीछेहाटीनें काय शिकविलें! १२९
१६ नवें जग आणि नवीं तत्त्वें १३३
१७ चालू महायुद्धांतून विकास पावणारा हिंदुस्थान १४७
१८ अहिंसावादाचें भवितव्य १६८
१९ गांधीच्या तत्त्वज्ञानावर 'क्ष' किरण १८३
२० जगावें कीं मरावें? किंवा मानव कुलाचा शेवट १९६

# श्री. पां वा. गाडगीळ

## यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | समाजवादाचा ओनामा (द्वितीयावृत्ति) | १–८–० |
| २ | रशियांतील राज्यक्रांति | ३–०–० |
| ३ | कॉंग्रेस आणि महायुद्ध | २–०–० |
| ४ | सुलभ समाजवाद | १–०–० |
| ५ | फॅसीझम | १–०–० |
| ६ | अराज्यवाद | १–०–० |
| ७ | मार्क्सचा भौतिकवाद | १–०–० |
| ८ | मार्क्सच्या कॅपिटलचा सारग्रंथ | १०–०–० |
| ९ | माझा दृष्टिकोन | ३–०–० |

प्रत्येक पुस्तकास पोस्टेज निराळें.

य. गो. जोशी-प्रकाशन ६२२/१९ सदाशिव, पुणें २.

# माझें लेखक-जीवन

माझ्या दाढीला साबण लावीत असतां तो माझ्याकडे अगदीं निरखून पाहत असल्याचें समोरच्या आरशांत पाहून मी चमकलों. पण जिज्ञासा आणि भीति दडपून ठेवण्याहून त्या वेळीं अधिक कांहीं करणें मला शक्य नव्हतें. हळूहळू त्यानें वस्तरा चालू केला. त्याचें मजकडे निरखून पाहणें चालूच होतें. त्याच्या चेहऱ्यावर किंचित् स्मित झळकूं लागलेलें मला दिसलें. वस्तऱ्याचा दुसरा हात दाढीवरून फिरून गेला व साफसफाई सुरू झाली.

"तुम्ही सांगलींतले ?" पॉवडरचें फूल माझ्या तोंडावरून फिरवतांना त्यानें विचारलें.

"नाहीं. मी काल मुंबईहून आलों."

"तिथं काय करतां ?"

"मी एका वर्तमानपत्रांत नोकर आहे." मला माझी फारशी ओळख द्यायची नव्हती म्हणून मीं मोघम उत्तर दिलें.

"तुम्ही पां. वा. गाडगीळ का ?"

आतां मात्र मी खजील झालों. थोडासा आनंदलोंहि. "मला तुम्ही ओळखतां ?" मीं विचारलें.

"नवयुग आणि धनुर्धारीमध्यें तुमचा फोटो आला आहे त्यावरून मीं

तुम्हांला ओळखलं. मी तुमचं लिहिणं नेहमीं वाचतों. आत्तांच आज 'समाजवादाचा ओनामा' संपवून आलों."

वर लिहिली ही सत्यकथा आहे. गेल्या ता. २८ डिसेंबर रोजीं राष्ट्रसेवादलाच्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सांगलीस मी गेलों होतों. तेथें माझ्या मामांच्या दुकानासमोरील 'नवयुग' हेअरकटिंग सलूनमध्यें श्री. आत्माराम साळुंखे यांनीं हा अमृतवर्षाव मजवर केला.

श्रेष्ठ कादंबरीकारांच्या कादंबऱ्या व कथा सरदार-संस्थानिकांपासून तों दुकाननोकरांपर्यंत सर्वजण आवडीनें वाचतात हें मला माहीत आहे. आमचें वाङ्मय असें सर्वांकडून वाचलें जात नाहीं. महाराष्ट्रांत जावडेकर, गोरे, महाजनी, सुंठणकर, भुस्कुटे, कोल्हटकर, लक्ष्मणशास्त्री, मी वगैरे आम्ही जे समाजवादी लेखक पुस्तकरूपानें वाङ्मय लिहून समाजवादी विचारसरणीचा प्रसार करीत आहों त्या आम्हांला ललित साहित्यिकांना मिळणारा प्रचंड वाचकवर्ग मिळूं शकत नाहीं. जे वाचक आम्हांला मिळतात त्यांतले विकत घेऊन वाचणारे फार थोडे; आणि राजकीय पक्षभेदांच्या अढीनें हे थोडेसे वाचक ग्रासलेले असल्यानें आमचा गौरव होतो त्यापेक्षा दूषणेंच फार खावीं लागतात. पण अशाहि प्रतिकूल परिस्थितींत वरीलसारखे प्रसंग येतात आणि सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितींत हें जें रुक्ष लेखनकार्य आम्ही करीत असतों त्या खरखरीत वाळवंटांत अशा एखाद्या प्रसंगानें पाण्यानें थबथबलेली हिरवळ भेटल्याचा आनंद आम्हांला अनुभवतां येतो. खरोखर श्रमजीवी वर्गासाठीं आणि त्या वर्गाच्या सेवेला वाहून घेतलेल्या कार्यकर्त्यांसाठींच आम्ही समाजवादी लेखक आमचें हें लेखनकार्य करीत असतों. समोर बसलेले श्रोते कोण आहेत हें पाहून वक्त्याला आपलें व्याख्यान सजवावें लागतें; त्याप्रमाणें प्रत्येक लेखक आपल्या लेखनाचें स्वरूप, त्याचा वाचक कोण असणार आहे हें लक्षांत घेऊन, ठरवीत असावा असा माझा समज आहे. रामायणाचें पुराण चालू असतां पुराणिकबुवांसमोर नेहमीं एक रिकामा पाट ठेवलेला असतो. त्यावर मारुती अदृश्यपणें बसून रामायण ऐकतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. मी लिहीत असतांना माझ्यासमोर असा एक श्रोता अदृश्यपणें बसलेला असतो. गांधींच्या राजकारणांत उडी घेणारा, पण शक्य तितक्या लवकर मार्क्सच्या विचारसरणीस सुसंगत असें

नवें राजकारण येथें उभारलें पाहिजे अशी सुप्त अथवा व्यक्त तळमळ बाळग-णारा कॉंग्रेसमधील अथवा शेतकरी-कामकरी-विद्यार्थि-संघटनेंतील तरुण हा माझा वाचक आहे व त्यासाठीं मी लिहितों. ललितप्रेमी मध्यम वर्गीय स्त्री-पुरुष आमचें वाङ्मय वाचीत नाहींत. निव्वळ गांधीवादी व इतर कॉंग्रेस पुढाऱ्यांकडून आणि इतर पक्षांतल्या पुढाऱ्यांकडून माझें व माझ्या इतर लेखकबंधूंचें वाङ्मय वाचलें जात नाहीं. माझे प्रकाशक य. गो. जोशी यांची तर एका पुढाऱ्यानें चांगलीच शोभा केली होती.

"तुम्ही मराठींत हीं पुस्तकं काढतां; पण आम्ही हा विषय मुळांत इंग्रजीं-तून वाचतों आणि आम्हांला तो समजतो. उलट ज्यांना इंग्रजी येत नाहीं त्यांना हा मराठींतून तरी कसा समजणार? कारण मराठींत या विषयाची परिभाषाच मुळीं नाहीं. लिहिणाऱ्यांचें लेखन अगदीं भाषांतरवजा वाटतें." सदर पुढाऱ्यानें ही टीका माझें पुस्तक हातांत घेऊनच केली होती म्हणून मला थोडेंसें वाईटहि वाटलें. पण कॉंग्रेसमधील तरुण कार्यकर्त्यांत आतां अशीं पुस्तकें हळूहळू वाचलीं जाऊं लागल्यानें आपणांस बरेंच कळतें असें मान-णाऱ्या पुढाऱ्यांकडून अवहेलना झाली तरी त्याची आतां फारशी फिकीर वाटत नाहीं.

कांहीं पुढारी नवविचार लिहिणाऱ्या लेखकाची हेटाळणी करतात हें खरेंच. पण मला समाजवादी लेखनाच्या कामीं पहिलें उत्तेजन महाराष्ट्रांतील कांहीं मोठ्या राजकीय पुढाऱ्यांकडूनच मिळालें आहे. जावडेकर हे माझे समाज-वादी लेखनांतले पहिले मार्गदर्शक होत. ते पुढारी आहेत तसेच ध्येयवादी लेखक आहेत. त्यांनीं कांहीं दिवस मला मार्गदर्शन केल्यावर माझा अभ्यास माझा मीच वाढवून लिहूं लागलों. समाजवादावरील पहिली लेखमाला मीं 'केसरीं'त प्रुफ-करेक्टर असतां लिहिली. त्यांतले कांहीं लेख माझ्या नांवावर आणि कांहीं लेख मीं निनांवी अथवा टोपण-नांवानें लिहिले. ज. स. करंदीकर व न. चिं. केळकर यांनीं या कामीं मला फार उत्तेजन दिलें व बहुमोल साहाय्य केलें. प्रथम जावडेकरांचीं पुस्तकें मी वापरीत असे; हळूहळू मी स्वतःच्या संसाराची आबाळ करून महत्त्वाचीं पुस्तकें विकत घेऊं लागलों. पुढें केळकरांनीं 'केसरी' संस्थेसाठीं नवी ग्रंथशाळा सुरू करून इतकीं चांगलीं पुस्तकें घेतलीं, कीं महाराष्ट्रांत आज 'केसरी'चा ग्रंथसंग्रह हा राजकीय दृष्ट्या

अव्वल दर्जाचा ठरेल. 'केसरीं'त प्रुफ-करेक्टर असतांना व पुढें 'मराठ्यां'त पर्वते यांच्या हाताखालीं उपसंपादक असतां मीं या दोन्ही पत्रांत खूप मेहनतीनें लिहिलें आहे. निव्वळ समाजवादाचें तात्त्विक लेखन तर मीं तेथें केलेंच; पण त्या वेळच्या प्रचलित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विषयांसंबंधानें अनेक लेख मीं लिहिले व त्यांपैकीं कांहीं केसरीच्या व मराठ्याच्या संपादकांनीं अग्रलेख म्हणून घातले होते.

'केसरीं'त माझा अग्रलेख आला त्या दिवशींचा माझा आनंद अवर्णनीय होता. केळकर-करंदीकरांचा माझा टिळक महाविद्यालयापासून परिचय. १९२५ सालीं मी कांहीं दिवस केळकरांच्याकडे लेखक म्हणूनहि होतों. वाचण्याचा व अभ्यासाचा मला नाद आहे याचें केळकरांना फार कौतुक वाटे. १९३१ सालीं डी व्हॅलेरानें आयर्लंडांत राजनिष्ठेच्या शपथेचा वाद माजविला त्यासंबंधानें केळकरांनीं मुद्दाम मला साधनें पुरवून आयर्लंडच्या त्या पेचप्रसंगासंबंधानें मजकडून लेख लिहवून घेतले, ते स्वतः 'एडिट' केले व केसरींत घातले. 'सह्याद्री'च्या पहिल्या अंकांत 'पासिफिक महासागरांतील राजकारण' हा लेख मीं लिहिला तो केळकरांच्याच सांगण्यावरून आणि त्यांनीं साधनें पुरविल्यामुळें. करंदीकर, भावे, गोखले, पर्वते, काळे या सर्वांनीं मला केसरी, मराठा व सह्याद्रि यांत लिहिण्यास भरपूर संधि व उत्तेजन दिलें. इतर कारणें घडलीं नसतीं तर मीं 'केसरी-मराठा' संस्था कधींच सोडली नसती इतके माझे तेथले दिवस चांगले गेले.

केळकरांनीं मला लेखनाच्या कामीं उत्तेजन दिलें. तसेंच शंकरराव देवांनीं माझें 'समाजवादाचा ओनामा' हें पुस्तक मुद्दाम कॉंग्रेसमधील कार्यकर्त्यांना हा विषय समजायला पाहिजे म्हणून माझ्याकडून लिहवून घेतलें. मतांच्या बाबतींत देवांनीं मजवर मुळींच बंधन घातलें नाहीं. शेवटचें 'हिंदुस्थान आणि समाजवाद' हें प्रकरण देव, एस्. एम्. जोशी आणि मीं असें तिघांनीं वाचलें. त्यांत गांधींच्यावर प्रखर टीका आहे; तिला देवांनीं मुळींच आक्षेप घेतला नाहीं. फक्त कायद्याच्या दृष्टीनें कांहीं दुरुस्त्या सुचविल्या व मला त्या पटल्या म्हणून मीं स्वीकारल्या. त्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा खर्च त्यांनीं त्यांच्या राष्ट्रीय वाङ्मयप्रसारक मंडळामार्फत केला. पुढें १९३५ च्या आरंभीं पुण्यास 'लोकशक्ति' पत्र कॉंग्रेस पक्षाचा पुरस्कार करण्यासाठीं काढण्याचें ठरल्यावर

जावडेकर आणि देव यांच्या आमंत्रणावरून मी केसरी-मराठा सोडून 'लोकशक्ती'त आलों. त्या वेळीं केळकरांना वाईट वाटलें व रागहि आला. "मी रागावलोंहि नाहीं, मला वाईटहि वाटलें नाहीं आणि केसरीचें तुमच्यावांचून अडणारहि नाहीं" असें एक मोठें ठसकेबाज पत्र त्यांनीं मला त्या वेळीं लिहिलें आहे; त्यावरूनच त्यांचा राग आणि दुःखहि व्यक्त होत होतें. 'केसरी'शीं माझा संबंध अशा प्रकारें सुटला आणि पुढें राजकीय प्रतिपक्षी या नात्यानें केसरीवर प्रखर टीकाहि वेळोवेळीं करावी लागली; तथापि केसरींत मला मिळालेली उत्तम वागवणूक आणि सर्व संपादकांनीं मला तेथें दाखविलेली आपुलकी यांचा विसर मला कधींच पडलेला नाहीं.

केसरी-मराठ्यांत मी चार वर्षें होतों आणि नंतर 'लोकशक्ती'त पांच वर्षें होतों. लोकशक्तींत जावडेकर प्रथम अडीच वर्षें मुख्य संपादक होते व पुढें अडीच वर्षें देव मुख्य संपादक होते. 'केसरी'त मी लिहायला शिकलों त्याप्रमाणें 'लोकशक्ती'त मी सर्व संपादकीय काम शिकलों. प्रचलित विषयांचा विचार करायला शिकण्याचें तिथलें मोठें साधन म्हणजे जावडेकरांशीं गप्पा मारणें. जावडेकर हें एक चालतें बोलतें ग्रंथालय आहे. मार्मिक आणि सडेतोड टीका हा त्यांचा हातखंडा असून खाजगी बैठकींत प्रचलित राजकारणाची ते फार चांगली चर्चा करतात. 'लोकशक्ती'त अशा चर्चा नेहमीं चालत. केव्हां केव्हां देव येत. तेहि अशा चर्चेत भाग घेत. त्यामुळें कॉंग्रेसच्या गोटांतील पुढाऱ्यांचीं मनें कळण्याच्या दृष्टीनें या चर्चा महत्त्वाच्या ठरत. अग्रलेख जावडेकर लिहीत. ते हजर नसले म्हणजे मी लिहीत असें. तिथें तारा व इतर भाषांतरें करणें, सभांचे रिपोर्ट घेणें, लिहून आलेल्या मजकुराचें संपादन करणें, पानांची सजावट करणें, रात्रपाळीचीं व दिवसपाळीचीं कामें करणें या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव मला 'लोकशक्ती'त मिळाला. जावडेकरांच्यानंतर देव संपादक झाले. पण देव नेहमीं फिरतीवर असत; त्यामुळें रोजच्या रोज अग्रलेख लिहिण्याचें काम मला करावें लागे. 'हरिजन'चें भाषांतरहि आम्ही कित्येक महिने देत होतों तें मीच करीत होतों. यामुळें दैनिक पत्राच्या संपादनास लागणारा बहुविध अनुभव मला तिथें सक्तीनें मिळाला. लोकशक्तीनंतर मी 'नवयुग'मध्यें दहा महिने होतों व आतां गेलीं दोन वर्षें 'लोकमान्यां'त आहे; आणि 'लोकशक्ती'तला अनुभव मला आज फार उपयोगी पडतो आहे.

वृत्तपत्रांतलें लेखन करीत असतांच समाजवादी पुस्तकें लिहिण्याचें व त्यासाठीं अभ्यास करण्याचें कामहि मी गेलीं आठ वर्षें सतत करीत आहें. माझें 'समाजवादाचा ओनामा' हें पुस्तक य. गो. जोशी यांना आवडलें व त्यांनीं माझें 'रशियन राज्यक्रांति' हें पुस्तक छापण्याचें कबूल केलें. त्या वेळीं तें पुस्तक अर्धेंहि लिहून झालें नव्हतें. तरीहि य. गो. नीं पुस्तक घेण्याचें धाडस दाखविलें याचा मला अचंबा वाटला. तें त्यांनीं प्रसिद्ध केल्यावर 'वादविवेचनमाले'ची कल्पना त्यांच्या व माझ्या बोलण्यांत एकदा निघाली. ती त्यांनीं लगेच कायम केली, विषयांची यादी केली, लेखक मिळविण्याची सर्व खटपटहि त्यांनींच केली. पण संपादक होण्याचा मान मात्र मला दिला. मुख्य संपादक हा दर्जा मला या प्रकारें प्रथम य. गो. जोशी यांनीं दिला आहे. वादविवेचनमालेचीं एकूण १२ पुस्तकें साडेसत्तावीसशें पानांचीं असून त्यांपैकीं बाराशें पानांचीं एकुण पांच पुस्तकें मीं लिहिलीं आहेत. सर्वच लेखकांचीं पुस्तकें अतिशय चांगलीं झालीं आहेत; त्याचें श्रेय त्या त्या लेखकांना व त्यांची निवड करणाऱ्या य. गो. जोशी यांना आहे.

माझें पुस्तक-लेखन अधिक महत्त्वाचें, कीं वृत्तपत्रांतील लेखन हें माझें मला सांगतां येत नाहीं. मी नेहमीं अभ्यास आणि चिंतन जें करतों त्यांतूनच या दोहोंचीहि उत्पत्ति होत असून दोन्हींबाबत मला सारखाच जिव्हाळा आहे. वृत्तपत्रसंपादन हा माझा आवडीचा व्यवसाय मला करायला मिळतो हें माझें भाग्य होय. पण कोणत्याच राजकीय पक्षाशीं बिलगून न राहतां त्रयस्थपणें वृत्तपत्र चालविणें मला आवडत नाहीं व तें मला करतांहि येणार नाहीं. कॉंग्रेस पक्षाशीं पूर्णपणें जमत नाहीं तरी मी कॉंग्रेसमध्यें राहतों तो यामुळें. कॉंग्रेस समाजवादी पक्षांत असल्यामुळें समाजवादाचा अभ्यास करण्याची मला विशेष संधि मिळाली. पक्षाच्या अभ्यास-मंडळांत दरसाल कांहीं आठवडे मी व्याख्यानें देत असें व त्यासाठीं विशेष तयारी करावी लागे. या तयारींतूनच माझीं पुस्तकें आणि वृत्तपत्रीय लेखन निर्माण झालें आहे. कॉंग्रेस समाजवादी पक्षामुळें भावनेला पोषक असें राजकीय वातावरण आणि जिव्हाळ्यानें प्रेम करणारे पक्षांतील स्नेही मला मिळाले. मला जो थोडाफार आत्मविश्वास प्राप्त झाला आहे तो त्याच्यामागें या मित्रांची शक्ति उभी आहे म्हणून. ते जें समाजकार्य करीत आहेत त्यास त्यांच्या रांगेंत उभा राहून हातभार लावणें याहून कोणतीहि

अधिक मोठी महत्त्वाकांक्षा मला नाहीं. श्रमजीवी वर्गाचे सेवक आणि श्रमजीवी वर्गांतले बुद्धिमान लोक माझें वाङ्मय समजून घेतात यांतच मला समाधान आहे.

मीं वकील होऊन पुढारी व्हावें अशी माझ्या कांहीं नातलगांची इच्छा होती; पण मीं त्यांची निराशा केली. मीं वृत्तपत्राचा मुख्य संपादक व्हावें अशी माझे मित्र राजगुरु यांची फार इच्छा होती. माझ्या अंगीं ती पात्रता आहे, याचा मजपेक्षां त्यांना अधिक विश्वास होता. त्यांनीं त्यासाठीं प्रयत्नहि केले; पण ते फसले. माझ्याबद्दल विशिष्ट आशा बाळगून मला त्यांनीं फार साहाय्य केलें.

मला वेळोवेळीं जी संधि व साहाय्य मिळालें त्यामुळें माझें लेखक-जीवन मी आतांपर्यंत घालवूं शकलों. पण ज्या एका व्यक्तीच्या सहकार्याशिवाय माझ्या हातून कांहींहि होऊं शकलें नसतें तिचा उल्लेख इथें केला पाहिजे. ही व्यक्ति म्हणजे माझी पत्नी इंदु. तिचें शिक्षण फार झालेलें नाहीं. तथापि मला थोर विचारांचा उमाळा आहे याचें तिला नेहमीं कौतुक वाटे. दुखणीं व दारिद्र्य यांनीं माझें आयुष्य फार व्यापलेलें आहे. पण इंदूनें हालअपेष्टा आणि काळजी यांना न जुमानतां आपली व माझी समाधानी वृत्ति भंगूं दिली नाहीं. त्यामुळें विचार व विद्याभ्यास यांस उत्तेजन व अनुकूल वातावरण मला घरांत मिळालें. माझ्या लेखनकार्याचें बहुतेक श्रेय या गृहपरिस्थितीला आहे. माझ्या लेखनकार्यापासून आर्थिक फायदा झाला नाहीं तरी इंदूला त्याचा अभिमान वाटतो. पण या विषयावर अधिक लिहिण्याचा फारसा उपयोग नाहीं. ज्यांना पत्नीचें असें साहाय्य झालें नसेल त्यांना तें शब्दांनीं लिहिलें तरी कळणार नाहीं व अनुभवी असतात त्यांना तें सांगण्याची जरूरीच नाहीं.

—'मनोहर', मार्च १९४३

# ब्रह्मविद्या आणि नीतिशास्त्र : : २

गेल्या मुंबई मराठी साहित्य-संमेलनांत आचार्य शंकरराव जावडेकर यांनीं जें अध्यक्षीय भाषण केलें त्यावर मीं 'लोकमान्यां'त प्रतिकूल टीका केली. या टीकेनें खवळून जाऊन एका वृत्तव्यवसायबंधूनें 'अरे, हा अर्धवट ज्ञानानें माजला' असें मजसंबंधानें लिहिलें आणि जावडेकरांपासून शंकराचार्यांपर्यंत सगळ्या थोरांच्या चुका काढण्याआधीं मीं पंचांसमक्ष वेदान्तविषयक वादविवाद करून वेदान्त विषयांत बोलण्याची लायकी सिद्ध करावी व मग टीकेसाठीं लेखणी उचलावी अशी मला ताकीद दिली. पण मी यांतलें कांहीं-ही करणार नाहीं. निवळ शास्त्रीय विषयांत सामान्य माणसानें तोंड खुपसूं नये हें खरें. पण जे विषय नित्याच्या जीवनावर परिणाम घडवीत असतात त्यासंबंधानें समजेल तितकें बोललें पाहिजे, अधिक समजून घेतलें पाहिजे आणि शास्त्र आपणाला कळतं नसलें तरी त्याचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम जसा आपणांस कळेल तसा बोलून दाखविला पाहिजे. जावडेकरांनीं आपल्या भाषणांत प्रत्यक्ष जीवनाचा कांहीं विषय आणला नसता आणि त्यांनीं ज्या ब्रह्मविद्येचें स्तोत्र गायिलें त्या ब्रह्मविद्येंतील ब्रह्मानंदाचें रसाळ वर्णन तेवढेंच केलें असतें तर मी बहुधा कुणालाच न मिळणाऱ्या त्या आनंदासंबंधानें बेफिकीर राहिलों असतों! पण जावडेकरांनीं तसें न करतां

ब्रह्मविद्येला प्रत्यक्ष मानवी जीवनावर आणून बसविलें आहे. म्हणून त्याची उपेक्षा करतां येत नाहीं. मोटार चालविण्याचें शास्त्र मला माहीत नाहीं. पण एखाद्या अगदीं तज्ज्ञ अशा मोटारहाक्यानें माझ्या अंगावर मोटार घालून माझी तंगडी मोडली तर 'हा शास्त्रज्ञ आहे, आपणाला काय यांतलें कळतें' म्हणून उलट त्यालाच नमस्कार करून जवळच्या फुटपाथवर मीं मुकाट्यानें वळवळत पडावें काय ? जावडेकरांनीं पुरस्कारिलेल्या ब्रह्मविद्येनें आजवर समाजाचें नुकसान झालें अशी माझी खात्री झाली असेल तर केवळ वेदान्तशास्त्राचा खोल अभ्यास मीं केलेला नाहीं अथवा मला आत्मसाक्षात्कार झाला नाहीं म्हणून मीं आजवर झालेलें नुकसान यापुढेंही सहन करणें योग्य नाहीं. हिंदी जनता ब्रिटिशांनीं आम्हांवर लादलेल्या राज्यघटनेस प्रतिकार करीत आहे. पण राज्यघटनाशास्त्राचा संपूर्ण अभ्यास आम्हांपैकीं कुणी केला आहे ? आणि संपूर्ण अभ्यास कशाचा तरी कुणी करूं शकेल काय ? जावडेकरांनीं ब्रह्मविद्या ही नीतिशास्त्राचा आधार व नीतिशास्त्राची निर्णायक म्हणून प्रतिपादिली यामुळें नीतिव्यवहाराशीं नित्य संबंध येणारा व्यावहारिक माणूस म्हणून मला त्या भाषणाचा परामर्श घ्यावासा वाटला. मी विद्वान् असल्याचा अथवा नसल्याचा संबंध त्यांत कांहींही येत नाहीं. माझी टीका प्रसिद्ध झाल्यानंतर जावडेकरांनीं 'कम्युनिस्ट दृष्टीनें कोणी कांहीं घेतलेल्या आक्षेपांना' 'लोकशक्ती'त उत्तर दिलें आहे. त्यांत माझ्या आक्षेपासारखे कांहीं आक्षेप उत्तरासाठीं त्यांनीं घेतलेले दिसतात. जावडेकरांच्या या उत्तरामुळें त्यांच्या मूळ भाषणाची विवाद्यता कमी होण्याऐवजीं वाढली आहे. हा सर्व विषय निवळ शास्त्रज्ञांचा नसून सामान्य माणसांनाच जिव्हाळ्याचा आहे म्हणून मीं 'चित्रे'च्या दिवाळी अंकासाठीं त्याची मुद्दाम निवड केली आहे.

* * *

प्रथम एक गोष्ट सांगतों, कीं मी 'कम्युनिस्ट दृष्टीनें' या विषयाकडे पाहत नाहीं. सेश्वरवादी अथवा चैतन्यवादी विश्वाचें आदिकारण हें चैतन्यमय आहे असें मानतात, तर 'कम्युनिस्ट' हे विश्वाचें आदिकारण जड आहे असें मानीत असल्याचें मी ऐकतों. मला स्वतःला मार्क्सचें या आदिकारणासंबंधाचें मत काय आहे तें नक्की माहीत नाहीं. आणि तें जडच आहे अथवा चैतन्यमय

आहे याबद्दल मार्क्सचें अमुक मत असल्याचें उद्यां मला कळलें तरी तें मी मान्य करावें असें मला वाटत नाहीं. माझ्या मतें विश्वाचें आदिकारण काय असावें याचा शोध केवळ चिंतनानंद भोगण्यासाठीं कोणीही चालू ठेवावा. पण व्यावहारिक दृष्टीनें जगांत वावरणाऱ्यांना त्याच्याशीं कांहींही कर्तव्य असणार नाहीं. विश्वमूल जड आहे असें कोणी 'मानतात'. आणि दुसरे कोणी तें चैतन्य आहे असें 'मानतात'. म्हणजे दोघेही 'मानणारे' अथवा गृहीत धरणारेच आहेत. अनुभव आणि अनुमान या कसोटीस कोणाचेंही 'मानणें' उतरत नाहीं. मग अनुभव व अनुमान यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध येणारें जें नीतिशास्त्र त्याचा या विश्वाच्या आदिकारणाशीं संबंध काय व तो कसा येणार ? 'विश्वघटनेचें व विश्वाच्या विकासाचें सामान्य स्वरूप काय आणि विश्वाच्या आदिकारणाशीं माझा संबंध कशा प्रकारचा आहे, या सिद्धांताचा समावेशही ब्रह्मशास्त्रांत होत असून या ब्रह्मशास्त्रावरून मनुष्याच्या जीवना संबंधींचा सिद्धांत अथवा नीतिशास्त्र ठरत असतें' असें जावडेकरांचें म्हणणें आहे. हें खरें मानलें तर आजवर नीतिशास्त्राचा विकासच काय, पण उदय झाला आहे असेंही म्हणतां येणार नाहीं. पण जावडेकरांसुद्धां आपण सर्वजण नीतिशास्त्र विद्यमान आहे, विकसत आहे असें मानीत आहों.

विश्वाचें आदिकारण जड आहे कीं सचेतन आहे यासंबंधीं कोणताही पुरावा हजारों, लाखों वर्षांच्या मानवी जीवनांत माणसाला कधींही खात्रीलायक असा सापडलेला नाहीं, तरीपण नीतिशास्त्र उदय पावलें आहे व विकसत आहे. तसेंच, विश्वघटनेचें सामान्य रूप व त्याच्या विकासाचें स्वरूप कुठें कुणाला निश्चयानें समजलेलें आहे? कम्युनिस्ट जो विरोधविकासी भौतिकवाद मानतात तो मानवी व्यवहारांत व इतरत्र कोठें कोठें प्रत्ययाला येतो हें खरें. पण तो सिद्धांत विश्वव्यापी आहे असें मानण्यास जगाचें जेवढें ज्ञान माणसाला हवें त्याच्या लक्षांशाही ज्ञान माणसाला अजून झालेलें नाहीं. 'जगाच्या आदिकारणाशीं माझा संबंध कशा प्रकारचा आहे' यासंबंधानें निर्णय ठरविणें हें नीतिशास्त्राला जर अवश्य असेल आणि या आदिकारणासंबंधानें निर्णायक शोध जर अजून कोणीच लाविलेला नाहीं तर नीतिशास्त्र अजून अस्तित्वांत आलेंच नाहीं असें म्हणण्याची आपत्ति पुन्हा येते. जावडेकर ब्रह्मविद्या हा शब्द कोणत्या अर्थानें वापरतात तें समजून न घेतां मी त्यांचेवर टीका

करतों असा एक आक्षेप घेण्यांत आला आहे. पण जावडेकरांचें मूळ भाषण आणि 'लोकशक्ती'त त्यांनीं आक्षेपांना दिलेलें उत्तर यांत त्यांनीं 'ब्रह्मविद्येंत' काय अंतर्भूत होतें याचा स्पष्ट खुलासा केला आहे. "ब्रह्मविद्या या शब्दांत केवळ विश्वाचें आदिकरण जड आहे कीं सचेतन आहे यासंबंधींचा सिद्धांत एवढाच अर्थ नसून त्या आदिकारणाशीं माझा संबंध कशा प्रकारचा आहे व विश्वघटनेचें आणि त्याच्या विकासाचें सामान्य स्वरूप कसें आहे या सिद्धांताचाही समावेश ब्रह्मविद्येंत होतो," असें जावडेकरांनीं स्पष्ट म्हटलें आहे. तसेंच "ब्रह्मविद्या अथवा ब्रह्मशास्त्र म्हणजे विश्वाच्या आदिकारणासंबंधींचें शास्त्र अशी व्याख्या केल्यास ब्रह्मशास्त्र हें प्रधानशास्त्र आहे हें मत सर्वमान्य होईल" असें जावडेकरांना वाटत असून, "या ब्रह्मशास्त्रावरून मनुष्याच्या जीवनासंबंधींचा सिद्धांत किंवा नीतिशास्त्र ठरत असतें" असें जावडेकर ठासून सांगतात. म्हणून या मुद्द्यासंबंधानें माझा जावडेकरांना करावयाचा प्रश्न मी अतिसंक्षिप्त रूपानें सांगतों. तो असा कीं, विश्वाचें आदिकारण काय, तें सचेतन आहे कीं जड आहे, आणि त्याच्याशीं माझा संबंध काय आहे याचें निर्णायक उत्तर समजण्याचें कोणतेंही साधन उपलब्ध झालेलें नसतां हजारों वर्षें जें नीतिशास्त्र विकसत आलें आहे तें (अगदीं गांधींच्या अहिंसावादासुद्धां) निरर्थक समजावयाचें कीं काय?

"समाजाचीं नैतिक मूल्यें ठरवितां येण्यापूर्वी विश्वविकास व विश्वघटना यांसंबंधीं विशिष्ट भूमिका स्वीकारावी लागते असें जावडेकर सांगतात. सृष्टीच्या बुडाशीं सचेतन ब्रह्म आहे हें हिंदु वेदांताचें म्हणणें जसें अनुभव व अनुमान या कसोटीस उतरत नसल्यानें नुसतें गृहीत धरावें लागतें, तसेंच सृष्टीच्या बुडाशीं जड तत्त्व आहे हें कम्युनिस्टांचें मतही अनुभव व अनुमान या कसोटीस उतरणारें नसून नुसतें गृहीत धरावें लागतें. माझ्या मतें सृष्टीच्या बुडाशीं नेमकें काय आहे हें जर कळत नसलें तर तें गृहीत धरण्याची आवश्यकताच काय? विद्यमान जीवनांतील सुखदुःखाची कार्यकारणमीमांसा कळत नाहीं म्हणून सामान्य माणसें पूर्वजन्मांतील कर्तृत्वाशीं त्याचा संबंध आहे असा भ्रम करून घेतात (आणि या भ्रमांत जनतेला ठेवण्यांत कित्येक सत्पुरुषांचें पोट चालतें), त्याप्रमाणें सृष्टिमूल अमुक प्रकारचें आहे असें गृहीत धरण्याची शास्त्रज्ञांना आवश्यकता आहे कीं काय? शास्त्रज्ञ सृष्टिमूलाकडे तोंड

करून इतिहासाच्या अंधारांत चाचपडत शिरतात, तेथें बुद्धीचा प्रकाश पाडतात, तेथील वस्तुजात न्याहाळून पाहतात, त्या इतिहासाचा नकाशा आणि चित्रपट काढतात, या सर्वांचा हेतु, मार्क्सच्या शब्दांत सांगावयाचें तर, इतिहासाचा 'गतिसिद्धांत' ठरविणें हा असतो. हा 'गतिसिद्धांत' शोधायचा तो तरी कशासाठीं ? पुन्हा कम्युनिस्टांच्याच भाषेंत सांगावयाचें तर 'भावी कर्तृत्वाला मार्गदर्शन' मिळावें म्हणून. गोचर सृष्टींत विशिष्ट नियम आहेत, वस्तु आणि अवस्था यांचें उत्पत्ति, स्थिति व नाश (म्हणजेच सर्व सृष्टिव्यापार) कांहीं विशिष्ट नियमांनीं होत आहेत ही गोष्ट माणसांच्याच नव्हे तर अनेक मनुष्ये-तर प्राण्यांच्या ध्यानांत आली असून स्मरणांत राहिली आहे. आणि या स्मरणाचा ते प्राणी 'भावी कर्तृत्वाला मार्गदर्शक' म्हणून उपयोग करतात. उदाहरणार्थ 'गवत हातांत घेतलेला माणूस पाहिला कीं गाय त्याचेकडे धावून येते आणि खड्गधारी माणूस पाहिला कीं गाय त्यापासून पळून जाते', मुंग्या पावसाळ्यासाठीं 'धनसंचय' करून ठेवतात, आभाळ गडगडलें कीं गुरें धावूं लागतात, सूर्यास्ताबरोबर घराकडे वळूं लागतात वगैरे प्रकारें सृष्टि-नियमासंबंधींच्या ज्ञानाचा प्राणी आपल्या जीवनांत उपयोग करतात. त्याच-प्रमाणें माणसानेंही 'भावी कर्तृत्वाला मार्गदर्शन' मिळण्यासाठींच सृष्टीच्या गतिसिद्धान्ताचें संशोधन केलें आहे.

* * *

जावडेकर म्हणतात, 'मानसशास्त्रांत जसें अंतर्मनाचा शोध करण्याचें तत्त्व मान्य झालें आहे तसेंच अध्यात्मशास्त्रांतही अंतरात्म्याचा शोध करण्याचें तत्त्व मान्य झालें पाहिजे.' हें त्यांचें म्हणणें बरोबर आहे. पण दोन्ही संशो-धनांचा हेतु 'भावी कर्तृत्वाला मार्गदर्शन' शोधणें हाच असला पाहिजे. अंत-र्मनाचा शोध करण्याचें तत्त्व जें मान्य झालें तें याच हेतूसाठीं. मनुष्याचा जिवंतपणा हा यंत्रासारखा आहे ही कल्पना प्रत्यक्ष व्यवहारांत अनुभवास येईना. मनुष्यास सुखी व सुसंस्कृत करण्यास जड सृष्टीबद्दलचा यांत्रिक दृष्टि-कोण अपुरा पडूं लागला. भावितपणें अथवा अभावितपणें माणूस करतो त्या बऱ्यावाईट गोष्टींचे परिणाम जेव्हां विचारांत घेण्याची पाळी आली तेव्हां मनुष्यांच्या मनांत अमुक विचार आणि अमुक हेतु प्रेरित करणें अवश्य होऊं

लागलें. तेव्हां कोणत्या प्रेरणा कशा निर्माण कराव्या हें समजण्यासाठीं मनाचा मूळ स्वभाव काय याची चिकित्सा सुरू झाली. आणि ज्याप्रमाणें व्यक्त हेतूची व भावनांची चिकित्सा सुरू झाली तशीच अव्यक्त हेतु व भावना अर्थात् अंतर्मनाचे व्यापार यांचीही चिकित्सा सुरू झाली. गांधींच्या तत्त्वज्ञानांत हृदयपरिवर्तन म्हणून जो एक सिद्धांत आहे त्याच्या सिद्धीस या अंतर्मनसंशोधनाचा उपयोग होतो. व्यक्त व अव्यक्त मनाचे व्यापार कसे चालतात हें पाहून शिक्षणतंत्रांतही सुधारणा होत आहेत. याच क्रमांत आतां अंतरात्म्याच्या संशोधनास सुरवात करण्यास कांहींच हरकत नाहीं. हें संशोधन विशिष्ट हेतूनें नव्हे तर केवळ संशोधनानंदासाठीं कोणी केलें तरी हरकत नाहीं. नीतिशास्त्रवाले त्या संशोधनाचा आपल्या कार्यास कृतज्ञतापूर्वक उपयोग करून घेतील. पण वाद अंतरात्म्याचें संशोधन करावें कीं नाहीं हा नाहीं. कांहीं माणसांना अंतरात्म्याचें ज्ञान झालें आहे, त्यांना साक्षात्कार झाला आहे, ते ब्रह्मविद् आहेत, म्हणून त्यांचा अंतर्नाद खरा असतो, त्यांना कूट प्रश्नांचीं उत्तरें अचूक सुचतात असें सांगण्यांत येतें तेव्हां वाद उत्पन्न होतो.

हे अंतरात्म्याशीं बोलूं शकणारे पुरुष फक्त प्राचीन काळीं होऊन गेले असते आणि आमच्या आजच्या जगांत त्यांतला एकही पुरुष शिल्लक राहिलेला नसता तर अंतरात्म्याशीं समाधि पावलेल्या अशा सत्पुरुषांचा समाधिभंग मुद्दाम स्वर्गांत जाऊन कोणीं केला नसता. पण अंतरात्म्याशीं समाधि पावणारीं माणसें आमच्या भोंवतालींही वावरताहेत, तीं अमुक अमुक हीं आहेत, अंतरात्म्याशीं बोलतांना त्यांना अमुक अमुक प्रश्नांचीं उत्तरें सुचलीं अथवा समजलीं आहेत, असें सांगण्यांत येऊं लागलें म्हणजे या समाधींतल्या माणसांची चौकशी करावी लागते. 'वेड्याचें अंतर्मन व त्याचा मानसिक अनुभव हा पुरावा धरण्यांत येतो. आणि संतांचा आत्मानुभव त्याज्य ठरविण्यांत येऊन त्यांचा अंतरात्मा व अंतर्नाद हें सर्व खोटें असा गिल्ला करण्यांत येतो पण हा बुद्धिवाद नव्हे' असें जावडेकरांचें म्हणणें आहे. येथें आक्षेपकांची भूमिका जावडेकर समजून घेत नाहींत. अमक्याचा अंतर्नाद हा ढोंग असलाच पाहिजे असें म्हणण्याचा कोणालाही अधिकार नाहीं. पण सज्जनांना होणारा अंतर्नाद भ्रम असूं शकतो आणि लबाड लोक ढोंग करून थोतांड माजवूं शकतात असें माझें म्हणणें आहे. शिवाय सज्जन आणि

असज्जन या कांहीं आंबा आणि फणस यांसारख्या अत्यंत भिन्न कोटी नव्हत. एकाच माणसाच्या ( आणि अतिशय थोर माणसाच्याही ) ठिकाणीं त्या असूं शकतात. त्यामुळें भ्रम व धूर्तता यांचा संमिश्र प्रकार जो आधीं आत्मवंचना व मग आपोआप परवंचना तो मोठमोठ्यांच्या बाबतींतही घडतो. धर्मराजानें 'अश्वत्थामा मेला' एवढें ऐकलें, पण 'अश्वत्थामा' नांवाचा हत्ती मेला कीं द्रोणाचार्यांचा पुत्र 'अश्वत्थामा' मेला यासंबंधानें खात्री करून घेतली नाहीं. यामुळें त्याला 'नरो वा कुंजरो वा' असें सफाईदार उत्तर देतां आलें. पण तें अखेर असत्य मानलें गेल्यावांचून राहिलें नाहीं. म्हणून अंतर्नाद हा ढोंग असेलच हें म्हणणें जसें खरें नव्हे तसेंच तो थोरामोठ्यांच्या बाबतींतही आत्मवंचक स्वरूपाचा नसेलच असें म्हणतां येणार नाहीं.

* * *

" आत्मानुभव अथवा त्या अनुभवांतून ऐकूं येणारा अंतर्नाद यांचा बौद्धिक दृष्ट्या मी असा अर्थ करतों कीं, त्या मनुष्याचा अंतरात्मा जागृत होतो व त्याच्या बुद्धीला सामान्य अवस्थेंत न सुटणारे कांहीं प्रश्नही तो सोडवितो " असें जावडेकर म्हणतात. आणि " या आत्मानुभवाचा आस्वाद घेणाऱ्यासच ब्रह्मवेत्ता म्हणतात " असेंही त्यांचें म्हणणें आहे. अत्यंत घोटाळ्याचा आणि वादग्रस्त असा हा मुद्दा आहे. " हा अंतर्नाद ज्यांना ऐकूं येतो त्यांच्या बुद्धीला तो पटतो; पण पुष्कळ वेळां तो इतरांना बुद्धिदृष्ट्या पटवून देतां येत नाहीं," अर्थात् तो जर इतरांच्या बुद्धीला पटला नाहीं तर तो त्यांनीं प्रमाण मानूं नये अशी शंकितांना पळवाटही त्यांनीं ठेवली आहे. पण अमक्याचा अंतर्नाद आम्हांला पटल्यानंतर तरी आम्हीं त्याला ब्रह्मवेत्ता कां म्हणायचें हा खरा प्रश्न आहे. आत्मानुभव आणि अंतर्नाद हें बंड आहे तरी काय ? अंतरात्म्याला सर्वविद् म्हणतात. म्हणजे काय त्याला रसायन शास्त्र कळतें, कीं ज्योतिष कळतें, कीं हें व इतर सर्व कळतें असें म्हणायचें कीं काय ! समजा, गांधी ब्रह्मवेत्ते आहेत. मग त्यांना मशिनगन कशी करतात हें आत्मसाक्षात्कारानें सांगतां येईल काय ! बुद्धीला एखाद्या अवघड प्रश्नाचें उत्तर सुचण्यास निवांत-पणा, मानसिक स्थैर्य, कुशाग्रता, निर्णय ठरविण्यास अवश्य अशा साहित्याची उपलब्धी हें सर्व हवें खरें. पण इतकें सर्व असल्यावरही त्या त्या विषयांत

ज्यानें आयुष्यभर अभ्यास व यत्न यांनीं परिश्रम केले आहेत आणि ज्याला आपल्या विषयाशीं पूर्ण तादात्म्य पावतां आलेलें आहे अशालाच फक्त त्या त्या क्षेत्रांतल्या प्रश्नांचीं उत्तरें सुचतात. गांधींना हिंदी राजकारणाची नाडी उत्तम कळते, लेनिनला रशियन राजकारणाची नाडी उत्तम कळे. त्यासंबंधींचे प्रश्न त्यांनीं पुष्कळदा अचूक सोडविले. ज्या वेळीं नेमके त्यांना ते ते मार्ग सुचले त्या वेळीं ते कसकसे सुचत गेले हें सांगतां आलें नाहीं, तरी तो अभ्यास मनःस्थैर्य, कुशाग्रबुद्धि, विषयाशीं सात्म्य यांचा परिणाम आहे असें मानावें. यांत आत्मसाक्षात्काराचा संबंध काय ? चर्चिल आणि हिटलर यांच्याही अंगीं हे गुण आहेत म्हणून त्यांना ब्रह्मवेत्ते मानावें काय ? निरनिराळ्या शास्त्रांत, कलांत आणि दुष्कृत्यांतही अलौकिक कर्तृत्व गाजविणारीं भलीं बुरीं माणसें असतात. एखाद्या दरोडेखोराला त्याच्या आयुष्यभरच्या अभ्यासामुळें इतर सहकाऱ्यांस व पोलिसांसही न सुचणारी युक्ति सुचते म्हणून तो ब्रह्मवेत्ता म्हणावा काय ? ब्रह्मवेत्ता म्हटलें कीं थोतांडांची कल्पना मनांत येते, याचें कारण ब्रह्मवेत्ता हा सर्वज्ञ असलाच पाहिजे असा समज आहे. आणि आपण ज्याला ब्रह्मवेत्ता म्हणतों त्याला तर त्याच्या क्षेत्राहून अन्य क्षेत्रांत इतर सामान्य माणसांहून अधिक कांहीं कळत नाहीं असा अनुभव आहे. मग हा ब्रह्मवेत्ता कसा ? बरें आपापल्या क्षेत्रांत आत्मसाक्षात्कारानें इतरांपेक्षां अधिक अचूक अथवा पूर्ण बिनचूक उत्तरें ज्यांना देतां येतात ते ब्रह्मवेत्ते म्हणावे तर, गांधी व लेनिन यांच्याबरोबर हिटलर आणि नाना मसाळ हेही ब्रह्मवेत्ते ठरतात. तसेंच रेससाठीं उत्तम घोड्यांची पारख करणारा एखादा आगाखानी 'नळराजा'ही ब्रह्मवेत्ता म्हणावा लागेल. शिवाय ब्रह्मवेत्त्याचा अंतर्नाद आम्हांला पटला नाहीं म्हणून तो सोडून देण्याची परवानगी जावडेकरांनीं दिली तरी गांधींच्यासारख्या ब्रह्मवेत्त्याच्या अंतर्नादामुळें केव्हां केव्हां घोर चुका झाल्या तर तसें बोलायची चोरी आहे! कारण "तुम्हांला नको तर त्याचें अंतर्नादाचें मत स्वीकारूं नका, पण येवढ्या थोर ब्रह्मवेत्त्याचें चूक म्हणून ओरडतां कां?" असा साळसूद उपदेश लोकांना चटकन् सुचतो. आणि एकदा एखाद्याला ब्रह्मवेत्ता म्हटलें कीं, त्याला अप्रामाणिक व आत्मवंचक म्हटलेलेंही कोणाला आवडत नाहीं. ही एक आध्यात्मिक 'मॉनर्की' निर्माण होते व हळूहळू ती 'ॲटॉक्रसी' ऊर्फ हुकूमशाही होते. मग भोंदू लोक त्या भूमिकेंत घुसून जगाची

लूट करतात आणि सज्जन कोण व भोंदू कोण अथवा एकच मनुष्य सज्जन किती व भोंदू किती हें कळायला कांहींच मार्ग राहत नाहीं. ज्ञानेश्वर-तुकाराम यांनीं जगाचें कल्याण केलें त्यापेक्षां जगांतल्या भोंदूंनीं जगाचें वाटोळें अधिक केलें आहे.

* * *

माझ्या या लिहिण्यांतील कांहीं भाग कम्युनिस्टांना आवडणार नाहीं, तर दुसरा कांहीं भाग वेदांत्यांना आवडणार नाहीं; पण तत्त्वज्ञानसंशोधनाचा उपयोग 'भावी कर्तृत्वाला मार्गदर्शन' (गाइड टु फ्यूचर ॲक्शन) हाच असतो हा कम्युनिस्टांचा महत्त्वाचा सिद्धांत असून त्याशीं माझें लिहिणें पूर्णपणें सुसंगत आहे. भावी कर्तृत्वाचा मार्ग शोधण्यासाठीं सृष्टिव्यापाराचें स्वरूप म्हणजे सृष्टीचा स्थितिगतिसिद्धांत शोधावा लागतो. हा सिद्धांत जितक्यापुरता समजला तितक्यापुरता भौतिकवाद खरा ठरला असें मानतां येतें. भौतिकवाद याचा अर्थ मी काय समजतों हें येथें कळून येईल. सृष्टिव्यापार कांहीं तरी नियमानें चालतात असा प्रत्यय येणें याचा अर्थ भौतिकवाद सिद्ध होणें असा आहे. भौतिकवाद म्हणजे मटीरिॲलिझम याचा अर्थ माझ्या मतें हाच आहे. मनुष्यकर्तृत्वाला तो प्रमुख आधार आहे. कारण आपलें कर्तृत्व अमुक नियमानुसार यशस्वी होईल असें अनुभवानें अथवा अनुमानानें कळल्यावांचून मनुष्यकर्तृत्व अशक्यच आहे. हा भौतिकवाद सृष्टिमूल सापडण्यापर्यंत खोल संशोधतां आलेला नाहीं. अर्थात् सृष्टिमूल जड आहे कीं सचेतन आहे आणि त्याच्याशीं 'माझा संबंध काय' यांतलें कांहींच कोणाला माहीत नाहीं. माझ्या दृष्टीनें गीतेंतील वेदांताशीं मी घेतों ही भूमिका पूर्णपणें सुसंगत आहे. सर्व गोचर व्यवहार हे 'प्रकृती'कडून केले जातात असें कृष्ण मानतो. ज्याला गीतेंत 'प्रकृति' म्हणतात तोच भौतिकवाद होय. सृष्टीची (विशिष्ट नियमानें अथवा नियमावलीनें) नियंत्रितता हा त्याचा अर्थ होय. जेथपर्यंत हा भौतिकवाद अथवा प्रकृतिवाद अनुभवानें व अनुमानानें सिद्ध होतो तेथवर मनुष्यबुद्धीची मजल चालूं शकते. पलीकडील क्षेत्रांत सयुक्तिक मनुष्ययत्नाची गति चालूं शकत नाहीं. हा अज्ञेयाचा मुलूख आहे. त्यांत जाईल तो ज्ञानी, मुक्त वगैरे जें गीतेंत म्हटलेलें आहे त्यांतलें मला कळलेलें

नाहीं. पण माणूस ज्ञानी असो अथवा नसो, प्रकृतीच्या क्षेत्रांत वावरून माणसानें हेतुपूर्वक कर्म केलें पाहिजे असें गीतेंत म्हटलें आहे, तेवढें मला महत्त्वाचें वाटतें. स्थितप्रज्ञ, त्रिगुणातीत व भगवद्भक्त म्हणजेच जावडेकरांचा 'मुक्त' याचीं गीतेंत जीं लक्षणें दिलीं आहेत तीं व्यावहारिक कसोटीचीं आहेत, भौतिक वादाच्या कसोटीचीं आहेत. ब्रह्मविद्येशीं त्यांचा कांहीं संबंध असलाच पाहिजे असें नाहीं. 'नीतिशास्त्र हें भौतिकवादाच्या अथवा प्रकृतीच्या क्षेत्रांतलें आहे. त्यापलीकडील मुलूख आणि नीतिशास्त्र यांचा कांहीं संबंध नाहीं. असा संबंध जोडण्याचा आग्रह प्रामाणिक असला तरी भ्रममूलक असतो आणि मागाहून त्यांत थोतांड व ढोंगबाजी निर्माण झाल्यावांचून राहत नाहीं.

'चित्रा'—दिवाळी अंक, १९४१

★

# हिंदी कम्युनिस्ट पक्षाची चूक कोणती ? : ३

हिंदी कम्युनिस्ट पक्षानें आज हिंदी राजकारणासंबंधानें अतिशय चुकीची भूमिका घेतली असून, तिचा परिणाम इतर कोणाहीपेक्षां त्यांनाच अधिक भोगावा लागत आहे. आपल्याच हातानें आपल्या पायांवर धोंडा पाडून घेऊन ते रक्तबंबाळ झाले आहेत. आणि त्यांच्या या दुःखद अवस्थेंत त्यांच्यासंबंधानें कोणी साधी सहानुभूति सुद्धां दाखवीत नसून, कालपर्यंतचे कम्युनिस्टांचे अनुयायी असलेले कित्येक तरुण आज त्यांना अतिशय तुच्छ लेखीत आहेत. साधारणतः समाजांतील कोणत्याही वर्गास कम्युनिस्टांसंबंधानें आपुलकी वाटत नाहीं. पूर्वीच्या काळीं मांग, रामोशी, बेरड वगैरे कांहीं जमातीचे लोक धंदेवाईक मारेकरी म्हणून भाड्यानें मिळत असत. त्याप्रमाणें कामगारांचे संप घडवून आणणारे धंदेवाईक पुढारी एवढीच माहिती यांचेसंबंधानें मुंबईंतील मध्यमवर्गाला आहे. कामगारांत यांचें वजन आहे म्हणण्यापेक्षां वचक आहे म्हणणें अधिक खरें ठरेल. संपाच्या वेळीं पुढारी या नात्यानें कम्युनिस्ट हे अतिशय तज्ज्ञ आहेत. म्हणून कामगार त्या वेळीं त्यांच्या अर्ध्या वचनांत असतात. पण संप यशस्वी होऊन अथवा ढेपाळून संपला आणि कम्युनिस्टांच्या नेतृत्वाची गरज संपली कीं, वाघ अथवा लांडगा जसा मारून पिटाळून लावावा तसे कम्युनिस्टांना हे कामगार पिटाळून लावतात. कम्युनिस्टांच्या

कार्यपद्धतींत सभ्यता, सौजन्य, भलेपणा, दुसऱ्याची भूमिका समजून घेऊन आपली समजूत देण्याची उत्सुकता यांपैकीं कांहींही नाहीं. ते कोणत्याही विषयाची निर्विकार चर्चा न करतां वाग्युद्ध करतात. आपणांजवळ बिनतोड युक्तिवाद नसला तर वितंडवाद घालावा, दम द्यावा, दुसऱ्याला भेकड अथवा बेअक्कल ठरवावें, याची त्यांना घाई असते. दुसऱ्या पक्षाची सभा होऊं नये असें वाटलें कीं ते त्यासाठीं भाड्यानें गुण्ड आणून सभा मोडतील. गिरणी-कामगार यूनिअनच्या निवडणुकींत हातांत पैसा अथवा पाठींत सुरी यांपैकीं कशाचाही उपयोग करण्यास ते मागेंपुढें पाहणार नाहींत. पक्षांत असतांना एकमेकांशीं पूर्ण एकजुटीनें वागणारे हे कम्युनिस्ट पक्षाबाहेर गेलेल्या माणसा-शीं हाडवैर धरतात, त्याचा सर्व बाजूंनीं सतत छळ चालू ठेवतात.

* * *

बहुतेक सर्व कम्युनिस्ट पुढारी अतिशय बुद्धिवान्, व्यासंगी, हजरजबाबी, निरनिराळ्या प्रचलित विषयांचा खोल अभ्यास करणारे असे असतात. त्यांच्या अनुयायांनाही त्यांच्या पात्रतेप्रमाणें त्यांनीं वादविवादांत निष्णात केलेलें असतें. पण ही सर्व विद्वत्ता आणि वादपटुत्व कोणाचीही खात्री पट-विण्यासाठीं नव्हे, तर दुसऱ्याला बौद्धिक पकडींत घेऊन त्याचा चेंदामेंदा करण्यासाठीं असतें. रसिकता, कलावृत्ति, विनोद यांचें यांना अतिशय वावडें आहे. महाराष्ट्रांतील कम्युनिस्टांत स्वभाषा बऱ्या प्रकारें लिहिणारे कमी. इंग्रजी त्यांना बरें येतें. पण मराठी असो इंग्रजी असो, यांचें लिहिणें–जेथें सिद्धान्तप्रतिपादन असेल तेथें– भूमिति अथवा गणित यांसारखे फक्त बोजड असेल. विषयप्रतिपादनासाठीं उपमा, दृष्टान्त किंवा इतर कोणतेंही भाषासौंदर्य त्यांत असायचेंच नाहीं. यांचें लेखन आपलें आपण मोठ्यानें वाचून ऐकलें तर खडकावरून बैलगाडी चालल्यासारखें वाटतें. उलट कोणावर टीका असली तर तींत युक्तिवादाचें नांवही नसायचें. ज्याच्यावर टीका असेल त्यांच्या उघड्या हजामत केलेल्या डोकीवर छिन्नीनें एकसारखी टाकी मारावी असा शिव्यांचा मारा त्या लेखांत असायचा.

* * *

कोमलता ही दगड आणि कम्युनिस्ट यांच्या अंतःकरणांत मुळींच

नसायची. शृंगारिक वृत्तीलाही ते असेच कांहींसे पारखे आहेत. कम्युनिस्टांतील विद्यार्थिनी व तरुणी या अगदीं पुरुषी असतात. स्त्री-पुरुष कम्युनिस्ट हे इतर पुरुषाशीं अथवा स्त्रीशीं बोलत असतांना त्यांच्यांत कोमल, नाजुक अथवा लाजरा आविर्भाव कांहींही असायचा नाहीं. एकमेकांच्या शृंगारिक चेष्टा चावट साहित्यिकांत जशा चालतात तशा कम्युनिस्टांत चालायच्या नाहींत. जागतिक क्रांति, इम्पीरिॲलिझम्, डायलेक्टिक, सोव्हिएट रशिया इत्यादि विषयांचा त्यांच्या रोजच्या खाण्यापिण्याशींही प्रत्यक्ष संबंध असतो असें त्यांना वाटतें. प्रियाराधन त्यांनीं कधीं केलेंच तर त्याचेंहि शब्दसाहित्य हेंच असेल. त्यांच्या पक्षाच्या संसारासाठीं हजारों रुपये खर्च होत असतात, पण हा पैसा ते कोठून आणतात याचा कोणास पत्ता नसतो. व्यक्तिशः कांहीं पुढाऱ्यांचा खर्च दरमहा दोनशें रुपयांपर्यंत असतोसें दिसतें खरें; पण हा पैसा तो पुढारी कोठून आणतो हें कळूं शकत नाहीं. हालकष्ट सोसण्याची कम्युनिस्टांची ताकद असीम आहे. गेल्या दहा-वीस वर्षांतील निम्याहून अधिक काळ कित्येकांनीं तुरुंगांत घालविलेला आहे. अतिशय श्रीमंत आईबापांच्या मुलांनींही घरादाराची, संसाराची आस सोडून कम्युनिस्ट कार्यांत उडी घेतलेली आहे. असे शेंकडों कम्युनिस्ट तरुण आहेत. ज्यांनीं विवाह केले आहेत तीं पतिपत्नीही स्वतःच्या संसाराबद्दल व भवितव्याबद्दल बेफिकीर असतात. उच्चविद्याभूषित असा कम्युनिस्ट माणूस आपल्या पक्षाचें कोणतेंही हलकें सलकें कामही मोठ्या नेकीनें व अक्कलहुषारीनें करतो. अनेकांनीं मिळून गटानें काम करण्याची कम्युनिस्टांची हातोटी विलक्षण आहे. पण कम्युनिस्ट हा कम्युनिस्टांशींच सहकार्य करील. इतर कोणालाही तो विश्वास देणार नाहीं व विश्वासांत घेणार नाहीं. प्रांतिक, जातीय वगैरे अहंकार त्याच्या ठिकाणीं लेशमात्र नसतो. सोव्हिअट रशिया ही त्याची काशी, मक्का, जेरुसलेम; मार्क्स हा स्वर्गांतला पिता आणि स्टालिन हा त्याचा भूवरील पुत्र; त्यांच्या शिकवणीचें आचरण हेंच कम्युनिस्टांचें जीवन. कम्युनिस्ट हा मानवसृष्टींतला एक विशेष प्रकार आहे. जगांतले सगळेच कम्युनिस्ट असे आहेत कीं नाहींत कुणास ठाऊक, पण हिंदुस्थानांत व महाराष्ट्रांत कम्युनिस्ट आढळतो तो हा असा आढळतो. यांपैकीं सर्व गुणदोष थोड्याफार प्रमाणांत कम्युनिस्टांखेरीज इतर अनेक व्यक्तींचे किंवा गटांचे ठिकाणीं आढळतात. पण बरीच मोठी सभासद-

संख्या असलेल्या या पक्षांतील बहुतेकांच्या ठिकाणीं हे गुण उत्कटत्वानें दिसतात. एवंगुणविशिष्टता हें पक्षाचें जणूं कांहीं लक्षणच झालें आहे.

* * *

अशा या हिंदी कम्युनिस्टांनीं आरंभीं सांगितल्याप्रमाणें हिंदी राजकारणासंबंधानें चुकीची व लोकांच्या भावना दुखविणारी म्हणजे 'लोकयुद्धा'ची भूमिका घेतली असल्यानें ते हास्याचा, तिरस्काराचा व विद्वेषाचा विषय झाले आहेत. विशेष हें कीं लोकांची सेवा इतर कोणत्याही पक्षापेक्षां अधिक प्रमाणांत व अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीनें करूं इच्छिणारे आणि अंगीकृत कार्यासाठीं सर्वस्वावर उदक सोडलेले हे कम्युनिस्ट त्यांच्या गेल्या वीस वर्षांच्या हयातींत हिंदी लोकमताशीं कधींच एकरूप झालेले नाहींत. जगांतील साऱ्याच कम्युनिस्टांची ही दशा अथवा दुर्दशा आहे असें म्हणतात. त्यांच्या कार्यपद्धति राक्षसी आहेत हें एकच वर्णन सर्वत्र ऐकूं येते. पण इतर जगांत खरोखर कांहींही असो, खुद्द हिंदुस्थानांत यांचें वर्तन राक्षसी झालें हें एकच वर्णन सर्व राजकीय पक्षांनीं कम्युनिस्टांच्या हयातीच्या गेल्या वीस वर्षांत त्यांचेसंबंधानें केलें आहे.

* * *

कामगार-चळवळ ही आधुनिक जगांत जनताउद्धाराची अतिशय उपयुक्त चळवळ होय. हिंदुस्थानांत काँग्रेसचा जन्म होऊन पंचवीस वर्षेंच झालीं होतीं आणि उद्योगधंद्याची वाढही थोडी झाली होती; कामगारांची पिळवणूक खूप होई; टिळकांसारख्या पुढाऱ्यानें शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू केल्या होत्या; पण कामगारसंघटना मात्र फारशी अथवा जवळ जवळ मुळींच झाली नव्हती; असा तो काळ होता. गेलें महायुद्ध नुकतेंच संपलें होतें. मुंबईस कामगार-असंतोष वाढला होता. रशियांतील क्रांतीच्या तात्त्विक भूमिकेचें आकलन इकडील लोकांना अजून होऊं लागलें नव्हतें. कम्युनिस्टांचे अग्रणी डांगे त्या वेळीं वीसच वर्षांचे असतील. त्या वेळीं म्हणजे १९२० सालीं त्यांनीं 'गांधी आणि लेनिन' नांवाचें पुस्तक लिहिलें. त्यांतील कांहीं लेखनांत प्रमाद घडलेले आहेत. पण ज्या वेळीं अथवा ज्या काळानंतर आठ-दहा वर्षें नामांकित पुढाऱ्यांनाही मार्क्सवाद म्हणजे काय हें मुळींच ठाऊक नव्हतें त्या काळीं डांगे यांनीं मार्क्स व लेनिन यांच्या शिकवणीचें इतकें मार्मिक आकलन केलेलें दिसतें कीं, त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचें आजही कौतुक वाटतें.

कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास मला येथें लिहायचा नाहीं. मला तशी त्या-संबंधानें फारशी माहितीही नाहीं. अंतःपुरांतील माणसांखेरीच कोणास ती माहीत असणारही नाहीं. उदाहरणार्थ रॉय यांनीं डांगे व मुझाफर अहमद यांना मार्क्सवादाची कितपत स्फूर्ति दिली आणि चळवळीबाबत कितपत साहाय्य केलें, डांगेसारख्या सूक्ष्म बुद्धीच्या माणसास रॉय यांच्या व्यक्तित्वाचें आकलन पूर्वी कधीं झालें होतें काय, त्यांचे संबंध कसे आले, खरोखर रॉय यांना जें महत्त्व देण्यांत येतें तें कितपत बरोबर आहे वगैरे किती तरी गोष्टींचें संशोधन व्हायला हवें आहे. पण माझा येथें तो विषयच नव्हे. कम्युनिस्ट पक्षाच्या एकंदर धोरणासंबंधानें अगदीं त्रोटक अभिप्राय व्यक्त करणें व त्यांची चूक त्यांना दाखविणें एवढेंच येथें मला प्रस्तुत आहे.

* * *

डांगे हे कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापकांपैकीं एक प्रमुख असावे. निमकर, जोगळेकर वगैरे कार्यकर्ते बरेच आधींपासून त्यांच्याबरोबर आहेत. पक्षाच्या सुरवातीपासूनच सोव्हिएट रशियाशीं यांचे चोरून संबंध होते असा सरकारला संशय आहे. डांगे यांजवरील पहिला खटला पक्षाच्या तीन-चार वर्षांच्या आयुष्यांतच झाला. त्यामुळें हिंदुस्थानांत व जगांत त्यांना प्रसिद्धि मिळाली. ते खरोखर 'वीर' मानले गेले. कम्युनिस्ट हे ब्रिटिश साम्राज्यविरोधी असल्यानें कॉंग्रेसवाल्यांची सहानुभूति साधारणतः त्यांचेकडे होती. पण पुढें उठल्या-सुटल्या संप घडवून आणून हिंदुस्तानच्या वाढत्या उद्योगधंद्यांत हे अडथळा उत्पन्न करतात, कामगारसंघाच्या फंडांत गोंधळ माजवितात, यांच्या कार्यपद्धति मवालीपणाच्या आहेत अशी लोकांची खात्री होऊं लागून मुंबईसारख्या शहरांतील मध्यम व वरिष्ठ वर्गाला कम्युनिस्टांबद्दल सहानुभूति वाटेनाशी झाली. तथापि कम्युनिस्ट पक्षांत तरुण सुशिक्षितांचा भरणा हळूहळू वाढूं लागला. कम्युनिस्टांचें एक महनीय तत्त्वज्ञान आहे व त्याचे हे लोक उपासक आहेत अशी सुशिक्षितांची खात्री होऊं लागली. पं. नेहरू हे युरोपचा प्रवास करून आले व त्या प्रवासांत त्यांनीं रशियास भेट दिली. तिकडून हिंदुस्थानांत परत आल्यावर आपण समाजवादी आहों व रशियाचे चाहते आहों असा त्यांनीं पुकारा केला, यामुळें कम्युनिझम् व कम्युनिस्ट यांचें महत्त्व येथें फार वाढलें. १९२९ सालीं सरकारनें सुप्रसिद्ध मिरतकटाचा खटला उभारला. हा खटला

जगभर गाजला. डांगे हे त्यांतले प्रमुख आरोपी होत. आपली कैफियत म्हणून त्यांनीं फुल्स्केप आकाराच्या सुमारें पांचशें छापील पृष्ठांचा जो ग्रंथ सरकारला सादर केला, तो फार थोड्यांच्या पाहण्यांत आहे. माझ्या सुदैवानें मला तो ग्रंथ बरेच दिवस लाभला. डांगे यांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेचें तें उत्तम स्मारक आहे. कम्युनिस्ट विचारसरणीवर त्यांत शास्त्रशुद्ध विवेचन आलेलें असून, हिंदी कामगार-चळवळीचें माहितीपूर्ण शास्त्रीय विवेचन त्यांत मिळतें. या खटल्यासाठीं सरकारनें जवळ जवळ एक कोटि रुपये खर्च केले ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या दृष्टीनें कम्युनिस्ट पक्ष येथें किती भयंकर स्वरूप पावला होता हें कळून घेतें.

पण ब्रिटिश साम्राज्याशीं लढत राहणाऱ्या कॉंग्रेसचें या कम्युनिस्टांशीं केव्हांच बनत नव्हतें. १९२९ सालीं नागपुरास पं. नेहरू ट्रेड यूनियन कॉंग्रेसचे अध्यक्ष होते त्या वेळीं कम्युनिस्टांच्या हट्टामुळें ट्रेड यूनियन कॉंग्रेसमध्यें भांडणें सुरू झालीं. पं. नेहरूंनीं आपल्या भाषणांत चीन व हिंदुस्थान येथील कम्युनिस्टांवर खूप कोरडे ओढले. १९३० सालीं गांधींनीं सत्याग्रह पुकारला. त्या वेळीं कम्युनिस्ट हे कॉंग्रेसपासून अलिप्त राहिले. शेतकऱ्यांत कम्युनिस्टांचा कोठेंच शिरकाव झाला नव्हता; आणि कामकरी हे संपाच्या वेळीं कम्युनिस्टांना नेतृत्व देत तरी कम्युनिस्टांचें प्रेम असें त्यांना कधींच नव्हतें. उलट गांधी-नेहरू हे कॉंग्रेसचे पुढारी असंख्य जनतेकडून आदरिले जात. कम्युनिस्ट हे स्वतःला दलित जनतेचे हितकर्ते आणि नेते मानीत असून, कॉंग्रेस ही भांडवलदारांची आहे व ती साम्राज्यशाहीस फितूर झाल्यावांचून राहणार नाहीं असें प्रतिपादीत. कॉंग्रेससंबंधीं कम्युनिस्टांचा मूळ सिद्धान्त जो होता तो अधिक भारदस्त व शास्त्रशुद्ध होता. पण लहानमोठे पुढारी सभांतून कॉंग्रेस-पुढाऱ्यांविरुद्ध नुसते शिव्या बकत असत. १९३० सालचा कॉंग्रेसलढा खूप बळावला. हजारों शेतकरी त्यांत सामील होऊन तुरुंगांत गेले. तेव्हां आपण या लढ्यांत पडलों नाहीं ही चूक झाली हें कम्युनिस्टांच्या लक्षांत आलें. नंतर शेतकऱ्यांत शिरण्याचा कार्यक्रम त्यांनीं उचलला. तेव्हां मेंढरांच्या कळपांत लांडगा शिरावा अशी हुल्लड चोहोंकडे उठली. धूमधडाक वर्गकलह, क्रांति, सशस्त्र बंड या भाषा सुरू झाल्या. कॉंग्रेसला शेतकऱ्यांतून हाकून लावण्याचे प्रयत्न यांनीं केले. पण शेतकऱ्यांची कम्युनिस्ट तत्त्वज्ञानावर श्रद्धा

वाढविण्याऐवजीं कॉंग्रेसच्या थोर पुढाऱ्यांस शिव्या देणें, जमीनमालक व सावकार यांविरुद्ध लोकांस दुर्वर्तन करण्यास चिथावणें व सोव्हिअट रशियाची स्तुतिस्तोत्रें गाणें एवढाच या चळवळीचा प्रचंड कार्यक्रम असे. एकंदर शेतकरी समाजाचें लक्ष आपल्याकडे ओढून घेणें, आपल्या दांडगाईच्या, मवालीगिरीच्या पण लोकांच्या गाऱ्हाणीं व्यवस्थित रीतीनें मांडण्याच्या अशा सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठीं खास शेतकऱ्यांतून माणसें तयार करणें, शेतकऱ्यांना सामुदायिक मोर्चे काढायला, सभा भरवायला, मालक अथवा सावकार यांजविरुद्ध लढतांना एकजुटीनें वागायला शिकविणें या बाबतींत कम्युनिस्टांचें कौशल्य मात्र कॉंग्रेसपुढाऱ्यांपेक्षां किती तरी पट श्रेष्ठ ठरलें आहे.

आंतरराष्ट्रीय युद्ध आणि क्रांति यांचें कम्युनिस्टांना त्यांच्या सर्व हयातभर वेड लागलें आहे. १९२७-२८ या कालांत त्यांनीं महायुद्धाचा संभव व क्रांति यांचा नुसता घोषा घेतला, पण तेव्हां कांहींच घडलें नाहीं. ही त्यांच्या आयुष्यांतली पर्वणी १९३९ सालीं जर्मनी आणि इंग्लंड यांचेमध्यें युद्ध सुरू झालें आणि रशिया जर्मनीच्या बाजूस झुकता काटा ठेवून तटस्थ राहिला, तेव्हां आली. त्या वेळीं सोव्हिएट मुत्सद्दी जर्मनीची खुशामत करून ब्रिटनचा धिक्कार करूं लागले, तेव्हां येथील कम्युनिस्टांनीं त्यांची 'री' ओढून कॉंग्रेसला ब्रिटनविरुद्ध सार्वत्रिक सत्याग्रह करण्याचा तगादा लावला. कॉंग्रेसच्या शांततेच्या धोरणावर ज्या कम्युनिस्टांचा विश्वास असणें अशक्य होतें असे शेंकडों कम्युनिस्ट कॉंग्रेसच्या प्रीदपत्रिकांवर भराभर सह्या करून कॉंग्रेसमध्यें घुसत होते. त्यांनीं आतां कॉंग्रेस-पुढारी ब्रिटिश साम्राज्यशाहीचे साथीदार असल्याचा प्रचार सुरू केला. पण कॉंग्रेसमध्यें व देशामध्यें कम्युनिस्टांना मुळींच पाठबळ मिळालें नाहीं. पुढें, पतंग दिव्यावर झडप घालतो त्याप्रमाणें सार्वत्रिक संपाची वावटळ यांनीं उठविली. तिला यश थोडेंच आलें. पण सरकारनें तेवढी संधि साधून उघड कम्युनिस्ट, प्रच्छन्न कम्युनिस्ट, कामगार-पुढारी या सर्वांना डांबून टाकलें. आश्चर्य हें कीं अखिल हिंदुस्थानांतील दलित जनतेचे पुढारी म्हणविणाऱ्या या कम्युनिस्टांना सरकानें डांबून टाकलें, पण त्यामुळें कामगारांत व शेतकऱ्यांत कोठेंच जोराची खळबळ माजलेली दिसली नाहीं.

युद्धाचीं पहिलीं पावणे-दोन वर्षें अशीं गेल्यानंतर जर्मनीनें रशियावर हल्ला केला तेव्हां आजपर्यंत पायावर चालणारे जगांतील कम्युनिस्टांचे सिद्धान्त

अकस्मात् जपानी बाहुलीप्रमाणें डोक्यानें चालूं लागले. साम्राज्यवादी राष्ट्रें व युरोपांतील सोशल डेमोक्रॅटिक पक्ष हे सर्व फॅसिस्टच आहेत असें हे पूर्वी बोलत. नंतर जर्मन फॅसिझम् हा यांना क्षम्य, प्रिय व कौतुकास्पद वाटूं लागून ब्रिटिश साम्राज्यशाही हीं जगाची वैरिणी आहे असा यांचा प्रचार चालू झाला. पण रूसो-जर्मन युद्ध सुरू होतांच जर्मन फॅसिस्ट हे राक्षस ठरून ब्रिटन व अमेरिका ही लोकशाही राष्ट्रें आहेत, तीं रशियाचीं मित्र आहेत, त्यांचें युद्ध हें साम्राज्यशाही युद्ध नसून लोकयुद्ध आहे असे मंत्रपाठ हे आतां व्यासपीठें, वृत्तपत्रें यांतून जगाला ऐकवीत आहेत. जन्मभर ज्या गांधींनीं ब्रिटनचा स्नेह संपादण्याची खटपट केली ते गांधी स्नेहसंपादनांत अपयश आल्यानंतर येथून ब्रिटिश सत्ता जावी यासाठीं लढा चालवीत आहेत अशा वेळीं कम्युनिस्ट हे ब्रिटिश साम्राज्यशाहीचे साहाय्यक होऊन बसले आहेत, हिंदुस्थानांतील अत्यंत प्रतिगामी अशा गटांची एकजूट करण्यास कॉंग्रेसला सांगत आहेत! हिंदी लोकमताशीं यांचें हें वर्तन इतकें विसंगत आहे कीं, कम्युनिस्टांच्या मित्रांनाहि त्याचा बोध होत नाहीं. पक्षाच्या बाहेर हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेहि मित्र यांना नाहींत, खुद्द पक्षांत बहुमत हें पक्षाच्या धोरणास विरुद्ध आहे असें ऐकूं येतें. पण पक्षसंघटनेखालीं तें दडपलें जात आहे आणि पक्षाच्या बाहेरील प्रचंड लोकमत कम्युनिस्टांना लांचखाऊ, घरबुडवे, देशद्रोही वगैरे शेलक्या विशेषणांनीं सजवून त्यांची पूजा बांधीत आहे.

* * *

"आपल्या सर्व हयातींत लोकमताला लाथाडणारे आणि या वेळीं जास्तींत जास्त प्रमाणावर लोकमताकडून तुडविले जाणारे जे हे कम्युनिस्ट त्यांचा आतां विचार तरी कशाला करायचा? लोकमताच्या रगाड्यापुढें ते नामशेष होतील आणि त्यांना नामशेष करावें म्हणजे झालें," असें कम्युनिस्टांच्या वैऱ्यांचें म्हणणें आहे. पण कम्युनिस्टांचा चमत्कार असा आहे कीं, ब्रिटिश साम्राज्यशाहीला अथवा लोकमतालाहि ते आजवर चिरडतां आलेले नाहींत. इतकेंच नव्हे तर भांडवलशाहींत धनिकवर्ग व कफल्लकवर्ग अशी जी समाजाची फाळणी होत आहे त्या फाळणीमुळें दलितवर्गाच्या वाढत्या दारिद्र्याच्या परिस्थितींतूनच दलितवर्गाच्या गाऱ्हाण्याला तोंड फोडणारा हा पक्ष निर्माण होतो आणि जगतो आहे. ही दारिद्र्यस्थिति कायम आहे व वाढते आहे तोंवर

कम्युनिस्टासारखा एक पक्ष जिवंत राहणारच. तो चांगलें न वागला तर वाईट वागणारच. या भांडवलशाही दारिद्र्याची मीमांसा मार्क्स व लेनिन यांनींच चांगल्या प्रकारें केली असून यांतून निर्माण होणाऱ्या समाजक्रांतीचें तंत्र त्यांनींच प्रयोगून पाहिलें आहे. यामुळें या वेळीं मार्क्सवादी पक्ष निर्माण होणें व बळावणें इतिहासक्रमप्राप्तच आहे.

* * *

गेल्या सात-आठ वर्षांत स्वतःला मार्क्सवादी म्हणविणारे निदान तीन पक्ष अस्तित्वांत आले आहेत. कम्युनिस्ट, कॉंग्रेस सोशॅलिस्ट व रॉयिस्ट असे हे तीन पक्ष होत. पैकीं रॉयिस्ट हे कम्युनिस्टांनीं रॉय यांना त्यांच्या नेतृत्वापासून हाकलल्यानंतर, रॉय यांनीं स्वतःभोंवतीं गोळा केलेले आहेत. ते आहेत ते आरंभापासून आजवर पाचोळ्यासारखेच असून त्यांचा विचार मला येथें करायचा नाहीं. कॉंग्रेस सोशॅलिस्ट हे कर्तृत्वाच्या मानानें कम्युनिस्टांपेक्षां आजवर कमी होते. ते कॉंग्रेसशीं स्वामिनिष्ठेनें वागतात आणि राष्ट्रवादी धोरणास चालना देऊन मार्क्सवादाच्या विचारसरणीवर कॉंग्रेसला नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. कॉंग्रेसच्या राजकारणांत त्यांनीं फार महत्त्वाची कामगिरी केली आहे. पण कॉंग्रेसवरिष्ठांकडून त्यांची कुचंबणा होते. सोव्हिएट रशियासारख्या एखाद्या देदीप्यमान व पुरोगामी राष्ट्राची पार्श्वभूमि त्यांना नाहीं आणि कम्युनिस्टांकडून प्रतिस्पर्धी मार्क्सवादी पक्ष या नात्यानें कॉंग्रेस सोशालिस्टांना दडपलें जातें. कम्युनिस्टांजवळ अव्वल दर्जाच्या कर्तृत्वाचे व अनुभवी पुढारी आहेत; तसे कॉंग्रेस-सोशालिस्टांत फारसे नाहींत आणि पक्षसंघटनेचा जो झगझगाट कम्युनिस्टांजवळ आहे तोही कॉंग्रेस-सोशालिस्टांजवळ नाहीं. इत्यादि कारणांमुळें समाजांत व राजकारणांत जें स्थान कॉंग्रेस-सोशालिस्टांना मिळावें तें मिळत नाहीं. कम्युनिस्टांबद्दल समाजांत प्रेम नसलें तरी दरारा आहे; आणि रशियन क्रांति व मार्क्सवाद यांच्या भडक रोषणाईमुळें तरुणांना कम्युनिस्टांचा दबदबा विशेष वाटतो. आज विद्यार्थ्यांनीं त्यांना सपशेल फेकून दिलें आहे; पण ते पुन्हा विद्यार्थ्यांत वजन मिळविणार नाहींत अथवा पुन्हा कामकरी-शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचे निमित्तानें त्यांचें नेतृत्व घेणार नाहींत असें म्हणणें धाडसाचें होईल.

* * *

म्हणून स्फोटक द्रव्य व्यवस्थितपणें रखवालींत ठेवण्याची खबरदारी जशी समाजानें घेणें अवश्य आहे त्याचप्रमाणें कम्युनिस्टांची व्यवस्था लावणें हेंही समाजाचें व राजकीय विचारवंतांचें कर्तव्य आहे असा येथें मी इशारा देवून ठेवतों. पण कम्युनिस्टांसंबंधानें इतर राजकीय पक्षांना इशारा देण्यासाठीं मी हा लेख लिहीत नाहीं. खुद्द कम्युनिस्टांना, ते लोकांना कसे दिसतात, स्वतः कसे वागतात, राजकारणांत त्यांचेपासून उपयोग अथवा अपाय काय होतो, हें स्पष्टपणें दाखवावें म्हणून मी हें लिहीत आहें. वर त्यांचें जें चित्र मीं काढलें आहे तें हिडीस आहे. त्यांत गुण आहेत त्यापेक्षां दोषच अधिक आहेत. कम्युनिस्टांना आपण खरोखरच असें आहों हें पटतें व त्यावद्दल अभिमान वाटतो. म्हणून त्यांचेशीं सरळ युद्ध करणें हाच समाजापुढें उपाय आहे. ज्यांना हें चित्र पसंत नाहीं व आपण असें नाहीं असें ज्यांना वाटतें त्यांनीं जरा अंतर्मुख होऊन पाहावें, लोकमताचा कानोसा घ्यावा म्हणजे माझ्या लिहिण्याचा त्यांना प्रत्यय येईल. मी एवढेंच म्हणतों कीं मीं हें चित्र सौम्यपणें व सहानुभूतीनें काढलें आहे. लोकांचा समज याहून फारच वाईट आहे. कम्युनिस्टांत असे लोक आजही अनेक आहेत कीं त्यांना हें चित्र कम्युनिस्ट पक्षाचें आहे हें पटतें. त्यांना तें आवडत नाहीं, पण तें बदलावें कसें हें कळत नाहीं, दोष नेमका कोठें आहे हें कळत नाहीं, पक्षसंघटनेच्या शिस्तींत श्रद्धेनें व निर्धारानें बरेंवाईट कार्य जें वाट्याला येईल तें ते करीत राहतात, आणि बोल्शेव्हिक क्रांतीसारखा प्रसंग येईल तेव्हां, समाज नाइलाज होऊन आपल्या पायाशीं येईल व त्याचें आणि जगत्क्रांतीचें आपण नेते बनूं असें मनोराज्य करीत असतात. कम्युनिस्टांतील या वर्गास मला त्यांची चूक दाखवावयाची आहे.

* * *

कम्युनिस्टांचें चुकतें कुठें यासंबंधानें मींहि पुष्कळ दिवस विचार केला. हिंदी राजकारणासंबंधानें मॉस्कोकडून सर्व आज्ञापत्रें घेणें ही त्यांची चूक होय असें माझें मत झालें होतें, व तें पुष्कळ दिवस कायम होतें. येथली परिस्थिति वेळोवेळीं कशी असते हें मॉस्कोवाल्यांना कळत नाहीं आणि मग त्यांनीं दिलेल्या चुकीच्या आज्ञांनीं येथील कम्युनिस्टांच्या राजकारणाचा खेळखंडोबा होतो असें मला वाटे. पण येथील कम्युनिस्टांत दांडगाई, मवालीपणा, दडपेगिरी, दडपशाहीवृत्ति हे जे गुण दिसतात ते रशियांतही असले तरी तिकडून

त्यांचीं पार्सलें येथें येतात हें मला पटेना. म्हणून अधिक विचार करतां कम्युनिस्टांचें पक्षसंघटनेचें जें तंत्र तेंच चुकीचें आहे अशी माझी खात्री झाली. हें कसें तें मी त्यांना संक्षेपतः दाखवूं इच्छितों.

* * *

मी हें सांगून ठेवतों कीं, कम्युनिस्ट म्हणजे मार्क्सवादी असा एक पक्ष येथें हवा असें माझें निश्चित मत आहे. हिंदुस्तानचें व जगाचें राजकारण यापुढें मार्क्सवादाच्या दिशेनेंच गेलें नाहीं तर जगांत अनर्थ होणार आहे. चालू युद्धानंतरचा हा प्रश्न नव्हे. ही लढाईच मार्क्सवाद्यांनीं आतां आपल्या हातीं घेतली पाहिजे आणि हें युद्ध लढण्याला सत्ता मिळावी म्हणून त्यांनीं स्वतः लढलें पाहिजे. मार्क्सवादाच्या मार्गोव्यानें हें युद्ध लढलें जाईल तरच स्वातंत्र्य व लोकशाही यांची कांहीं धडगत आहे. पण म्हणूनच कम्युनिस्ट पक्षानें तांतडीनें आपलें सदोष तंत्र बदलून आपलें शुद्धीकरण केलें पाहिजे. आज समाज व कम्युनिस्ट पक्ष हे जे एकमेकांकडे भीतीनें व तिरस्कारानें पाहत आहेत तें थांबलें पाहिजे. पक्षाच्या अंतर्गत कारभारांत जी लष्करशाही नांदत आहे ती नाहींशी झाली पाहिजे. समाज व कम्युनिस्ट पक्ष यांचेमध्यें स्नेहभाव निर्माण झाला पाहिजे.

* * *

हें घडून न येण्यास कारण असें जें पक्षाचें तंत्र तें म्हणजे गौप्य हें होय. वरवर पाहणाऱ्यास असें वाटतें कीं, सरकारनें कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरविला त्यामुळें गौप्य हें त्याचें अपरिहार्य असें तंत्र झालें. पण हें खरें नाहीं. पक्षाच्या आरंभापासून त्याच्या मध्यवर्ती धोरणाचे धागेदोरे अदृश्य असतात. पैसा कोठून येतो हें गुप्त ठेवणें भाग पडत असेल, पण पक्षाचें जें राजकारण असतें तें लोकांना छापांतील गणपतीच्या स्वरूपांतच पहायला मिळतें. हें धोरण ठरतें तेव्हां तें कसें ठरतें, निरनिराळ्या मतभेदांच्या छटा कशा दिसतात व त्या शेवटीं एकांत एक मिसळून एखाद्या वेळचें अखेरचें मत कसें बनतें, त्यांत पुन्हा बदल होऊं लागतो तो कसा होऊं लागतो, हें सर्व बाहेर कोणास-ही कळत नाहीं. यामुळें समाजाला कम्युनिस्टांसंबंधानें विश्वास वाटत नाहीं. टेरॉरिस्ट अथवा दहशतवादी यांचें जसें सगळें तंत्र गुप्त असतें तसेंच या कम्यु-निस्टांचें असल्याचा लोकांना अनुभव आहे. पण कम्युनिस्टांबद्दल समाजाला

जितकी भीति वाटते तितकी टेरॉरिस्टांबद्दल वाटत नव्हती. कारण टेरॉरिस्ट एखाददुसऱ्या अधिकाऱ्याचा बळी घेत आणि स्वतः त्याचें प्रायश्चित्त सोशीत. त्यामुळें राजकीय प्रगति झालीच तर समाजाचा प्रत्यक्ष फायदा होई आणि न झाली तर समाजाचें प्रत्यक्ष नुकसान कांहींच होत नसे. पण कम्युनिस्ट हे गुप्तपणें काय जें करीत असतात, त्यामुळें एकंदर जनता क्षुब्ध होते. सरकार, सावकार, दुकानदार, कारखानदार यांचें जीवित व मालमत्ता संकटांत येते, इतकेंच नव्हे तर विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, कौटुंबिक व सामाजिक शिस्त आणि बंधनें नष्ट होऊन हलकल्लोळ माजण्याची भीति समाजाला वाटते. हें सर्व घडवून आणण्याची तयारी कम्युनिस्ट हे पडद्यामागें करीत असून, विद्यार्थ्यांना असल्या कार्यांच्या नादीं लावतात— 'बिघडवतात' अशी समाजाला भीति वाटत आहे.

पुष्कळ कम्युनिस्टांचा समज असा असतो कीं, पक्षसंघटनेंतील गौप्य हें मार्क्सवादी क्रांतिकारक पक्षसंघटनेला अत्यवश्यच आहे. पण नेहमींच ही गोष्ट खरी नाहीं. लेनिनला हें गौप्य रशियांत अवश्य वाटलें याचें कारण झारचा जुलमी अंमल हें होय. तेथल्या त्या परिस्थितींत उघड चळवळ कोणतीच करणें अशक्य असल्याचा त्यांना अनुभव आला. पण हिंदुस्थानपुरतें बोलायचें तर येथें गुप्त संघटनेची जरूरी केव्हांही भासलेली नाहीं. कॉंग्रेस ही अनेकदा बेकायदा ठरली आहे. हल्लीं ती बेकायदाच आहे. तिच्यामार्फत अथवा तिच्या नांवावर बेकायदा कृत्यें गुप्तपणें केलीं जातही असतील. पण राजकीय धोरण व कार्यक्रम यासंबंधाने चर्चा व निर्णय या बाबतींत कॉंग्रेसचें गुप्त असें कांहीं नाहीं. कॉंग्रेस वर्किंग कमिटींतील चर्चा गुप्त ठेवतात हें खरें; पण सरकारनें एकदा या गुप्त चर्चेचीं टिपणें पळवून नेऊन प्रसिद्ध केलीं तेव्हां त्यांत नवें कोणतेंच गौप्य आढळलें नाहीं. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीपूर्वीं जाहीरपणें जे मतभेद तपशीलवार व्यक्त झाले होते तेच वर्किंग कमिटीच्या बैठकींत व्यक्त झालेले आढळले. त्यासंबंधानें आपण अंधारांत होतों असें कोणासही वाटलें नाहीं.

* * *

कॉंग्रेस आज बेकायदा असतांना कॉंग्रेसवर जेवढें सरकारी बंधन आहे तेवढेंच पूर्वीं कम्युनिस्टांवरही होतें. कम्युनिस्ट पक्ष बेकायदा असतांना पक्षाचे

कित्येक सभासद कित्येक वर्षे केवळ पक्षाचें नांव वगळून सर्व प्रकारची संघटना करीत होते; पण सरकारनें त्यांना कधींच हात लावला नाहीं. मार्क्सच्या शिकवणीचा प्रचार कधींच बेकायदा नव्हता व नाहीं. तात्त्विक चर्चेवर अथवा सौम्यपणें केलेल्या व्यावहारिक चर्चेवरही कम्युनिस्टांना कधीं बंधन सोसावें लागलें नाहीं. कम्युनिस्ट बेकायदा असतांही रामगड कॉंग्रेसच्या ऑ. इं. कॉं. कमिटींत कम्युनिस्टांनीं जीं भाषणें केलीं तीं ज्यांनीं ऐकलीं त्यांना कम्युनिस्ट पक्षावरील बेकायदेशीरपणाचा शिक्का हा फार्स वाटला. बेकायदा अवस्थेंतही इतका उघड प्रचार चालू असतां पक्ष कायदेशीर असल्याच्या अमदानींत, पक्षाचें मध्यवर्ती राजकारण कधींच खुलेपणानें चालत नसे. दहशतवाद्यांचीं कारस्थानें जशीं पडद्याआड चालत तशींच कम्युनिस्टांचींही पडद्याआड चालत.

*　　*　　*

'इन्टर्नल डेमॉक्रसी' म्हणजे 'अंतःपुरांतील लोकशाही' असें या गोप्यतंत्राला कम्युनिस्टांनीं गोड नांव दिलें असून, त्याला बहुतेक अनुयायी बळी पडतात. याचा अर्थ असा कीं, "पक्षाचें गूढ बाहेर फुटत नसलें तरी पक्षांतील सभासदांच्या बैठकींतून खुल्या दिलानें, पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्यानें भरपूर चर्चा होते; आणि जो निर्णय होतो तो पूर्ण एकमतानें अथवा बहुमतानें म्हणजेच शुद्ध लोकशाहीनें होतो, अंतर्गत दडपशाही हा भ्रम आहे, ज्यांना आमच्या अंतःपुरांत डोकावून पाहायला मिळत नाहीं, अथवा ज्यांना हाकलून दिलें आहे त्यांनीं मत्सरानें उठविलेला हा बागुलबुवा आहे" असें कम्युनिस्ट म्हणतात. पण हें समर्थन योग्य नव्हे.

पहिली गोष्ट अशी कीं, ज्या कोट्यवधि जनतेच्या जीवनाच्या उलथापालथीसंबंधाचे अखेरचे निर्णय तुम्ही ठरवितां ते मुळांत तुम्हांला कसे सुचतात, त्यांत एकमेकांच्या मतानें घासाघीस करून तुम्ही सुधारणा कशी करतां, परिस्थिति तपासतां म्हणजे काय करतां हें त्या जनतेला समजत नाहीं. मलेरियाच्या रोग्याला नाक दाबून धरून डॉक्टरनें कोयनेलचा घोट जसा पाजावा अथवा रोग्याला भूल देऊन त्याची मूळव्याध जशी कापावी तसें कम्युनिस्टांचें हें वर्तन लोकांना वाटतें. फरक पडतो तो हा कीं, डॉक्टर हा रोग्याकडून राजीखुषीनें निवडला जातो, पण कम्युनिस्ट घोड्याची लगाम खेचून त्यावर स्वार

व्हावें त्याप्रमाणें जनतेवर स्वार होऊं पाहतात व मग सहजच लाथा खातात. दहशतवादी हे फारतर कोणा तरी अधिकाऱ्याचा खून करीत पण लोकांच्या दैनंदिन जीवनास तोशीस पोंचवीत नसत, म्हणून समाजानें त्यांची फारशी फिकीर केली नाहीं. पण कम्युनिस्ट हे समाजकल्याण करण्याचा पुकारा करून समाजाच्या पायांत सुरुंगाची दारू भरीत असतात. अर्थात् याची आवश्यकता कशी, केव्हां आणि कोठवर उत्पन्न झाली आहे हें समजून घेण्याचा, हे विचार व निर्णय ठरत असतांच त्यांत हस्तक्षेप, सहकार्य व त्यास विरोध करण्याचा जनतेला हक्क आहे.

*　　　　*　　　　*

कम्युनिस्ट जे निर्णय ठरवीत असतात ते त्यांच्या संघटनेंतील सभासदांपुरतेच ठरवीत नाहींत; एकंदर समाजासंबंधानें ठरवीत असतात. त्या निर्णयाबाबतींत समाजाचा सल्ला न घेतां फक्त पक्षसंघटनेंतील सभासदांचाच सल्ला घेणें ही लोकशाही होऊंच शकत नाहीं. खरोखर पक्षसंघटनेंतील सभासदांना आपले विचार तयार होत असतांना ते सामान्य जनतेसमोर खुलेपणानें मांडण्याचा हक्क जोंवर नाहीं तोंवर, ते पक्षसंघटनेंत विचारस्वातंत्र्य कसें गाजविणार हें कळूंच शकत नाहीं. पक्षांत घ्यायचें व ठेवायचें कुणाला आणि हाकलायचें कुणाला याची सत्ता एका विशिष्ट कंपूच्या हातींच राहणार. जीं माणसें राजीखुषीनें गुलामगिरी व दडपशाही पत्करतील त्यांनाच अंतःपुरांत प्रवेश व ठाव मिळणार आणि कंपूशाहीविरुद्ध सामान्य जनमताचा पाठिंबा घेण्याची त्यांना बंदी असणार. अशा कंपूशाहीच्या कैचींत स्वातंत्र्यप्रेमापेक्षां करड्या शिस्तीच्या नांवाखालीं गुलामगिरी गाजवावी व गुलामगिरी सोसावी हीच प्रत्येक सभासदाचे बाबतींत सवय, स्वभाव आणि संस्कृति बनते. मग दहशतवादी गुप्तसंघटनेच्या अंगभूत असे जे भयानकपणा, क्रूरपणा, ताठरपणा, आततायीपणा, विश्वासघातकी वृत्ति, पिशाचवृत्ति वगैरे गुणदोष, ते एखाददुसऱ्या व्यक्तीच्याच नव्हे, तर सगळ्या संघटनेच्या अंगीं बाणतात.

*　　　　*　　　　*

कॉंग्रेसमधील कांहीं वरिष्ठांनीं कांहीं विशिष्ट व्यक्तींविरुद्ध वेळोवेळीं शस्त्र धरलें, पण कॉंग्रेसवरिष्ठांकडून अन्याय होतो असें जनतेला वाटतांच अन्याय पावणाऱ्या व्यक्तीचे बाजूनें लोकमत धावून आलें आणि बाहेरील लोक-

मताच्या या दडपणामुळें अन्यायवृत्तीस तावडतोब आळा बसला. काँग्रेसला फॅसिस्ट म्हणणाऱ्यांना शेवटीं काँग्रेसचे कांहीं गुणविशेष मान्य करावे लागले ते असे : पक्षसंघटनेंत शिस्त राखण्याचा प्रयत्न काँग्रेस करते तो अवश्य आहे. ज्या वर्तनामुळें काँग्रेसच्या रोजच्या कार्यांत उपद्रव होतो व पक्षसंघटना मोडून पडण्याची धास्ती असते असें वर्तन अथवा आचरण शिस्तबाह्य मानलें जातें व सदर सभासदास काँग्रेस सोडावी लागते हें अवश्य आहे. एरवीं पक्षसंघटना टिकूंच शकत नाहीं. पण काँग्रेसमध्यें होणारे विचारविनिमय व निर्णय जनतेच्या नजरेखालीं, तिच्या सहकार्यानें व तिच्या अनुमतीनेंच होतात. काँग्रेसमध्यें लोकशाही आहे ती अशी आहे, यामुळें काँग्रेसच्या निर्णयाबद्दल लोकांत विलक्षण आदर व विश्वास असतो. काँग्रेसपुढाऱ्यांबद्दल लोकांत प्रीति असते; आणि काँग्रेसनें कितीही चुका केल्या अथवा काँग्रेसच्या कार्यक्रमामुळें कितीही नुकसान झालें तरी जनतेची तक्रार येत नाहीं.

* * *

"युद्धसंघटना म्हटली कीं तींत गौप्य आलेंच. शत्रूला आपले डावपेच कळूं देणें म्हणजे पराभवास आमंत्रण देणेंच होय, कम्युनिस्ट पक्ष ही वर्गयुद्धसंघटनाच होय, तिच्या व्यवहारांत गौप्य असणारच" असा एक सोपा पण उथळ युक्तिवाद कम्युनिस्टांत ऐकण्यांत येतो. पण ही शाब्दिक पोपटपंची आहे. सरकारचें लढाईखातें म्हणजेच सगळें सरकार नव्हे. युद्धखात्यापुरतें गौप्य ठेवण्यास हरकत नाहीं; पण बाकीचीं सर्व खातीं लोकमताच्या प्रकाशांत चाललीं पाहिजेत. तसेंच सगळाच्या सगळा कम्युनिस्ट पक्ष म्हणजे वर्गयुद्धसंघटना नव्हे. किंबहुना वर्गयुद्ध म्हणजे शस्त्रयुद्ध नव्हेच, तें पुष्कळ अंशानें मतप्रसारयुद्ध, संघटनायुद्ध असतें; बहुसंख्यसमाजास बौद्धिक शिक्षण व आचारशिक्षण द्यायचें असतें आणि बहुसंख्य समाजाकडून तें वर्गयुद्ध लढवायचें असतें. हा लढा संपासारख्या निःशस्त्र उपायांनीं व कायदेशीर मार्गांनींच पुष्कळ काळ चालवयाचा असतो. अखेर जेव्हां राज्यक्रांतीची वेळ येते तेव्हां तिच्यासाठीं लोकमत उघडपणें तयार करायचें असतें. हळूहळू कम्युनिस्ट पक्ष म्हणजे पक्षांतले सभासद असें नव्हे, तर पक्ष म्हणजे एक प्रचंड वर्गसंघटना असें त्यास स्वरूप येतें. राष्ट्राराष्ट्रांतील शस्त्रयुद्धांत सैन्याचे सेनापति मागें राहून सैन्यास मार्गदर्शन करीत असतात. वर्गयुद्धांत क्रांतीचे

वेळीं पुढारी बहुतेक तुरुंगांत अथवा गुप्त असतात. लढ्याचें प्रत्येक पाऊल सामान्य जनतेस आपल्या बुद्धीनें अनुभवानें व अकलेनें टाकावें लागतें आणि त्यासाठीं कम्युनिझमचें क्रांतिशास्त्र व युद्धतंत्र सामान्य जनतेस माहीत असावें लागतें. मी रशियन राज्यक्रांतींतला अनुभवच येथें मांडतों आहे. बोल्शेविक पक्ष गुप्त होता तो तेथल्या नाइलाज परिस्थितीमुळें. पण पक्षांतील मतभेद व वादविवाद जाहीरपणें होत असत. प्रत्यक्ष १९०५ सालीं व १९१७ सालीं जनतेनें क्रांतीचीं पावलें स्वतः टाकलीं, बोल्शेविकांनीं आपलें क्रांतितंत्र जनतेला शिकविलें व जनतेनें समजून घेऊन आचरून दाखविलें. कॉर्निलोव्ह या सरसेनापतीनें बंड केलें त्या वेळीं लेनिन, ट्रॉट्स्की, वगैरे सर्व पुढारी गुप्त अथवा तुरुंगांत होते. जनतेनें आपल्या कर्तृत्वानें सरसेनापतीस विरोध केला, आपल्या मतप्रसारानें सरसेनापतीच्या सैन्यास जागृत केलें, आणि आपल्या बाजूस वळविलें. अखेरीस सरसेनापतीच्या बाजूला एकहि सैनिक उरला नाहीं आणि एकहि गोळी न उडवितां त्याचें बंड बोल्शेव्हिक जनतेनें मोडलें. 'बोल्शेव्हिक' हा अखेरीस पक्ष न राहतां 'बोल्शेव्हिक' जनता निर्माण झाली व तिनें क्रांति केली.

* * *

दहशतवादी हे जनतेपासून आपणास कोंडून घेतात, पण क्रांतिकारकांनीं जनतेशीं समरस झालें पाहिजे, हीच लेनिनची खरी शिकवण होय. हिंदी कम्युनिस्ट पक्ष हा लेनिनच्या शिकवणुकीचा अनुयायी नसून दहशतवादी आहे; जनतेपासून अलग, जनतेपासून गुप्त, जनतेला भिवविणारा, जनतेकडून तिरस्कारिला जाणारा असा हा पक्ष आहे. यामुळें त्याचे अंगीं आरंभीं सांगितलेले दोष आले आहेत. कम्युनिस्टांत व्यक्तिशः विद्वान्, कर्तबगार, त्यागी व अखिल हिंदी जनतेला ललामभूत असे किती तरी लोक आहेत. लढाऊपणा पक्षनिष्ठा, संघटित कार्यकर्तृत्व वगैरे गुणांत काँग्रेसजनांपेक्षां कम्युनिस्ट हे निःसंशय वरचढ आहेत. त्यांची हुकूमशाहीची गादी मॉस्कोला आहे हा फारसा दोष नव्हे. पक्ष उघड व लोकशाहीप्रधान होईल तर स्थानिक प्रश्न व स्थानिक लोकमत यांची पडछाया पक्षाच्या धोरणांत खात्रीनें पडूं लागेल. हिंदी राजकारणास यापुढें मार्क्सवादी वळण लागलें पाहिजे व तसें तें लावण्यासाठीं मार्क्सवादी पक्षाची जरूरी आहे. हळूहळू काँग्रेसचें हल्लींचें नेतृत्व

प्रगतीचे कामीं अपुरें पडूं लागेल आणि तें चालू युद्धकाळांतच अपुरें पडूं लागेल अशी भीति आहे. फार काय चालू युद्धकार्यही, कॉंग्रेस सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट अथवा दुसऱ्या कोणत्या तरी नांवांच्या ( अथवा निनांवाच्या ) मार्क्सवादी पक्षास, राज्यसत्ता काबीज करून, हातीं घ्यावें लागेल. जो पक्ष स्वतांस मार्क्सवादी म्हणवितो त्यानें यासाठीं उघड भूमिकेनें वावरलें पाहिजे. हिंदी कम्युनिस्ट पक्ष उघडपणें वावरूं लागेल तर त्याचे हल्लींचे पुढारी कदाचित् मागें पडतील कदाचित् कॉंग्रेस सोशॅलिस्ट व कम्युनिस्ट हे भेद नाहींसे होतील, कदाचित् कॉंग्रेस व मार्क्सवादी पक्ष यांची एकजुटीची व एकरूपतेची भूमिका निर्माण होईल. हें काय व कसें होईल तें मी सांगूं शकत नाहीं. पण कम्युनिस्ट पक्ष कायदेशीर झाला हें पुरे नाहीं, तो उघड झाला पाहिजे. जनतेचा, जनतेसाठीं, जनतेच्या पाठिंब्यानें चाललेला असा तो पक्ष झाला नाहीं तर हा एक रोग मानण्याइतके दोष त्यामध्यें आहेत आणि त्याला शत्रु मानून त्याशीं लढण्याखेरीज जनतेला दुसरा मार्ग नाहीं. कम्युनिस्टांशीं लढणें हें दुःखद वाटतें म्हणून त्यांना मी हा आत्मसंशोधनाचा व सुधारणेचा उपाय सुचवीत आहें.

— 'चित्रा', दिवाळी अंक, १९४२

★

# आधुनिक भारतांतील कृष्ण आणि भीष्म : : ४

टिळकांच्या मृत्यूनंतर बावीस वर्षांत महाराष्ट्रांतील सुशिक्षित मध्यम वर्गानें बापूजी अणे यांचेवर जितकें प्रेम केलें तितकें महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याही राजकीय पुढाऱ्यावर केलें नाहीं. नागपूर-वऱ्हाडकडे तर सुशिक्षित मध्यम वर्गाप्रमाणें सामान्य जनतेनेंही बापूजींच्यावर दृढ प्रेम केलें आहे. केळकरांचा मानसन्मान महाराष्ट्रानें अणे यांचेपेक्षां अधिक केला. विद्वत्ता, बुद्धिमत्ता व कर्तबगारी यांत अणे यांचेपेक्षां केळकर वरचढ आहेत. पण केळकरांचे-बद्दल थोडासा दरारा, थोडीशी भीति व त्या मानानें कमी आदर व त्याहूनही कमी प्रेम महाराष्ट्राला वाटलें आहे. अणे यांच्याबद्दल भीति कोणासच वाटली नाहीं, सर्वांना बराचसा आदर वाटतो आणि प्रेम तर निरतिशय वाटतें. स्वतां केळकर लोकांच्या मनांतील या भावना जाणून आहेत. केळकरांना अणे यांच्या-बद्दल थोडासा रागही आहे. पण त्याचें कारण राजकीय इतिहासांत सांपडेल. केळकरांना अणे यांचेबद्दल जी भावना आहे ती लोकांचेप्रमाणेंच कांहींशी आदराची व त्याहून अधिक प्रेमाची आहे. प्रेमळपणा हा केळकरांच्या स्वभावांत आहे, पण तो त्यांचा गुण त्यांनाच फारसा आवडत नसावा व म्हणून तो आपल्या ठिकाणीं आहे याचा त्यांना अभिमान वाटत नाहीं व होतां

होईतों त्याचें प्रदर्शन होऊं देण्याचें ते टाळीत असतात. पण अणे यांचे-बद्दलचें आपलें प्रेम त्यांनीं अनेक वेळां खाजगी व जाहीर रीतीनें व्यक्त केलें आहे. अर्थात् अणे यांचा गौरव करतांनाही आपल्या मनांतला राग ते छद्म-रूपानें व्यक्त करण्याचें टाळीत नाहींत हा भाग वेगळा. अणे हे याप्रमाणें गेल्या बावीस वर्षांत महाराष्ट्राचे एक आवडते थोर पुरुष झाले आहेत. राज-कीय प्रतिपक्षांतही भांडणें निकरास पोंचलीं असतां अणे यांचेबद्दल लोकांचें प्रेम कधीं कमी झालें नाहीं. महाराष्ट्रांतल्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानांतही अण्यांचे-बद्दल अशीच श्रेष्ठ भावना आहे. स्वतः गांधींचें व अण्यांचें कधींच बनलें नाहीं. अणे केळकरांच्यापेक्षां अधिक फटकळ असल्यानें गांधींचेसंबंधानें केव्हां केव्हां फार तिखट बोलतात. पण गांधींना अण्यांच्यासंबंधानें अतिशय आदर व प्रेम आहे. हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांत पं. मालवीयांचेबद्दल जसा सर्व पक्षांत अत्यादर आहे तसा अणे यांचेबद्दलही आहे असें म्हटलें तर मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं.

* * *

असे हे सर्वांना प्रिय व आदरणीय झालेले बापूजी अणे जेव्हां व्हाइस-रॉयच्या कार्यकारी मंडळांत गेले तेव्हां तीव्र विरोध आणि दृढ पाठिंबा यांची प्रचंड रणधुमाळी महाराष्ट्रांत व साऱ्या हिंदुस्थानांत माजली. अणे कार्यकारी मंडळांत गेले या विषयाची जितकी चर्चा झाली तितकी कार्यकारी मंडळांत गेलेल्या दुसऱ्या कोणत्याही सभासदांसंबंधानें झाली नाहीं. ज्यांनीं अण्यांना पाठिंबा दिला त्यांना हें कार्यकारी मंडळ मुळींच मान्य नव्हतें. पण ज्या अर्थीं अणे यांना तेथें जावेंसें वाटलें त्या अर्थीं तेथें ते कांहीं अलौकिक कर्तृत्व करून दाखवितील अशी त्यांना खात्री वाटली. उलट ज्यांना अणे यांचें करणें अयोग्य वाटलें त्यांनीं महाराष्ट्रांतल्या गेल्या बावीस वर्षांतील काँग्रेसविरोधी दुःखद राजकारणाचा हा कळसाध्याय आहे असें म्हणून अश्रुपात केला. आयुष्यभर स्वार्थत्याग केलेले अणे म्हातारपणीं मोठ्या पगाराला लालचावले अशीही टीका कित्येकांनीं केली. अणे यांनीं आतां आपल्या एक वर्षाच्या अमदानींत विशेष चांगलें असें कर्तृत्व कांहींच गाजविलें नाहीं. उलट सरकार व काँग्रेस यांचेमध्यें समेट घडविण्याचे कामीं त्यांना अपयश आलें. सरकार-पासून जनता अधिकाधिक दूर गेली. अणे राजीनामा देणार अशा बातम्या

उठूं लागल्या. गांधी व कॉंग्रेस यांची न्याय्य मागणी सरकारनें धुडकावून लावून त्यांना अटक केली आणि देशभर अघोर दडपशाही माजविली. आतां तर अणे यांना राजीनामा देण्यावांचून सुटकाच नाहीं अशी सर्वांची खात्री झाली. आणि मग जेव्हां मध्यअसेंब्लींत अणे यांनीं भाषण करून गांधींच्या व कॉंग्रेसच्या अटकेस पाठिंबा दिला व अधिकाऱ्यांच्या दडपशाहीवर आपलें उपरणें झाकलें तेव्हां अणे यांना पाठिंबा देणाऱ्यांनाही हादरा बसला. 'बापूजी हें काय, अहो, आमची तुमच्यापासून वेगळी अपेक्षा होती', 'तुम्ही कांहीं अलौकिक कराल असें आम्हांला वाटलें होतें' असें यांनीं हुंदके दिले. ज्यांना अणे यांचें वर्तन मुळांतच चूक वाटत होतें त्यांनाही अणे यांनीं व्हाइसरॉयला पाठिंबा दिला याचें आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आणि अणे म्हातारपणीं पैशाला लालचावले असें ज्यांनीं आधींच म्हटलें होतें त्यांनीं 'आम्ही हें आधींच बोललों होतों' म्हणून आनंदानें टाळ्या पिटल्या.

* * *

अशा या बापूजी अण्यांचेकडे—त्यांच्या वादग्रस्त झालेल्या वर्तनाकडे—मी येथें जरा तात्त्विक दृष्टीनें पाहणार आहें. अणे हे महनीय पुरुष आहेत, यांत शंका नाहीं आणि ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांत गेले हें चूक असलें तरी त्यांची महनीयता त्यामुळें कमी झालेली नाहीं. पैशाचा लोभ त्यांना सुटला असता तर थोड्याशा मुत्सद्देगिरीनें गेल्या बावीस वर्षांत ते अनेकदां प्रांतिक मंत्री झाले असते. कॉंग्रेसच्या अमदानींत पंतप्रधानही झाले असते. द्रव्य हें कांहीं त्यांनीं वमनासारखें मानलेलें नाहीं. हल्लींच्या कार्यकारी मंडळाचा मोठा पगार ते घेतातही. पण डॉक्टर हा रोग्याकडून फी घेतो म्हणून त्याचें रोग्याची चाकरी करण्याचें कार्य दूषित होतें असें म्हणतां येणार नाहीं. रोग्याची सेवा तो कशी करतो हें पाहिलें पाहिजे. त्याचे हातून रोगी बचावला नाहीं, त्याचा अंदाज चुकला अथवा आपल्या अंगच्या कौशल्याबद्दल त्याचा समज अवास्तव असला तर तसें म्हणावेंच. पण तरीसुद्धां त्यानें आपलें काम जिव्हाळ्यानें केलें कीं नाहीं हें स्वतंत्रपणें पाहतां येतें. निदान फार थोर म्हणून गणलेलीं माणसें धनलोभाला बळी पडलीं असें मानलें तरी दुसरीं कोणतीं कारणें त्यांच्या त्या वर्तनामागें होतीं कीं नाहीं याचा खोल विचार केल्यावांचून केवळ आर्थिक लोभावर त्यांचें चारित्र्य आपटूं नये. माझ्या एका

मित्रासमोर मीं हा विचार मांडला असतां "अहो 'अर्थस्य पुरुषो दासः'– माणूस पैशाचा गुलाम असतो असें स्वतां भीष्मांनीं स्वतःच्या वर्तनासंबंधानें म्हटलें आहे, मग बापूजींचें काय सांगतां!" असे उद्गार त्यानें मजजवळ काढले. मी क्षणभर स्तब्ध बसलों, तेव्हां मी निरुत्तर झालों असें त्या मित्राला वाटलें. पण मी स्तब्ध बसलों तो निरुत्तर झालों म्हणून नव्हे. भीष्माच्या चरित्राबद्दल माझ्या त्या मित्राचा आणि मोठमोठ्या पंडितांचा जो समज आहे तोच चुकीचा आहे हा विचार माझ्या मनांत आला आणि नंतर मीं माझें हें म्हणणें त्या मित्रास सांगितलें. तेंच आज येथें जरा विस्तारानें मांडणार आहें.

* * *

भीष्म ही महाभारतांतील अत्यंत थोर अशी व्यक्ति आहे. पित्याच्या कामुकवृत्तीस आड येऊं नये म्हणून त्यानें राज्यावरचा हक्क सोडून आजन्म ब्रह्मचर्य पाळलें. आणि आपल्या सावत्र भावांना राज्यावर बसवून त्यांच्या पुत्रपौत्रांचें राज्य सांभाळलें. या पौत्रांत म्हणजे कौरव-पांडवांत पुढें कलह माजले आणि कौरव पक्षाचें रक्षण करीत असतां भीष्म धारातीर्थीं पतन पावला. तो फार वर्षें जगला व त्याचें चरित्र अतिशय धीरोदात्तपणें कर्तव्याचरण करण्यांत गेलें. असा हा भीष्म अन्नाचा गुलाम ठरला असें मानणें चूक होईल. भीष्माच्या वर्तनाचें खरें बीज शोधलें पाहिजे व तसें तें सांपडतेंही. भीष्माच्या आयुष्यांत तीन प्रसंग अतिशय महत्त्वाचे आहेत. पहिला त्यानें आजन्म अविवाहित राहण्याचें ठरवून राज्यावरचा हक्क सोडला त्या वेळचा. 'भीष्माची भयंकर भूल' या मथळ्यावरचा एक लेख जुन्या मासिक मनोरंजनाच्या फाइलींत आढळतो. त्यांत भीष्मासारख्या तेजस्वी पुरुषानें आपला वंश खुंटविला व राज्यावरचा हक्क सोडला ही चूक केली, त्यामुळें पुढें नादानांच्या हातीं राज्य गेलें व अनर्थ झाले असें म्हटलें आहे. तें खरें असो, नसो. तथापि येथें 'अर्थस्य पुरुषो दासः' हा युक्तिवाद तरी खास उपयोगी पडत नाहीं. भीष्माच्या बाजूनें असें म्हणतां येईल कीं, पितृभक्तीच्या दृढभावनेनें त्यानें ती प्रतिज्ञा केली आणि पुढें प्रतिज्ञा पाळणें हेंच त्यास आपलें कर्तव्य वाटलें. सत्यप्रतिज्ञ असणें हा त्या वेळीं श्रेष्ठ गौरवाचा सद्‌गुण मानला जात असला पाहिजे.

* * *

द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळचा प्रसंग अत्यंत हृदयद्रावक आणि चीड आणणारा आहे. द्रौपदीस द्यूतांत जिंकून घेतलेली दासी म्हणून दुःशासनानें द्यूतसभेंत ओढून आणली व तिची विटंबना तो करूं लागला. त्या सभेंत भीष्मद्रोणादि वडील माणसें हा प्रकार निमूटपणें पाहत आहेत हें पाहून द्रौपदी म्हणते—

" धिगस्तु नष्टः खलु भारतानां धर्मस्तथा क्षत्रविदां च वृत्तं।
यत्र ह्यतीतां कुरुधर्मवेलां प्रेक्षन्ति सर्वे कुरवः सभायाम्॥ "

[ या सभेंत कुरुराज्यांतील जी धर्ममर्यादा तिचें उल्लंघन होत असतां हे कुरुवंशज डोळ्यांनीं स्वस्थपणें पाहत आहेत यांना धिक्कार असो. या भरतखंडांतील धर्म आणि क्षत्रियांचें चारित्र्य खरोखर नष्टच झालें काय ? ]

द्रौपदीच्या या त्वेषपूर्ण भाषणावर भीष्म उत्तर करतो,

'न धर्मसौक्ष्म्यात्सुभगे विवेक्तुं शक्नोमि ते प्रश्नमिमं यथावत्।
अस्वाम्यशक्तः पणितुं परस्वं स्त्रियश्च भर्तुर्वशतां समीक्ष्य॥ '

[ हे सुभगे, जो स्वतःच द्यूतांत हरला गेल्यामुळें स्वदेहावरील स्वामित्वाला मुकला तो युधिष्ठिर दुसऱ्याचें धन पणास लावूं शकत नाहीं. पण उलट स्त्री ही पतीची मालकीची वस्तु आहे ( असे दोन परस्परविरुद्ध धर्मादेश मजसमोर येतात ) ते पाहिले म्हणजे धर्म हा फार सूक्ष्म आहे असें वाटतें. म्हणून तुझ्या प्रश्नाचें योग्य उत्तर कोणतें तें मला सांगतां येत नाहीं. ]

यांत द्रौपदीनें विचारलें होतें कीं, तुमचा क्षात्रधर्म बुडाला कीं काय तें सांगा. त्यावर भीष्म म्हणतो धर्म कोणता तेंच मला सुचत नाहीं. मी तरी काय करूं ?

* * *

तिसरा प्रसंग कौरवांचा सेनापति म्हणून भीष्म अर्जुनाशीं रणांगणावर लढत होता त्या वेळचा आहे. हा प्रसंगच भीष्माच्या चरित्रांत अत्यंत महत्त्वाचा गणला गेला पाहिजे.. पांडवांच्या शौर्यामुळें कौरवसेनेचा भराभर संहार होऊं लागला आणि भीष्म कांहीं मनापासून लढत नाहीं असें दुर्योधनाला वाटलें. तेव्हां तो भीष्माकडे गेला व भीष्माला बरेंच टोंचून बोलला. 'पांडवांवर खरोखर तुम्ही कृपा करूं पाहतां म्हणून आमच्या सैन्याची पांडवांकडून चाललेली

ही कत्तल तुम्ही सहन करीत आहां... जर अखेर आमचा पक्ष तुम्हांला सोडून जायचा नसेल तर तुमच्या शौर्यास शोभेसें प्रचंड युद्ध तुम्हीं केलें पाहिजे.' हे दुर्योधनाचे शब्द ऐकून भीष्म चिडला. 'हे राजा, पांडवांना जिंकणें शक्य नाहीं, ते देवांनाही अजिंक्य आहेत. हे तुझ्या हिताचे शब्द मीं तुला सांगितले होते. आतां माझ्या या म्हाताऱ्या शरीरांत असेल त्या शक्तीनें मी शौर्याची शिकस्त करतों, तूं पाहत रहा' असे उद्‌गार काढून भीष्मानें तुंबळ रण सुरू केलें. त्यामुळें पांडवसेनेचा फन्ना उडूं लागला. अर्जुनाच्या रथावर बसलेल्या कृष्णाला काळजी वाटूं लागली. अर्जुनाचा पराक्रम 'मृदु' होऊं लागला. तेव्हां पांडवांचा सर्वनाश आतां अटळ आहे असें पाहून कृष्णानें अर्जुनाच्या घोड्यांची लगाम फेकून दिली, रथाखालीं उडी घेतली आणि भीष्माच्या रथावर जाऊन त्याचा शिरच्छेद करण्याच्या इराद्यानें हातांत चक्र घेऊन कृष्ण भीष्माच्या रथाकडे पायींच धावूं लागला. 'त्या वेळीं धरणी कंप पावूं लागली' ('सकंपन्गां'). कृष्ण आपणास मारण्यासाठीं स्वतः धावून येत आहे असें पाहून भीष्मास हर्ष झाला. तो कृष्णास म्हणतो,

**एह्येहि देवेश जगन्निवास, नमोस्तु ते शार्ङ्गगदासि पाणे ।**
**प्रसह्य मां पातय लोकनाथ, रथोत्तमात् भूतशरण्य संख्ये ॥**
**त्वया हतस्येह ममाद्य कृष्ण, श्रेयः परस्मिन्निह चैव लोके ॥**

[हे जगन्निवासा, हे शार्ङ्ग, गदा आणि खड्ग हातीं घेणाऱ्या देवश्रेष्ठा, ये, ये, तुला नमस्कार असो; हे लोकनाथा, हे प्राणिमात्रांच्या संरक्षका, या युद्धांत या श्रेष्ठ रथांतून उलथून पाडून मला तूं आपल्या बलानें ठार कर म्हणजे इहपरलोकीं माझें कल्याण होईल.]

कवींनीं, हरिदासांनीं आणि पुराणिकांनीं हा प्रसंग अतिशय लोकप्रसिद्ध व लोकप्रिय केलाच आहे.

* * *

पण कवींनीं, हरिदासांनीं व तात्त्विक चर्चा करणारांनींही या कथेचें मर्म नीटसें समजून दिलेलें नाहीं. 'धरीं ना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं' अशी कृष्णानें केलेली प्रतिज्ञा त्यास मोडावयास लावण्याची प्रतिज्ञा भीष्मानें केली होती. तेव्हां कृष्णानें भीष्माची कृष्णभक्ति पाहून आपली प्रतिज्ञा

मोडली व भीष्माला यश दिलें असें वामन पंडितानें या कथेचें सार काढलें आहे. पण मूळ कथेंत केवळ भीष्माची कृष्णाबद्दलची भक्ति दिसून येत नाहीं अथवा कृष्णाची 'हातीं शस्त्र धरणार नाहीं' ही प्रतिज्ञा मोडण्याचें भीष्माचें कौशल्य व शस्त्र हातीं घेण्यांत कृष्णाचें भक्तवात्सल्य दिसून येत नाहीं. भीष्माच्या मनांतली एक मोठी तात्त्विक मळमळ या प्रसंगानें व्यक्त झाली आहे. दुर्योधनाचें वर्तन वेळोवेळीं चुकत असल्याचें भीष्मानें त्यास बजावलें होतें. आपणच वाढविलेल्या या कुरुवंशजांच्या युद्धांत एक बाजू घेऊन आपण पाप तर करीत नाहीं ना, असें त्याचें मन त्याला खात होतें. तशांत त्याला पुरुष-श्रेष्ठ असा वाटणारा जो कृष्ण तोच आपणांस ठार करण्यास येतो आहे असें त्यानें पाहिलें तेव्हां आपली बाजू चुकली असली पाहिजे अशी त्याची खात्री झाली आणि कृष्णाच्या हातून आतां मरावें असें त्याला खरोखर वाटलें. 'ब्रूटस्सारखा थोर पुरुषही आपणावर घाव घालतों आहे तेव्हां आपलें वर्तन चुकीचें असून आपण आतां मरणेंच बरें' अशा अर्थाचे उद्‌गार ( यू टू ब्रूटस्, फॉल देन सीझर ) ज्यूलिअस सीझरनें काढल्याचें प्रसिद्ध आहे. भीष्माची मनोभूमिका या वेळीं कांहींशी या प्रकारची होती.

खरोखर या प्रसंगाचें खरें महत्त्व आणखी पुढेंच आहे. भीष्माचे वरील भाषण ऐकून कृष्ण वेगानें धावतां धावतां म्हणतो—

**त्वं मूलमस्येह भुवि क्षयस्य, दुर्योधनं चाद्य समुद्धरिष्यसि।**
**दुर्द्यूतदेवी नृपतिर्निवार्यः, सन्मंत्रिणा धर्मपथिस्थितेन॥**
**त्याज्योऽथवा कालपरीतबुद्धिर्धर्मातिगो यः कुलपांसनः स्यात्॥**

[ या पृथ्वीवर आज जो हा विध्वंस चालला आहे त्याला तूं कारण आहेस. आणि आज दुर्योधनाची बाजू उचलून धरीत आहेस. अधर्मानें द्यूत खेळणाऱ्या राजाला स्वतः धर्मपालन करणाऱ्या मंत्र्यानें आवरलें पाहिजे. तसा तो आवरला जाऊं शकत नसेल, तो कुलकलंक असेल, धर्ममर्यादा त्यानें उल्लंघिली असेल, कालानें त्याची बुद्धि विपरीत केली असेल, तर त्याचा त्याग केला पाहिजे. ]

**भीष्मस्तदाकर्ण्य यदुप्रवीरं, राजा परं दैवतमित्युवाच**

[ कृष्णाचे हे शब्द ऐकून त्या यादवश्रेष्ठाला भीष्म म्हणाला, 'राजा हेंच श्रेष्ठ दैवत होय.' ]

तेव्हां कृष्ण पुन्हा उत्तर करतो—

**त्यक्तस्तु कंसो यदुभिर्हितार्थे संबोध्यमानो न बुबोध राजा॥**

[ कंसाला मार्गाला आणण्याचा प्रयत्न केला असतांही तो जेव्हां ऐकेना तेव्हां यादवांनीं आपल्या कल्याणासाठीं त्याचा त्याग केला. ]

वरील संवादांत भीष्म व कृष्ण या दोघांचे तात्त्विक मुद्दे आहेत. राजा हाच श्रेष्ठ दैवत होय, त्याचें रक्षण केलें पाहिजे असें भीष्म म्हणत होता. तर उलट राजा वाईट चालीचा असला तर त्याचा त्याग व नाश केला पाहिजे असें कृष्ण म्हणत होता. सांगण्याचा मुद्दा हा आहे, कीं भीष्माची भूमिका आपण दुर्योधनाचें अन्न खातों त्याची चाकरी केली पाहिजे अशी क्षुद्र नसून, समाजव्यवस्थेंत राजा श्रेष्ठ दैवत आहे; त्याचें रक्षण केलें पाहिजे असें भीष्माचें मत होतें. श्रीकृष्णाचा व भीष्माचा अतिशय उच्च अशा भूमिकेवर प्रामाणिक मतभेद होता असें यावरून दिसून येईल.

भीष्मचरित्रांतील या प्रसंगांत व आजच्या राजकारणांत सर्वस्वी साम्य आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. पण राज्यशासनासंबंधानें कृष्ण आणि भीष्म या दोघांनीं ज्या भिन्न भिन्न भूमिका घेतल्या आहेत त्याच व तशाच भूमिका आज अनुक्रमें गांधी आणि अणे यांनीं घेतल्या आहेत एवढेंच मला दाखवायचें आहे.

* * *

चालू युद्धाच्या सुरवातीनंतर अणे व गांधी या दोघांच्या भूमिका अतिशय भिन्न व परस्पर-विरोधी होऊं लागल्या. ब्रिटन दुर्बल आहे व त्याला पराभवाची भीति आहे असें गांधींच्याप्रमाणें अणे यांनाही वाटलें असावें. परचक्रापुढें नमायचें नाहीं, यापुढें आणखी एखादें नवें परचक्र येथें येऊं द्यायचें नाहीं याबद्दल दोघांचाही दृढनिश्चय आहे. चालू राज्यसंस्था युद्धकालांतच युद्ध जिंकण्यासाठींच बदलली पाहिजे असें दोघांनाही वाटलें. त्यासाठीं राज्यसत्तेशीं झगडा होतां होईतों करावा लागूं नये अशी दोघांचीही इच्छा होती. भीष्मानें व कृष्णानें पुढील अनर्थ टाळण्याचे परोपरीनें प्रयत्न केले, तसेंच अणे व गांधी यांनींही केलें. पण दोघांच्या अंतिम तत्त्वज्ञानांत फरक होता. राजा आपलें ऐकणार नाहीं तर अखेर आपण त्याचेंच रक्षण केलें पाहिजे असें भीष्माला वाटलें. राजा नष्ट झाला तर अराजक म्हणजे बेबंदशाही माजते. बेबंदशाहीपेक्षां वाईट राजाही बरा असें प्राचीन हिंदूंचें तत्त्व

आहे, 'पृथ्वीवर समाजांत दंडधारण करणारा राजा नसेल तर पाण्यांत मोठा मासा लहान माशास खातो त्याप्रमाणें, बलवान् हे दुर्बलांना खाऊन टाकतात, म्हणून राजा सुधारूं न शकल्यास कसलाही पण जबरदस्त राजा समाजाला हवा असतो, अर्थात् त्याचें आपण रक्षण केलें पाहिजे' असा हिंदुधर्माचा दंडक आहे. वेन आणि नहुष या राजांना प्रजेनें मारल्याचीं उदाहरणें आहेत, पण ते अपवाद होत. त्यांचे उल्लेख हे राजांना इशारे म्हणून हिंदुशास्त्रग्रंथांत देण्यांत येत असत. प्रजाधर्म म्हणून त्यांचें समर्थन कधींच झालेलें नाहीं. पण कृष्णाची विचारसरणी वेगळी आहे. भारतीय युद्ध टाळण्यासाठीं त्यानें शिकस्तीचे प्रयत्न केले. द्यूतसमारंभ झाला त्या वेळीं कृष्ण द्वारकेला गेला होता व हस्तिनापुरास येऊं शकला नाहीं. नाहीं तर त्यानें द्यूत व नंतर द्रौपदीची झालेली विटंबना होऊं दिली नसती. पण भीष्मानें द्यूतसमारंभ व नंतरची विटंबना टाळायला हवी होती, असें कृष्णाचें म्हणणें असल्याचें वर आलें आहेच.

* * *

पांडवांच्या अज्ञातवासानंतर कृष्ण पांडवांची बाजू मांडण्यासाठींच शिष्टाईस गेला. पण दुर्योधन न ऐकेल तर त्याचें राज्य उलथून पाडलें पाहिजे असें त्याचें स्पष्ट मत होतें. शिष्टाईस जातांना त्यानें द्रौपदीचा निरोप घेतला त्या वेळीं कृष्ण म्हणतो,

**धार्तराष्ट्रा कालपक्का न चेच्छृण्वन्ति मे वचः।**
**शेष्यन्ते निहताः भूमौ, श्वशृगालादनीकृताः ॥**

वरील श्लोकांत 'कालपक्क' हा कृष्णाच्या तोंडचा शब्द फार महत्त्वाचा आहे. पुढें कुंतीशीं बोलतांना "कालपक्कमिदं सर्वं सुयोधनवशानुगम्" असा याच शब्दाचा उपयोग कृष्णानें पुन्हा केला असून, इतर अनेक ठिकाणीं हाच शब्द महाभारतांत आलेला आढळतो. याचा अर्थ आज आपणांस कळतो तोच त्या वेळींहि अभिप्रेत दिसतो. अमुक एक व्यवस्था अथवा संस्था आपली उपयुक्तता संपल्यानंतर नष्ट होणें हेंच योग्य असतें. नाहीं तर तिचा अधःपात होऊं लागतो; व त्यामुळें इतरांचाही अकालीं नाश होतो. गर्भातील मूल परिपक्क झाल्यावर गर्भातून बाहेर न येऊं शकेल तर गर्भिणी व गर्भ या दोघांचाही नाश होतो. पिकलेल्या फळाची योग्य विल्हेवाट न लावल्यास

तें सडूं लागतें व इतर फळांचा नाश करतें. अंड्यांतील प्राण्यांची पूर्ण वाढ झाल्यावर कवच फोडलें नाहीं तर आंतील प्राण्याचा नाश होतो, म्हणून तें कवच फोडावेंच लागतें. भारतीय युद्धकाळीं कौरवपक्षाची अवस्था अशी झाली होती कीं काय याचें संशोधन मी येथें करीत नाहीं. 'मी कौरवांना धर्माचरण सांगणार आहें. त्यांनीं तें ऐकलें नाहीं तर त्यांच्या अधर्माचें माप भरलें, त्यांचा नाश केला पाहिजे.' 'राजा या नात्यानें यापुढें ते जिवंत राहणें इष्ट नाहीं' असें कृष्णाचें मत होतें. गांधींनींही समेटाचे प्रयत्न पुष्कळ केले, पण अखेर हिंदी राष्ट्राच्या स्वाभिमानास साजेल असा जर समेट झाला नाहीं तर ही राजवट कालपक्क झाली आहे, हिच्या कवचांत हिंदी राष्ट्राची यापुढें प्रगति होणार नाहीं, या जुलमी 'सुव्यवस्थे'पेक्षां उघड बेबंदशाही पुरवली असें गांधींनीं अनेकदा उद्‌गार काढले आहेत. ही राज्यव्यवस्था कालपक्क झाली हाच गांधींचा अभिप्राय आहे.

*　　*　　*

अणे यांचा मानसपिंड या जातीचा नाहीं. बंगाल व महाराष्ट्र येथें जो दहशतवाद्यांचा वर्ग चाळीस वर्षांपूर्वी उदयास आला त्यास त्या वेळच्या टिळकपक्षानें पाठिंबा दिला नसला तरी सर्व पुढारी त्याचें मनांतून कौतुक करीत. अणे हेही अर्थात् या कौतुक करणाऱ्यांत होतेच. हिंसा ही राजकारणांत तत्त्वतःच गैर आहे असें मत त्यांनीं कधींही मांडलेलें नाहीं, मान्य केलें नाहीं. गांधींच्याशीं गेलीं वीस वर्षें हिंसेच्या बाजूनें अणे यांनीं तात्त्विक झगडा केला. अशा या अण्यांनीं मध्य असेंब्लींत 'लोकांचे अत्याचार पाहून गांधींना अटक झाली हें योग्य झालें असें मला वाटलें' अशी कबुली दिली याचें अणे यांच्या कित्येक अभिमान्यांना आश्चर्य वाटतें. पण १९०७ सालचे दहशतवाद्यांचें अत्याचार आणि हल्लींची दंगल यांत जो तत्त्वतः व स्वरूपतः फरक आहे तो या लोकांच्या लक्षांत येत नाहीं. सावरकर, खुदीराम बोस, बारींद्रकुमार, वगैरेंचा दहशतवाद जनतेच्या असंतोषावर आधारलेला नव्हता; मध्यम सुशिक्षित वर्गाची ती चळवळ होती. जनतेच्या व्यक्त व जाग्रत आकांक्षांचें त्यांत प्रतिबिंब नव्हतें, समाजक्रांति हें त्याचें ध्येय नव्हतें व समाजाच्या कर्तृत्वाचा संबंध त्यांत कोठेंही येण्यासारखा नव्हता. राज्यसंस्था उध्वस्त होऊन अराजक माजण्याची त्यांत मुळींच भीति नव्हती. राज्यकर्त्यांना

दमदाटी देऊन कांहीं अधिक हक्क उकळावे एवढाच हेतु त्यांत होता. त्यांतील स्वार्थत्याग करणारा व आत्माहुति देणारा जो विशिष्ट वर्ग तो कष्ट सोशी, त्याग करी, पण एकंदर समाजास त्यामुळें मुळींच उपसर्ग अथवा उपद्रव पोंचत नसे. यामुळें या दहशतवाद्यांबद्दल पुढाऱ्यांनाही सहानुभूति वाटत असे. दहशतवादी हे फाशी जातात व सरकार त्यांना फाशी देतें असें हें चालायचेंच, असें मानून त्यांचेबद्दल निवळ सहानुभूति दाखविणें आणि राजकीय लाभ पदरांत पडतील ते घेणें याहून अधिक कांहीं कर्तव्य आपणांस आहे असें मात्र कोणींही मानलें नाहीं. गांधींच्या पूर्वी दहशतवादास आळा घालण्याचा प्रयत्न स्वतंत्रपणें कोणींही पुढाऱ्यांनीं केला नाहीं हें येथें लक्षांत घेण्यासारखें आहे.

गांधींनीं जी जनताजागृतीची व जनताकर्तृत्वाची चळवळ केली तिचा मूळ पायंडा टिळकांनींच घातला होता. पण गांधींनीं विशेष केलें तें हें कीं, दहशतवादापासून तरुणांस परावृत्त करून त्यांना समाजाची सेवा करा, समाजाला जागृत करा, समाजाकडून चळवळ करवा आणि स्वतः सर्व प्रकारचे हाल, कष्ट सोसून जनतेलाही हाल सोसण्यास व आपलें नशीब आपल्याच हातांनीं घडविण्यास शिकवा हा संदेश दिला आणि समाजाकडून व कार्यकर्त्यांकडून तो आचरवून घेतला. गांधींच्या शिकवणुकीचें अहिंसा हें वैशिष्ट्य होतें हें निःसंशय खरें आहे. एवढ्याच दृष्टीनें पाहिलें तर गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें झालेले प्रकार हे सर्व गांधींच्या शिकवणुकीचे प्रकार होते असें म्हणतां येणार नाहीं. पण केवळ अहिंसा हेंच गांधींच्या शिकवणुकीचें वैशिष्ट्य नव्हतें. स्वातंत्र्यार्थ जनतेनें करावयाचा निकराचा यत्न हेंहि त्याचें वैशिष्ट्य होतें. हा प्रयत्न करावयाचा तो अहिंसेनेंच करावयाचा ही गोष्ट सर्वश्रेष्ठ खरी, पण अहिंसेच्या नांवानें वागतांना लोकांना भेकडपणानें वागण्याची पाळी आली, अथवा आपण भेकड ठरतों आहों असें लोकांना वाटलें तर त्यांनीं अत्याचार करणें अपरिहार्य होय असें गांधींनीं म्हटलें असतें. गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमधील दंगलीची पूर्वतयारी गांधींनीं केली हें मॅक्स्वेलचें म्हणणें चूक असलें तरी दंगलीची जबाबदारी त्यानें गांधींचेवर टाकली हें माझ्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. मॅक्सवेलची चूक ही कीं, त्यानें जरूर इतका प्रामाणिकपणा दाखविला नाहीं. या दंगलींत जातीय अत्याचार झाले नाहींत, खाजगी मालमत्तेस इजा करण्यांत आली नाहीं, स्त्रीविषयक गुन्हे झाले नाहींत.

तें सडूं लागतें व इतर फळांचा नाश करतें. अंड्यांतील प्राण्यांची पूर्ण वाढ झाल्यावर कवच फोडलें नाहीं तर आंतील प्राण्याचा नाश होतो, म्हणून तें कवच फोडावेंच लागतें. भारतीय युद्धकाळीं कौरवपक्षाची अवस्था अशी झाली होती कीं काय याचें संशोधन मी येथें करीत नाहीं. 'मी कौरवांना धर्माचरण सांगणार आहें. त्यांनीं तें ऐकलें नाहीं तर त्यांच्या अधर्माचें माप भरलें, त्यांचा नाश केला पाहिजे.' 'राजा या नात्यानें यापुढें ते जिवंत राहणें इष्ट नाहीं' असें कृष्णाचें मत होतें. गांधींनींही समेटाचे प्रयत्न पुष्कळ केले, पण अखेर हिंदी राष्ट्राच्या स्वाभिमानास साजेल असा जर समेट झाला नाहीं तर ही राजवट कालपक्क झाली आहे, हिच्या कवचांत हिंदी राष्ट्राची यापुढें प्रगति होणार नाहीं, या जुलमी 'सुव्यवस्थे'पेक्षां उघड बेबंदशाही पुरवली असें गांधींनीं अनेकदा उद्‍गार काढले आहेत. ही राज्यव्यवस्था कालपक्क झाली हाच गांधींचा अभिप्राय आहे.

* * *

अणे यांचा मानसपिंड या जातीचा नाहीं. बंगाल व महाराष्ट्र येथें जो दहशतवाद्यांचा वर्ग चाळीस वर्षांपूर्वीं उदयास आला त्यास त्या वेळच्या टिळकपक्षानें पाठिंबा दिला नसला तरी सर्व पुढारी त्याचें मनांतून कौतुक करीत. अणे हेही अर्थात् या कौतुक करणाऱ्यांत होतेच. हिंसा ही राजकारणांत तत्त्वतःच गैर आहे असें मत त्यांनीं कधींही मांडलेलें नाहीं, मान्य केलें नाहीं. गांधींच्याशीं गेलीं वीस वर्षें हिंसेच्या बाजूनें अणे यांनीं तात्त्विक झगडा केला. अशा या अण्यांनीं मध्य असेंब्लींत 'लोकांचे अत्याचार पाहून गांधींना अटक झाली हें योग्य झालें असें मला वाटलें' अशी कबुली दिली याचें अणे यांच्या कित्येक अभिमान्यांना आश्चर्य वाटतें. पण १९०७ सालचे दहशतवाद्यांचें अत्याचार आणि हल्लींची दंगल यांत जो तत्त्वतः व स्वरूपतः फरक आहे तो या लोकांच्या लक्षांत येत नाहीं. सावरकर, खुदीराम बोस, बारींद्रकुमार, वगैरेंचा दहशतवाद जनतेच्या असंतोषावर आधारलेला नव्हता; मध्यम सुशिक्षित वर्गाची ती चळवळ होती. जनतेच्या व्यक्त व जागृत आकांक्षांचें त्यांत प्रतिबिंब नव्हतें, समाजक्रांति हें त्याचें ध्येय नव्हतें व समाजाच्या कर्तृत्वाचा संबंध त्यांत कोठेंही येण्यासारखा नव्हता. राज्यसंस्था उध्वस्त होऊन अराजक माजण्याची त्यांत मुळींच भीति नव्हती. राज्यकर्त्यांना

दमदाटी देऊन कांहीं अधिक हक्क उकळावे एवढाच हेतु त्यांत होता. त्यांतील स्वार्थत्याग करणारा व आत्माहुति देणारा जो विशिष्ट वर्ग तो कष्ट सोशी, त्याग करी, पण एकंदर समाजास त्यामुळें मुळींच उपसर्ग अथवा उपद्रव पोंचत नसे. यामुळें या दहशतवाद्यांबद्दल पुढाऱ्यांनाही सहानुभूति वाटत असे. दहशतवादी हे फाशी जातात व सरकार त्यांना फाशी देतें असें हें चालायचेंच, असें मानून त्यांचेबद्दल निवळ सहानुभूति दाखविणें आणि राजकीय लाभ पदरांत पडतील ते घेणें याहून अधिक कांहीं कर्तव्य आपणांस आहे असें मात्र कोणींही मानलें नाहीं. गांधींच्या पूर्वी दहशतवादास आळा घालण्याचा प्रयत्न स्वतंत्रपणें कोणींही पुढाऱ्यांनीं केला नाहीं हें येथें लक्षांत घेण्यासारखें आहे.

गांधींनीं जी जनताजागृतीची व जनताकर्तृत्वाची चळवळ केली तिचा मूळ पायंडा टिळकांनींच घातला होता. पण गांधींनीं विशेष केलें तें हें कीं, दहशतवादापासून तरुणांस परावृत्त करून त्यांना समाजाची सेवा करा, समाजाला जागृत करा, समाजाकडून चळवळ करवा आणि स्वतः सर्व प्रकारचे हाल, कष्ट सोसून जनतेलाही हाल सोसण्यास व आपलें नशीब आपल्याच हातांनीं घडविण्यास शिकवा हा संदेश दिला आणि समाजाकडून व कार्यकर्त्यांकडून तो आचरवून घेतला. गांधींच्या शिकवणुकीचें अहिंसा हें वैशिष्ट्य होतें हें निःसंशय खरें आहे. एवढ्याच दृष्टीनें पाहिलें तर गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें झालेले प्रकार हे सर्व गांधींच्या शिकवणुकीचे प्रकार होते असें म्हणतां येणार नाहीं. पण केवळ अहिंसा हेंच गांधींच्या शिकवणुकीचें वैशिष्ट्य नव्हतें. स्वातंत्र्यार्थ जनतेनें करावयाचा निकराचा यत्न हेंहि त्याचें वैशिष्ट्य होतें. हा प्रयत्न करावयाचा तो अहिंसेनेंच करावयाचा ही गोष्ट सर्वश्रेष्ठ खरी, पण अहिंसेच्या नांवानें वागतांना लोकांना भेकडपणानें वागण्याची पाळी आली, अथवा आपण भेकड ठरतों आहों असें लोकांना वाटलें तर त्यांनीं अत्याचार करणें अपरिहार्य होय असें गांधींनीं म्हटलें असतें. गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमधील दंगलीची पूर्वतयारी गांधींनीं केली हें मॅक्स्वेलचें म्हणणें चूक असलें तरी दंगलीची जबाबदारी त्यानें गांधींचेवर टाकली हें माझ्या दृष्टीनें अगदीं बरोबर आहे. मॅक्सवेलची चूक ही कीं, त्यानें जरूर इतका प्रामाणिकपणा दाखविला नाहीं. या दंगलींत जातीय अत्याचार झाले नाहींत, खाजगी मालमत्तेस इजा करण्यांत आली नाहीं, स्त्रीविषयक गुन्हे झाले नाहींत.

आणि ब्रिटिश स्त्रीपुरुषांना ब्रिटिश म्हणून इजा पोंचविण्यांत आली नाहीं हाही गांधींच्या अहिंसेच्या व निर्वैरत्वाच्या शिकवणुकीचा परिणाम होता. मॅक्सवेल व अणे यांनीं एवढी कबुली द्यावयास पाहिजे होती. पण चळवळींत दिसून आलेल्या गुप्त सामर्थ्यानें दोघेही भेदरले असल्यानें चळवळीचा थोडा-ही गौरव करणें त्यांना परवडण्यासारखें नव्हतें.

* * *

चळवळींत दिसून आलेलें हें गुप्त सामर्थ्य म्हणजे तिची क्रांतिक्षमता हें होय. अणे यांना हिंसा ही तत्त्वतः अमान्य नसली तरी दहशतवाद्यांच्या हिंसेसंबंधानेंच त्यांचीही सहिष्णुवृत्ति होती. सर्वसामान्य जनतेची प्रगति-कारक अशी सनदशीर व कायदेभंगाची चळवळही त्यांनीं पुरस्कारिली व पूर्वीं अशा सत्याग्रहांत त्यांनीं भागही घेतला आहे. पण सामान्य जनतेची हिंसायुक्त अथवा अहिंसायुक्त अशी क्रांतीची चळवळ मान्य होण्यासारखी त्यांची मनोवृत्तिच नाहीं. कॉंग्रेसनें सत्ता हातीं घेऊन कायद्याच्या बळावर कांहीं ठराविक मर्यादेपर्यंत उलथापालथ केली तरीही ती ते पत्करतील व तिचा पुरस्कारही करतील. पण पुढारी तुरुंगांत गेल्यानंतरही ज्वालामुखी-सारखा जनताक्षोभाचा स्फोट व्हावा, त्यानें सर्व समाजव्यवस्थाच हादरून जावी आणि बेबंदशाहीचा धोका उत्पन्न व्हावा हें कोणत्याही अवस्थेंत त्यांना मान्य होणार नाहीं. अशा परिस्थितींत प्रस्थापित राज्यसंस्था कितीही वाईट असली तरी तिला अनावर झालेला लोकक्षोभ दडपून टाकण्यास मदत करणें याहून दुसरें कर्तव्य त्यांना सुचतच नाहीं. हा लोकक्षोभ दडपून टाकला गेल्यावर राज्यसत्तेची सुधारणा करण्याचें साधन, राज्यकर्त्यांना वाकविण्याचें साधन आपणांजवळ कांहींच राहत नाहीं हें अणे यांना दिसतें. पण बेबंद-शाहीपेक्षां वाईट राज्यसत्ताही पुरवली हा हिंदूंचा सिद्धान्त त्यांना प्राणभूतच वाटत आहे. त्यांचा पिंडच त्याचा बनलेला आहे.

* * *

गांधी हे क्रांतिकारक आहेत कीं नाहींत हें अजून वादग्रस्त आहे. पण त्यांचा पिंड क्रांतिकारक आहे यांत शंका नाहीं. बेबंदशाहीचें त्यांनाही वावडें आहे. ती टाळण्यासाठीं सर्व उपाय ते करतील; पण त्यांच्या दृष्टीनें एक वेळ अशी येते कीं, राज्यसंस्था व समाजव्यवस्था यांत लोकांच्या गरजा भागण्या-

जोगे पालट होईनासे झाले म्हणजे हे पालट घडवून आणण्यासाठीं प्रयत्न करणें अवश्य ठरतें. राज्यसंस्था व समाजव्यवस्था स्वतःच पालट करून घेण्यास तयार होत नाहींत. अशा वेळीं समाजांतील विकासी शक्तींनीं राज्यसंस्था व समाजव्यवस्था यांच्या घट्ट कवचांत कोंडून मरण्यापेक्षां तें कवच फोडून बाहेर येणें हेंच गांधींसारख्यांना अधिक बरें वाटतें. अशा वेळीं बेबंदशाही माजतेच. पण ती टाळण्याचा ते जसा प्रयत्न करतात त्याचप्रमाणें बेबंदशाही फार काळ टिकणार नाहीं; तींतून आपोआप तडजोड, समेट व व्यवस्था निर्माण होईलच होईल, असा त्यांना इतिहाससिद्ध विश्वास वाटत असतो. तुम्ही येथून निघून जा, मग येथें यादवी माजली तरी चालेल, थोड्या दिवसांत भांडणाऱ्या पक्षांना भांडणाचा थकवा व कंटाळा येईल, अक्कल सुचेल आणि सर्वजण एकत्र येऊन गुण्यागोविंदानें सामायिक संसार करूं लागतील असें गांधींनीं पूर्वीं अनेकवार लिहिलें आहे. हा क्रांतिकारक मनोवृत्तीला वाटणारा विश्वास आहे. क्रांतीची शास्त्रीय चिकित्सा मार्क्सनें अलीकडे केली. पण क्रांतिप्रवृत्ति आणि स्थितिप्रिय वृत्ति या दोन मानवी मनोवृत्ति सनातन दिसतात. कृष्ण आणि भीष्म यांच्या मनोवृत्तींत हाच फरक दिसून येतो. कृष्ण आणि अर्जुन यांचेमध्येंही हा फरक आहे. बांधवांना मारणारें हें युद्ध खेळण्यानें कुलस्त्रिया बिघडतील, वर्णसंकर होईल वगैरे भीति जी अर्जुनानें व्यक्त केली ती या स्थितिप्रिय वृत्तीची द्योतक होती. कृष्ण क्रांतिप्रवृत्तीचा होता. गीतेच्या अकराव्या अध्यायांत सर्व विश्व कालाच्या दाढेखालीं चिरडलें जात असून, कालाच्या अक्राळविक्राळ जाभाड्यांत आप्तस्वकीयांच्या रक्तमांसाचा चिखल झाला असल्याचें भयानक चित्र जें कृष्णानें अर्जुनाला दाखविलें तें कृष्णाच्या क्रांतिप्रवृत्तीचें निदर्शक आहे. सर्वभयानक अशा कोलाहलांतून पलीकडे या क्रांतिपुरुषांची दृष्टि पोंचते, त्या कोलाहलांतून निर्माण होणारी सुव्यवस्था आधींच पाहूं शकणारी दिव्य दृष्टि त्यांना असते. गांधी, लेनिन हे अशा प्रकारचे थोर पुरुष होत. अणे हे या जातींतले नव्हेत. अर्जुन, भीष्म वगैरेच्या जातींत ते बसूं शकतील.

* * *

कौरव व पांडव यांचा विरोध ज्याप्रमाणें पुढें बिनतोड होऊन अखेर भीष्म व कृष्ण यांना एकमेकांविरुद्ध लढावें लागलें त्याप्रमाणें येथेंही आतां क्रांतिप्रवृत्ति आणि स्थितिप्रिय वृत्ति यांचा झगडा अपरिहार्य आहे. अणे व्यक्तिशः

कार्यकारी मंडळ सोडतीलही. गांधींचें कांहींही होईल. तो प्रश्न वैयक्तिक म्हणून किरकोळ आहे. पण या दोन प्रवृत्तींतला वाद आज मिटण्यासारखा नाहीं. तो बिनतोड झाला आहे. “दंगल माजलेली मीं जेव्हां पाहिली तेव्हां गांधींना तुरुंगांत घातलें हें बरोबर झालें असें मला वाटलें” असें अणे यांनीं म्हटलें. त्यावर बरीच टीका झाली. “गांधी बाहेर असते तर त्यांनीं दंगे शमविले असते, त्यांना तुरुंगांत घालण्यानें दंगे भडकले हे अणे कां लक्षांत घेत नाहींत?” असा प्रश्न अणे यांच्या भक्तांनींच त्यांना विचारला आहे. पण हे भक्त चुकत असून अणे हेच बरोबर आहेत असें मला वाटतें. गांधींना अटक झाली नसती तर त्यांनीं सत्ता मागितली असती. सरकार ती देणार नव्हते हें अणे यांना ठाऊक होतें. मग गांधींनीं अत्याचार करूं नका, स्वस्थ बसा असें सांगितलें नसतें. कारण, गेल्या वीस वर्षांत कधींच आला नव्हता एवढा निकराचा प्रसंग आज आला आहे. वेळींच लोकांनीं सत्ता घेतली नाहीं तर हल्लींच्या राज्यकर्त्यांचा पराभव होऊन जपान येथें येईल अथवा हल्लींचे राज्यकर्तेच फॅसिस्ट होऊन येथें व जगांत सर्वत्र नवी गुलामगिरी सुरू होईल असें गांधींना वाटत आहे. अर्थात् या भवितव्याचा संभव नष्ट करण्यासाठींच गांधींनीं सत्याग्रह सुरू केला असता. दुसरा कुठलाच मार्ग शिल्लक नाहीं हें पाहून सत्याग्रहांत अत्याचार शक्यतोंवर कमी होतील एवढी खटपट केली असती, पण बेबंदशाहीच्या भयानें सत्याग्रह थांबविला नसता. त्या स्थितींत गांधींना तुरुंगांत घालणें अथवा गांधींच्या पक्षास येऊन मिळणें हें अणे यांना भाग पडलें असतें. भीष्मापुढें असा प्रसंग आला तेव्हां त्यानें ‘राजा परं दैवतं’ या तत्त्वानुसार दुर्योधनाची बाजू पत्करली त्याप्रमाणें अणे यांनीं बेबंदशाहीपेक्षां कुराज्य पत्करलें आणि भीष्मांनीं कृष्णाशीं सामना दिला तसा अणे गांधींशीं देत आहेत. त्यांच्यांतील विरोध बिनतोड आहे आणि त्यापुढें दोघांचाही इलाज नाहीं. अणे बेबंदशाहीच्या भीतीनें फॅसिझमच्या निर्मितीस साहाय्य देत आहेत. गांधी फॅसिस्ट गुलामगिरी टाळण्यासाठीं बेबंदशाहीचा धोका पत्करूनही त्यांतून नवी अशी प्रगतिपर सुव्यवस्था निर्माण करण्याचा हिय्या बांधून कामास लागलेले आहेत. अखेर कोण जिंकणार याचा विचार मला प्रस्तुत करायचा नाहीं. वादाचें तात्त्विक स्वरूप काय तेवढेंच मला सांगायचें आहे. —‘नवयुग’, दिवाळी अंक, १९४२

★

# समाजवादच कां हवा ? : : ५

समाजवाद या शब्दाच्या अर्थासंबंधानें बरेच गैरसमज आहेत. खाजगी मालकीहक्क रद्द करणें हें समाजवादाचें ध्येय असें सामान्यतः मानण्यांत येतें. पण ह्याचा अर्थ खाजगी उपभोगाच्या ज्या वस्तु असतात त्यावरील खाजगी मालकीही रद्द करणें असा नव्हे. गोविंदाच्या अंगांतील सदरा इतर कोणींही वापरावा, एका गृहस्थाच्या राहण्याच्या खोलींत इतर कोणींही घुसावें असा समाजवादाचा अर्थ नाहीं. उपभोग्य वस्तूवरील मालकी ही ज्याची त्याची पवित्र मानलीच पाहिजे; फक्त धनोत्पादनसाधनांवरील मालकी खाजगी न राहतां समाजाकडे द्यावी एवढाच समाजवादाचा अर्थ आहे.

खाजगी मालकीसंबंधानें समाजांत कांहीं कल्पना अत्यंत दृढमूल असतात. खाजगी मालकी ही एक नैसर्गिक गोष्ट आहे असा सुप्त समज समाजांत वावरत असतो. पण तो खरा नव्हे. आपल्या शरीरावर उगवणारीं बोटें हीं ज्याच्या त्याच्या मालकीचीं असतात. ही मालकी खरोखर निसर्गसिद्ध आहे. कोणत्याही राज्यसंस्थेच्या कायद्यानें ही मालकी रद्द होऊं शकणार नाहीं. पण धनाची खाजगी मालकी अशी निसर्गसिद्ध नव्हे. माणसानें आपल्या सोयीसाठीं ती निर्माण केली आहे. मोटारी वगैरे वाहनें रस्त्याच्या डाव्या बाजूनेंच जावींत, तीं दर ताशीं अमुक मैल वेगानेंच चालवावीं हे

नियम आपण समाजाच्या सोयीसाठीं कृत्रिमतेनें करीत असतों. तसेंच धनावरील खाजगी मालकीचें आहे. ज्याच्या त्याच्या उपभोगाचें अन्नवस्त्र, राहण्याची जागा वगैरेवर ज्याची त्याची मालकी ठेवल्यानें हित होत असतें. म्हणून उपभोग्य धनावर खाजगी मालकी न्याय्य मानण्यांत आली आहे. पण धनोत्पादनसाधनांवर अशी खाजगी मालकी ठेवणें नेहमींच समाजाच्या हिताचें होत नाहीं.

आपण एक उदाहरण घेऊं. पुण्या-मुंबईसारख्या शहरीं पूर्वीं हल्लींप्रमाणें सार्वजनिक नळानें पाणीपुरवठा करतां येत नसे. त्या वेळीं ज्याच्या त्याच्या घरीं खाजगी विहिरी असत. या विहिरी ज्याच्या त्याच्या मालकीच्या असत. पुढें, समजा, एखाद्या मोठ्या शेटजीनें या गांवांत एक मोठा तलाव खोदला. त्याचे नळ घरोघर पोंचविण्याची त्यानें व्यवस्था केली. हा तलाव त्यानें स्वतःच्या खर्चानें खोदला असल्यानें त्यावर त्याची खाजगी मालकी असणें स्वाभाविकच होतें. त्यानें त्या तलावाचे नळ गांवांत घरोघर पोंचवून अगदीं स्वस्त दरांत घरोघर पाणी पुरविण्याची सोय केली. तेव्हां नळाचें स्वस्त दरानें मिळणारें पाणी घरोघर वापरण्याची वहिवाट पडून विहिरींचा उपसा बंद झाला. यामुळें त्यांचें पाणी बिघडूं लागलें. गांवांत रोगराई पसरण्याची भीति उत्पन्न झाली. तेव्हां गांवकऱ्यांनीं घरोघरच्या विहिरी बुजवून टाकल्या. तलावाच्या पाण्याचा पुरवठा गांवाला भरपूर असल्यानें विहिरी बुजविल्याबद्दल कोणासच वाईट वाटलें नाहीं. सारा गांव आतां त्या तलावाच्या पाण्यावरच अगदीं क्षणोक्षणीच्या जीवनासाठीं अवलंबून राहिला हें उघड आहे. पुढें शेटजीला अगर त्याच्या पश्चात् मुलाला पैशाचा लोभ सुटला. त्यानें पाणीपट्टीचे दर पांचदहा पट वाढविले. आतां त्या गांवकऱ्यांची परिस्थिति काय होईल याचा विचार करा. एखाद्याची केळीची बाग असली आणि त्यानें केळीं खूप महाग केलीं पण दुसरीकडे कोठेंही केळीं मिळण्यासारखीं नसलीं तर ज्यांना महाग केळीं विकत घेणें परवडेल तेच तीं घेतील. बाकीचे लोक केळीं खरेदीच करणार नाहींत. केळ्यांवांचून त्यांच्या जगण्याला अडथळा होईल असें मुळींच नाहीं. पण पाण्याची बाब अशी नव्हे. ज्यांना पाणीपट्टी महाग म्हणून पाण्याचा नळ घेणें परवडणार नाहीं त्यांच्यावर पाण्यावांचून मरण्याचा प्रसंग येईल. पाण्याच्या तुटवड्यामुळें गांवांत रोगराई माजेल आणि एकंदर तो गांव लवक-

रच नष्ट होऊन जाईल. तुम्ही म्हणाल तलावाच्या मालकाला पाणीपट्टी वाढविण्याचा कायदेशीर हक्क आहे. त्यानें हा हक्क बजावला आणि लोकांचें नुकसान झालें, तर त्याचा तरी काय इलाज! हें म्हणणें वरवर पाहतां खरें आहे. पण चूक व्यक्तीची नसून कायद्याची आहे. ज्या वेळीं घरोघरीं विहिरी होत्या त्या वेळीं त्या त्या घरमालकाचा त्याच्या त्याच्या विहिरीवर असलेला मालकीहक्क समाजास अपाय करूं शकत नव्हता. पण पाणी हें व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनास अत्यावश्यक असें जें द्रव्य त्याचा सगळाच्या सगळा साठा एकाच मालकाच्या खाजगी मालकींत येण्यामुळें ही खाजगी मालकी एकंदर समाजास विध्वंसक ठरते. म्हणून असें जीवनावश्यक द्रव्य सगळेंच्या सगळें खाजगी मालकींत न ठेवतां जनतेच्या प्रातिनिधिक अशा संस्थेच्या मालकींत ठेवून त्याचा वापर नफ्यासाठीं नव्हे तर सार्वजनिक हितासाठीं करावा हें समाजवादाचें मुख्य तत्त्व आहे.

तुम्ही म्हणाल, मग तर समाजवाद आजही सुरू आहे. मुंबई-पुण्यासारख्या शहरांत पाण्याचे साठे हे खाजगी मालकींत नसून सार्वजनिक मालकींत आलेलेच आहेत. पण एवढ्यानें भागलें नाहीं. गिरण्या, कारखाने, आगगाड्या, शेती वगैरे सर्व धनोत्पादनसाधनें सार्वजनिक मालकींत आलीं पाहिजेत असें समाजवाद्यांचें मागणें आहे. हें वरील तत्त्वास धरूनच आहे. कसें तें पाहा: पाणी हें जसें जीवनावश्यक आहे त्याचप्रमाणें अन्नवस्त्र व राहण्याची जागा ह्या गोष्टीही जीवनावश्यक आहेत. या गोष्टी आजकाल बहुसंख्य समाजास कशा प्राप्त होतात? पैसा खर्च करून प्राप्त होतात. हा पैसा बहुसंख्य समाजास कसा मिळतो? कांहीं तरी रोजगारी करून मिळतो. ही रोजगारी कुठें मिळतें? गिरण्या-कारखाने वगैरेंत मिळते. पण दिवसानुदिवस गिरण्या-कारखाने वगैरेमध्यें जितक्या लोकांना रोजगारी हवी असते तितक्यांना ती मिळूं शकत नाहीं. हे लोक बेकार राहतात. अधिक सुधारलेलीं यंत्रें गिरण्या-कारखान्यांतून आणलीं म्हणजे माणसांची गरज कमी होऊन लोक अधिकाधिक बेकार होत जातात. या बेकारांच्याकडे पैसा अर्थातच नसतो. म्हणून त्यांना अन्नवस्त्र, राहण्याची जागा वगैरे जीवनावश्यक गोष्टी खरेदी करतां येत नाहींत. तुम्ही म्हणाल गिरण्या-कारखान्यांत जर काम नसेल तर लोकांनीं खाजगी धंदे करावेत. पण दिवसानुदिवस तेंही अशक्य होत चाललें आहे.

कारण, गिरण्या-कारखाने वगैरेंना लागणारें प्रचंड भांडवल शेकडा चार-दोन माणसांजवळच असतें. तेव्हां प्रत्येकजण कारखानदार होईल ही अपेक्षा चुकीची आहे. पण प्रत्येकास लहान धंदे करतां येणार नाहींत काय? तेंही शक्य नाहीं. कारण, गिरण्यांचा स्वस्त व सुबक माल बाजारांत ढिगांचे ढीग पडला असतांना लहान हस्तव्यवसायांनीं ( उदा० हातमागाचें कापड ) तयार केलेला उणाख ( हीन प्रतीचा ) व महाग माल कोण खरेदी करणार? आगगाडी व मोटार यांची वाहतूक सर्रास झाल्यानंतर कोणी बैलगाडींतून भाड्यानेंच काय पण फुकटही प्रवास करणार नाहीं. मग बाजाराच्या चढाओढींत भाड्याच्या बैलगाड्या, हातमाग वगैरे लहान धंदे चालणार कसे? सारांश, बहुसंख्य समाजाला रोजगारी मिळण्यासाठीं मोठ्या धंदेवाल्यांकडे नोकरी मागण्या-वांचून आज चरितार्थाचें दुसरें साधन राहिलेलें नाहीं.

पण येथें अशी शंका येते कीं, मोठे कारखाने खाजगी मालकींतून सार्वजनिक मालकींत आणले तरी त्यांत सर्व समाजास रोजगारी कशी मिळणार? केवळ कारखाने खाजगी मालकींतून सार्वजनिक मालकींत गेले म्हणून या कारखान्यांनीं निर्माण केलेला माल जो ढिगांचे ढीग पडून राहिला आहे तो खपून जाईपर्यंत कारखान्यांत नवी रोजगारी निर्माण होणारच नाहीं. मग ते कारखाने खाजगी राहोत नाहीं तर सरकारी मालकींत जावोत. या प्रश्नाचा आणखी थोडा विचार करूं.

जगाच्या आर्थिक व्यवहारांत बिनतोड असा एक नवा चक्रव्यूह तयार झाला आहे. जुन्या काळचें दारिद्र्य आणि आजकालचें दारिद्र्य यांत एक मोठा फरक दिसून येतो. पूर्वीं धान्य व इतर संपत्ति पिकतच नसे. त्यामुळें लोक दरिद्री राहत हें स्वाभाविक होतें; पण बाजारांत सर्व प्रकारच्या संपत्तीचे ढीगचे ढीग पडले असूनही जनता दरिद्री आहे, हें काय कोडें आहे? दुकान-दाराला विचारलें तर तो सांगतो बाजारांत माल खपत नाहीं म्हणून तो पडून राहिला. पण माल कां खपत नाहीं? लोकांचे जवळ माल खरेदी करण्यास पैसा नाहीं म्हणून. लोकांचे जवळ पैसा कां नाहीं? लोक पूर्ण अथवा अर्धबेकार आहेत म्हणून; किंवा लोकांना कमी मजुरी अथवा पगार मिळतो म्हणून. पण बाजारांतला माल खपून जाईपर्यंत नवीन माल निर्माण होणार नाहीं आणि अर्थात् नवीन माल निर्माण करणें शक्य होईपर्यंत नवी

रोजगारी मिळणार नाहीं. म्हणजे येथें जो एक बिनतोड चक्रव्यूह निर्माण होतो तो असा : बाजारांतला माल कां खपत नाहीं? लोकांचे जवळ पैसा नाहीं म्हणून. लोकांचे जवळ पैसा कां नाहीं? लोकांना रोजगारी नाहीं, म्हणून. लोकांना रोजगारी कां नाहीं? कारखान्यांत काम नाहीं म्हणून. कारखान्यांत काम कां नाहीं? नवीन माल निर्माण करणें शक्य नाहीं म्हणून. नवीन माल निर्माण करणें कां शक्य नाहीं? बाजारांतील आधींचा माल खपत नाहीं म्हणून. तो माल कां खपला नाहीं? लोकांचे जवळ पैसा नाहीं म्हणून. सारांश, माल खपत नाहीं म्हणून रोजगारी नाहीं, आणि रोजगारी नाहीं म्हणून माल खपत नाहीं. असा हा बिनतोड चक्रव्यूह निर्माण होतो. आर्थिक व्यवहारांत हा चक्रव्यूह कां निर्माण होतो? याचें उत्तर समजून घेण्यासाठीं या व्यवहाराकडे आणखी थोडें सूक्ष्म रीतीनें पाहिलें पाहिजे.

काल संध्याकाळीं मी माझी नोकरी उरकून एक रुपया पगार घेऊन आलों. या एक रुपयाला काल संध्याकाळीं मजुरी अथवा पगार हें नांव होतें. तोच रुपया घेऊन मी आज सकाळीं बाजारांत गेलों व मला हवा होता तो माल खरेदी केला. त्या वेळीं त्याच रुपयास खरेदीशक्ति हें नांव मिळालें. म्हणजे पैसा हा एकदां मजुरीचें वा पगाराचें रूप धारण करतो आणि तोच पैसा पुनः खरेदीचें रूप धारण करतो. शेतकरी हा शेतमाल विकून जें धान्य मिळवितो ती आपण त्याची मजुरी असें समजूं. ही मजुरी खर्च करून म्हणजे तिला खरेदीशक्तीचें रूप देऊन तो तेल्याजवळचें तेल खरेदी करीत असतो. एकंदर सामाजिक व्यवहाराकडे लक्ष दिल्यास आपणांस असें दिसून येईल कीं, समाजांतील शेतकरी, तेली, कोष्टी, गवंडी, सुतार, शिक्षक वगैरे जे समाजाचे घटक आहेत, ते एकमेकांची सेवा अगर श्रमफल एकमेकांस देऊन परस्परसहकार्यानें व परस्परावलंबनानें सामाजिक जीवन संभाळीत असतात. प्रत्येकजण आपल्या श्रमाचें फळ समाजास विकतो व त्यापासून मिळणारा पैसा ही त्याची मजुरी असते. सर्वांच्या श्रमांचीं फळें बाजारांत आलीं म्हणजे प्रत्येकजण आपली मजुरी ऊर्फ श्रमशक्ति खर्च करून हीं बाजारांत आलेलीं श्रमफळें खरेदी करीत असतो. एकंदर समाजाच्या दृष्टीनें पाहिल्यास एकंदर समाज श्रमफळ निर्माण करून त्याची मजुरी सर्वांना वाटतो, आणि तीच मजुरी पुनः खरेदीशक्तीच्या रूपानें परत घेऊन त्या धनाचा व्यक्तिशः वाटणीनें उपभोग घेत असतो. उदाहरणार्थ, असें समजा

कीं, कांहीं शेतकरी, कांहीं सुतार, कांहीं कोष्टी, कांहीं तेली, कांहीं गवंडी यांचा एक समाज बनलेला आहे. हे सर्वजण मिळून एकशेंदहा रुपयांचा माल रोजच्या रोज निर्माण करीत असतात असें मानूं. प्रत्येक गटाला मजुरी वाटली जाते. ही मजुरी किती वाटली जाते ? पांच गटांना प्रत्येकीं आपण वीस वीस रुपये देऊं. दुसरे दिवशीं सकाळीं हा प्रत्येक गट बाजारांत येऊन आदले दिवशीं निर्माण झालेल्या विविध मालाची खरेदी करील म्हणजे प्रत्येक गट वीस वीस रुपयांचा माल खरेदी करील. हा माल त्या दिवशीच्या उपभोगांत संपेल. त्या दिवशीं जे धनोत्पादक श्रम करावयाचे त्यासाठीं जें भांडवल हवें तें म्हणजे दहा रुपयांचा उरलेला माल होय. सर्व गटांचे श्रम आणि हें दहा रुपयांचें भांडवल ह्यांच्या संयोगानें त्या दिवशीं संध्याकाळीं पुनः एकशेंदहा रुपयांची संपत्ति निर्माण होईल.

असा क्रम चालला असतां अशी कल्पना करा कीं, त्या गांवांतील शेत-जमीन, हस्तव्यवसायाचीं हत्यारें वगैरे सर्व धनोत्पादनसाधनें कोणी तरी कोणत्या तरी उपायानें आपल्या एकट्याच्या मालकीचीं केलीं. नंतर त्यानें धनोत्पादन-पद्धतींत एक सुधारणा केली. असें समजा कीं, प्रत्येक सुतार वेगवेगळेपणें काम करीत असतां एक एक खुर्ची निर्माण करतो. पण दहा सुतार एकत्र येऊन श्रमविभागानें आणि परस्परसहकार्यानें त्या खुर्च्या निर्माण करूं लागतील तर त्याच दहाजणांनीं एकेकट्यानें जेवढ्या वेळांत दहा खुर्च्या केल्या तेवढ्याच वेळांत तेच दहाजण मिळून वीस खुर्च्या निर्माण करतील हें आपणांस सहज समजण्यासारखें आहे. याप्रमाणें शेतकरी, तेली वगैरे जे इतर समाजघटक या सर्वांच्याकडून अशाच प्रकारें अधिकाधिक धन निर्माण होऊं लागलें, आणि पूर्वीं ११० रुपयांची संपत्ति निर्माण होई तेथें ते आतां २२० रुपयांची संपत्ति निर्माण करूं लागले. पण आतां मजुरी किती वाटली जाते ह्याचा विचार करूं. आतां २० ऐवजीं ४०–४० रुपये वाटले जातील का? नाहीं. कारण, खुल्या मजुरीचा दर जो ठरणार तो श्रम करणाऱ्यांच्या परस्परचढाओढीनें ठरणार. धनोत्पादन दुप्पट वाढलें तरी एकंदर लोकसंख्या कांहीं दुप्पट वाढली नाहीं. यामुळें धनोत्पादनशक्ति जितक्या प्रमाणांत वाढली तितक्या प्रमाणांत धनाची गरज उत्पन्न झाली नाहीं. अर्थात् मजुरांची संख्या कमी करणें शक्य झालें. यामुळें कांहीं मजुरांना बेकारीचा धोका उत्पन्न होऊन मजुरामजुरांत रोजगारी

मिळविण्याविषयीं चढाओढ सुरू झाली. प्रत्येकजण आपल्याला रोजगार मिळावा म्हणून चढाओढीनें कमी मजुरी मागूं लागला. यामुळें कांहीं लोक बेकार झाले, पण त्याबरोबरच मजुरीही दर गटामागें चरितार्थास कमींत कमी आवश्यक म्हणजे पूर्वीं जी २० रुपये मिळत होती तीच मिळूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाजारांत जें गिऱ्हाईक आलें तें पूर्वींप्रमाणें १०० रुपयांचेंच आलें. १०० रुपयांचा माल खपला. भावी धनोत्पादनासाठीं भांडवल म्हणून २० रुपयांचा माल बाजूस काढून ठेवला. पण अजून १०० रुपयांचा माल बाजारांत न खपतां पडून आहे. म्हणून लोकांना रोजगारी मिळणार नाहीं. पण उलट लोकांना नवी रोजगारी मिळेपर्यंत लोकांच्या जवळ मालखरेदीस पैसाच नाहीं. आज जगांत न खपणाऱ्या मालाचे ढिगांचे ढीग एका बाजारांत आणि बेकार म्हणून जी दरिद्री, ती जनता दुसऱ्या बाजारांत हीं दृश्यें दृष्टीस पडत आहेत, ही गोष्ट वरील उदाहरणावरून आपल्या दृष्टोत्पत्तीस आली.

इंग्लंडांत दोनशें वर्षांपूर्वीं श्रमविभागपद्धतीचा अवलंब होऊं लागून धनोत्पादनशक्तीची वाढ जेव्हां झाली तेव्हां तेथें वास्तविक वरील उदाहरणांतल्यासारखी आपत्ति आली होती. पण मग त्या वेळीं धनोत्पादन अजीबात बंद पडून कायमची बेकारी कां उत्पन्न झाली नाहीं? त्याचें विशेष कारण त्या वेळीं घडलें. वर उदाहरणांत सांगितलेला शंभर रुपयांचा जो माल बाजारांत पडून राहिला तो त्यांनीं हिंदुस्थान, जर्मनी, चीन यासारख्या परदेशी बाजारांत खपवून त्याचा मिळालेला जो पैसा त्याला नफा हें नांव त्यांनीं दिलें. हा माल त्यांनीं बाहेर कसा खपविला? श्रमविभागपद्धतीनें व पुढें पुढें यंत्रांच्या वापरामुळें इंग्लंडचा माल किंमतींत स्वस्त व गुणांत श्रेष्ठ होता. हिंदुस्थान, चीनसारख्या देशांतील माल जुन्या पद्धतीप्रमाणें निर्माण होई. तो महाग व कमी दर्जाचा असे. तो मागें पडून ब्रिटिश माल तेथें खपला. ह्या मागासलेल्या देशांतले जुने धंदेवाले त्यामुळें बेकार झाले. ब्रिटिशांनीं, वाढलेल्या नफ्याचें पुनः भांडवल करून व नव्या नव्या बेकारांना नोकरीस घेऊन आपल्या भांडवलीं उत्पादनाचें क्षेत्र वाढवलें. या नफ्याच्या लोभानें अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली, हिंदुस्थान, चीन वगैरे देशांतही भांडवली उत्पादन सुरू झालें. वर दिलेल्या उदाहरणांवरून एक गोष्ट लक्षांत येते ती ही कीं,

भांडवली उत्पादनांत जे मजूर काम करतात ते सर्व उपभोग्य माल खरेदी करूं शकत नाहींत. त्याच्या किंमतीहून कमी मजुरी त्यांना वाटली जाते. उरलेला माल ह्या मजुरांच्या बाहेरील क्षेत्रांतील गिऱ्हाइकानें घ्यावा लागतो. यामुळें बाहेरच्या मागासलेल्या धंदेवाल्यांची गिऱ्हाइकी मोडून ते कारखानदारी मजूर होतात. भांडवली उत्पादनाचें क्षेत्र अशा प्रकारें वाढतां वाढतां तें सर्व जग व्यापून टाकतें, आणि जगांत एका बाजूस भांडवलदार आणि दुसऱ्या बाजूस त्यांच्यासाठीं धनोत्पादन करणारे मजूर अशी विभागणी होते. आतां या भांडवलदार कारखानदारांनीं मजुरांच्या हातून निर्माण करविलेला माल मजुरांनीं खरेदी करून उरल्यानंतर खपविण्यास जगाबाहेरचें असें नवें गिऱ्हाईक मिळूं शकत नाहीं. अर्थातच हा माल पडून राहतो. तो खपत नाहीं म्हणून बेकारी उत्पन्न होते. इंग्लंडांत दोनशें वर्षांपूर्वीं पडून राहिलेला भांडवलदारांचा माल खपविण्यासाठीं इंग्लंडाबाहेर पाठवितां आला पण आतां साऱ्या जगांतील भांडवली उत्पादनानें निर्माण होऊन न खपलेला माल खपविण्यास जगाबाहेरचा बाजार मिळूं शकत नाहीं. म्हणून यापुढें वरील उदाहरणांत म्हटल्याप्रमाणें भावी उत्पादनाचें भांडवल म्हणून २० रुपयांचा माल बाजूला काढून ठेवल्यावर उरलेल्या २०० रुपये मालाइतकी मजुरी समाजास वाटली गेली पाहिजे. तरच बाजारांतील सगळा भोग्य माल संपेल आणि नवीन उत्पादन होऊन बेकारीचें संकट टळेल.

अर्थात् कारखानदारांना नफा म्हणून कांहीं उरणारच नाहीं हें येथें उघड होत आहे. कोणीही खाजगी मालक बिननफ्याचा धंदा करणार नाहीं. म्हणून सार्वजनिक सरकारनें धनोत्पादनसाधनें म्हणजे कारखाने, आगगाड्या वगैरे यांचा वापर, सर्वांना रोजगारी मिळेल आणि सर्वांना धनोपभोग मिळेल अशा प्रकारें करावा लागतो. ज्याप्रमाणें शहरांतील पाण्याचा उपयोग नफ्यासाठीं न करतां लोकोपयोगासाठीं केला जातो, त्याप्रमाणें कारखाने, खाणी, आगगाड्या, शेती वगैरे सर्वांचा उपयोग नफ्यासाठीं नव्हे तर समाजाच्या उपयोगासाठीं करण्याची वेळ आली आहे. याचाच अर्थ समाजवादाची आवश्यकता उत्पन्न झाली आहे हा होय.

—'रामचंद्र भट हायस्कूल, परेल', येथें दिलेलें व्याख्यान

★

# सोशॅलिझम्चा सूड ! : : ६

मुंबई कौन्सिलपुढें कांहीं दिवसांपूर्वीं आलेल्या 'वारसावरील करा'संबंधीं चर्चा करीत असतां माझ्या एका मित्रानें 'हा सोशॅलिझम्चाच एक लहानसा घोट आम्हांला पाजला जात आहे' असा अभिप्राय दिला. सध्यां जगांत जिकडे तिकडे श्रीमंतांवर कर बसविण्याच्या योजना व कल्पना एकाहून एक पुढें येत आहेत. श्रीमंतांची संपत्ति काढून घेणें ही सोशॅलिझमची एक फलश्रुति दिसत असल्यामुळें भ्रमानें, स्थूल विचारानें अथवा धूर्तपणानें या करवाढीस सोशॅलिझम् असें नांव देण्याचा परिपाठ पुष्कळ ठिकाणीं पडत चाललेला दिसतो. 'आतां तुमच्यावर सोशॅलिझम् सोडतों' म्हणून कोणी करवाढीद्वारा प्रतिपक्षास धाक घालीत आहेत, तर 'तुमचा सोशॅलिझम् पत्करतों बाबा' म्हणून कोणी प्रतिपक्षास शरण जाण्याचा आव आणीत आहेत. उलट यांच्या प्रतिपक्षांतील कोणी या 'सोशॅलिझम्'ला पाहून भेदरले आहेत, तर दुसरे कोणी 'सोशॅलिझम्' एकदांचा आलेला पाहून हातांतलें काम टाकून देऊन 'शाबास माझी कृति!' म्हणून आपल्या पाठीवरून हात फिरवून आपलें आपण अभिनंदन करीत आहेत! या प्रकारची अज्ञ, स्थूल अथवा धूर्त विचारसरणी सोशॅलिझम्च्या प्रगतीस—अथवा ज्यांना सोशॅलिझम् नको असेल त्यांना त्याची पीछेहाट करण्याच्या प्रयत्नासहि—विघातक आहे.

हल्लीं सर्वत्र चाललेली करवाढ हा सोशॅलिझम् नव्हे, सोशॅलिझम्चें सोंगसुद्धां नव्हे. असलाच तर हा सोशॅलिस्ट लोकांचा सूड घेतला जात आहे ! सोशॅलिस्ट पद्धतींत श्रीमंतांची संपत्ति सरकारनें घेणें ही बाब मुख्य नसून संपत्तीची वाटणी न्याय्य पद्धतीनें व्हावी ही बाब महत्त्वाची आहे. आजच्या करवाढीकडे या दृष्टीनें पाहा. आज राज्यकर्ते आपला कारभार थोड्या खर्चांत कां आटपत नाहींत ? त्यांनीं साम्राज्यलोभानें मोठमोठीं सैन्यें उभारलीं त्या वेळीं धनिकां-कडून काढलेल्या कर्जाच्या ओझ्याचें व्याज फुगत चाललें आहे. गेल्या महा-युद्धामुळें विजयी व अपजयी दोनही राष्ट्रें विपत्तींत आलीं. आणि प्रत्येकांतील श्रीमंत एकंदरीनें आबादानींत असून गरीब अधिकाधिक निर्धन व त्रस्त होत आहेत. युद्धामुळें गरीबांत जागृतिही झाली असून श्रीमंत गरीबांच्या श्रमावर गब्बर होतात, व आपणांवर जुलूम करतात असा गरीबांचा समज (गैरसमज म्हणा) झाला आहे. या असंतुष्ट निर्धनांनीं आपणांस सत्तापदावरून ओढूं नये म्हणून आजच्या श्रीमंत राज्यांना सैन्य खडें ठेवावें लागतें व त्याच्या खर्चाकरितां कर वाढवावे लागतात. श्रीमंत लोक हे कर सुखासुखी देत नाहींत. गरीबांकडून कर घेऊन गरीबांवरच दंडुका चालवावा अशी यांची राज्यकर्त्यांना सूचना असते. पण गरीबांजवळ एक तर पैसा नसतो, व गरीब असंतुष्ट झाले म्हणजे सैन्याचा व पोलिसाचा खर्च करांचे पेक्षां अधिक वाढतो. म्हणून श्रीमंतांना ही करवाढीची गोळी एरंडेलाप्रमाणें वाईट तोंड करून गिळावी लागते.

म्हणजे गरीब करांतून सुटतात असें नव्हे. मिळकतीच्या प्रमाणांत पाहिलें तर गरीबांना श्रीमंतांहून अधिक कर द्यावा लागतो. पण चोरून खिसा कापावा, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत मिठावर आणि इंग्लंड इत्यादि राष्ट्रांत आयात मालावर कर बसवून अप्रत्यक्षपणें गरीबांच्या चिरीमिरीचीही चोरी हे राज्यकर्ते करतात.

'ज्यांचेकडून कर घ्यावा त्यांचे कारणीं तो लावावा' असें कर-शास्त्र सांगतें. पण हा नियम आजचे राज्यकर्ते पाळतात काय ? 'लोकांकडून आम्ही कर घेतों आणि तो लोकांचे कारणीं लावतों' हा शाब्दिक बुरखा केव्हांच उडून गेला आहे. यंत्रयुगामध्यें ज्याच्या हातीं यंत्र त्यालाच संपत्ति निर्माण करण्यास संधि असते. त्याचे दारीं हातापायांचीं फक्त निसर्गदत्त

हत्यारें घेऊन काम मिळविण्याकरितां यंत्रहीन मजुरांना तोंड वेंगाडावें लागतें. गरजेहून हे मजूर अधिक असतात. यामुळें कमींत कमी मजुरीवर त्यांना यंत्रवाल्यांची संपत्ति निर्मावी लागते, आणि यंत्रवाल्यास नफा जास्त मिळतो. म्हणून समाजांत यंत्रवाला, अल्पसंख्य श्रीमंतवर्ग व केवळ हातपाय एवढींच आयुधें असणारा प्रचंडसंख्य गरीब असें वर्गीकरण झालें आहे. दळणवळणाचीं साधनें वाढल्यानें हें वर्गीकरण भौगोलिक मर्यादाही ओलांडून जागतिक होऊं पाहत आहे. श्रीमंतांकडून घेतला जाणारा कर कदाचित् श्रीमंतांकारणीं खर्चिला जात असेल; पण गरिबांच्या कराचा व्यय कसा होतो ? त्यांना शिक्षण नाहीं, आरोग्य नाहीं, आयुष्य नाहीं, राहण्यास घरें नाहींत, कायदेबाजींत संरक्षण नाहीं, नीतिवर्तनास अनुकूल परिस्थिति नाहीं, कांहींही नाहीं. गरिबांचीं खिल्लारें, पोरें पाठीस बांधून व त्यांच्या पाठीस लागलेले सरकारी अधिकारी, पोलीस, सैनिक यांस भिऊन धूम दशदिशां पळताहेत, अथवा आपआपल्या घरांत अथवा खुराड्यांत लपून बसलीं आहेत. त्यांना प्रतिकार करण्याचें धैर्य अथवा कल्पनाही नाहीं. त्यांच्यांत धैर्य आणणाऱ्या पुढाऱ्यांकरितां त्यांच्याच खर्चानें तुरुंग बांधले आहेत. त्यांत लान्सबरी, गांधी, जवाहरलाल यासारख्यांना कोंडण्यांत येतें. आणि गरीब प्रजेचें रक्त करग्रहणानें पिळून काढून 'आम्ही कसें दराऱ्यानें राज्य करतों' अशी शेखी हे राज्यकर्ते मिरवितात. कदाचित् गरिबांना दंडुक्यांनीं मारण्यास पोलीस व त्यांच्या जमावावर गोळ्या घालण्यास सैन्य सरकार ठेवतें या अर्थानें 'गरीबांचा कर गरीबांकारणीं' लागत आहे असें म्हणतां येईल !

श्रीमंतांवरील कराच्या व्ययाचीहि हीच रड. दराऱ्यानें राज्य करावयाचें म्हटलें कीं, लठ्ठ लठ्ठ पगाराचे जुलुमी अधिकारी व सैनिक ठेवावे लागतात. हे अधिकारी आपला धाक प्रसंगीं श्रीमंतांसहि दाखविल्यावांचून राहत नाहींत. कारण अधिकारमदाचा प्रभावच तसा आहे. हिंदुस्थानांतील श्रीमंतगरीबांकडून घेतलेल्या कराचा व्यय कोठें होतो ? पेन्शन घेऊन विलायतेस गेलेल्या सैनिकांचीं व मुल्की अधिकाऱ्यांचीं पेन्शनें, आमच्या डोक्यावर लादलेल्या युरोपियन अधिकाऱ्यांचे लठ्ठ पगार, विलायतची खंडणी, हुंडणावळ संभाळण्याकरितां विलायती व्यापाऱ्यांस देण्यांत येणारी दक्षिणा आणि येथील श्रीमंतगरीब कोणासच नको असूनही आशिया खंडावर गुरगुरण्याकरितां ठेवलेलें

प्रचंड सैन्य या कामीं होतो. 'ज्याचा कर घ्यावा त्याच्या तो कारणीं लावावा' या करशास्त्राच्या नियमाचा पद्धतशीर भंग येथें होत आहे, व कमी-अधिक प्रमाणांत जगभर असेंच चाललें आहे.

आणि म्हणून 'प्रजेच्या कल्याणाकरितां संपत्तीचा व्यय करणें' हें जें सोशॅलिझम्चें ध्येय त्याऐवजीं येथें प्रजेवर जुलूम करण्याकरितां संपत्तीचा व्यय होत आहे. श्रीमंतांकडून संपत्ति घेणें ही अर्धी गोष्ट करून व्यय करतांना व्यभिचार करणें म्हणजे धार काढून मला दूध पाजव असें मुलानें म्हटलें असतां धार काढल्यावर तें दूध गटारांत ओतून अथवा सापास पाजून मुलाचा सूड घ्यावा त्याप्रमाणें सोशॅलिझम्चा सूड घेणें आहे. कर न घेतां संपत्ति-साधनेंच सरकारनें कबजांत घेणें हा एक घटनेचा फरक करवाढ व सोशॅलिझम् यामध्यें असल्यामुळें करवाढीच्या चौकटींत सोशॅलिझम् बसतच नाहीं. पण संपत्तीचा सद्व्यय ही जी मुख्य ध्येयभूत बाब त्या दृष्टीनेंच आधीं हल्लींची करवाढ हा सोशॅलिझम् नव्हे.

सोशॅलिझम्चे कोणी पुरस्कर्ते असोत वा तिरस्कर्ते असोत. मला त्यांत इष्टानिष्ट कांहीं नाहीं. शुद्ध बुद्धीनें व पूर्ण विचारानें केलेल्या कसल्याही प्रयत्नास अखेर सत्यलाभ व सद्गति मिळत असते अशी माझी दृढ श्रद्धा आहे. पण 'हा सोशॅलिझम् आला!' म्हणून भ्रमानें कोणीही आपल्या प्रयत्नांत शैथिल्य आणूं नये, अथवा भलत्या वाटेनें जाऊं नये.

—'केसरी', १ जानेवारी १९३२

★

## मालकीहक्काची गरज संपली : : ७

मालकीहक्काचा इतिहास असा आहे कीं, 'मीं उत्पन्न केलेलें धन मीं हवें तसें भोगावें' हें 'मालकीचें तत्त्व' संपत्त्युत्पादक श्रम करण्यास प्रेरणा मिळावी, हुरूप यावा याकरितां प्रथम निघालें. यंत्रशोधापूर्वी जमीन, नांगर, हातमाग, भट्टी, घण, हातोडा, लोखंड इत्यादि संपत्तिसाधनांचे 'मालक' हे स्वतांच आपल्या धंद्यांचीं धोरणें सांभाळणारे म्हणून 'चालक' व स्वतांच कष्ट करणारे म्हणून 'मजूर' असत. या 'मालकां'ना 'चालकत्व' व 'मजुरत्व' यासाठीं लागणाऱ्या कर्तृत्वास मालकीहक्कामुळेंच प्रेरणा होती हें उघड आहे. पण आधुनिक भांडवलशाही ऊर्फ साम्राज्यशाहीचें जें स्वरूप दृष्टीस पडतें त्यांत आपणांस अगदींच वेगळा देखावा दिसून येतो. कच्च्या मालाची निपज, खरेदी, वाहतूक; पक्क्या मालाची निपज, वाहतूक, विक्री, अशा निरनिराळ्या अंगांनीं विभागून प्रचंड भांडवलाचे धंदे शाखोपशाखांनीं सर्व जगभर पसरले व त्यांच्या या अफाट विस्तारामुळें सूक्ष्म गुंतागुंतीच्या विशिष्ट प्रकारच्या ज्ञानाची गरज उत्पन्न होऊन धंदे हे निरनिराळ्या विषयांतील अनेक 'तज्ज्ञ' ( Expert ) अशा चालकांकडे गेले. यांच्या हाताखालीं कमी-अधिक अंशानें तज्ज्ञ असे असंख्य मजूर जगभर राबूं लागले. हे चालक व मजूर निवळ पगारी नोकर आहेत, मालक नव्हेत. मालक कोठें आहेत व काय करीत आहेत? मालक म्हणजे समाईक भांडवलाचे भागी-

दार. हे जगांत कोठेंही असतील तेथें स्वस्थ बसून दरसाल वाटण्यांत येणारा नफा घेत आहेत. हे संख्येनें हजारों असतात. यांच्यातर्फे दहा-पांच डायरेक्टरांचे मंडळ धंद्याचा कारभार पाहतें. पण धंद्याचें स्वरूप एवढें प्रचंड व विविध झालेलें असतें कीं, चालक म्हणजे पगारी तज्ज्ञ सांगतील तें धोरण व बांधतील तें तोरण डायरेक्टरांस मानावें लागतें. अनुभवही असा आला आहे कीं, या चालकांच्या–तज्ज्ञांच्या कारभारांत ढवळाढवळ न केल्यास अत्यंत शास्त्रशुद्ध पायावर धंदा चालवून हे तज्ज्ञ तो चांगला किफायतशीर करून दाखवितात. यामुळें डायरेक्टर तज्ज्ञांविरुद्ध सहसा जात नाहींत. आणि आज साऱ्या जग-भर ज्यांच्या शाखा आहेत व ज्यांत हजारों मजूर काम करीत आहेत असे शेंकडों धंदे निवळ तज्ज्ञांनीं चालविले आहेत,—तज्ज्ञसत्ताक झाले आहेत.

* * *

आतां प्रश्न असा कीं, कर्तृत्वाची प्रेरणा हवी म्हणून उत्पन्न केलेला 'मालकी'हक्क ज्यांना नाहीं असे निवळ पगारी चालक व पगारी मजूर एवढे जगड्व्याळ धंदे कधीं डोळ्यांनीं न पाहिलेल्या मालकांकरितां किफायतशीर-पणें चालवितात, हें कसें ? मालकीहक्कावांचून या कर्तृत्वास हुरूप कसा आला ? खरी गोष्ट अशी आहे कीं हुरूप ही एक प्रकारची भावनेची उकळी असते. भावनोद्रेक हा निरंतर टिकणारा नसतो. विशेष प्रसंगांनीं तो निर्माण होत असतो. पण वरचेवर येणाऱ्या अशा उद्रेकानें प्रेरित असा जो खटाटोप हातून घडतो त्याची शरीरास व मनास संवय जडते व एकदां हा खटाटोप संवयीचा झाला, म्हणजे प्रत्येक वेळीं कांहीं भावनोद्रेकाची जरूर राहत नाहीं. म्हणजे मालकीहक्कानें जो हुरूप, जो भावनोद्रेक उत्पन्न होतो त्याचा उपयोग उद्यो-गाची संवय लागण्यास–उद्योगी स्वभाव बनण्यास होतो. म्हणजे मालकीहक्क हा उद्योगी स्वभाव बनविण्याचें साधन होतें. एकदां असा स्वभाव बनला म्हणजे माणसाचे हातून उद्योग होऊन संपत्ति निर्माण होते. हल्लींच्या उद्योगयुगामध्यें हा उद्योगी स्वभाव बनविण्याचीं सुधारलेलीं साधनें निर्माण झालेलीं आहेत. आधुनिक धंद्यांच्या अवाढव्य स्वरूपामुळें त्यांतील अंगोपांगांचें शिक्षण पद्धतशीरपणें अनेक वर्षें घ्यावें लागतें, व त्याही आधीं सामान्य लिहिणें, वाचणें व विविध बौद्धिक ज्ञान यांची प्राप्तीही अवश्य होऊन बसली आहे. हा जो शैक्षणिक काल असतो त्यांत घडणाऱ्या खटपटीस संपत्तिप्राप्ती-

सारखें तात्कालिक उत्तेजन कांहींच नसतें, तर शरीर व मन उद्योगक्षम बनविणें हेंच एक या काळांतील ध्येय असतें. या काळांत लागणाऱ्या उद्योगाच्या संवयी इतक्या दृढ होतात कीं, वेतास बरेंच दिवस वाक देऊन ठेविला असतां तो जसा मग लवकर सरळ होत नाहीं, तद्वत् शिक्षणावस्थेंत एकदां लागलेली शारीरिक व मानसिक उद्योगाची संवय पुढें उद्योग करण्यावांचून स्वस्थ बसूं देत नाहीं; इतकेंच नव्हे तर शिक्षणामुळे तो तो उद्योग सुकर वाटून, खुर्चीवर बसून सौकर्यानें हातपाय हालविण्यांत जसें एक प्रकारचें सुख वाटतें तसेंच एक प्रकारचें सुख सौकर्यानें उद्योग करण्यांतहि वाटत असतें. आळशीपणाचा, गैदीपणाचा तिटकारा वाटत असतो.

*　　　　*　　　　*

सर्व लोकांचा इतका दृढ व उच्च स्वभाव बनतो अथवा सर्वत्र शिक्षणाची अशी सोय आहे असें नव्हे. तरी पण उद्योगानुकूल अशीं इतरही कारणें आज उत्पन्न झालीं आहेत. निदान श्रम करून जगणारांत तरी श्रम करून जगणें हा स्वाभिमानाचा विषय होऊन बसला आहे. उद्योगीपणाशिवाय जगाच्या धावपळींत आज आपण मागें राहूं अशी व्यक्त अथवा अव्यक्त जाणीवहि सर्वांस होत आहे. शिवाय प्रचंड धंद्यांत देखरेखीचें कामही शास्त्रीय पद्धतीमुळें सोपें व अचूक झालें आहे. यंत्राचे साहाय्यानें होणारें काम ठराविक गुणाचें व मापाचें होतें. धंद्याच्या मोठ्या स्वरूपामुळें प्रत्येक बाबींत यंत्राचा उपयोग होऊं लागला असून जरूर त्याप्रमाणें नवनव्या यंत्रांचा शोध लावण्यासाठीं यंत्रशास्त्र्यांना शोधकार्यावर कायमचें नेमून ठेवणें परवडतें. जमाखर्चासारखें बरेचसें बौद्धिक काम माणसापेक्षांही बिनचूक करण्याचीं यंत्रें निघालीं आहेत. संपत्तिमात्राचीं गुणमापें पारखण्याभोजण्याचीं साधनें इतकीं शास्त्रीय इयत्ताबद्ध (Standardised) झालीं आहेत कीं, दुधांत पाणी किती, खडकवासल्यांत पाणी किती, मुंबईंत एकंदर खपणारी वीज किती व कोणीं किती वापरली, याचा हिशेब आज ऑफिसांत बसून अधिकाऱ्यास नोंद करतां येत आहे. या सर्वांमुळें हजारों माणसांनीं निर्मिलेल्या संपत्तीचे गुण व माप यांची मोजदाद करतां येऊन लबाडी अथवा कुचराई यांची शक्यता कमी होऊं लागली आहे. सांगण्याचा मुद्दा एवढाच, कीं हातून उद्योग होण्याकरितां 'मालकीहक्का'ची जी गरज एका काळीं वाटली ती आतां

तितकीशी वाटत नाहीं. शिक्षण, स्वाभिमान व शास्त्रीय शोध यामुळें संपत्ति उत्पन्न होण्यास उपयोगी असा उद्योग माणसांनीं करावा ही शक्यता उत्पन्न झाली आहे. पगारी माणसांकडून विशिष्ट गुणमापांचें काम पारखून–मोजून घेतां येत आहे व 'मालकीं'तील मूळ तत्त्व जें 'भोग्य संपत्तीच्या स्वामित्वाची भूक' ती आज भोग्य वस्तु मिळवून देणाऱ्या पैशाच्या नक्त पगारानें भागत आहे.

*　　*　　*

श्रमाच्या प्रेरणेस 'मालकी'च्या हक्काची गरज इतपत नाहींशी झाल्यामुळें एक गोष्ट उघड होते कीं, जगाच्या निरनिराळ्या भागांत आपापल्या घरीं बसून भांडवलाच्या भागीदारीचा नफा घेणारे जे भागीदार त्यांच्या या मालकीच्या मिळकतीचा नैतिक आधार समूळच नष्ट झाला आहे. 'सर्व लोकांनीं मिळून संपत्ति उत्पन्न करणें' ( Socialisation of production) व 'उत्पन्न झालेली सर्व संपत्ति लोकांच्या वापरांत आणणें' (Socialisation of Consumption ) हीं दोन सोशालिस्टांचीं साध्यें आहेत. खासगी मालकीमुळें श्रम करण्यास वाटणारा हुरूप, संपत्तिसाधनें सामुदायिक मालकीचीं केल्यास राहणार नाहीं, हा पहिल्या साध्याविरुद्ध असलेला आक्षेप हल्लींच्या उद्योग-युगांत चुकीचा ठरला आहे. म्हणजे सोशालिझम्‌वरील 'अशक्यते'चा, 'अव्यवहार्यतेचा' आक्षेप आतां दूर झाला आहे. अर्थात् यावरच आधारलेला अनिष्टतेचा आक्षेप आपोआप गळून पडत असून, जें सामुदायिक सत्तेनें व श्रमानें निर्मिलें तें समुदायानें भोगावें हें न्याय्यच ठरत आहे.

*　　*　　*

एक गोष्ट खरी आहे कीं, जगांतील ज्या धंद्यांचे अथवा लोकांचे बाबतींत शिक्षण व शास्त्र यांची प्रगति झाली नाहीं त्या ठिकाणीं संपत्तिसाधनें व उत्पन्न संपत्ति यांची खाजगी मालकी नष्ट करतां येणें शक्य नाहीं. पण याचा अर्थ एवढाच कीं, जेथें सोशालिझम स्थापित करायचा असेल त्या ठिकाणीं शिक्षण व शास्त्र यांची प्रगति करण्याचे प्रयत्न आधीं झाले पाहिजेत. रशियांत शिक्षण व शास्त्र हीं दोनही मागसलेलीं होतीं. पण तेथील आजच्या सोशालिस्ट राज्यकर्त्यांनीं सोशालिझम स्थापण्याच्या उद्देशानें राज्यसत्ता जिंकून शास्त्र व शिक्षण यांची प्रगति करण्याचें मोठ्या हिय्यानें मनावर घेतलें आहे.

तें त्यास कितपत साधत आहे, हा प्रश्न वेगळा; पण शिक्षण व शास्त्रज्ञान यांची सोशॉलिझमला गरज आहे एवढें सोशालिस्टांनीं कबूल केलें पाहिजे. पण ज्या धंद्यांत व लोकांत आज शिक्षण व शास्त्र यांची प्रगति झाली असून, सामुदायिक उत्पादन चालू आहे त्या धंद्यांत घरबशा भांडवलवाल्यांना आयता नफा कां वांटावा? तज्ज्ञ चालक व तज्ज्ञ मजूर या सर्वांना नक्त तनखा-मजुरी मिळते या दृष्टीनें हे सर्व लोक 'मजूर'च होत. या मजुरांनीं कष्टानें संपत्ति निर्मावी, पण त्यांना तिचा नक्त वांटाच तेवढा मिळावा व अमर्याद वांटा ऊर्फ नफा हा मात्र कांहींच न करणाऱ्या भांडवलवाल्यांना जावा हा सोशालिस्टांच्या मतें घोर अन्याय होय.

* * *

सोशालिस्टांच्या मतें या पद्धतीमुळें एकंदर समाजाचा नैतिक ऱ्हासहि होत आहे. श्रम केल्याशिवाय नफा घेऊन चैन करीत बसणारे भांडवलवाले नीतिभ्रष्ट होतातच. पण एकंदर भांडवलशाहीचें ध्येयच नफा मिळविणें हें असल्यामुळें ज्या संपत्तीनें नफा मिळतो तिचेंच फक्त उत्पादन होतें. दारू उत्पन्न करण्यानें नफा मिळत असला म्हणजे झालें. त्यामुळें बहुसंख्य जो मजूरवर्ग व गरीब लोक यांचा नैतिक अधःपात होतो. हें टाळणें भांडवलशाहीचें कर्तव्य ठरत नाहीं. मजुरांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न होत असलाच तर त्यांना श्रम करण्यास इच्छा व कुवत राहावी एवढ्यापुरताच. समाजांतील दुर्बळांना बलिष्ठांपासून रक्षिण्याकरितां राज्यसंस्था असाव्या. पण त्याहि भांडवलवाल्यांच्या प्रच्छन्न गुमास्त्यांकडून त्यांच्याच धोरणानें चालविल्या जात आहेत. यामुळें आजच्या एकंदर समाजव्यवस्थेचें ध्येयच भांडवलवाल्यांकरितां नफा वाढविणें हें आहे. राज्यसंस्था व एकंदर समाजव्यवस्था धनिकसत्तात्मक झाली आहे. चांगलें अथवा वाईट यांचें नैतिक अथवा माणुसकीस साजेसें कांहीं लक्षण निर्माण झालें नसून संपत्युत्पादनक्षमता या एकाच निकषावर सर्व सामाजिक कर्तृत्व पारखलें जात आहे. जे संपत्ति निर्मितात त्यांना तीपासून सुख लाभावें, त्यांच्या जीविताची उन्नति व्हावी हें संपत्ति निर्माण करण्याचें आज ध्येयच नाहीं. संपत्ति कां भोगावी? तर परत संपत्ति निर्मिण्याकरितां. अर्थात् संपत्तीकरितां संपत्ति हें आजकालचें धोरण. 'जीविताहून अन्य कांहीं संपत्ति नाहींच' हें रस्किन्‌चें उदात्त मत आजच्या भांडवलशाहीरूपी

समाजव्यवस्थेस मान्य नाहीं व यामुळें निवळ मजुरी करण्याचें ज्या लहान लहान समाजांच्याच नव्हे तर आफ्रिका-हिंदुस्थान यांसारख्या प्रचंड राष्ट्रांच्या कपाळीं आलें आहे त्यांना आपलें जीवित यंत्रासारखें जड, रुक्ष व भावनाहीन करावें लागत आहे. माणुसकीचाच हा विध्वंस आहे. म्हणून सोशालिस्ट म्हणतात कीं, संपत्तिसाधनें सार्वजनिक मालकीचीं करून एकंदर समाजकर्तृत्वाचें ध्येयच समाजोपयोग हें ठरविलें पाहिजे. हें इष्ट तर आहेच. पण शास्त्र व शिक्षण यांनीं आज हें शक्यहि झालें आहे. भांडवलवाल्यांचा फुकटखाऊपणा आज मजुरांच्या डोळ्यांवर ढळढळीत येऊं लागला असून, भांडवलशाहीमुळें राष्ट्रेंच्या राष्ट्रें गुलामगिरीच्या नरकांत रुतत चाललीं आहेत. हा अनर्थ मजुरांचें दुर्लक्ष होण्यासारखा क्षुद्र नाहीं, जगांतील मजुरांच्या हल्ल्यांपुढें भांडवलवाल्यांना यापुढें नमलें पाहिजे, नाहीं तर नष्ट झालें पाहिजे. याचाच अर्थ, भांडवलशाही 'कालपक्व' झाली असा आहे.

— केसरी, १३ जून १९३१.

★

# आंतरराष्ट्रीय राजकारणांतील वर्गीय दृष्टि : : ८

सामान्यतः जगांतील कोणत्याही देशांत जमीनदार व शेतकरी, भांडवलदार व मजूर अशी आर्थिक तत्त्वावर समाजाची विभागणी करण्याचा प्रकार अलीकडे पुष्कळ रूढ झाला आहे. त्या त्या देशांत जमीनदार, भांडवलदार वगैरे वर्ग अथवा शेतकरी, मजूर हे वर्ग मुख्यतः राजकारणांत व आर्थिक व्यवहारांत वर्गीय हितबुद्धीनें वागत असतात. जगांतील रशियाखेरीज बाकीच्या सर्व देशांत जमीन, कारखाने, खाणी, आगगाड्या, बँका इत्यादि धनोत्पादन-साधनें बव्हंशानें जमीनदार-भांडवलदार वर्गांच्या हातीं असून राज्यसत्तेवरही याच वर्गाचें प्रभुत्व असतें. धनोत्पादन-साधनांची मालकी व राज्यसत्तेवरील प्रभुत्व यांच्या बळावर हे सत्ताधारी धनिकवर्ग शेतकरी व मजूर या वर्गांची पिळवणूक करीत असतात आणि या पिळवणुकींतून सुटका करून घेण्यासाठीं शेतकरी व मजूर हे वर्ग सत्ताधारी वर्गांशीं सर्वच देशांत कमी-अधिक प्रमाणांत झगडत असतात. ही विचारसरणी म्हणजे "राष्ट्रीय अंतर्गत राजकारणांतील वर्गीय दृष्टि" होय. ही विचारसरणी मुख्यतः समाजवाद्यांनीं मांडलेली असून ती सर्वमान्य झाली आहे असें नव्हे, तथापि राष्ट्रीय राजकारणांतल्या घडामोडींचा बोध होण्यास या दृष्टिकोनाचा फार उपयोग होतो हें आतां समाजवाद मान्य नसणाऱ्या पण सामाजिक व राजकीय बाबतींत पुरोगामी असलेल्या पुष्कळ

विचारवंतांना पटलेलें आहे. त्या त्या देशांच्या अंतर्गत राजकारणांत म्हणजेच राष्ट्रीय राजकारणांत जशी ही वर्गीय दृष्टि असते तशीच निरनिराळ्या राष्ट्रांच्या परस्परसंबंधांत म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारणांतही या वर्गीय दृष्टिकोनाकडूनच मुत्सद्द्यांच्या व्यवहारास प्रेरणा कशी मिळते व या वर्गीय दृष्टिकोनांतून पाहिलें तरच आंतरराष्ट्रीय राजकारणाचा नीट उलगडा कसा होतो, हें या लेखांत कांहीं उदाहरणें घेऊन दाखवावयाचें आहे.

युरोपच्या पूर्व भागांतील पोलंड व रुमानिया या दोन देशांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्यावर जर्मनांकडून अथवा दुसऱ्या परराष्ट्राकडून हल्ला झाल्यास इंग्लंड हें पोलंड व रुमानिया यांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं धावून येईल असें आश्वासन त्या राष्ट्रांना ब्रिटिश मुख्य प्रधान चेंबर्लेन यांनीं दिलेलें आहे. हें आश्वासन जरूर त्या वेळीं पार पाडतां येण्यास इंग्लंडला रशियाच्या मदतीची आवश्यकता भासते. पण पोलंड व रुमानिया यांच्या रक्षणासाठीं इंग्लंडनें रशियाची मदत मिळवावी या गोष्टीस प्रथमपासून पोलंड व रुमानिया या देशांतल्या राज्यकर्त्यांचाच विरोध झाला आणि अजूनही तो विरोध पुष्कळ अंशीं कायम आहे. पोलंड अथवा रुमानिया यांच्या रक्षणासाठीं रशियन सैन्य पोलंड व रुमानिया या राष्ट्रांच्या प्रदेशांत उतरविणें अवश्य आहे. पण रशियन सैन्य आपल्या रक्षणासाठींही आपल्या भूमीवर येऊं देण्यास पोलंड व रुमानिया हीं राष्ट्रें तयार नाहींत हें रशियाची मदत नाकारण्याचें त्यांचें मुख्य कारण आहे. गेल्या महायुद्धांत बेल्जमच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांचीं सैन्यें बेल्जममध्यें उतरून जर्मन सैन्याशीं लढलीं आणि त्यांना बेल्जमच्या सरकारनें विरोध केला नाहीं. फ्रान्सच्या सरहद्दीवर ब्रिटिश व फ्रेंच सैन्य आणि युद्धसाहित्य ऑस्ट्रियाशीं लढण्यासाठीं नेण्यांत आलें होतें. तसेंच रशियन सैन्य पोलंड व रुमानिया यांच्या प्रदेशांत त्या राष्ट्रांच्या रक्षणासाठीं न्यावें लागेल; पण आपलें स्वातंत्र्यरक्षण करण्यासाठींही पोलंड आणि रुमानिया हीं राष्ट्रें रशियन सैन्यास आपल्या प्रदेशांत येऊं देण्यास तयार नाहींत हें आश्चर्य नव्हे काय? जर्मन हल्ल्यामुळें स्वातंत्र्य गेलेलें पुरवलें; पण रशियन सैन्य आपल्या भूमीवर येणें नको। अशी कांहींशी वैतागाची वृत्ति पोलंड आणि रुमानिया हीं राष्ट्रें कां स्वीकारीत आहेत?

पोलंड व रुमानिया यांच्या या विरोधाचा खुलासा केवळ तर्कानें करीत

असण्याची जरूरी राहिलेली नसून, या विरोधाचें कारण आतां स्पष्टपणें जाहीर झालेलें आहे. पोलंड व रुमानिया या देशांत सरंजामशाही व भांडवलशाही आहे. म्हणजे तेथील धनसत्ता व राज्यसत्ता सरंजामदार ऊर्फ जमीनदार व भांडवलदारवर्ग यांच्या हातीं आहे. १९१७ सालीं रशियांत राज्यक्रांति झाल्यापासून तेथें सरंजामशाही व भांडवलशाही यांचा पाडाव झाला असून तेथील धनसत्ता आणि राज्यसत्ता शेतकरी-कामकऱ्यांच्या हातीं आहे. एकंदर जगभर अशीच क्रांति घडवून आणावी असें रशियांतील बोल्शेव्हिक् सरकारचें मत आहे. रशियांतील सैनिकांना युद्धाचें शिक्षण जसें दिलेलें असतें त्याच-प्रमाणें राज्यक्रांतिकारक मत-प्रसाराचेंहि उत्कृष्ट शिक्षण त्यांना दिलेलें असतें. जगांत रशियासारखी राज्यक्रांति व समाजक्रांति घडवून आणावी हें ध्येयही त्यांच्यासमोर ठेवलेलें असतें. असे क्रांतिकारक रशियन सैनिक पोलंड व रुमानिया या देशांच्या भूमीवर तेथील सैनिकांत, मजुरांत व शेतकऱ्यांत मिस-ळले म्हणजे ते आपल्या क्रांतिकारक विचारसरणीचा त्यांच्यामध्यें फैलाव करून १९१७ सालीं रशियांतील शेतकरी, कामकरी व सैनिक यांनीं जसा सरंजामशाही आणि भांडवलशाही यांचा पाडाव केला व शेतकरी-कामकऱ्यांचें राज्य स्थापलें तशी क्रांति हे रशियन सैनिक पोलंड व रुमानिया या देशांतही घडवून आणतील अशी भीति या देशांतील सत्ताधारी अशा सरंजामदार व भांडवलदार वर्गास वाटतें. म्हणून स्वदेशाचें स्वातंत्र्यरक्षण करण्यासाठींही रशियन सैन्य स्वदेशांत येऊं देऊन राज्यक्रांति व समाजक्रांति यांचा धोका पत्करण्यास पोलंड व रुमानिया या देशांतले सत्ताधारी वर्ग तयार होत नाहींत. राष्ट्रीय स्वातंत्र्यरक्षणाइतकें अथवा त्याहूनही अधिक महत्त्व त्यांना आपल्या वर्गाची सत्ता टिकविण्याचें वाटतें. या वर्गीय दृष्टीनेंच पोलंड व रुमानिया येथील सत्ताधाऱ्यांच्या रशियासंबंधींच्या धोरणाचा उलगडा होऊं शकतो.

याहूनही अधिक महत्त्वाचें उदाहरण झेकोस्लोव्हाकियाचें सांगतां येईल. हें राष्ट्र आतां नष्टच झालें आहे. त्या राष्ट्रांतील सत्ताधारी धनिक वर्गानें बोल्शेव्हिकांचें क्रांतिकारक सैन्य आपल्या भूमीवर आपल्या रक्षणासाठीं येऊं देऊन समाजक्रांतीचा धोका पत्करण्यापेक्षां राष्ट्रीय स्वातंत्र्य गमावलें जाण्याचा धोका पत्करला. आणि त्याप्रमाणें या राष्ट्राचें राष्ट्रीय स्वातंत्र्य नष्ट होऊन युरोप-च्या नकाशांतून या राष्ट्राचें नांवही आतां पुसलें गेलें आहे.

या झेकोस्लोव्हाकियांतील मुख्य जी झेक वंशाची जनता ती शेंकडों वर्षें परतंत्रच होती. गेल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रियन साम्राज्यांतून झेकोस्लोव्हाकिया हें स्वतंत्र प्रजासत्ताक राज्य निर्माण करण्यांत आलें. ऑस्ट्रिया व जर्मनी या दोन राष्ट्रांपासून या नवीन राष्ट्राच्या स्वातंत्र्यास धोका पोंचण्याचा संभव असल्यामुळें झेकोस्लोव्हाकियानें लवकरच दहा लक्ष सैन्य उभारून तें शस्त्रास्त्रसन्नद्ध केलें. आपली सुरक्षितता वाढविण्यासाठीं झेक सरकारनें फ्रान्सशीं परस्परसाहाय्याचा तहही केला. पुढें बोल्शेव्हिक रशियाशींही असा तह केला. स्वातंत्र्यरक्षणाच्या या सर्व तयारीच्या कसोटीची वेळ १९३८ च्या सप्टेंबरमध्यें आली. झेकोस्लोव्हाकियांतील अल्पसंख्य जर्मनांनीं जर्मनीच्या चिथावणीनें बंड उभारलें. या जर्मनांना स्वतंत्र करण्याचें निमित्त करून जर्मन चॅन्सेलर हिटलर यानें झेकोस्लोव्हाकियावर हल्ला करण्याची तयारी चालविली. अर्थात् तहाप्रमाणें प्रथम फ्रान्सनें व व मागाहून रशियानें झेकोस्लोव्हाकियास जर्मन हल्ल्याविरुद्ध मदत करावी हें ओघानेंच आलें. प्रथम फ्रान्सनें इंग्लंडच्या सल्ल्यास मान देऊन झेकांस मदत करण्याचें नाकारलें. बंडवाल्या अल्पसंख्य जर्मनांचा प्रदेश जर्मनीस देऊन टाकावा अशी झेक सरकारला मसलत दिली.

या अल्पसंख्य जर्मनांच्या प्रदेशांत झेक राज्याची सर्व तटबंदी असल्यानें हा प्रदेश जर्मनीस देऊन टाकल्यावर झेक राज्याचें स्वातंत्र्य जर्मनी केव्हांही अगदीं सहज हिरावून घेऊं शकेल ही गोष्ट त्या वेळीं 'मँचेस्टर गार्डियन'ने जाहीरपणें लिहिली असून झेक सरकारला ती इतर कोणापेक्षांही अधिक ठाऊक होती. झेक सरकारनें लढाईची जय्यत तयारी ठेवली असून फ्रेंचांची मदत प्रथम न मिळाली तरी कांहीं दिवस जर्मनीशीं आपण झुंज चालू ठेवूं असें प्रमुख सेनापतीचें मत होतें. रशियानें 'अगदीं परिणामकारक' अशी मदत देण्याची तयारी ठेवली होती ही गोष्ट झेक सरकारचा त्या वेळचा अध्यक्ष डॉ. बेनेश यानें नुकतीच जाहीर केली आहे. जर्मन हल्ल्यास झेक सरकारनें एकदां निकरानें तोंड देण्यास सुरवात केली असती म्हणजे फ्रान्सला फार दिवस तटस्थ राहणें अशक्य झालें असतें; व रशियाचीही मदत झेक सरकारला मिळून झेक सरकारचें स्वातंत्र्य टिकून राहणें बहुधा शक्य झालें असतें. निदान राष्ट्रीय स्वातंत्र्य हें सर्वस्वाचा होम करूनही रक्षिण्याइतकी बहुमोल चीज आहे हें लक्षांत घेतां, इतर कोणाची मदत मिळाली नसती तरीही डॉ. बेनेशनें आपल्या दहा

लक्ष शूर सैन्यानिशीं जर्मनीस सामना द्यावयास हवा होता. झेक सैनिक हे साऱ्या युरोपांत शूर सैनिक म्हणून शेंकडों वर्षांच्या इतिहासांत गाजले आहेत. रानटी हबशांचा रानटी बादशाह रासतफारी यानेंही कोणाची मदत नसतां सात महिनेपर्यंत इटलीशीं सैन्यानिशीं स्वतः रणावर उभें राहून लढण्याची शिकस्त केली. अखेर निरुपाय होऊन त्यानें देशत्याग केला असला तरी स्वदेश स्वतंत्र करण्याचा त्यानें निदिध्यास घेतला आहे. पण या रानटी बादशहास जें करणें शौर्याचें व स्वाभिमानाचें वाटलें तें सुधारलेल्या झेक राज्याचा विद्वान् व तत्त्वज्ञ अध्यक्ष जो डॉक्टर बेनेश त्यास तसें वाटलें नाहीं. रशिया मदत देण्यास तयार आहे असें माहीत असतांही त्यानें रशियाची मदत मागितली नाहीं; फ्रेंचांनीं तहानें बांधून घेतल्याप्रमाणें मदत दिली पाहिजे असा बेनेशनें हट्ट धरला नाहीं; अथवा रासतफारीप्रमाणें राष्ट्रीय स्वातंत्र्यरक्षणार्थ दिव्य करण्याचीही तयारी केली नाहीं, तर फ्रेंच सरकारच्या सल्ल्याप्रमाणें जर्मन सरकारला अल्पसंख्य जर्मनांची वसाहत असलेला झेक राज्यांतील सुडेटन प्रदेश, त्यांतील सर्व मजबूत तटबंदीसह, नाक मुठींत धरून देऊन टाकला. पुढें स्वतः बेनेशला देशत्याग करावा लागला व त्याच्यामागून जर्मनीनें सर्व झेक राज्य केवळ दमदाटीनें आपल्या अमलाखालीं आणलें. त्यांतला कांहीं भाग आतां पोलंड व हंगेरी यांनाही खैरातवजा देण्यांत आला आहे.

डॉ. बेनेश आणि झेकोस्लोव्हाकियांतील सत्ताधारी वर्ग यांनाही शरणागतीची प्रेरणा वर्गीय स्वार्थबुद्धीकडून मिळाली ही गोष्ट आतां एच्. एन्. बेल्सफर्ड प्रभृति नामांकित विचारवंत जाहीरपणें लिहूं बोलूं लागले आहेत. झेकोस्लोव्हाकियांत राजकीय लोकशाहीचा सर्व देखावा असला तरी, तेथली धनसत्ता व राज्यसत्ता मोठमोठ्या भांडवलवाल्यांच्या हातीं होती. रशियाचें सैन्य जर्मन हल्ला परतविण्यासाठीं झेकभूमीवर आलें तर, तें तेथील कामगारांना चिथावून समाजक्रांति घडवून आणील व मग राष्ट्रीय स्वातंत्र्य शिल्लक राहिलें तरी धनिकांची सत्ता व मत्ता धुळीस मिळवील ही भीति चेंबर्लेन यांना विशेष प्रकारें वाटत होती. फ्रान्सनें जर्मनीच्या भीतीनें रशियाशीं मित्रत्वाचा तह केलेला होता. पण या तहामुळें जर्मनीवर रशियन कम्युनिस्टांची क्रांतिकारक धाड केव्हां पडेल याचा नेम नसल्यानें ब्रिटिश मुत्सद्द्यांना हा रूसो-फ्रेंच तह नेहमींच नापसंत होता. फ्रान्सलाही रशियाच्या समाजक्रांतीचें कधींच

मोठेंसें प्रेम नव्हतें. जर्मनीची चढाई थोपवून धरण्यासाठीं केवळ हें बुजगावणें फ्रान्सनें उभें केलें होतें. हें रूसो-फ्रेंच सख्य चेंबर्लेन यांनीं मोठ्या कौशल्यानें मोडून काढलें. प्रथम त्यांनीं झेकोस्लोव्हाकियांत लॉर्ड रन्सिमन या मुत्सद्दयास पाठवून डॉ. बेनेश व झेक भांडवलवाले यांना "स्वातंत्र्ययुद्ध खेळून कम्युनिस्ट क्रांतीची वाट मोकळी करण्यापेक्षां जर्मनीपुढें गुडघे टेकून धनदौलती संभाळणें हेंच जगांतील भांडवलशाहीच्या हिताचें आहे" हें पटविलें. त्याचबरोबरच फ्रेंचांना जर्मन हल्ल्याविरुद्ध केव्हांही मदत करण्याचें आश्वासन देऊन झेकांच्या मदतीस जाण्यापासून परावृत्त केलें, आणि झेकोस्लोव्हाकियाचा सुडेटन प्रदेश झेक सरकारकडून जर्मनीच्या पदरांत टाकविला. यामुळें महायुद्ध टळलें, रशियन सैन्य युरोपांत शिरण्याचें टळलें आणि समाजक्रांतीचें युरोपियन भांडवलशाहीवर आलेलें संकट टळलें.

सध्यां ब्रिटिश मुख्य प्रधानांना ब्रिटिश साम्राज्यशाहीचें तारूं दोन प्रचंड खडकांतून मोठ्या युक्तीनें चालवावें लागत आहे. एका बाजूस जर्मनी, जपान व इटली या वर्धिष्णु साम्राज्यवाद्यांच्या हल्ल्यापासून ब्रिटिश साम्राज्याचें त्यांस रक्षण करावयाचें आहे. एवढें एकच कार्य त्यांच्यापुढें असतें तर फ्रान्स, रशिया आणि अमेरिका यांच्या मदतीनें जर्मनी, इटली आणि जपान यांच्याशीं इंग्लंडनें यापूर्वीच लढाई दिली असती आणि निदान आजच्यापेक्षां अधिक निश्चितपणें इंग्लंडला वरील तीन फॅसिस्ट राष्ट्रांविरुद्ध विजय मिळाला असता. त्यानंतर इंग्लंडचें जगावरील प्रभुत्व पहिल्याइतकेंच टिकलें असें जरी नव्हे, तरी आज जर्मनी, इटली व जपान यांचें बळ अतिशय वाढल्यामुळें ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वावरच जें संकट कोसळूं पाहत आहे तें हीं तीन राष्ट्रें दुर्बल होतीं त्या वेळीं कोसळलें नसतें. पण तसें करण्यांत जर्मनीचा पराभव होऊन जर्मनींत व इतर युरोपांत कम्युनिस्ट क्रांति घडून येण्याची भीति होती. हा दुसऱ्या बाजूचा खडक त्यांस टाळायचा होता. महायुद्धांत जर्मनीचा पराभव होऊन जनतेचें दारिद्य्र व आपत्ति इतकी वाढली कीं, समाजक्रांतीच्या भीतीची तरवार जर्मन भांडवलशाहीच्या डोकीवर युद्धानंतर सतत पंधरा वर्षें लटकत होती. १९३३ सालीं जर्मन नाझी पक्षाचा पुढारी हिटलर अधिकारारूढ झाला तेव्हां कम्युनिझमला ठोकून काढण्याची प्रतिज्ञा करूनच हिटलरनें अधिकारसूत्रें हातीं घेतलीं. त्या वेळीं कम्युनिझमच्या संकटास तोंड देण्यासाठीं हा मोठाच

तट उभारला जात आहे असे उद्गार काढून लॉइड जॉर्ज वगैरे प्रमुख ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं हिटलरचें उघड उघड अभिनंदन केलें. नाझी पक्ष जर्मनींत अधिकारावर येण्यानें फ्रेंचांचें संकट वाढलें व म्हणूनच त्यांनीं रशियाशीं सख्याचा तह केला. पण हा तह हें केवळ कागदी बुजगावणें होतें. खरोखर जर्मनीविरुद्ध फ्रान्स व रशिया यांना लढावें लागल्यास, परस्परांस लष्करी साहाय्य कसें द्यावें याची योजना कधींही आखण्यांत आली नव्हती आणि झेक स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची वेळ आली तेव्हां आपण केलेले तह आपणच कस्पटासमान लेखतों असें फ्रेंचांनीं कृतीनें जाहीर करून, झेकोस्लोव्हाकियास दगा दिला.

सारांश, इंग्लंडला आणि फ्रान्सला आपल्या साम्राज्यनाशाचा एक बाजूचा खडक तर टाळावयाचा आहेच, पण दुसरीकडे जागतिक भांडवलशाहीचा नाश व कम्युनिझम्चा उद्भव हाही खडक टाळावयाचा आहे. हा दुसरा खडक टाळण्यासाठीं जर्मनी, इटली व जपान यांच्याकडून आपल्या साम्राज्यशाहीवर येणारें वाढतें संकट इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें पत्करीत आहेत. कदाचित् जर्मन नाझी पक्षाच्या व जपानी लष्करशाहीच्या संकेताप्रमाणें जर्मनी व जपान यांचें कम्युनिस्ट रशियाशीं परभारें युद्ध झालें तर कम्युनिझम् व जर्मन-जपानी साम्राज्यशाही हीं दोन्ही दुर्बल होऊन ब्रिटिश-फ्रेंच साम्राज्यशाहीचें बल वाढेल व त्यांना जगांतील समाजक्रांतीची प्रवृत्ति चेपून काढण्यासाठीं तें खर्चतां येईल अशी इंग्लंड-फ्रान्सची अपेक्षा आहे.

जर्मन नाझी पक्ष, इटालियन फॅसिस्ट पक्ष व जपानी लष्करी पक्ष यांचें अँग्लो-फ्रेंच साम्राज्यशाहीशीं हाडवैर असलें तरी, जगांतील भांडवलशाही समाजव्यवस्था टिकवून धरली पाहिजे याबाबत इंग्लंड-फ्रान्सशीं त्यांचेंही एकमतच आहे. आणि कम्युनिस्ट रशियाचा पाडाव करून रशियाचा प्रदेश वाटून घेण्याची एखादी योजना पार पाडण्यास या राष्ट्रांची एकजूट होईल यांत मुळींच शंका नाहीं. आज केवळ त्यांच्यांत चालू असलेल्या अंतःस्पर्धेमुळें हा बनाव अनेक मुत्सद्द्यांची इच्छा असतांही घडून येत नाहीं. पण समाजक्रांतीच्या लाटेस कोठेंही डोकें वर काढण्याची संधि मिळूं नये यासाठीं आपल्या साम्राज्याची दुर्बलता वाढत असतांही साम्राज्यशाही राष्ट्रांची आपसांत यादवी माजूं नये यासाठीं हीं राष्ट्रें आज प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत

हें कोणासही सूक्ष्मपणें पाहिल्यास दिसून येईल. औद्योगिक क्षेत्रांत पुढार-लेल्या अशा स्वतंत्र भांडवलशाही राष्ट्रांचें परराष्ट्रीय राजकारण वर्गीय दृष्टीनें, समाजक्रांति टाळण्याच्या दृष्टीनें, कसें चाललें आहे हें येथवर कांहीं उदाहरणें घेऊन पाहिलें. मागासलेल्या व परतंत्र अथवा अर्धस्वतंत्र राष्ट्रांतही हीच दृष्टि कशी प्रभावी आहे हें आतां पाहूं.

१९३६ च्या ऑगस्टमध्यें इंग्लंडनें ईजिप्तला 'स्वातंत्र्य' दिल्याचें जाहीर केलें त्या वेळीं ईजिप्तमध्यें परराष्ट्रीयांचे जे हक्क होते ते रद्द करण्यांत येऊन ईजिप्तला सैन्य पाठविण्याची मुभा मिळाली व इंग्लंड हें कोणत्याही राष्ट्राशीं युद्धास उभें राहिल्यास ब्रिटिश सैन्याच्या खांद्यास खांदा लावून लढण्याचा अधिकार ईजिप्तला मिळाला.

त्याचबरोबर ईजिप्तमध्यें अंतर्गत बंड होऊन राजघराण्यावर संकट आल्यास अथवा अस्वस्थता माजल्यास ती मोडून राजघराण्याचें व त्याच्या सत्तेचें रक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिश सैन्यानें पत्करली. अँग्लो-ईजिप्शिअन तहांत ईजिप्तला हें जें शेवटचें अंतर्गत शांतता राखण्याचें आश्वासन मिळालें तें ईजिप्तच्या सरकारला फारच फायदेशीर होतें; पण हा ईजिप्तच्या सरकारचा स्वार्थ वर्गीय स्वार्थ होता, राष्ट्रीय स्वार्थ नव्हता.

ईजिप्तची समाजव्यवस्था प्राचीन सरंजामी पद्धतीची आहे. राजा हा या सरंजामदारांत प्रमुख सरंजामदार आहे. या सरंजामशाहीचा नाश होऊन शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय ईजिप्तच्या जनतेची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रगति होणें शक्य नाहीं.

पण सरंजामशाहीचा नाश करण्यासाठीं शेतकऱ्यांनीं बंड केल्यास ब्रिटिश समशेर हें बंड मोडून काढून सरंजामशाहीचें रक्षण करण्यास सज्ज आहे. अर्थात् ईजिप्तचें स्वातंत्र्यही तितक्या प्रमाणांत बेगडी ठरलें आहे. ज्या नाहसपाशानें अँग्लो-ईजिप्शन तहास ईजिप्तचा प्रधान या नात्यानें संमति दिली त्या नाहस-पाशाचा ईजिप्शन राजानें इंग्लंडच्या कारस्थानास बळी पडून तहानंतर लगेच पूर्ण पाडाव केला. त्यानें ईजिप्तच्या पार्लमेंटची सत्ता वाढूं देण्याचें नाकारून तें आपल्या हातचें बाहुलेंच राखलें आणि ईजिप्तचा राजा स्वतः इंग्लंडच्या हातचें बाहुलें बनून राहिला आहे. या गुलामगिरीचा शेवट शेतकऱ्यांच्या उठावणीनेंच होऊं शकेल; पण यासाठीं सरंजामशाहीचा पाडाव करावा लागेल. सरंजाम-

दारांचा पुढारी नाहसपाशा अशा समाजक्रांतीस तयार नाहीं म्हणून आजच्या पाडाव झालेल्या स्थितींतही अँग्लो-ईजिप्शन तहाचें समर्थन करीत आहे.

ईजिप्तचें हल्लींचें 'स्वातंत्र्य' हिंदी संस्थानिकांच्या 'स्वातंत्र्या'सारखें आहे. अंतर्गत बंडापासून संस्थानिकांचें रक्षण करण्याची जबाबदारी इंग्रजांवर आहे. ही जबाबदारी इंग्रजांना पार पाडतां यावी यासाठीं ब्रिटिश सैन्यसत्तेचें प्रभुत्व संस्थानिकांवर आहे, आणि राज्यक्रांति व समाजक्रांति होऊन आपली सरंजामी सत्ता धुळीस मिळूं नये म्हणून संस्थानिकांनीं हें नामधारी 'स्वातंत्र्य' म्हणजे वास्तविक पारतंत्र्य– खुषीनें अथवा नाखुषीनें पत्करलें आहे. याचा अर्थ आपली सरंजामी सत्ता म्हणजे वर्गसत्ता टिकावी यासाठीं राष्ट्रीय स्वातंत्र्यावर उदक सोडून परकीय सत्तेपुढें मान तुकविणें हेंच ईजिप्तचें व हिंदी संस्थानिकांचें परराष्ट्रीय राजकारण.

पॅलेस्टाइनमधील अरबांचें बंड चालू असतांही सध्यां तेथें असाच एक बनाव सुरू आहे. इराक, सीरिया, पॅलेस्टाइन, अरबस्तान वगैरे या सर्व शेजार-शेजारच्या अरब राष्ट्रांत जनता अडाणी असून तेथें सरंजामदारांचें प्रभुत्व आहे. हल्लींच्या अरब जनतेच्या बंडामुळें ब्रिटिश सत्तेला जसा धोका आहे तसाच तो या सरंजामदारांच्या सत्तेसही आहे. म्हणून या सर्व सरंजामदार अरब राष्ट्रांचें फेडरेशन घडवून ईजिप्तसारखेंच 'स्वातंत्र्य' या फेडरेशनला द्यावें म्हणजे अरबांचें बंड शमविण्यास आपण साहाय्य करूं अशी मागणी त्यांनीं इंग्लंडकडे केली असून या मागणींत वरील सर्व अरब सत्ताधाऱ्यांची वर्गीय स्वार्थाची दृष्टिच कशी प्रभावी आहे हें वरील ईजिप्तसंबंधींच्या विवेचनावरून कळून येईल.

चिनी सरकारचा सेनापति, सर्वाधिकारी व स्वातंत्र्यवीर चँक-कै-शेक यानें स्वदेशांतील कम्युनिस्टांचे समाजक्रांतीचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं ब्रिटिश, अमेरिकन व जपानी सरकारांशींही वेळोवेळीं सहकार्य केलें असून, त्यासाठीं राष्ट्रीय स्वातंत्र्याचा झगडाही त्यानें अनेकवार ढिला केला आहे. सध्यां कम्युनिस्टांनीं समाजक्रांतीची चळवळ सोडून देण्याचें आश्वासन दिल्यामुळें चँग-कै-शेक स्वातंत्र्यलढ्यांत कम्युनिस्टांशीं सहकार्य करीत आहे.

पण याच वेळीं ब्रिटिश-अमेरिकन साम्राज्यशाहीचें साहाय्य व वाढतें प्रभुत्व चीनवर अदृश्यपणें येत असून, कम्युनिस्टांच्या क्रांतिकारक उठावणीस

दडपून टाकण्यासाठीं तो पुन्हा जरूर तेव्हां ब्रिटिश-अमेरिकन साम्राज्यशाहीचें साहाय्य घेईल व त्यासाठीं त्यांच्या प्रभुत्वापुढें मान तुकवील असा संभव आहे. चँगला राष्ट्रीय स्वातंत्र्य हवेंच, पण त्यापेक्षांही वर्गसत्ता टिकविण्याचा त्याचा हट्ट तीव्रतर असून चीनचें परराष्ट्रीय धोरण तो याच वर्गीय दृष्टीनें चालवितो असा आजवरचा अनुभव आहे.

हिंदी राजकारणाचा बोधही या दृष्टीनें बराच स्पष्टपणें होऊं शकतो. हिंदी संस्थानिकांचें परराष्ट्रीय धोरण म्हणजे साम्राज्य सरकारसंबंधींचें धोरण कसें आहे, हें वर सांगितलेंच आहे. खालसा हद्दींतील जमीनदारवर्ग शेतकऱ्यांच्या उठावणीनें राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षां शेतकऱ्यांस दडपण्यासाठीं ब्रिटिश सैन्यसत्तेचा आश्रय करतो व त्यासाठीं स्वदेशावर पारतंत्र्याचें जोखड राहूं देतो. हिंदी भांडवलदारवर्गासंबंधानें आजच निर्णायकपणें बोलण्याची घाई करूं नये. तरी पण दिग्दर्शनापुरतें बोलून ठेवतों. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अखेरच्या झगड्यासाठीं जनतेच्या उठावणीची गरज आहे. ही जनतेची उठावणी अखेर स्वदेशी भांडवलशाहीच्या बोकांडीं बसून समाजक्रांति करील ही भीति हिंदी भांडवलदारवर्गास आजच वाटूं लागली आहे व म्हणून निकराचा स्वातंत्र्यलढा टाळून ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं कांहीं तरी तडजोड करण्याचा खटाटोप हा हिंदी भांडवलदारवर्ग करीत आहे ही गोष्ट आतां लपून राहिलेली नाहीं.

एकादें राष्ट्र स्वतंत्र असो अथवा परतंत्र असो, त्याच्या राष्ट्रीय राजकारणाप्रमाणें परराष्ट्रीय राजकारणांतही वर्गीय दृष्टि बरीच प्रभावी असते. एकंदर जगांतल्या आंतरराष्ट्रीय राजकारणांत वर्गीय दृष्टीला याप्रमाणें फारच महत्त्व असून तें राजकारण समजून घेण्यास या वर्गीय दृष्टिकोनाचा फार उपयोग होतो हें वरील विवेचनावरून समजून येईल.

—किर्लोस्कर, ऑगस्ट १९३९

★

# कॉंग्रेसची घटनासमितीची मागणी : : ९

साम्राज्यशाही युद्धविरोधाचा झगडा कॉंग्रेस अखेर सुरू करो अथवा न करो, तसा तो झगडा कॉंग्रेसनें सुरू करणें योग्य असो वा नसो, हिंदी राजकारणांत जी एक कोंडी निर्माण झाली आहे ती मोडण्यास घटना-समितीच्या मागणीचा पुरस्कार कॉंग्रेसपुढाऱ्यांनीं सध्यां चालविला असून त्या मागणीचें स्वरूप समजून घेणें आणि तिला पाठिंबा देणें हें आज राष्ट्रीय स्वातंत्र्यलढा समजून घेण्याचे दृष्टीनें अत्यवश्य आहे.

घटनासमितीची कल्पना हिंदी राजकारणांत अगदींच नवी अशी नाहीं. कॉ. मानवेंद्र रॉय यांनीं, हिंदुस्थानची राज्यघटना वयांत आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांस मताधिकार देऊन त्यांनीं निवडलेल्या घटना समितीनें बनवावी या मताचा पुरस्कार गेल्या पांच-सहा वर्षांपूर्वींपासून केला आहे. पं. जवाहरलाल यांनींही नंतर या कल्पनेचा स्वीकार केला. पण त्यांची घटनासमितीची कल्पना रॉय यांच्या कल्पनेहून मूलतः भिन्न आहे. हिंदुस्थानांतून ब्रिटिश साम्राज्यशाहीची सत्ता पूर्णपणें नाहींशी झाल्यावर कॉंग्रेसचें तात्पुरतें सरकार येथें स्थापन होईल व तें वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांस मताधिकार देऊन घटनासमिति बोलावील अशी कॉ. रॉय यांची योजना आहे. पं. जवाहरलाल नेहरूंना ब्रिटिश सरकार व हिंदुस्थान यांच्या दरम्यान तह होऊन ब्रिटिश

सरकार हिंदी घटनासमितीस मान्यता देईल असें वाटत असल्याचें त्यांच्या लखनौ काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणावरून वाटतें.

सध्या गांधींनीं ज्या घटनासमितीचा पुरस्कार चालविला आहे ती घटनासमिति या दुसऱ्या प्रकारची होय. 'टाइम्स ऑफ इंडिआ'ला कांहीं आठवड्यांपूर्वी दिलेल्या मुलाखतींत गांधींनीं घटनासमितीच्या या योजनेस प्रथम स्पष्टपणें पाठिंबा दिला असून. "या घटना समितीनें वसाहतीच्या स्वराज्यापेक्षां कमी दर्जाची अशी घटना जरी हिंदुस्थानला दिली तरीही मी ती घटना स्वीकारीन" असें गांधी म्हणाले होते. ता. २५ नोव्हेंबरच्या हरिजनमधील प्रसिद्ध लेखांत गांधीजी लिहितात, "अशा घटनासमितीनें बनविलेली घटना आदर्शवत् असणार नाहीं हें खरें. पण कायदेपंडित व सिद्धांती यांच्या दृष्टीनें ती कितीही अपुरी असली तरी पण तीच खरीखुरी घटना ठरूं शकेल."

रॉय आणि गांधीजी यांच्या घटनापरिषदेच्या कल्पनेंत असा मूलभूत फरक आहे खरा. पण अंतिम फलाच्या दृष्टीनें तो तसाच राहील असें नाहीं. कारण घटनासमिति–मग ती ब्रिटिश सत्तेखालीं भरो अथवा ब्रिटिश सत्ता येथून गेल्यावर भरो— ही कांहीं एक ठाम आकाराची (एकानें दुसऱ्यास उचलून देतां-घेतां देण्याजोगी) वस्तु नव्हे. लोकजागृतीच्या चळवळीचें तें एक फार महत्त्वाचें साधन आहे. "जागे व्हा, उठा आणि आपल्या राजकीय व आर्थिक हक्कांसाठीं झगडण्यास कंबर कसा" अशी आरोळी देण्याची ही चळवळ आहे. ती एकदां सुरू झाली म्हणजे ब्रिटिश सत्तेखालींच घटनासमिति भरवावी असा गांधींनीं आग्रह धरला तरी विशिष्ट मुदतींत ब्रिटिशांची संमति या घटनासमितीस न मिळाल्यास तेवढ्यामुळें चळवळ थोपवून धरणें गांधींनाही शक्य होणार नाहीं. आणि ब्रिटिशसत्ता येथून गेल्यावर घटनासमिति भरविण्यास जें शांततेचें व निःपक्षपाती वातावरण हवें तें योग्य काळांत न मिळाल्यास घटनासमिति भरेलच असेंही सांगतां येणार नाहीं. म्हणून घटनासमितीचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असेल या चर्चेपेक्षां ही एक लोकजागृतीची आणि राजकीय लोक-संघटनेची चळवळ आहे याच दृष्टीनें तिचा विचार करणें उपयुक्त होईल.

घटनासमितीचें विशिष्ट स्वरूप महत्त्वाचें नसून चळवळीचें आणि लोक-जागृतीचें साधन या दृष्टीनें तिचें महत्त्व अधिक आहे असें मी विशेष जोर देऊन म्हणतों याचें कारण असें कीं, ब्रिटिशांच्या संमतीनें घटनापरिषद बोल-

वावी असें गांधी म्हणत असले व ब्रिटिश सत्ता येथून गेल्यावर घटनासमिति बोलवावी असें रॉय म्हणत असले तथापि घटनासमिति वयांत आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांच्या मतदानानें बोलवायची याबाबत दोघांचें एकमत असून, अशा घटनासमितीस जनतेची संमति मिळविणें, अशा घटनासमितीवांचून अन्य प्रकारें बनलेल्या राज्यघटनेस येथें नांदणूक करतां येणार नाहीं अशी जनतेची तयारी करणें व पूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्यास अनुकूल असे प्रतिनिधि जनतेनें निवडून द्यावे यासाठीं लोकमतास शिक्षण देणें याबाबतही दोघांचें एकमत आहे. यासाठीं करावयाच्या प्रयत्नानें लोकमत कसें तयार होईल त्यावर घटनासमितीचें स्वरूप व तिनें बनवावयाच्या राज्यघटनेचें स्वरूप निर्णीत होणार आहे. घटनासमितीच्या विशिष्ट स्वरूपापेक्षां तिचें पर्यवसान महत्त्वाचें आहे, हें लक्षांत घेऊन जवाहरलालजींच्या घटनासमितीच्या घोषणेस गांधींनीं प्रथम प्रथम पाठिंबा दिला नव्हता. कारण तें पर्यवसान त्यांना धोक्याचें वाटत होतें. अलीकडेच आपलें मत बदलून आपण या कल्पनेस उचलून धरण्यास प्रवृत्त झालों असें गांधींनीं कबूलही केलें आहे. या कल्पनेस गांधींचा मूळ विरोध होता तो कां, व आतां ते कां अनुकूल झाले आहेत याचा थोडासा तपशीलानें विचार केला म्हणजे घटनासमितीच्या चळवळीचें यथार्थ स्वरूप समजून येणार आहे. घटनासमिति व कायदेमंडळ यांत फरक असतो हें अनेकांना आतां ठाऊक झालें आहे. कायदेमंडळांत आपणा सर्वांना अलीकडे परिचित झालेलीं खंडकरी बिल, शेतकरी-कर्जनिवारण बिल, सावकारी नियंत्रण बिल, ग्रामपंचायत बिल वगैरे अनेक लोकोपयोगी कायद्याचीं बिलें येत असतात. राज्यघटनेनें घालून दिलेल्या कक्षेतच या बिलांनीं कार्य करावयाचें असतें. पण ही राज्यघटना बनवावयाचें काम घटनासमिति करीत असते. अमुक एका राज्यघटनेंत राजा असावा कीं अध्यक्ष असावा, त्याच्या अधिकारावर मर्यादा कोणती व किती असावी, न्यायासनाचे अधिकार किती असावे, मंत्रिमंडळ प्रातिनिधिक व लोकमतास जबाबदार असावें कीं नुसतेंच प्रातिनिधिक व ठराविक मुदतीचें असावें, कायदेमंडळांत सरदारांची सभा, धनिकांची सभा, गरीब लोकांची सभा अशा भिन्न असाव्या कीं सर्व जनतेची सभा एकच असावी, खाजगी मिळकतीस परवानगी किती असावी, कोणत्या बाबी खाजगी मिळकतीखालीं किती असाव्या व किती नसाव्या, राज्यसत्तेस

सरकार हिंदी घटनासमितीस मान्यता देईल असें वाटत असल्याचें त्यांच्या लखनौ काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणावरून वाटतें.

सध्या गांधींनीं ज्या घटनासमितीचा पुरस्कार चालविला आहे ती घटनासमिति या दुसऱ्या प्रकारची होय. 'टाइम्स ऑफ इंडिआ'ला कांहीं आठवड्यांपूर्वीं दिलेल्या मुलाखतींत गांधींनीं घटनासमितीच्या या योजनेस प्रथम स्पष्टपणें पाठिंबा दिला असून, "या घटना समितीनें वसाहतीच्या स्वराज्यापेक्षां कमी दर्जाची अशी घटना जरी हिंदुस्थानला दिली तरीही मी ती घटना स्वीकारीन" असें गांधी म्हणाले होते. ता. २५ नोव्हेंबरच्या हरिजनमधील प्रसिद्ध लेखांत गांधीजी लिहितात, "अशा घटनासमितीनें बनविलेली घटना आदर्शवत् असणार नाहीं हें खरें. पण कायदेपंडित व सिद्धांती यांच्या दृष्टीनें ती कितीही अपुरी असली तरी पण तीच खरीखुरी घटना ठरूं शकेल."

रॉय आणि गांधीजी यांच्या घटनापरिषदेच्या कल्पनेंत असा मूलभूत फरक आहे खरा. पण अंतिम फलाच्या दृष्टीनें तो तसाच राहील असें नाहीं. कारण घटनासमिति— मग ती ब्रिटिश सत्तेखालीं भरो अथवा ब्रिटिश सत्ता येथून गेल्यावर भरो— ही कांहीं एक ठाम आकाराची ( एकानें दुसऱ्यास उचलून देतां-घेतां देण्याजोगी ) वस्तु नव्हे. लोकजागृतीच्या चळवळीचें तें एक फार महत्त्वाचें साधन आहे. " जागे व्हा, उठा आणि आपल्या राजकीय व आर्थिक हक्कांसाठीं झगडण्यास कंबर कसा " अशी आरोळी देण्याची ही चळवळ आहे. ती एकदां सुरू झाली म्हणजे ब्रिटिश सत्तेखालींच घटनासमिति भरवावी असा गांधींनीं आग्रह धरला तरी विशिष्ट मुदतींत ब्रिटिशांची संमति या घटनासमितीस न मिळाल्यास तेवढ्यामुळें चळवळ थोपवून धरणें गांधींनाही शक्य होणार नाहीं. आणि ब्रिटिशसत्ता येथून गेल्यावर घटनासमिति भरविण्यास जें शांततेचें व निःपक्षपाती वातावरण हवें तें योग्य काळांत न मिळाल्यास घटनासमिति भरेलच असेंही सांगतां येणार नाहीं. म्हणून घटनासमितीचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असेल या चर्चेपेक्षां ही एक लोकजागृतीची आणि राजकीय लोकसंघटनेची चळवळ आहे याच दृष्टीनें तिचा विचार करणें उपयुक्त होईल.

घटनासमितीचें विशिष्ट स्वरूप महत्त्वाचें नसून चळवळीचें आणि लोकजागृतीचें साधन या दृष्टीनें तिचें महत्त्व अधिक आहे असें मी विशेष जोर देऊन म्हणतों याचें कारण असें कीं, ब्रिटिशांच्या संमतीनें घटनापरिषद बोल-

वावी असें गांधी म्हणत असले व ब्रिटिश सत्ता येथून गेल्यावर घटनासमिति बोलवावी असें रॉय म्हणत असले तथापि घटनासमिति वयांत आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांच्या मतदानानें बोलवायची याबाबत दोघांचें एकमत असून, अशा घटनासमितीस जनतेची संमति मिळविणें, अशा घटनासमितीवांचून अन्य प्रकारें बनलेल्या राज्यघटनेस येथें नांदणूक करतां येणार नाहीं अशी जनतेची तयारी करणें व पूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्यास अनुकूल असे प्रतिनिधि जनतेनें निवडून द्यावे यासाठीं लोकमतास शिक्षण देणें याबाबतही दोघांचें एकमत आहे. यासाठीं करावयाच्या प्रयत्नानें लोकमत कसें तयार होईल त्यावर घटनासमितीचें स्वरूप व तिनें बनवावयाच्या राज्यघटनेचें स्वरूप निर्णीत होणार आहे. घटनासमितीच्या विशिष्ट स्वरूपापेक्षां तिचें पर्यवसान महत्त्वाचें आहे, हें लक्षांत घेऊन जवाहरलालजींच्या घटनासमितीच्या घोषणेस गांधींनीं प्रथम प्रथम पाठिंबा दिला नव्हता. कारण तें पर्यवसान त्यांना धोक्याचें वाटत होतें. अलीकडेच आपलें मत बदलून आपण या कल्पनेस उचलून धरण्यास प्रवृत्त झालों असें गांधींनीं कबूलही केलें आहे. या कल्पनेस गांधींचा मूळ विरोध होता तो कां, व आतां ते कां अनुकूल झाले आहेत याचा थोडासा तपशीलानें विचार केला म्हणजे घटनासमितीच्या चळवळीचें यथार्थ स्वरूप समजून येणार आहे. घटनासमिति व कायदेमंडळ यांत फरक असतो हें अनेकांना आतां ठाऊक झालें आहे. कायदेमंडळांत आपणा सर्वांना अलीकडे परिचित झालेलीं खंडकरी बिल, शेतकरी-कर्जनिवारण बिल, सावकारी नियंत्रण बिल, ग्रामपंचायत बिल वगैरे अनेक लोकोपयोगी कायद्याचीं बिलें येत असतात. राज्यघटनेनें घालून दिलेल्या कक्षेंतच या बिलांनीं कार्य करावयाचें असतें. पण ही राज्यघटना बनवावयाचें काम घटनासमिति करीत असते. अमुक एका राज्यघटनेंत राजा असावा कीं अध्यक्ष असावा, त्याच्या अधिकारावर मर्यादा कोणती व किती असावी, न्यायासनाचे अधिकार किती असावे, मंत्रिमंडळ प्रातिनिधिक व लोकमतास जबाबदार असावें कीं नुसतेंच प्रातिनिधिक व ठराविक मुदतीचें असावें, कायदेमंडळांत सरदारांची सभा, धनिकांची सभा, गरीब लोकांची सभा अशा भिन्न असाव्या कीं सर्व जनतेची सभा एकच असावी, खाजगी मिळकतीस परवानगी किती असावी, कोणत्या बाबी खाजगी मिळकतीखालीं किती असाव्या व किती नसाव्या, राज्यसत्तेस

खाजगी मिळकतीवर वेळोवेळीं किती आक्रमण करण्याचा अधिकार असावा, राष्ट्रसंरक्षण खात्याचे अधिकार किती व त्याच्या मर्यादा कोणत्या, वगैरे वगैरे स्वरूपाची राज्यघटनेची चौकट तयार करणें हें घटनासमितीचें काम असतें. या घटनेंत फरक करण्याची जरूरी भासल्यास तो करण्याची तरतूदही राज्यघटनेनें करून द्यावयाची असते. एवढें केल्यानंतर घटनासमितीचें अवतारकार्य संपते व ती अंतर्धान पावते.

खरोखर वरील सर्व बाबी घटनाशास्त्राच्या अभ्यासकांनाच समजणाऱ्या असून, त्यांनींच त्यासंबंधानें निर्णय दिला पाहिजे. सामान्य सुशिक्षितांस अथवा राज्यघटनाशास्त्राव्यतिरिक्त इतर शास्त्रांतल्या पंडितांनाही न समजणारा हा विषय आहे. उभ्या हिंदुस्थानच्या पस्तीस कोटि जनतेपैकीं शंभर लोकांनाही हा विषय पूर्णपणें समजण्याची मारामार! या शंभरांतही मतभेद एवढे तीव्र आहेत कीं, त्यांचें राज्यघटनेच्या अमुक एका प्रकारावर मतैक्य होणेंच कठिण! स्वतः मतदारांना घटनाशास्त्रांतलें कांहींच कळत नाहीं. वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांनीं म्हणजे घटनासमितीच्या सुमारें १० कोटि मतदारांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि सगळे घटनापंडित असतील असा संभव मुळींच नाहीं. मग अशा प्रतिनिधींची घटनासमिति या हिंदुस्थानची राज्यघटना कशी ठरविणार?

वरील प्रश्नाच्या उत्तरांतच घटनासमितीच्या चळवळीचें स्वरूप कळून येणार असून, गांधींचा या घटनासमितीस विरोध कां होता हेंही कळून येणार आहे. घड्याळाचीं आंतील चक्रें, स्क्रू, स्प्रिंग वगैरेची रचना कशी असतें हें सामान्य माणसास कळत नाहीं. घड्याळ्याच्या तबकडीवर पाहणें व घड्याळ वक्तशीर चाललें आहे कीं नाहीं हें ठरविणें, एवढें सामान्य माणसास करतां येतें. आणि घडयाळ वक्तशीर चालत नाहीं असें आढळून आल्यास सामान्य माणूस तें दुरुस्त करून घेऊं शकतो. आपल्या शरीराची रचना आपणांस कोठें ठाऊक आहे? पण थोडेंसें कांहीं दुखणें आलें तर आपण आजारी आहों हें आपणांस कळतें व वैद्यापुढें आपणांस होणाऱ्या व्यथेचें वर्णन करून आपण वैद्याकडून आजारावर इलाज करून घेतों. आपल्या नित्याच्या अथवा नैमित्तिक अशा हजारों गरजा भागविणाऱ्या वस्तु आपण बाजारांतून आणतों. त्या सगळ्या निर्माण करण्याची कला आपणांस कोठें अवगत असते? पण आपल्या गरजा आपणांस अवगत असतात; आणि

त्या निवारण्याचीं साधनें अथवा परिस्थिति आपण इतरांकडून मिळवितों. राज्यघटना ही अशीच एक वस्तु अथवा परिस्थिति आहे.

अनेक व्यक्तींनीं एकत्र राहून वैयक्तिक आणि सामुदायिक संसार चालवावयाचा तर, राज्यसंस्थेचें बंधन या सर्वांना अवश्य आहे ही गोष्ट बहुधा गृहीत धरली जाते. अर्थात् व्यक्तीच्या व समुदायाच्या गरजा भागविण्यास अनुकूल असेंच राज्यसंस्थेच्या घटनेचें स्वरूप असावें हें अगदीं उघड आहे. परकीयांपासून स्वतंत्र असणें हें राज्य म्हणजे 'स्टेट' या संस्थेचें प्रमुख लक्षण मानलें जातें. म्हणजे अमुक एका भूप्रदेशांत राहणारे लोक एकाच राज्यसंस्थेनें निगडित असले, त्या राज्यसंस्थेवर त्या भूप्रदेशाबाहेरच्या दुसऱ्या राज्यसंस्थेचें बंधन नसलें म्हणजे तें राज्य स्वतंत्र होय. अशा स्वतंत्र राज्यानें बद्ध असलेली जी जनता तिला स्थूल मानानें आपण राष्ट्र असें म्हणूं. राष्ट्रवाद अथवा राष्ट्रीय स्वातंत्र्यवाद म्हणून जो म्हणतात त्याचा अर्थ राष्ट्राचें स्वतंत्र राज्य असावें असें सांगणारें मत असा आहे.

राष्ट्राला स्वराज्य असावें, म्हणजेच राष्ट्र स्वतंत्र असावें, ही मानवजातीची आकांक्षा फार जुनी आहे. पण या राष्ट्रवादाचें स्वरूप सर्वकाळीं व सर्वस्थळीं सारखेंच राहिलेलें नाहीं. राष्ट्र हा शब्द पूर्वीं इंग्लंड, स्कॉटलंड, महाराष्ट्र, बंगाल वगैरे आजच्या उपराष्ट्रांना अथवा प्रांतांना लावण्यांत येई. आज इंग्लंड व स्कॉटलंड हे दोन्ही देश बऱ्हंशीं एकत्र आले असून त्यांना इंग्लंड असेंच म्हटलें जातें. महाराष्ट्र म्हणून अलग प्रांत आपण मानतों, तरी पण राष्ट्र म्हणजे हिंदुस्तान असेंच आपण आतां ओळखूं लागलों आहों. तसेंच शिवाजीच्या काळीं स्वराज्य म्हणजे स्वदेशी व स्वधर्मी राजाचें राज्य अशी कल्पना रूढ झाली होती. पण युरोपांत एकोणिसाव्या शतकांत राष्ट्रवादाचें स्वरूप लोकशाहीप्रधान राज्यघटना असें होतें. इटलीचा जगप्रसिद्ध देशभक्त माझिनी हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचें खरें स्वरूप लोकशाही आहे असेंच म्हणे. अमेरिकेनें अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडचें वर्चस्व झुगारून तेथें लोकशाहीप्रधान राज्यघटना स्थापन केली. हिंदुस्थानांत इंग्रजांची सत्ता नाहींशी करून स्वराज्य स्थापावें अशी चळवळ सुरू झाली तेव्हां यापुढें शिवाजी अथवा अकबर यांच्यासारख्या देशी राजांची सत्ता न आणतां तेथें लोकशाहीप्रधान अशी स्वदेशी सत्ता स्थापन करावी असा सर्व स्वराज्यवाद्यांचा निश्चय होता.

लोकशाहीप्रधान राज्यघटना हेंच हिंदी जनतेचें आजही ध्येय आहे. पण राष्ट्रवादाची ही कल्पना आतां अपुरी ठरूं लागली असून, प्रत्यक्ष व्यवहारांत ती अधिक व्यापक होणार असा संभव दिसत आहे. कसें तें पहाः—लोकशाही-प्रधान राज्यघटनेची व्यापक कल्पना म्हणजे, वयांत आलेल्या प्रत्येक माणसास ज्या राज्यघटनेंत मताधिकार असतो व जबाबदार मंत्रिमंडळास राज्यसत्तेचे सर्व अधिकार असतात ती लोकशाहीप्रधान राज्यघटना असें मानण्यांत येतें. पण यांत संपत्तीच्या खाजगी मालकीवर जवळ जवळ मुळींच बंधन नसतें. यामुळें धनोत्पादनसाधनें समाजांतल्या थोड्या लोकांच्या हातीं जाऊन आधु-निक प्रचंड उत्पादनसाधनांच्या बळावर धनाचें केन्द्रीकरण होत जातें. आणि मूठभर लोकांच्या हातीं संपत्तीचे ढिगाचे ढीग साचत राहतात. लक्षा-वधि लोकांना जिवापाड मेहनत करूनही गरजेपुरतें अन्न, वस्त्र, आश्रय, औषधपाणी मिळत नाहीं, तर दुसऱ्या लक्षावधि लोकांना श्रम करण्याला कामच मिळत नाहीं म्हणून मजूरी मिळत नाहीं व जगांत डोळ्यांसमोर अन्नवस्त्रांचे ढीग वाया चालले असतां त्याला त्यांतलें कांहींच खरेदी कर-ण्याचें सामर्थ्य नसतें. म्हणजे दर तीन अथवा पांच वर्षांनीं राज्यघटनेचे प्रतिनिधि निवडून देण्याची लोकशाही सत्ता सामान्य माणसास मिळाली तरी तेवढ्यावरून साध्या रोजच्या पोटापाण्याचा प्रश्नही सुटत नाहीं अशी परि-स्थिति उत्पन्न झाली आहे. पूर्वीं राजा व त्याचे दरबारी यांनाच राज्यसत्तेचा लाभ होत असे. सामान्य जनतेस राजकीय सत्ता मुळींच नसे. त्याचप्रमाणें हल्लीं धनोत्पादनसाधनें ज्या मूठभर भांडवलदार व जमीनदार वर्गांजवळ असतात त्यांच्याच हातीं समाजाची सर्व आर्थिक सत्ता राहून मताधिकाररूपी राजकीय सत्तेचा पोकळ वासा जनतेच्या हातीं आला आहे. जनता आर्थिक दृष्ट्या पूर्ण परतंत्र व कंगाल आहे. म्हणून राजकीय लोकशाहीबरोबर आर्थिक लोकशाहीही जनतेस अवश्य वाटूं लागली आहे. सार्वजनिक रस्ते, सार्व-जनिक पाणीपुरवठा, सैन्य, आरमार या गोष्टी जशा कोणासही खाजगी माल-कीनें वापरूं न देता त्या गोष्टी सार्वजनिक मालकींत ठेवून त्यांचा वापर नफ्यासाठीं केला जात असतो. हाच प्रघात उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत कारखाने, खाणी, जमिनी, बँका यांच्या बाबतींत केल्यावांचून समाजांत समता स्थापणें हा जो लोकशाहीचा मुख्य हेतु तो कधींच साध्य होणार नाहीं.

हें मत म्हणजेच समाजवाद असून त्यास आर्थिक लोकशाही असेंही म्हणतां येईल.

रशियांत कम्युनिस्ट क्रांति झाल्यापासून हें मत विशेष प्रामुख्यानें जगासमोर आलें, व राजकीय लोकशाही ही नुसती धूळफेक असून आर्थिक लोकशाहीवांचून समाजांत समता स्थापन करणें शक्य होणार नाहीं ही गोष्ट जगांतील विचारवंतांस कळूं लागली. या आर्थिक लोकशाहीच्या चळवळीस सुरवात करण्याकरितांच जमीन, कारखाने, खाणी, आगगाड्या वगैरे धनोत्पादनसाधनांचे मालक सामान्य जनतेस विरोध करूं लागतात आणि या विरोधाचें रूपांतर अत्याचारी अथवा अनत्याचारी कलहांत होतें. यासच वर्गकलह म्हणतात. घटनासमितीसाठीं लोकमत तयार करण्याची चळवळ सुरू झाली म्हणजे हिंदुस्थानांत आपणांस लोकशाही स्थापावयाची आहे, येथें राजाऐवजीं अध्यक्ष असेल, हिंदुस्थानांतच अखेरचें हायकोर्ट असेल, कायदेमंडळाच्या दोन सभा असतील अथवा एक सभा असेल, वगैरे तपशील जनतेसमोर सांगण्याचा कांहीं उपयोग नसतो. पोटभर भाकर, अंगभर वस्त्र, निवाऱ्याची जागा आणि आजारपणीं औषधपाणी कसें मिळेल असा प्रश्न सामान्य जनता पुढाऱ्यास विचारते. आणि पुढाऱ्यांनीं प्रामाणिकपणें उत्तर द्यायचें म्हणजे उत्तरोत्तर अधिकाधिक प्रमाणांत धनोत्पादनसाधनें सार्वजनिक मालकीत आणून जनतेच्या हितासाठीं यांचा वापर होईल अशी राज्यघटना तयार करूं, म्हणजे खाजगी मिळकतीवर आक्रमण करण्यास सरकारला भरपूर सत्ता देऊं असें आश्वासन जनतेला द्यावें लागतें. आणि या कामीं धनिकवर्गाचा विरोध होऊं लागला कीं, प्रतिकाराची तयारी जनतेनेंही करावी लागते. हीच वर्गयुद्धाची तयारी होय. जनतेचें दारिद्र्य केवळ इंग्रजांची सत्ता येथून गेल्यानें नाहींसें होणें शक्य नाहीं. म्हणून स्वातंत्र्यलढ्याबरोबर वर्गलढाही अपरिहार्य ठरतो व घटनासमितीच्या चळवळींत त्याचा प्रसार व तयारी टाळणें शक्य होत नाहीं. गांधींना स्वातंत्र्य हवें, पण हा वर्गलढा नको. म्हणून त्यांचा घटनासमितीस विरोध होता हें वरील विचार समजून घेतल्यास सहज लक्षांत येतें.

वर्गलढा टाळण्यासाठीं घटनासमितीला बगल देऊन स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची त्यांची एक युक्ति होती. तिचा प्रयोग ते युद्धापूर्वी करीत असून युद्ध झालें नसतें तर आणखी कांहीं काळ त्यांनीं तो प्रयोग तसाच चालू

ठेवला असता. सामान्य जनतेस शांततेचें व विधायक कार्यक्रमाचें शिक्षण देऊन आजच्या जातिनिष्ठ व परंपरागत पुढाऱ्यांवर हल्ला न करतां त्यांच्याशीं मिळतें घ्यावें व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कार्यांत त्यांना सामील करून घेऊन साम्राज्यशाहीविरुद्ध एकजुटीचा स्वातंत्र्यलढा चालवावा अशी गांधींची मनीषा होती. जातिनिष्ठ पुढारी विशेषतः हक्कदारवर्गांचें हितरक्षक असून या हक्कदारवर्गांचें जनतेच्या पिळणुकीवर आधारलेलें जीवन इंग्रजांच्या मदतीवांचून येथें टिकूं शकत नाहीं व म्हणून ब्रिटिश सत्ता घालविण्यास हे हक्कदार वर्ग कधींच अनुकूल होणार नाहींत, हा मुद्दा गांधींच्या लक्षांत पूर्वीं कधीं आला असेल अथवा नसेल. पण हक्कदारवर्गाशीं एकदां लढा सुरू केला कीं त्याचें वर्गयुद्धांत रूपांतर होतें व त्यांत अत्याचार होण्याचा संभव असतो. त्यापेक्षां हक्कदारवर्गांचा हृदयपालट करून त्यास पिळवणुकीपासून व साम्राज्यशाहीस चिटकून राहण्यापासून परावृत्त करीत असावें आणि त्याबरोबरच पूर्ण शांततेनें लढा चालविण्याची जनतेची कुवत वाढवीत राहावें ही गांधींची कार्यपद्धति होती. घटनासमितीसारखें अखिल जनतेस एकदम जागृतीची आरोळी देणारें व वर्गकलहाचा धोका असणारें कार्य आजच हातीं घेण्यास ते तयार नव्हते. पण युद्धामुळें परिस्थितींत एकदम पालट झाला. जातिनिष्ठेच्या नांवावर हक्कदारवर्गांचे हक्क संरक्षण करूं पाहणारे पुढारी या युद्धानें जगांत व हिंदुस्थानांत प्रचंड प्रमाणावर सामाजिक उलथापालथ होणार हें पाहून भेदरले. युद्धाचें वादळ क्षितिजावर जमूं लागलें तेव्हांपासून त्यांना ही धडकी भरलेली दिसत होती.

ही समाजक्रांति टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे ब्रिटिशांची सत्ता येथें कायम राहूं देणें हाच होय, हें त्यांनीं ओळखलें. कॉंग्रेसच्या जनताजागृतीच्या चळवळीस यशस्वितेनें विरोध केला तरच ब्रिटिशसत्ता येथें राहणें सोपें होतें, कॉंग्रेस तर दिवसेंदिवस जहाल प्रवृत्तीकडे झुकूं लागली होती. युद्धामुळें कॉंग्रेसची ही चळवळ अधिकच बळावणार हें उघड होतें. अशा वेळीं जनतेस जातिनिष्ठेच्या वेडानें क्षोभवून कॉंग्रेसच्या जनतानिष्ठ अशा धोरणास खो घालावा असा डाव जिनाप्रभृतींनीं रचून युद्धाच्या थोडे दिवस आधींपासून व युद्ध सुरू झाल्यावर कॉंग्रेसविरोधाची चळवळ सुरू केली.

गांधींच्या पुढें या वेळीं एक रोकडा प्रश्न येऊन पडला. जातिनिष्ठांचीं मनें

दुखवूं नयेत म्हणून राष्ट्रवादच सोडावा कीं राष्ट्रवादाच्या पुरस्कारासाठीं जातिनिष्ठांशीं लढा द्यावा हा तो प्रश्न होता. जातिनिष्ठ पुढाऱ्यांचीं आर्जवें करण्यांत यापुढें अधिक वेळ घालवावा तर ब्रिटिश सत्ता येथें दृढमूढ करण्यासाठीं जातीय तंटे माजविण्याचा उपद्व्याप हे जातिनिष्ठ पुढारी अतिशय जोरानें करतील व नोकरशाहीच्या पाठिंब्यानें ते यशस्वी होतील व यामुळें आपला स्वातंत्र्यलढा कायमचाच अनंतकालपर्यंत दूर लोटला जाईल अशी गांधींना भीति वाटली. त्यांचा कांहींसा धीरही सुटला. आणि अशा प्रतिगामी पुढाऱ्यांच्या मुळावरच प्रहार घालण्यासाठीं त्यांनीं घटनासमितीची योजना स्पष्टपणें स्वीकारिली. तींत जो वर्गकलहाचा व अत्याचाराचा धोका आहे असें वर म्हटलें आहे, तो त्यांना अजूनही दिसतोच आहे. पण तो टाळण्याचा ते शक्य तो प्रयत्न करीत असून त्यांत फारसें यश न आल्यास निदान जातीय कलह माजण्यापेक्षां थोडाफार वर्गकलह झाला तरी चालेल अशी मनोवृत्ति गांधींनीं धारण केली आहे.

ब्रिटिशांतील सत्ताधारी वर्गांची आपणांस या कामीं मदत मिळावी अशी त्यांची इच्छा आहे. जातीय दंगे व जातीय अत्याचार झाले तरी अखेरीस सामाजिक उलथापालथ न टळतां अशा सामाजिक उलथापालथीस भयंकर अत्याचारी स्वरूप येईल, जातीय दंग्यांच्या रूपानें उत्पन्न होणाऱ्या कोलाहलांत कम्युनिझम् व अत्याचारी वर्गयुद्ध निर्माण होईल ही गोष्ट इंग्लंडांतील विचारवंतांना पटावी आणि त्यांना गांधींच्या मागणीस वेळींच मान्यता देऊन शांततारक्षणाच्या आणि वर्गीय तेढीची तीव्रता कमी करण्याच्या कामीं ब्रिटिश सरकार व गांधी म्हणजे काँग्रेस या उभयतांचें सहकार्य व्हावें अशी गांधींची इच्छा व अपेक्षाही आहे. पण ब्रिटिशांची संमति या योजनेस मिळेल कीं न मिळेल हा प्रश्न मुळींच महत्त्वाचा नाहीं. जनताजागृतीची, जनतेस राजकीय हक्कांचें शिक्षण देण्याची आणि जनताहिताचे पुढारी जनतेमार्फत निवडून आणून एकजुटीनें अखंड राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याची घटनासमितीची चळवळ ही अमोल संधि आहे. या चळवळींत काँग्रेसनें पुरस्कारिलेल्या राष्ट्रवादास हक्कदारवर्गांचा विरोध होऊन त्या राष्ट्रवादास समाजवादाचें स्वरूप द्यावें लागलें तरी तें दिलें पाहिजे. राजकीय लोकशाही अपुरी ठरून आर्थिक लोकशाही म्हणजेच समाजवाद हाच खरा राष्ट्रवाद म्हणण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

—किर्लोस्कर, जानेवारी १९४०

# क्रिप्स आणि कॉंग्रेस : समेट अशक्य कां झाला? : : १०

कॉंग्रेसच्या आजच्या युद्धविषयक धोरणासंबंधानें मला चर्चा करावयाची आहे. हें युद्धविषयक धोरण आज नवीन उत्पन्न झालें नसून तें गेलीं कित्येक वर्षें विकसत आलें आहे. पण कोणत्याही पुराणाची सुरवात जशी जगाच्या आरंभापासून करण्यांत येते तशी येथें कॉंग्रेसच्या आरंभापासून विवेचनाची सुरवात करायची नाहीं. हल्लींच्या कॉंग्रेसधोरणाचा उगम मुख्यतः चालू युद्धाच्या सुरवातीपासून झाला आहे. पण तेथपासूनही मला तें सांगायचें नाहीं. क्रिप्स-वाटाघाटींच्या निमित्तानें कॉंग्रेसच्या भूमिकेची खूप छाननी झाली व त्या वेळेपासून कॉंग्रेसच्या धोरणास जें स्वरूप आलें तेंच मुख्यतः आज कायम आहे. कॉंग्रेसच्या हिंदुमुसलमानविषयक धोरणास जें फाजील महत्त्व दिलें जातें तें योग्य नव्हे. खरा मुद्दा राजकीय धोरणाचा आहे. आजच्या पेचप्रसंगाचें कारण कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांची दुही हें नसून कॉंग्रेसची राजकीय मागणी अमान्य झाली हें आहे. मुख्यतः क्रिप्स यांनीं आणलेल्या योजनेसंबंधानें तड-जोड अशक्य झाली, म्हणूनच आजचा पेचप्रसंग उद्भवला. क्रिप्सयोजना रद्द झाली नाहीं, तिला ठिगळें लावून हल्लींचा पेचप्रसंग सोडवितां येईल असें कांहीं लोकांना वाटतें. पण तें बरोबर नाहीं. सरकार व कॉंग्रेस यांचे मतभेद

मूलग्राही असल्यानें तडजोड अशक्य होत आहे. हें कळून घेण्यासाठीं क्रिप्स-वाटाघाटींची थोडी चर्चा येथें करायची आहे.

* * *

सर स्टॅफर्ड यांनीं दोन देणग्या इकडे येतांना आणल्या आणि त्या दोन्हीही कॉंग्रेसनें व इतर पक्षांनीं फेटाळल्या. एकींत युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य व घटनासमितीनें राज्यघटना बनविण्याचा हक्क देण्यांत आला होता. दुसरीनें हिंदुस्थानच्या मध्य कार्यकारी मंडळांत हिंदी राजकीय पक्षांना स्थान देण्यांत आलें होतें. पण या दोन्ही मागण्या कॉंग्रेसनें व इतर सर्व पक्षांनीं या ना त्या कारणांनीं नाकारल्या. युद्धाच्या आरंभीं कॉंग्रेसनें खरोखर युद्धोत्तर स्वातंत्र्याचें आणि घटनासमितीचें आश्वासनच मागितलें होतें. मध्य सरकार-संबंधानें विशेषशी स्पष्ट मागणी कॉंग्रेसनें केली नव्हती. मग क्रिप्स यांची योजना कॉंग्रेसनें कां नाकारली ? खरोखर युद्धाच्या सुरवातीस ही देणगी क्रिप्स यांनीं दिली असती तर ती कॉंग्रेसनें घेतली असती का ? आणि घेतली असती तर कॉंग्रेसचें तसें करणें योग्य झालें असतें का ? हे प्रश्न मोठे कुतूहलो-त्पादक आहेत. त्यांचीं उत्तरें येथें न देतां सर स्टॅफर्ड यांच्या देणग्या आल्या तेव्हां कां नाकारल्या गेल्या तें येथें सांगतों. म्हणजे बाकीच्या प्रश्नांचीं उत्तरेंही त्यांत अंतर्भूत होतील. मला येथें हें सांगून ठेवलें पाहिजे कीं, क्रिप्सयोजना नाकारण्याचीं मी देतों तीं कारणें कॉंग्रेसतर्फे अधिकृतपणें देण्यांत आलेलीं नाहींत. पण तीं स्वतंत्रपणें सयुक्तिक वाटणारीं आहेत.

* * *

पहिली गोष्ट ही आहे कीं, युद्धानंतर हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचें आश्वासन क्रिप्स यांनीं देणें म्हणजे " जाळ्यांतून मासा निसटला असता धीवरानें कृष्णार्पण " म्हणण्यांतला तो प्रकार होता. चालू युद्धांत ब्रिटनचा पराभव झाल्यास हें स्वातंत्र्यांचें आश्वासन व्यर्थ जाणारच आहे. पण ब्रिटन विजयी झालें तरीं हिंदुस्थानला अंकित ठेवणें ब्रिटनला यापुढें शक्य होणार नाहीं असें मला वाटतें. हिंदुस्थानांतील ११ प्रांत व मध्यसरकार यांचा एकूण जमा-खर्च शांततेच्या काळीं सालीना साधारण दोनशें कोटींच्या आसपास असतो. पैकीं संरक्षणखर्च चालू युद्धापूर्वीं ४५ ते ५५ कोटींपर्यंत असे. हा संरक्षणखर्च हिंदुस्थानचें दारिद्र्य लक्षांत घेतलें तर फार मोठा होय हें खरें; पण जर्मनी,

जपान, इंग्लंड वगैरे राष्ट्रांचा जो संरक्षणखर्च होत असतो त्या मानानें हिंदुस्थानचा संरक्षणखर्च फार लहान होता. हा कशावर अंदाजलेला होता? परचक्राचा संभव किती आहे [illegible] आलें होतें त्यावर [illegible] आणि ब्रह्मदेशाच्या पूर्वेकडून इंडोचायना [illegible] फ्रान्स हें इंग्लंडचें मित्रराष्ट्र होतें; [illegible] येऊन जपानची स्वारी आल्यास इंडोचायना फ्रेंचांचें असल्यानें फ्रेंचांची मदत इंग्लंडला मिळणार होती. जपान जर हिंदुस्थान व चीन जिंकील तर अमेरिकेच्या साम्राज्यास यामुळें धोका असल्यानें जपानविरुद्ध ब्रिटनला अमेरिकेचें साहाय्य केव्हांही मिळणार होतें. जपानचें वाढतें सामर्थ्य रशिया व चीन यांनाही धोक्याचें असल्यानें त्यांची मदतही ब्रिटनला केव्हांही मिळणार होती. जर्मनी व इटली हे ब्रिटनचे आणखी दोन प्रतिस्पर्धी. पण चालू युद्धापूर्वी पुष्कळ वर्षें त्यांची ही चुरस आपसांत होती आणि या दोघांपासून फ्रान्सला संकट अधिक होतें. यामुळें ब्रिटनला असलेला धोका त्या मानानें दूर होता. उलट फ्रान्सपासून इंग्लंडला धोका नव्हता. कारण इटली व जर्मनी यांचेविरुद्ध ब्रिटनची मदत फ्रान्सला हवी असे. रशिया हा ब्रिटनचा आणखी एक प्रतिस्पर्धी. पण जर्मनी व जपान यांच्या कैंचींत तो सांपडला असल्यानें केव्हां ना केव्हां हीं तीन राष्ट्रें आपसांत लढून एकमेकांस दुर्बल करून टाकतील असा अंदाज होता. सारांश मित्रराष्ट्रांचें हमखास साहाय्य मिळेल आणि प्रतिस्पर्धी राष्ट्रें आपसांत लढून दुर्बल होतील, यामुळें हिंदुस्थानला व ब्रिटिश साम्राज्याला प्रत्यक्ष परचक्राचा धोका कमी आहे असें गेल्या युद्धानंतर १२-१४ वर्षेपर्यंत ब्रिटिश मुत्सद्द्यांना वाटत होतें. म्हणून हिंदुस्थानचा संरक्षणखर्च ४५ तें ५५ कोटि एवढाच ठेवण्यांत येई. त्यानंतर हळूहळू त्यांचा भ्रमनिरास होऊं लागला आणि चालू युद्धानें तर ही परिस्थिति साफ वेगळी असल्याचें नजरेस येत आहे.

* * *

फ्रान्स व अमेरिका यांच्या पाठबळावर विसंबून राहणें आणि प्रतिस्पर्धी राष्ट्रें आपसांत भांडून दुर्बल होतील अशी आशा बाळगणें हीं दोनही ब्रिटनचीं धोरणें या युद्धानें चूक ठरविलीं आहेत. चालू युद्धांत ब्रिटनचा विजय होऊन हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित राहील असें आपण समजूं. तरी पण फ्रान्सच्या

पाठिंब्यावर ब्रिटनला यापुढें कधींही विसंबून राहणें धोक्याचें व्हावें एवढा मोठा दगा फ्रान्सनें दिला आहे. अमेरिका इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यानंतरही ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, पासिफिकमधील अनेक बेटें व हॉलंडचें साम्राज्य जपाननें ब्रिटनपासून हिसकून घेतलें; अमेरिकेचें साहाय्य ब्रिटनला पुरेंसें पोंचूंही शकलें नाहीं. इटली व जर्मनी आपसांत भांडलीं नाहींत इतकेंच नव्हे, तर जर्मनी व रशिया यांचेमधील तेढीचा फायदा ब्रिटनला मिळूं नये यासाठीं जर्मनीनें पावणेदोन वर्षेंपर्यंत रशियाला यशस्वितेनें तटस्थ ठेवलें. रशिया व जपान अजूनही लढूं इच्छीत नाहींत. सांगण्याचा मुद्दा असा कीं, युद्धानंतरच्या काळांत हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित ठेवावयाचें तर बाहेरच्यां कोणत्याही राष्ट्राचें साहाय्य मिळणार नाहीं व परराष्ट्रांच्या परस्परतेढीचा फायदा मिळणार नाहीं हें इंग्लंडला ध्यानांत घ्यावें लागेल व त्या धोरणानें परचक्रनिवारणाची तयारी करावी लागेल. परचक्र केवढें येईल ? अमुक राष्ट्राचा हल्ला येईल अथवा एकाच राष्ट्राचा हल्ला येईल असें सांगतां येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रिटनचें राज्य येथें आहे तोंवर जर्मनी, जपान व इटली यांना जगांत साम्राज्यें वाढविणें अशक्य असल्यानें अनेक राष्ट्रांचा संघटित हल्ला हिंदुस्थानवर येईल हें गृहीत धरून संरक्षणयोजना आंखली पाहिजे. फ्रान्स व अमेरिका यांचें पाठबळ मिळून शिवाय इतर राष्ट्रांच्या आपसांतील दुहीचा फायदा मिळेल या हिशेबानें हिंदुस्थानची संरक्षणयोजना जी आंखली गेली होती तिचा खर्च दरसाल सुमारें पंचावन्न कोटि होता. आतां कोणत्याही राष्ट्राच्या मदतीवांचून आणि प्रत्येकीं हिंदुस्थानपेक्षां किती तरी अधिक संरक्षणखर्च करणाऱ्या अशा अनेक राष्ट्रांना तोंड देण्यासाठीं जी संरक्षणयोजना आंखण्यांत यावयाची असेल तिजसाठीं कमींत कमी हल्लींच्या चौपट-पांचपट संरक्षणखर्च येथल्या सरकारला करावा लागेल.

* * *

म्हणजे हिंदुस्थानचा संरक्षणखर्च कमींत कमी दोनशें ते तीनशें कोटींपर्यंत जाईल. ज्या देशाचें प्रांतिक सरकारें व मध्यसरकारें यांचें उत्पन्न दोनशें कोटि रुपये आहे व ज्याला तितका खर्चही करावा लागतो तो देश केवळ संरक्षण खात्यावर दोनशें ते तीनशें कोटि रुपये कोठून खर्च करणार ? लोकांची कर देण्याची पात्रता आतां संपली आहे. अशा स्थितींत करवाढ तरी कशी करणार ?

जपान, इंग्लंड वगैरे राष्ट्रांचा जो संरक्षणखर्च होत असतो त्या मानानें हिंदुस्थानचा संरक्षणखर्च फार लहान होता. हा कशावर अंदाजलेला होता? परचक्राचा संभव किती आहे यासंबंधानें युद्धपूर्वकालांत जें अनुमान बांधण्यांत आलें होतें त्यावर तो अंदाजलेला होता. हा अंदाज कसा बांधला जाई? फ्रान्स हें इंग्लंडचें मित्रराष्ट्र होतें; आणि ब्रह्मदेशाच्या पूर्वेकडून इंडोचायना व सयाम येथून जपानची स्वारी आल्यास इंडोचायना फ्रेंचांचें असल्यानें फ्रेंचांची मदत इंग्लंडला मिळणार होती. जपान जर हिंदुस्थान व चीन जिंकील तर अमेरिकेच्या साम्राज्यास यामुळें धोका असल्यानें जपानविरुद्ध ब्रिटनला अमेरिकेचें साहाय्य केव्हांही मिळणार होतें. जपानचें वाढतें सामर्थ्य रशिया व चीन यांनाही धोक्याचें असल्यानें त्यांची मदतही ब्रिटनला केव्हांही मिळणार होती. जर्मनी व इटली हे ब्रिटनचे आणखी दोन प्रतिस्पर्धी. पण चालू युद्धापूर्वी पुष्कळ वर्षें त्यांची ही चुरस आपसांत होती आणि या दोघांपासून फ्रान्सला संकट अधिक होतें. यामुळें ब्रिटनला असलेला धोका त्या मानानें दूर होता. उलट फ्रान्सपासून इंग्लंडला धोका नव्हता. कारण इटली व जर्मनी यांचेविरुद्ध ब्रिटनची मदत फ्रान्सला हवी असे. रशिया हा ब्रिटनचा आणखी एक प्रतिस्पर्धी. पण जर्मनी व जपान यांच्या कैचींत तो सांपडला असल्यानें केव्हां ना केव्हां हीं तीन राष्ट्रें आपसांत लढून एकमेकांस दुर्बल करून टाकतील असा अंदाज होता. सारांश मित्रराष्ट्रांचें हमखास साहाय्य मिळेल आणि प्रतिस्पर्धी राष्ट्रें आपसांत लढून दुर्बल होतील, यामुळें हिंदुस्थानला व ब्रिटिश साम्राज्याला प्रत्यक्ष परचक्राचा धोका कमी आहे असें गेल्या युद्धानंतर १२-१४ वर्षेंपर्यंत ब्रिटिश मुत्सद्यांना वाटत होतें. म्हणून हिंदुस्थानचा संरक्षणखर्च ४५ तें ५५ कोटि एवढाच ठेवण्यांत येई. त्यानंतर हळूहळू त्यांचा भ्रमनिरास होऊं लागला आणि चालू युद्धानें तर ही परिस्थिति साफ वेगळी असल्याचें नजरेस येत आहे.

* * *

फ्रान्स व अमेरिका यांच्या पाठबळावर विसंबून राहणें आणि प्रतिस्पर्धी राष्ट्रें आपसांत भांडून दुर्बल होतील अशी आशा बाळगणें हीं दोनही ब्रिटनचीं धोरणें या युद्धानें चूक ठरविलीं आहेत. चालू युद्धांत ब्रिटनचा विजय होऊन हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित राहील असें आपण समजूं. तरी पण फ्रान्सच्या

पाठिंब्यावर ब्रिटनला यापुढें कधींही विसंबून राहणें धोक्याचें व्हावें एवढा मोठा दगा फ्रान्सनें दिला आहे. अमेरिका इंग्लंडच्या बाजूनें युद्धांत सामील झाल्यानंतरही ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, पासिफिकमधील अनेक बेटें व हॉलंडचें साम्राज्य जपाननें ब्रिटनपासून हिसकून घेतलें; अमेरिकेचें साहाय्य ब्रिटनला पुरेसें पोंचूंही शकलें नाहीं. इटली व जर्मनी आपसांत भांडलीं नाहींत इतकेंच नव्हे, तर जर्मनी व रशिया यांचेमधील तेढीचा फायदा ब्रिटनला मिळूं नये यासाठीं जर्मनीनें पावणेदोन वर्षेंपर्यंत रशियाला यशस्वितेनें तटस्थ ठेवलें. रशिया व जपान अजूनही लढूं इच्छीत नाहींत. सांगण्याचा मुद्दा असा कीं, युद्धानंतरच्या काळांत हिंदुस्थान इंग्लंडच्या अंकित ठेवावयाचें तर बाहेरच्या कोणत्याही राष्ट्राचें साहाय्य मिळणार नाहीं व परराष्ट्रांच्या परस्परतेढीचा फायदा मिळणार नाहीं हें इंग्लंडला ध्यानांत घ्यावें लागेल व त्या धोरणानें परचक्रनिवारणाची तयारी करावी लागेल. परचक्र केवढें येईल ? अमुक राष्ट्राचा हल्ला येईल अथवा एकाच राष्ट्राचा हल्ला येईल असें सांगतां येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रिटनचें राज्य येथें आहे तोंवर जर्मनी, जपान व इटली यांना जगांत साम्राज्यें वाढविणें अशक्य असल्यानें अनेक राष्ट्रांचा संघटित हल्ला हिंदुस्थानवर येईल हें गृहीत धरून संरक्षणयोजना आंखली पाहिजे. फ्रान्स व अमेरिका यांचें पाठबळ मिळून शिवाय इतर राष्ट्रांच्या आपसांतील दुहीचा फायदा मिळेल या हिशेबानें हिंदुस्थानची संरक्षणयोजना जी आंखली गेली होती तिचा खर्च दरसाल सुमारें पंचावन्न कोटि होता. आतां कोणत्याही राष्ट्राच्या मदतीवांचून आणि प्रत्येकीं हिंदुस्थानपेक्षां किती तरी अधिक संरक्षणखर्च करणाऱ्या अशा अनेक राष्ट्रांना तोंड देण्यासाठीं जी संरक्षणयोजना आंखण्यांत यावयाची असेल तिजसाठीं कमींत कमी हल्लींच्या चौपट-पांचपट संरक्षणखर्च येथल्या सरकारला करावा लागेल.

*　　　　*　　　　*

म्हणजे हिंदुस्थानचा संरक्षणखर्च कमींत कमी दोनशें ते तीनशें कोटींपर्यंत जाईल. ज्या देशाचें प्रांतिक सरकारें व मध्यसरकारें यांचें उत्पन्न दोनशें कोटि रुपये आहे व ज्याला तितका खर्चही करावा लागतो तो देश केवळ संरक्षण खात्यावर दोनशें ते तीनशें कोटि रुपये कोठून खर्च करणार ? लोकांची कर देण्याची पात्रता आतां संपली आहे. अशा स्थितींत करवाढ तरी कशी करणार ?

अशा परिस्थितींत हिंदुस्थानचा संरक्षणखर्च कमी करण्याचा एक उपाय म्हणजे खडें सैन्य नेहमीं मोठें न ठेवतां सक्तीचें लष्करी शिक्षण देशांतील सर्व प्रौढांना देऊन जरूर त्या वेळीं अगदीं थोड्या इशारतीनें प्रचंड सैन्य उभारण्याची शक्यता निर्माण करणें हा. दुसरा उपाय देशांतले उद्योगधंदे व शेती वाढवून युद्धसाहित्याचे कारखाने वाढविणें आणि लोकांचें कर देण्याचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं लोकांची सुबत्ता वाढविणें हा. चालू युद्धानंतर इंग्लंडनें तावडतोब या गोष्टी करण्यास हातीं घेतल्या नाहींत तर पुन्हा कोणी तरी ब्रिटनकडून हिंदुस्थान हिसकून घेतल्यावांचून राहणार नाहीं. आणि या नव्या राज्यकर्त्यालाही वर सांगितल्या प्रकारच्या देशोन्नतीच्या तरतुदी कराव्या लागतील. सर्व देशास सक्तीचें लष्करी शिक्षण द्यावयाचें ठरविलें आणि प्रचंड औद्योगिक उत्कर्ष करण्याचें योजलें, तर संरक्षण व उद्योगधंदे हीं खातीं पूर्ण प्रातिनिधिक अशा मंत्र्याचे हातीं द्यावीं लागतील. हीं दोन खातीं पूर्ण प्रातिनिधिक मंत्र्याचे हातीं दिलीं म्हणजे बाकीचीं खातीं आपोआप प्रातिनिधिक मंत्र्यांकडे येतात; देश स्वतंत्र होतो. केवळ सरकारी जमाखर्चाच्या दृष्टीनेंच हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिल्यावांचून ब्रिटनला चालू युद्धानंतर अन्य गति कशी नाहीं हें येथें पाहिलें आहे. या देशांत स्वातंत्र्यप्राप्तीची जी ईर्ष्या निर्माण झालेली दिसते तीमुळेंही परराज्य येथें अशक्य होईल असें म्हणतां येतें. मग 'युद्धोत्तरकाळांत स्वातंत्र्य देऊं' या क्रिप्स यांच्या आश्वासनाची गरज काय?

पण क्रिप्स यांचा प्रयत्न प्रामाणिक नव्हता. हिंदुस्थानला युद्धोत्तरकालांत जें स्वातंत्र्य देऊन टाकण्यावांचून सुटका नाहीं हें त्यांना पटलें तेंही शक्य तितकें खची करून, दुर्बळ करून, निरुपयोगी करून देण्याची त्यांची योजना होती. याचें मुख्य गमक हें होतें कीं, जे संस्थानिक अखिल हिंदुस्थानच्या संयुक्त घटनेंत सामील होणार नाहींत त्यांच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं हल्लींप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यसत्ता त्यांच्यावर राहावयाची होती. हे संस्थानिक ब्रिटिश हिंदुस्थानच्या लोकशाही कैचींत येण्याऐवजीं ब्रिटिश सैन्याच्या संरक्षणाखालीं राहायला केव्हांही खूष असणार हें उघडच आहे. अशा सर्व हिंदुस्थानांत गळवांप्रमाणें पसरलेल्या सहाशें संस्थानांत ब्रिटिश सैन्य व सत्ता विखुरलेली राहिली म्हणजे नवीनच जन्मास येणाऱ्या स्वतंत्र हिंदुस्थानास वाघापुढें बांधलेल्या कोंकरासारखें जीवन कंठावें लागणार. तसेंच ज्या प्रांतांना अखिल

भारतीय संयुक्त घटनेंत सामील व्हावयाचें नसेल त्यांना अलग राहतां येईल अशी लालूच दाखविण्यांत आली होती. असे प्रांत संस्थानांतील ब्रिटिश सैन्याच्या आश्रयाला गेल्यावांचून राहणार नाहींत. माझा क्रिप्स यांच्यावर खोडसाळ व वितंडात्मक आरोप करण्याचा हेतु नाहीं. इतिहास असा घडत असतो त्याला क्रिप्सचा तरी काय इलाज? जर्मनीनें आपल्या सैन्याच्या जोरावर युरोपांतील दुबळीं राष्ट्रें अशींच पादाक्रांत केलीं, आणि पूर्वी ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदुस्थान तुकड्यातुकड्यांनीं जिंकला व दुबळीं राज्यें वश करून घेतलीं, तें सर्व जबरदस्त सैन्याच्या जोरावरच केलें. सर्व देशभर सहाशें संस्थानांत पसरलेलीं ब्रिटिश सैन्यें ईस्ट इंडिआ कंपनीच्या या इतिहासाची पुनरावृत्ति केल्यावांचून राहणार नाहींत. हातून गेलेला हिंदुस्थान परत जिंकून घेण्याचा हा डाव आहे असे उद्गार नेहरूंनीं क्रिप्सयोजनेसंबंधानें जे काढले त्यांचा हा अर्थ होता. शिवाय सहाशें संस्थानांत म्हणजे दहा कोटि देशी प्रजेवर अनियंत्रित जुलूमशाही राहणारच होती. क्रिप्सयोजनेंत युद्धानंतर जें स्वातंत्र्य देण्यांत आलें होतें त्याचें स्वरूप याप्रमाणें विश्वासघाताचें होतें. हिंदुस्थान स्वतंत्र होणें हें, इतिहास सरळ घडूं दिला तर, क्रमप्राप्त होतें. या इतिहासक्रमास क्रिप्सयोजना हा अडथळा होता. क्रिप्स यांची युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याची योजना काँग्रेसनें कां धुडकावून लावली हें यावरून दिसून येईल.

* * *

पण खरोखर क्रिप्स यांनीं हिंदी प्रश्नास जें स्वरूप दिलें तें अगदीं चुकीचें व काँग्रेसवर दुष्ट हेतूचा आरोप करणारें होतें. युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याचें आश्वासन हिंदी लोकांना दिल्यास काँग्रेस व इतर पक्ष युद्धसहकार्य करतील अशी किप्स यांनीं अपेक्षा केली. 'स्वातंत्र्याचें आश्वासन द्या तर युद्धसहकार्य करतों' असा स्वातंत्र्याचा सौदा काँग्रेस करीत आहे असा याचा अर्थ होत होता. पण काँग्रेसची मनःस्थिति अशी सौद्याची नव्हती. युद्धाच्या अगदीं आरंभीं काँग्रेसची भूमिका असावी इतकी स्पष्ट झाली नव्हती हें खरें; पण जनतेला युद्धोत्सुकता वाटण्यासाठीं राज्यसत्तेबद्दल ममत्व वाटलें पाहिजे, आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण आपण करतों आहों अशी भावना जनतेची झाली पाहिजे, तरच जरूर तितका तीव्र युद्धप्रयत्न होऊन विजयाचा संभव निर्माण होईल असें काँग्रेसला वाटत होतें. चालू युद्ध हें भयंकर होणारें आहे, फॅसिस्ट राष्ट्रांची तयारी प्रचंड

असून संयुक्तराष्ट्रांची तयारी पुरेशी नाहीं, यामुळें जनतेनें युद्धप्रयत्न जिवापाड केला तरच विजय मिळेल ही भूमिका पं. नेहरूंची होती. फ्रान्सचा पाडाव झाल्यानंतर विजयाचा संभव जेव्हां बराच कमी झाला तेव्हां हिंदी जनतेवर राष्ट्ररक्षणाची जबाबदारी पुष्कळ मोठ्या प्रमाणावर पडणार आहे असें काँग्रेसला वाटलें व लोकांना राष्ट्ररक्षणासाठीं उत्साहित करण्याकरितां अखिल जनतेचें म्हणजेच राष्ट्रीय असें सरकार स्थापन व्हावें अशी मागणी काँग्रेसनें केली. तींत एक विशिष्ट अर्थ होता. 'स्वातंत्र्य द्या तर युद्धसहकार्य करतों' अशी सौदाची ही भाषा नव्हती, तर 'विजय मिळविण्यासाठीं लोकांत रणोत्साह निर्माण करणें जरूर आहे, आणि हा रणोत्साह स्वातंत्र्य मिळाल्यावांचून निर्माण होणार नाहीं, म्हणून राष्ट्रीय सरकार द्या' अशी ही मागणी होती. खरोखरच फ्रान्सच्या पाडावानंतर संयुक्त राष्ट्रांनीं युद्ध जिंकण्याचा संभवच कमी झाल्यानें युद्धोत्तरकालासंबंधींच्या आश्वासनाचें महत्त्वच कमी होऊन विजय कसा मिळवायचा याच प्रश्नास महत्त्व आलें.

* * *

मलाया, सिंगापूर ( आणि ब्रह्मदेश ) यांचा पाडाव होत गेला तसतसें याच एका प्रश्नाचें महत्त्व वाढत गेलें. या मुलुखांतील भांडवलदार, धनिक, जमीनदार व संस्थानिक यांनीं जपानच्या आक्रमणास मुळींच विरोध न करतां त्यापुढें मान तुकविली. सामान्य जनता युद्धाबद्दल तटस्थ राहिली इतकेंच नव्हे तर तिनें जपानला साहाय्य केलें. यापुढें जनतेला स्वदेशरक्षणाचा हुरूप नसेल तर परचक्राला आपलें आक्रमणकार्य सुलभतेनें करतां येईल आणि हिंदी जनतेला येथील ब्रिटिश सत्तेबद्दल ममत्व नसल्यानें व स्वदेशरक्षणाबद्दल हुरूप नसल्यानें येथेंही जपान मलायांतल्याप्रमाणें यशस्वी होईल ही भीति उत्पन्न झाली. पं. नेहरूंना ही भीति सर्वांत अधिक वाटल्यामुळें क्रिप्स यांनीं आणलेल्या योजनेंत थोडे फेरफार करून कांहीं तडजोड घडवावी व मध्यसत्ता हातीं घेऊन जनतेच्या अंगीं हुरूप आणावा अशी उताविळी त्यांना झाली होती. पण क्रिप्स यांनींच तडजोड होऊं दिली नाहीं. ही तडजोड कां होऊं शकली नाहीं यासंबंधानें अनेक भ्रम पसरले आहेत. काँग्रेसनें अहिंसेचा हट्ट धरला म्हणून तडजोड फिसकटली असा जो एक प्रवाद आहे तो साफ खोटा आहे. 'आम्ही राज्यसत्ता हातीं मिळाल्यास जपानला सशस्त्र प्रतिकार करणार

आहों' असें कॉंग्रेसनें जाहीर केलें होतें आणि क्रिप्सनाही कळविलें होतें. कॉंग्रेसच्या हातीं सत्ता गेल्यास कॉंग्रेस जपानशीं तह करील किंवा जपानला अनुकूल होईल अशीही भीति खाजगी रीतीनें व्यक्त करण्यांत आली होती, पण ती सचवही लटकी होती. पं. नेहरू हेच राष्ट्राचे पुढारी असून ते जपानशीं तडजोड कधींही करणार नाहींत हें सर्वांना माहीत होतें. वादाचा खरा मुद्दा सत्ता सोडायची कीं नाहीं हा होता. आणि ब्रिटननें सत्ता सोडण्याचें नाकारलें म्हणून समेट अशक्य झाला.

* * *

कॉंग्रेसची मागणी काय होती व ब्रिटननें ती कां नाकारली याची उपपत्ति आणखी थोडी स्पष्ट केली पाहिजे. कॉंग्रेसनें संरक्षणसत्ता मागितली याचा अर्थ सरसेनापति, सैन्य व युद्धकार्य यांवर पूर्ण ताबा मागितला असा नव्हे. पण युद्धमंत्र्याला पूर्ण विश्वासांत घेऊन सरसेनापतीनें युद्धकार्य करावें अशी ही मागणी होती. युद्धमंत्र्यानें सरसेनापतीच्या कारभारांत ढवळाढवळ करूं नये, पण एकादा सरसेनापति नालायक अथवा इतर कोणत्याही दृष्टीनें असमर्थ ठरल्यास, ऑस्ट्रेलियन पंतप्रधानानें ज्याप्रमाणें ब्रिटिश युद्धखात्याकडून युद्धकार्य काढून घेऊन अमेरिकन युद्धखात्याच्या हवालीं केलें तशी सत्ता हिंदी युद्धमंत्र्याला म्हणजेच मंत्रिमंडळाला असणें अवश्य आहे. याचें मुख्य कारण असें कीं हल्लींच्या युद्धयंत्रावर जनतेचा विश्वास नाहीं. राष्ट्रीय सरकारला आणखी अनेक पराभव खाऊनही जनतेचा दम टिकवावा लागेल. अशा वेळीं 'माझा युद्धयंत्रावर मुळींच ताबा नाहीं, पराभवांची जबाबदारी मजवर मुळींच नाहीं, तुम्ही मात्र हजारों, लाखोंनीं रणांगणावर मरायला चला' असें कोणाही युद्धमंत्र्यास जनतेसमोर येऊन सांगतां येणार नाहीं व जनता तें ऐकून घेणार नाहीं. दुसरी बाब नागरिक सैन्याची. नागरिक सैन्य अमर्याद प्रमाणांत उभारून अंतर्गत शांतता राखणें आणि रणांगणावर जरूर लागेल तेव्हां हवें तेवढें सैन्य नेहमीं तयार ठेवणें अवश्य होतें. पण नागरिक सैन्य किती उभारावें हें ठरविण्याचा अधिकार मंत्रिमंडळाचा नसून सरसेनापतीलाच राहील असें क्रिप्स यांनीं सांगितलें. नेहरूंनीं ही अट मान्य केली नाहीं.

* * *

तिसरी बाब पूर्ण जबाबदार आणि संयुक्तजबाबदारीच्या मंत्रिमंडळाची. कार्यकारी मंडळाचे सभासद व्हाइसरॉयनें निरनिराळ्या पक्षांतून नेमावे, ते व्यक्तिशः व्हाइसरॉयलाच जबाबदार असावे आणि व्हाइसरॉयचे जादा अधिकार व धुडकावणी-अधिकार ( पॉवर ऑफ व्हेटो ) कायम राहावे असा क्रिप्स यांचा हट्ट होता. कॅाँग्रेसची मागणी याबाबत अगदीं वेगळी होती. ती नीट समजून न घेतांच टीकाकारांनीं कॅाँग्रेसला दूषण दिलें आहे. पुण्यास राष्ट्रीय मंत्रिमंडळ मागण्याचा ठराव ऑ. इं. कॅाँग्रेस कमिटीनें केला त्यांत कायदेमंडळांतील लोकप्रतिनिधींना जबाबदार असें मंत्रिमंडळ बनवावें अशी मागणी केली होती. अर्थात् मध्यकायदेमंडळांतील निरनिराळ्या पक्षांच्या लोकनियुक्त सभासदांचेंच हें मंत्रिमंडळ बनलें असतें. त्याचा पुढारी व्हाइसरॉयनेंच निवडला असता खरा; पण नंतर त्याचे सर्व सहकारी त्या पुढाऱ्यानेंच निवडले असते, ते त्यांला जबाबदार राहिले असते व तें मंत्रिमंडळ संयुक्त जबाबदारीचें राहून मध्यकायदेमंडळाला जबाबदार राहिलें असतें. ब्रिटिश राजा जसा नामधारी आहे तसा व्हाइसरॉय राहिला असता. मध्यकायदेमंडळाचा विश्वास मंत्रिमंडळावर पुढें राहिला नसता तर तें मंत्रिमंडळ बदलावें लागलें असतें इतकेंच नव्हे, तर मंत्रिमंडळाच्या इच्छेनुसार जरूर तर फेरनिवडणुकीही कराव्या लागत्या.

* * *

युद्धकालांत एवढ्या घालमेली धोक्याच्या असतात खऱ्या. पण ऑस्ट्रेलियांत युद्धकाळामध्येंच निवडणुकी होऊन हल्लींचें मंत्रिमंडळ अधिकारावर आलें आहे आणि पंतप्रधान कर्टिन यांस हल्लीं विरोधी पक्ष त्रास देऊं लागला असल्यानें, तो नव्या निवडणुकी पुन्हा करून लोकमताचा पाठिंबा आपणांस आहे कीं नाहीं हें पाहण्याचा युद्धकालींच विचार करीत आहे. राज्यसंस्था जनतेच्या विश्वासाची नाहीं आणि त्यामुळें ती युद्धकार्याला अपात्र आहे असें एकदां ठरलें म्हणजे, ती राज्यसंस्था लोकांच्या विश्वासास पात्र करणें व त्यापायीं येणारे सर्व धोके पत्करणें हें युद्ध जिंकण्यासाठींच अवश्य ठरतें. यासाठीं हल्लींचा हिंदी राज्यघटनाकायदा आमूलाग्र मोडून टाकावा लागला असता खरा, पण जनतेच्या विश्वासाचें सरकार स्थापन झाल्याखेरीज युद्ध जिंकणें शक्य नाहीं अशी खात्री झाली तर केवढेही घटनात्मक बदल करणें

हें अवश्यच आहे. ब्रिटिश सरकारला चालू सरकारच युद्ध जिंकील अशी खात्री वाटत असल्यास त्यांनीं सत्तात्यागास संमति दिली नाहीं हें स्वाभाविक झालें असें वाटल्यास म्हणावें. अप्रातिनिधिक व बेजबाबदार असें हल्लींचें सरकार युद्ध जिंकण्यास अपात्र आहे असें काँग्रेसला वाटतें आणि जगांतील अनेक थोर विचारवंतांस वाटतें. अर्थात् काँग्रेसनें संपूर्ण सत्तेवांचून समेट करण्याचें नाकारलें हेंही योग्य झालें असें मानलें पाहिजे.

* * *

सरकारनें तडजोड कां नाकारली याबद्दल लोकांना जो संशय येतो तोही येथें सांगितला पाहिजे. युद्धकालांत जी संरक्षणसत्ता काँग्रेसनें मागितली होती ती तेवढी मिळाली व निकराचा युद्धप्रयत्न करून हिंदुस्थाननें जपानचा पाडाव केला तर त्या कारणासाठीं हिंदुस्थानचें कित्येक लक्ष सैन्य, शस्त्रास्त्रें वगैरे तेवढ्या मुदतींत निर्माण होतील. राष्ट्रीय एकजूट व जनतेची जागृति यांचें प्रमाण एवढें प्रचंड वाढेल कीं, हिंदु-मुसलमानांची दुही नाहींशी होऊन प्रांताप्रांतांतील तेढीही मावळतील. संस्थानांतील प्रजा इतकी जोरदार होईल कीं संस्थानिकांचें हात लटके पडतील आणि अशा प्रकारें युद्ध संपतां संपतांच हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होऊन युद्धोत्तरकालची क्रिप्सयोजना लादण्याच्या इंग्लंडच्या प्रयत्नास उधळून लावील. सारांश, जपानचा पाडाव करतांना स्वतांच्या हातांनीं आपलें साम्राज्य ब्रिटनला गमवावें लागेल या भीतीनें ब्रिटिश सरकारनें काँग्रेसशीं तडजोड करण्याचें नाकारलें. अंतर्गत एकजूट नाहीं वगैरे सर्व सबबी खोट्या होत्या. क्रिप्स येऊन गेल्यानंतर वातावरण तापत गेलें व आज काँग्रेस तुरुंगांत गेली आहे. युद्धाची परिस्थिति अधिकच बिघडली आहे. पण काँग्रेस व सरकार यांचे दरम्यान कोणताही नवा मुद्दा निर्माण झालेला नाहीं. हल्लींचें सरकार जनतेच्या विश्वासाचें नसल्यानें युद्धप्रयत्नांस नालायक आहे असें काँग्रेसला वाटतें. सरकारला काँग्रेसच्या साहाय्यावांचून आपण युद्ध जिंकूं व साम्राज्यही टिकवूं असें वाटतें. यांत कोणाचें तरी मत बदलल्याशिवाय अथवा एक दुसऱ्यास शरण गेल्याशिवाय हा पेचप्रसंग सुटणार नाहीं.

—समीक्षक, सप्टेंबर १९४२

# पाकिस्तान आणि मध्ययुरेशिअन मुसलमानी साम्राज्य : : ११

हिंदुस्थानचें राजकीय ऐक्य देशाच्या अफाटपणामुळें व पूर्वी दळणवळणाचीं साधनें अगदींच तुटपुंजीं असल्यानें इतिहास-काळांत कधीं फारसें टिकवितां आलेलें नाहीं. तथापि तें ऐक्य निर्माण करण्याचा व टिकविण्याचा हिय्या अशोकापासून अकबरापर्यंतच्या थोरथोर पुरुषांनीं केला आणि त्यासाठीं जिवापाड कष्टही केले. त्यांपैकीं कोणास कितीही यश आलें असो वा नसो, हिंदुस्थान—हें प्राचीन भरतखंड—एक, अखंड, एकजिनसी आहे ही कल्पना हिंदवासीयांनीं कधींच सोडलेली नाहीं. खंड म्हणजे 'कॉंटिनेंट' हा शब्द हल्लीं अनेक भिन्न, सुट्या, परस्पर-स्वतंत्र देशांचा समुदाय या अर्थानें वापरला जातो. पण प्राचीन हिंदी लोक तसा अर्थ खंड या शब्दाचा करीत नसावे. एक विस्तीर्ण देश एवढाच त्या शब्दाचा प्राचीन अर्थ दिसतो. भरत राजाच्या अमलाखालचा एक विस्तीर्ण देश तो हा भरत-खंड. अखिल हिंदुस्थान हा स्वदेश व त्याबाहेरचा तो परदेश ही कल्पना केवळ प्राचीन व अर्वाचीन हिंदूंचीच नव्हती तर मुसलमानांचीही तीच कल्पना होती. सिंधुपार (ट्रॅन्स-इंडस) व सिंधुपूर्व (सिस-इंडस) असे मुसलमानांचे दोन भेद करण्यांत येऊन सिंधुपार मुसलमानांचें साहाय्य सिंधुपूर्व मुसलमानांनीं येथील हिंदूंशीं अथवा

इतर कोणाशीं लढतांना घेऊं नये असें मत पानिपतकालीं अनेक मुसलमानांचें होतें. नजिबखानानें पेशव्यांवर सूड उगविण्यासाठीं सिंधुपार मुस्लिम सरदार जो अहमदशहा अब्दाली त्याची मदत मागितली ही चूक केली असें अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला याचें मत असल्याचें प्रसिद्ध आहे. मराठ्यांचें राज्य स्वतंत्र असून सुद्धां महादजीनें दिल्लीच्या मोगल बादशहाची गादी दिल्लीस जाऊन जी सांवरली ती या अखंड भारततत्त्वाच्याच कल्पनेनें. आगगाडी आणि तारायंत्र नसल्यानें अखंडराष्ट्रत्वास आवश्यक असें दळणवळण ज्या काळीं मुळींच नव्हतें त्या काळींही अखंडराष्ट्रत्वाची कल्पना शेंकडों वर्षें याप्रमाणें टिकून राहिली. पण आतां दळणवळणाचीं साधनें वाढलीं. हिंदुस्थानच नव्हे तर सारें जग एक होत आहे अशा वेळीं, या प्राचीन राष्ट्राच्या दुफळ्या, चिरफळ्या करण्याची कल्पना रूढ होत आहे, तेंच उच्च ध्येय असल्याचा प्रचार शिष्टांकडून केला जात आहे; हा खरोखर एक दुर्दैवी चमत्कार होय. जिना हे या भरतखंडाचे पाकिस्तान व हिंदुस्थान असे दोनच तुकडे करावे एवढेंच उघडपणें म्हणतात. पण हिंदुस्थानाचाही एक द्राविडिस्तान नांवाचा लचका निघावा अशी प्रेरणा अप्रत्यक्षपणें ते करीत आहेत. आणि त्यांच्या पाकिस्तानांतही पठाणिस्तान, सिंधीस्तान अशा फळ्या–चिरफळ्या करण्याच्या योजना येऊं लागल्या आहेत. राष्ट्राचें संघटित झालेलें बळ विस्कटून टाकून पारतंत्र्याचा नवा कालखंड निर्माण करण्याच्याच या योजना आहेत.

* * *

पण एखादी अवघड व अडचणीची बाब मुळीं अस्तित्वांतच नाहीं असा खोटा समज करून घेण्यानें त्या अडचणीचें निवारण न होतां ती निवारणें अधिक अवघड—अशक्य होत जातें हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. उदाहरणार्थ, पाकिस्तानची मागणी ज्या मुसलमानांतर्फें जिना करतात त्या मुसलमानांचें कांहीं गाऱ्हाणें असूंच शकत नाहीं असें मानणें हा वेडेपणा होय. कदाचित् हें गाऱ्हाणें अमक्याविरुद्ध आहे असें नेमकें सांगतां येत नसेल. कदाचित् अन्याय एकानें करावा आणि प्रायश्चित्त तिसऱ्यालाच मिळावें असें घडत असेल. स्वतःच चुका करून मुसलमान हे दुसऱ्यावर दातओठ खात असतील. वास्तविक या सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. हिंदूंनीं मुसलमानांवर अन्याय केला हेंही त्याबरोबरच खरें आहे आणि मुसलमानांनींही हिंदूंवर अन्याय

केला आहे. मुळांत या प्रकारचें जें दुःख अथवा दुखणें आहे त्याचें विकृत स्वरूप म्हणजे आजची पाकिस्तानची चळवळ होय. पाकिस्तानचा विषय क्षणभर अजीबात बाजूस ठेवून हें मुळांतलें दुखणें समजून घेतलें पाहिजे. इतिहासकाळांत हिंदुमुसलमान जसे लढले तसे ते एकजुटीनेंही वागले; परस्परांनीं परस्परांच्यावर अंमल गाजविला व एकमेकांवर राज्यें केलीं; परस्परांच्या मदतीनें स्वकीयांशींही लढाया केल्या; आणि या सर्व काळांत सर्वांनीं हिंदुस्थान ही आपली अखंड मायभूमि मानली होती. हिंदुस्थानांतले तीन-चतुर्थांशाहून अधिक मुसलमान हे मूळचे परदेशांतून आलेले मुसलमान नसून येथलेच हे लोक धर्मांतरानें मुसलमान झालेले आहेत. पण हिंदूंत जातिभेदाची भावना जितकी तीव्र आहे तितकी मूळचे परस्थ मुसलमान व येथले धर्मांतरित मुसलमान यांमध्यें नव्हती. यामुळें धर्मांतरित मुसलमानांना त्यांच्या नव्या धर्माचा व जातीचा अभिमान वाटत आला आहे. बाबर, अकबर, शहाजहान, औरंगजेब यांसारखे पराक्रमी राजे व बादशहा मुसलमानांत झाले यामुळें स्वाभाविकच मुसलमानांना स्वधर्म व प्राचीन स्ववैभव यांचा अभिमान वाटतो. पण खुद्द मोगल साम्राज्यांत या मुसलमानांची स्थिति कधींच चांगली नव्हती. गेलीं शेंकडों वर्षें उच्च वर्णीय हिंदु हे व्यापार व उद्योगधंदे यांत अग्रेसर असून मोगल अमलांत दिवाणी खात्यांत व लष्करांतही हिंदूंचा भरणा मोठा होता. सरकारी महसूल गोळा करणें हें काम बहुतेक त्यांच्याच हातीं होतें. मुसलमान हे मुख्यतः सरदार व लष्करी सेनापति असत. कांहीं सैनिक असत; आणि बाकी मग एकदम सगळे दरिद्री शेतकरी, साळी, कोळी व इतर हलके धंदे करणारे असत. हिंदुस्थान इंग्रजांनीं हिंदूंपासून घेतलें कीं मुसलमानांपासून घेतलें याबद्दल इतिहास-पंडितांत वाद चालतो. त्यांत दोन्ही पक्षीं लक्षांत न घेतलेला मुद्दा हा कीं, मोगल राज्यांतले दिवाणी अधिकारी व वसूली-कामगार जे बहुतेक हिंदु होते ते ब्रिटिशांना वश झाले. यामुळें बंगाल सर करणें ब्रिटिशांना सोपें गेलें. ब्रिटिशांनीं, सत्ता घेतांच, मुसलमान सरदार व लष्करी अमलदार यांना नामोहरम केलें. कॉर्नवॉलिसनें मोगल अमलांतील जमीनमहसूल-अमलदारांना—जे बहुतेक हिंदु होते—कायमधारा ठरवून जमीनदार बनविलें. हा कायमधारा फारच माफक ठरविण्यांत आला आणि जमीनदारानें शेतकऱ्याला किती पिळावें व कसें वागवावें यासंबंधानें मात्र कांहींच धरबंध घातला

नाहीं. त्यानंतर शेतकरी-रक्षणाचे कायदे झाले, पण आज दीडशें वर्षांनंतर रयतवारी प्रांतांत शेतकऱ्यांना जेवढें संरक्षण मिळालें आहे त्याच्या अल्पांशही संरक्षण बंगालच्या दरिद्री शेतकऱ्यांना मिळालें नाहीं. म्हणून बंगालमध्यें जातीय वादाच्या बुडाशीं हिंदु जमीनदार, सावकार, दुकानदार, कारखानदार, —विरुद्ध दरिद्री मुसलमान शेतकरी ही भूमिका बहुधा नेहमींच असते.

* * *

सत्तावन्नच्या बंडांत हिंदु-मुसलमान ब्रिटिशांविरुद्ध एकजुटीनें लढले खरे; पण ब्रिटिशांनीं पराभव करून जिवंत ठेवलेले जे अनेक हिंदु राजे व हिंदु व्यापारी आणि धनिक वर्ग त्यांनीं ब्रिटिशांना विरोध केला नाहीं, शक्य तेवढें साहाय्यच केलें. बंडानंतर बरींच वर्षे मुसलमानांना सैन्यांत अथवा इतर दिवाणी खात्यांत अतिशय कमी नोकऱ्या मिळत. पुढें हिंदूंत राजकीय जागृति होऊन ते राजकीय सत्तेसाठीं ब्रिटिशांशीं झगडूं लागले तेव्हां हिंदूंना विरोध करतां यावा म्हणून ब्रिटिशांनीं मुसलमानांना जवळ केलें. पण बहुसंख्य मुसलमान अ-जागृत आणि अशिक्षित असून कमालीचे दरिद्री होते. त्यांना ब्रिटिशांचें कपट कळणें शक्य नव्हतें. कांहीं थोडे सुशिक्षित अथवा सरंजामी मुसलमान होते ते स्वार्थबुद्धीनें ब्रिटिशांना सामील होऊन काँग्रेसला विरोध करूं लागले. पण काँग्रेसमध्यें वर्चस्वशाली असलेल्या हिंदूंनीं मुसलमानी सामान्य जनतेंत जागृति करून त्यांना काँग्रेसमध्यें घेण्याचा प्रयत्न फारसा कधींच केला नाहीं. असा प्रयत्न करणें म्हणजे जनतेच्या दारिद्र्यनाशाच्या प्रयत्नास हात घालणेंच होतें. त्यामुळें दरिद्री हिंदु व दरिद्री मुसलमान यांचा कलह धनिक व हक्कदार हिंदुमुसलमानांशीं झाला असता. काँग्रेमसधील वरिष्ठ वर्गीय हिंदूंना हें इष्ट न वाटल्यानें त्यांनीं फक्त वरिष्ठ वर्गीय मुसलमानांना वश करण्याचा नेहमीं प्रयत्न केला. याचा परिणाम एवढाच झाला कीं या वरिष्ठ वर्गीय मुसलमानांची खुशामत करण्याची चढाओढ सरकार व काँग्रेस यांचेमध्यें लागून त्यांत सरकार नेहमींच यशस्वी झालें. मुसलमान बहुसंख्य जनतेच्या पाठिंब्याबाबत काँग्रेस अजूनही बेफिकीर आहे. अगदीं साध्या गोष्टींतही काँग्रेसवर हिंदुधर्माचा छाप दिसतो. 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत संस्कृत आहे. काँग्रेसचा अध्यक्ष मुसलमान असला तरी त्याला कुंकुमतिलक लावून ओवाळण्यांत येतें. वैयक्तिक सत्याग्रह सुरू करतांना राजेंद्रबाबूंनीं

'दसऱ्याचे सुमुहूर्तावर आम्ही दिग्विजयास निघणार' अशी घोषणा केली. गांधी हे जे काँग्रेसचे पुढारी त्यांची प्रार्थना ही आतां राष्ट्रीय स्वरूप पावली असतांही तिचा देखावा पूर्ण हिंदुधर्मीय आहे. वेळीं अवेळीं आपला हिंदुधर्माचा अभिमान ते ठासून सांगत असतात आणि काँग्रेसवर त्यांचें वर्चस्व असल्यानें काँग्रेसवरही हिंदुत्वाचा आरोप येतो.

* * *

मुसलमानांच्या गाऱ्हाण्याचें अथवा दुःखाचें हें जें स्वरूप रेखाटलें आहे तें फक्त मुसलमानांचेंच आहे असें मात्र नव्हे. महाराष्ट्रांत ज्या मराठ्यांनीं तरवारबहादुरी केली त्यांची परिस्थिति पेशव्यांच्या काळांत अंशतः आणि ब्रिटिश अमलाखालीं फार मोठ्या प्रमाणांत अशीच झाली. पांच कोटि अस्पृश्य समाजाला हिंदुसमाजांत साध्या माणुसकीचेही हक्क नाहींत. रजपुतांच्या आजच्या सर्व संस्थानांत प्राचीन शूरांचे वंशजलोक कर्तृत्वशून्य असे लाकडाचे ओंडेच बनले आहेत. अखिल हिंदुस्थानांतील बहुसंख्य समाजाची अवस्था हीच आहे पण हिंदूंतील अल्पसंख्य धनिकांच्या हातीं समाजांतील आर्थिक सत्ता बऱ्याच प्रमाणांत असून, मध्यम सुशिक्षित वर्ग मुसलमानांपेक्षां हिंदूंत बराच अधिक आहे. राजकीय दृष्टया हा वर्ग विशेष जागृत आहे. हे सर्व ब्रिटिश सत्तेस विरोध करतात व त्या कामीं हिंदुजनतेचा पाठिंबा ते घेतात; यामुळें काँग्रेसच्या राजकीय चळवळीस हिंदु चळवळीचें स्वरूप येतें. हिंदु व मुसलमान यांचे दरम्यान सांस्कृतिक भिन्नता आहे, हीं दोन पृथक् राष्ट्रें आहेत, हें जिनांचें म्हणणें मुळींच खरें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, हिंदु संस्कृति आणि मुसलमान संस्कृति अशा दोन संस्कृति आहेत हें म्हणणेंच खरें नाहीं. मुसलमानांत शिया, सुनी वगैरे अनेक पंथ असून त्यांचें भरपूर वैर आहे. हिंदूंत ब्राह्मण, मराठे, कुणबी, धनगर, तेली, माळी, साळी, अस्पृश्यांत महार, चांभार, मांग, धेड, भंगी वगैरे जितक्या अनेक जाति तितके कमीअधिक भिन्न पूजाप्रकार असून त्यांतही बारीक भेद आहेत. सर्व थोर धर्मांच्या अनुयायांना मूळ धर्मतत्त्वांचा विसर पडत असून, त्यांचीं विकृत रूपें तेवढींच त्यांच्यापाशीं असतात. आधुनिक लौकिक व्यवहारांत धर्माचें उच्चाटनही होत असून, आतां दरिद्री आणि श्रीमंत हेच भेद उरत आहेत. आणि या फरकामुळें उत्पन्न झालेले संस्कृतिभेदच महत्त्व पावत आहेत. सारांश, हिंदु-मुसलमान असा जो

एक वाद या देशांत आहे तो वाद बिनबुडाचा आहे हें म्हणणें खरें नाहीं. तो ऐतिहासिक परिस्थितींत रुजला व वाढला आहे. आज त्याचें स्वरूप थोडें-फार बदललें आहे. पण हिंदु-मुसलमान एवढाच हा वाद नाहीं. तत्त्वतः हिंदूंतील अनेक जाति, मुसलमानांतील अनेक पंथ आणि सांपत्तिक परिस्थितींतील सार्वत्रिक विषमता व राजकीय जागृतींतील सार्वत्रिक कमी-अधिकपणा इत्यादि कारणांमुळें या देशांतील एकंदर समाजघटना जीर्ण झालेल्या वस्त्राप्रमाणें जागोजाग विरली आहे. ही फूट राज्यकर्त्यांना सोइस्कर असून तूर्त त्यांच्या उपयोगासाठीं त्यांनीं या फुटीला हिंदु-मुसलमानभेदाचें स्वरूप दिलें आहे. महाराष्ट्रांत यापूर्वीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद सरकारनें प्रोत्साहित केला होता आणि मुसलमानांचें सावज हातचें गेल्यास स्पृश्यास्पृश्य वादळ माजवून सरकार आंबेडकरांचा 'जिना' बनवूं इच्छीत आहे हें सूक्ष्मपणें पाहिलें असतां कळून येतें.

* *

अंतर्गत फुटीची ही वस्तुस्थिति खरी आहे आणि परकी सरकार तिचा फायदा घेतें हें लक्षांत घेऊन तिजवर इलाज करणें हें येथील लोकधुरीणांचें कर्तव्य ठरतें. पण असलेली अडचण नाहींच म्हणणारे असे कांहीं आत्मसंतुष्ट लोक आहेत त्याप्रमाणें ती अडचण निवारण्याचे अगदीं सोपे उपाय शोधून काढून त्यानें ती अडचण निवारली जाईल अशी आत्मवंचना करणारे लोकही येथें आहेत. सावरकर हे अशांपैकीं एक होते. लोकशाहीवर त्यांचा फारसा विश्वास नसावा. कारण हिंदु संस्थानिकांच्या अनियंत्रित सत्तेविरुद्ध चालणाऱ्या झगड्यास त्यांचा नेहमीं विरोध असतो. पण मुसलमानांना मात्र ते लोकशाहीचे घोट नेहमीं पाजीत असतात. त्यांच्या मतें एका माणसाला एक मत दिलें आणि बहुमताचा राज्यकारभार स्थापला कीं लोकशाही झाली; आणि लोकशाहींत ज्या अर्थीं अन्याय होत नाहीं असें मानण्यांत येतें त्या अर्थीं मुसलमानांना अधिक कांहींही देण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदुसभेच्या थोर पुढाऱ्यांपासून लहान कार्यकर्त्यांपर्यंत लोकशाहीसंबंधानें हाच ढोबळ समज आहे व तो सर्वस्वी चुकीचा आहे. नुसतेंच बहुमताचें राज्य म्हणजे लोकशाही नव्हे. 'बहुमतानें ठरलेल्या निर्णयास आम्ही मान्यता देऊं' अशी संमति समाजांतील अल्पसंख्यांनींही द्यावी लागते. अल्पमताचा संभाळ करण्याची

जबाबदारी बहुमतावर असते. अल्पमताचे वर्ग असंतुष्ट असतील तर त्यांच्या साहाय्यानेंच परचक्र येतें आणि अल्पमत हें संख्येनें अल्प असलें तरी त्यांच्यांत बहुमती वर्गाबद्दल तेढ असेल तर त्याविरुद्ध लढण्यासाठीं ते युद्धसामर्थ्य कमावतात आणि त्यामुळें अल्पमतवाले बहुमतास भारीही होतात. लोकशाही-प्रधान राज्यघटना तयार करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांनीं हे धोके व या जबाबदाऱ्या लक्षांत घेऊन अल्पमतवाल्यांच्या संरक्षणाचे अनेक उपाय योजले आहेत. उदाहरणार्थ, राज्यघटनेच्या मूलतत्त्वांसंबंधींचे जे निर्णय ते फक्त ५१ टक्के बहुमतानें ठरविण्यांत येत नाहींत. कायदे-मंडळांतील तीन-चतुर्थांश अथवा चार-पंचमांश बहुमतानें असे निर्णय ठरवितात. कांहीं बाबी कायदेमंडळाच्या निर्णयावर न सोपवितां खास मतदारांच्या निर्णयावरच सोपवितात. हिंदु अथवा मुसलमान समाजासंबंधानें एकादा कायदा करावयाचा असल्यास प्रथम त्या समाजाचें मत अजमावल्यावांचून व त्याची संमति मिळविल्या-वांचून सदर निर्णय कायम होत नाहीं. अल्पमतवाल्यांचे सर्वच प्रतिनिधि बहुमतवाल्यांपुढें पराभव पावून कायदेमंडळांत अल्पमताचे प्रतिनिधि निवड-लेच जाणार नाहींत हा संभव टाळण्यासाठीं एकाच उमेदवारासाठीं अनेक मतें देण्याचा अधिकार एका मतदारास देणें यासारखे उपाय योजले जातात. आणि अखेर अल्पसंख्य व बहुसंख्य यांचीं संयुक्त मंत्रिमंडळें बनवून अल्प-संख्यांना राज्यकारभारांत भागीही देतात. लोकशाहींत अल्पसंख्यांच्या या प्रश्नास इतकें प्रचंड महत्त्व आहे कीं बहुसंख्यांच्या निर्णयाप्रमाणें राज्यकारभार चालविण्याचा हक्क अजीबात सोडून देऊन अल्पसंख्यांचा ज्यास्तींत जास्त पाठिंबा कोणत्याही योजनेस मिळविणें हेंच बहुमताचें कर्तव्य हल्लींच्या लोकशाहींत मानलें जातें. लोकशाहीचें खरें बळ या दृष्टिकोनांतच असतें. 'एका माणसास एक मत' या शब्दसमुच्चयांत लोकशाहीचें सार आणणें हा शुद्ध मूर्खपणा आहे.

* * *

अल्पसंख्यांचें समाधान करण्याचे वरील व इतर प्रकारचे सर्व इलाज वापरणें व त्यांचे समाधान मिळविणें हें बहुमताचें कर्तव्यच आहे. खरोखर हिंदु व मुसलमान या दोन्ही समाजांतील अंतर्गत जातिभेद, संस्कृतिभेद व आर्थिक परिस्थितिभेद या सर्व गोष्टींचा विचार केला असतां जात, धर्म अथवा इतर

कोणत्या बाबतींत कोणताच एक वर्ग बहुसंख्य आहे असें मानतां येणार नाहीं. ब्राह्मण, मराठे, कुणबी, तेली, साळी, वाणी, महार, चांभार, मांग, धेड, शिया, सुनी, शीख वगैरे निरनिराळ्या जाति, धर्म, वर्ग जे कोणी असतील ते सर्व आपापल्यापरी अल्पसंख्यच आहेत. सर्व समाज हिंदु व मुसलमान यांचा बनला आहे हें म्हणणें खरें नसून एका जुन्या वाक्प्रचाराप्रमाणें 'अठरा पगड जातींचा हा समाज' बनला आहे असें म्हणावें लागेल. वेगळ्या भाषेंत सांगावयाचें तर हिंदु समाजांत जातिभेद हा दोष आहे तसा हिंदी समाजांत हिंदुमुसलमान वाद हा एक जातिभेदासारखाच दोष आहे असें मानलें पाहिजे. रजपूत, मराठे, शीख, ब्राह्मण या सर्वांनीं राज्यें केलीं तशींच मुसलमानांनींही केलीं. पण मराठे व रजपूत हे जसे भिन्न राष्ट्रें नव्हत, तशींच हिंदु व मुसलमान हीं भिन्न राष्ट्रें नव्हत. देशांतील या अनेक जातींना राज्यसंस्थेकडून कांहीं ना कांहीं संरक्षण, साहाय्य, सवलती, हक्क व पुरस्कार देणें अवश्य आहे व त्या धोरणानेंच लोकशाही घटना बनवावी लागेल. केवळ एका माणसास एक मत असें ठरवून बहुमताचा निर्णय मान्य करण्याचें ठरविल्यास अल्पमतास अन्याय होऊन यादवी माजेल अथवा अनेक पंथ व गट पडून सगळेच अल्पमतवाले ठरतील आणि राज्यकारभारांत बहुमतवाला पक्षच निर्माण न झाल्यानें अनवस्था प्रसंग येईल.

* * *

हिंदुस्थानांतील अनेक जाति व अनेक पंथ यांपैकीं संघटित असें कोणीही नाहींत व श्रीमंत आणि गरीब हे जे नवीनच अस्तित्वांत येऊं लागलेले वर्ग ते अजून संघटित झालेले नाहींत. यामुळें येथें बहुसंख्य विरुद्ध अल्पसंख्य अशी यादवी माजण्याचा संभव नसून अनेक लहानलहान गटांत बजबजपुरी माजण्याचा संभव विशेष आहे. अशा वेळीं कर्तबगार, संधिसाधु, नीतिअनीतीस झुगारून देऊन मिळेल तें साधन वापरणारा माणूस अथवा गट समाजाच्या अनेक दुःखांच्या तारा छेडून समाजास झुलवितो व अनियंत्रित राज्यसत्ता जिंकतो. जगांतील सर्व जुलमी राज्यकर्त्यांच्या सत्ताप्राप्तीची हीच संधि व हेंच तंत्र असतें. जिनांनीं आज महत्त्वाकांक्षा धरली आहे ती या प्रकारची आहे. मीं वर म्हटलेंच आहे कीं मुसलमानांचें गाऱ्हाणेंच नाहीं असें म्हणणें खरें नव्हे. कॉंग्रेसपुढाऱ्यांनीं कॉंग्रेसवर चढणारा धार्मिक रंग पार धुऊन काढ-

लाच पाहिजे. केवळ बहुमताचा निर्णय मान्य न करतां अल्पमतवाल्यांच
अडचणी समजून घेऊन त्यांच्या निवारणासाठीं विशेष सवलती, साहाय्य वै
दिलें पाहिजे. पण तें केवळ मुसलमानांनाच नव्हे तर हिंदूंतीलही अनेक जातीं
दिलें पाहिजे. अस्पृश्यांना सर्वांपेक्षां अधिक दिलें पाहिजे. बहुसंख
अल्पसंख्य असा हा खरा प्रश्न नसून देशांत अनेक जाति आहेत, त्या सर्वां
राजकीय ध्येय व राजकीय हित एक आहे, पण सामाजिक व सांस्कृति
हितसंबंध वेगवेगळे असून त्यांची वेगवेगळीं तरतूद केली पाहिजे असें
प्रश्नांचें स्वरूप आहे. पण याच परिस्थितींतील फुटीरपणामुळें आले
जी सामाजिक दुर्बलता तिची संधि जिना घेत आहेत. मुसलमानांचें हिं
स्थानांत एका काळीं साम्राज्य होतें त्याची आठवण मुसलमानांना दे
त्यांच्या साम्राज्याभिमानाच्या सतारीवर आपलें पाकिस्तानचें गाणें जि
वाजवीत आहेत. वर अल्पसंख्यांना राज्यघटनेचे द्वारा संरक्षण देण्य
जे अनेक मार्ग म्हणून उल्लेखिले ते सर्व जर निरुपयोगी ठरले अथवा त्यापे
अल्पसंख्यांचा सलग मुलूख असेल तर तो तोडून त्यांना सलग प्रांत बनव
देणें शक्य झालें तर तें योग्य ठरेल. सोव्हिअट रशियांत अशा अल्पसं
जमातींचीं पोटराज्यें निर्माण करण्यांत आलीं आहेत. तसें जिनांना पाकिस्त
हवें असतें व देणें शक्य असतें तर तें देणें इष्टही ठरलें असतें. पण पाकिस्त
म्हणून जे मुलूख जिना तोडून मागत आहेत त्यांच्या चतुःसीमा कशा
आंखल्या तरी २५ ते ४० टक्के हिंदु त्या मुलुखांत राहतातच. ते शहरांत
खेड्यांत सर्वत्र सर्व व्यवहारांत शेंकडों वर्षें पिढ्यानुपिढ्या आहेत. आणि हि
स्थान म्हणून जो मुलूख उरतो त्यांतही दीड दोन कोटि मुसलमान राहतात
शिवाय जिनांना पाकिस्तान व हिंदुस्थान असें एका राज्यसत्तेचे दोन घ
बनायला हवेत असें नसून अनेक पृथक् व स्वतंत्र राज्यें बनवायचीं आहे
त्यांच्या पोटांत अल्पसंख्य गटांना असंतोष राहीलच. आणि या निरनिराळ
राष्ट्रांचीं सैन्यें एकमेकांपुढें शस्त्रास्त्रें घेऊन उभीं राहतील. आणि साऱ्या हिं
स्थानाला रणांगणाचें स्वरूप येईल. असा जिनांच्या मागणीचा फलितार्थ अ

* * *

जिनांना अथवा दुसऱ्या कोणा मुसलमानी हिटलरला मुसलमानी साम्रा
चें पुनरुज्जीवन करायचें असून त्या धोरणानें हें पाकिस्तानचें राजका

चाललें आहे. नकाशावर नजर टाकल्यास युरोप व आशिया यांचें दरम्यान ईजित, इराक, सीरिया, पॅलेस्टाइन, अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान इत्यादि अनेक मुसलमानी राष्ट्रांचा प्रचंड सलग मुलूख दृष्टीस पडतो. यांतील प्रत्येक राष्ट्रांत जितकी मुसलमान लोकसंख्या आहे त्यापेक्षां अधिक लोकसंख्या हिंदुस्थानांत असून उत्तर हिंदुस्थानांत पाकिस्तान म्हणून पंजाब, सिंध, सरहद्द व व बंगाल येथें जीं एक अथवा अनेक मुसलमान राज्यें स्थापायचीं त्यासुद्धां सर्व मुसलमान राष्ट्रांचा हा सर्व मुलूख एकत्र केला तर फार प्रचंड होतो. पंजाब व बंगाल यांचीं पाकिस्तानें बनविल्यावर पंजाब व बंगाल या दोन पाकिस्तानांना जोडणारा लांब पट्ट्याचा मुलूखही ( कॉरिडोर ) जिना मागत आहेत. हा जोडणारा पट्टा म्हणजे गंगा, यमुना या नद्या व उत्तर यमुनेचा कांहीं पश्चिम भाग असा होत असून, याचे उत्तरेकडचा व पूर्वेकडचा सगळा प्रदेश हळूहळू हिटलरच्या पद्धतीनें पाकिस्तानांत जमा होणार हें उघड आहे. पुढें सर्व मुसलमानी राष्ट्रांच्या एकीकरणाची धामधूम उठेल. आणि ज्यांत इराक व इराण येथील जगप्रसिद्ध तेलाच्या खाणी आहेत, ज्यांत नाइल, टैग्रिस, युफ्रेटिस, सिंधु या नद्या आहेत, ज्यांत ईजित, सुएझ, सीरिया, इराक, पॅलेस्टाइन, अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान बलुचिस्तान, सिंध, सरहद्द, पंजाब, काश्मीर, सं. प्रांत आसाम, बंगाल एवढा प्रचंड मुलूख आहे, ज्यांत गंगा, यमुना या प्रचंड नद्यांखालचा सुपीक प्रदेश आहे, तो सर्व मुलूख महंमदाच्या अनुयायांचें अखंड एक राष्ट्र बनेल. युरोप व आशिया या जोडखंडास युरेशिया म्हणतात. म्हणून या मुसलमान साम्राज्यास मध्ययुरेशियन साम्राज्य म्हणतां येईल. मग त्यांत सहजच बाकीचें हिंदुस्थान, रशियाचा कांहीं भाग, युरोपचा कांहीं भाग, असे हळूहळू सामील करण्यांत येतील. हिटलरच्या कल्पनेपेक्षांही हें सारें भव्य दिसतें आणि जिनासारखा पुरुष हा खरा विश्वकर्मा ब्रह्मदेव असला पाहिजे असें क्षणभर वाटतें.

* * *

पण हें घडविण्याइतका दम जिनांत मुळींच नाहीं. मोर नाचतो तसें नाचून लांडोर आपली फजीती करून घेते त्यांतला हा प्रकार आहे. हिटलरची नक्कल करण्याचा जिनांचा मूळचा हेतु असला तरी अखेर रशियाच्या झारचीच ती नक्कल होणार आहे. ज्या समाजांत कांहीं थोडे लोक सुखी, गबर व बेफिकीर

असून एकंदर बहुसंख्य समाज दरिद्री, मागसलेला आणि क्षुब्ध होण्याच्या मार्गावर असतो त्या समाजाचें भवितव्य दोनपैकीं एक मार्ग अनुसरतें. एकंदर समाजाला चतकोर भाकर अधिक मिळावी, पण वरिष्ठ वर्गाचा खिसा कापला न जातां तो अधिक भरावा यासाठीं साम्राज्यवर्धन करणें हा एक मार्ग असतो; आणि तें अशक्य झालें तर बहुसंख्य समाज वरिष्ठ वर्गास वरिष्ठ पदावरून खेचून खालीं पाडतो, समाजक्रांति करतो व आपल्या प्रगतीचा मार्ग आपल्या मनगटानें बांधतो. रशियाचा झार साम्राज्य वाढविण्यासाठींच [illegible] होऊन साम्राज्य वाढणें अशक्य झालें व तेथल्या जनतेनें झार व सरंजामदार यांस उलथून टाकून आपल्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला. हिंदुस्थानांतील वरिष्ठ वर्गापुढें आज हाच प्रसंग आहे. मोगल राज्यांतील मुसलमानी अवशेष व ब्रिटिशांनीं पोसून वाढविलेले कांहीं बडे मुसलमान संस्थानिक, अमीर वगैरे असून हिंदु संस्थानिक व जमीनदार तर खूपच आहेत. या सर्वांपुढें हाच प्रश्न आहे. रशियाच्या झारला परराष्ट्रांपासून संरक्षण व साहाय्य अप्रत्यक्ष-पणें घ्यावें लागे. येथील हे हक्कदार इंग्रजांचे अंकित व इंग्रजांनींच संरक्षिलेले आहेत. पण दिवसानुदिवस ब्रिटिश सत्ता दुर्बल झाली व जनतेचा जोर वाढला हें यांना दिसतें आहे. यामुळें केवळ ब्रिटिशांचें संरक्षण यांना अपुरें वाटत असून लोकांवर दाब ठेवणारा एकादा पुढारी यांना त्यांचें रक्षण करण्यासाठीं हवा आहे. हिंदूंत असा पुढारी मिळत नाहीं, कारण हिंदु भांडवलदारांचें ब्रिटनशींच वितुष्ट आलें असून, जनताच ब्रिटनविरोधी होत आहे. मुसलमान समाज अ-जागृत असून त्यांत उद्योगधंदेवाला वर्ग व सुशिक्षित मध्यम वर्ग हे फारसे नाहींत. यामुळें राजकारणाचें सूक्ष्म स्वरूप मुसलमानांना कळत नाहीं आणि त्यांच्या प्राचीन राज्यकर्तृत्वाच्या स्वाभिमानास चिडवून स्वतंत्र मुसल-मानी स्वराज्याची व साम्राज्याची आकांक्षा जिना हे त्यांच्यांत चेतवितात. पण असें करतांना हिंदुमुसलमान संस्थानिक, अमीर, जमीनदार व इतर हक्क-दार यांच्या मिराशीस धक्का लावण्याची गोष्टही जिना बोलत नाहींत. हें वर्तन हिटलरसारखें नसून झारसारखें आहे. हिटलरनें सर्व वरिष्ठ वर्गाविरुद्ध जनतेला चेतवून दिलें होतें व युद्धाच्या गरजेनुसार खरोखरच त्यानें वरिष्ठ वर्गाला नामो-हरम करून कनिष्ठ वर्गाचा संतोष करण्याचा प्रयत्न केला आहे. उलट झारनें

वरिष्ठ वर्गांना कवटाळून त्यांना टिकविण्याचा प्रयत्न केला व शेवटीं त्यांच्याबरोबर स्वतःही तो रसातळास गेला. जिनांना मुख्यतः क्रांतिकारक शक्ति दडपून टाकून सरंजामशाही टिकवायची आहे व मुसलमानांना झुलविण्यासाठीं साम्राज्य वाढवावयाचें आहे. पण हिटलरप्रमाणें त्यांची भिस्त स्वतांवर नसून ब्रिटिशांवर आहे. युद्ध संपेपर्यंत ब्रिटिशांनीं सत्ता सोडूं नये, मुस्लिम लीगला हातीं धरून येथील सत्ता चालवावी आणि येथील सरंजामशाही टिकविण्यास मुस्लिम लीगला मदत करावी असें त्यांचें म्हणणें दिसतें. त्यांतल्या त्यांत [illegible] चालू युद्धकालांत व नंतर रुजवांत आणि पसरींत जावें असें त्यांचें एकंदर धोरण आहे.

* * *

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मार्गांत—विशेषतः युद्ध चालू असतांच राष्ट्रीय सरकार निर्मिण्याच्या मार्गांत—जिनांच्या या धोरणानें अडथळा आणला आहे. यामुळें सर्व विचारवंतांचें लक्ष त्याकडे लागलें आहे. 'पाकिस्तानचें तत्त्व तूर्त मान्य करा मग तपशीलाचा विचार करूं, सध्यां राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याच्या योजनेंत जिनांना गुंतवून घेऊं' असा मानभावी अथवा भोळा उपदेश पुष्कळ लोक करीत आहेत. पण ही गोष्ट इतकी सोपी नाहीं. वायव्य आणि पूर्व सरहद्दीवर पाकिस्तान निर्मिण्यासाठीं सगळ्या हिंदुस्थानांतील मुसलमानांचें मतदान घ्यावें, पण भावी पाकिस्तानांतील मुसलमानेतरांचें मत मागूं नये ही जिनांची अट आहे. साध्या स्वाभिमानाच्या दृष्टीनेंही ही अट कोणी मानणें शक्य नाहीं. पण ही अट कबूल करूनही राष्ट्रीय सरकारांत जिनांना घेतलें तर ज्या योगें भावीकालांत पाकिस्तान बनणें अशक्य होईल अशा पद्धतीनें युद्धप्रयत्न करण्यास जिना तयार नाहींत. युद्ध हा उद्योग असा असतो कीं, राष्ट्र हें एकजूट व एकजीव बनवूनच तो करावा लागतो. हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान असे पृथक् मुलूख व पृथक् राष्ट्रें अस्तित्वांत नाहींतच. युद्धासारखा सर्व राष्ट्राची सर्व शक्ति एका कढईत वितळून व एका मुशींत घडवून टाकणारा उद्योग यशस्वीपणें सिद्धीस जाईल त्या वेळीं हिंदुस्थान व पाकिस्तान अशी या मूळच्या अखंड देशाची फाळणी करण्याची कल्पनाही ठार मरून जाईल. जिनांना हा धोका दिसतो आहे. म्हणून एकजुटीच्या

लाच पाहिजे. केवळ बहुमताचा निर्णय मान्य न करतां अल्पमतवाल्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्या निवारणासाठीं विशेष सवलती, साहाय्य वगैरे दिलें पाहिजे. पण तें केवळ मुसलमानांनाच नव्हे तर हिंदूंतीलही अनेक जातींना दिलें पाहिजे. अस्पृश्यांना सर्वांपेक्षां अधिक दिलें पाहिजे. बहुसंख्य-अल्पसंख्य असा हा खरा प्रश्न नसून देशांत अनेक जाति आहेत, त्या सर्वांचें राजकीय ध्येय व राजकीय हित एक आहे, पण सामाजिक व सांस्कृतिक हितसंबंध वेगवेगळे असून त्यांची वेगवेगळीं तरतूद केली पाहिजे असें या प्रश्नांचें स्वरूप आहे. पण याच परिस्थितींतील फुटीरपणामुळें आलेली जी सामाजिक दुर्बलता तिची संधि जिना घेत आहेत. मुसलमानांचें हिंदुस्थानांत एका काळीं साम्राज्य होतें त्याची आठवण मुसलमानांना देऊन त्यांच्या साम्राज्याभिमानाच्या सतारीवर आपलें पाकिस्तानचें गाणें जिना वाजवीत आहेत. वर अल्पसंख्यांना राज्यघटनेच्या द्वारा संरक्षण देण्याचे जे अनेक मार्ग म्हणून उल्लेखिले ते सर्व जर निरुपयोगी ठरले अथवा त्यापेक्षां अल्पसंख्यांचा सलग मुलूख असेल तर तो तोडून त्यांना सलग प्रांत बनवून देणें शक्य झालें तर तें योग्य ठरेल. सोव्हिअट रशियांत अशा अल्पसंख्य जमातींचीं पोटराज्यें निर्माण करण्यांत आलीं आहेत. तसें जिनांना पाकिस्तान हवें असतें व देणें शक्य असतें तर तें देणें इष्टही ठरलें असतें. पण पाकिस्तान म्हणून जे मुलूख जिना तोडून मागत आहेत त्यांच्या चतुःसीमा कशाही आंखल्या तरी २५ ते ४० टक्के हिंदु त्या मुलखांत राहतातच. ते शहरांत व खेड्यांत सर्वत्र सर्व व्यवहारांत शेंकडों वर्षें पिढ्यानुपिढ्या आहेत. आणि हिंदुस्थान म्हणून जो मुलूख उरतो त्यांतही दीड दोन कोटि मुसलमान राहतातच. शिवाय जिनांना पाकिस्तान व हिंदुस्थान असें एका राज्यसत्तेचे दोन घटक बनायला हवेत असें नसून अनेक पृथक् व स्वतंत्र राज्यें बनवायचीं आहेत. त्यांच्या पोटांत अल्पसंख्य गटांना असंतोष राहीलच. आणि या निरनिराळ्या राष्ट्रांचीं सैन्यें एकमेकांपुढें शस्त्रास्त्रें घेऊन उभीं राहतील. आणि साऱ्या हिंदुस्थानाला रणांगणाचें स्वरूप येईल. असा जिनांच्या मागणीचा फलितार्थ आहे.

* * *

जिनांना अथवा दुसऱ्या कोणा मुसलमानी हिटलरला मुसलमानी साम्राज्याचें पुनरुज्जीवन करायचें असून त्या धोरणानें हें पाकिस्तानचें राजकारण

चाललें आहे. नकाशावर नजर टाकल्यास युरोप व आशिया यांचें दरम्यान ईजिप्त, इराक, सीरिया, पॅलेस्टाइन, अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान इत्यादि अनेक मुसलमानी राष्ट्रांचा प्रचंड सलग मुलूख दृष्टीस पडतो. यांतील प्रत्येक राष्ट्रांत जितकी मुसलमान लोकसंख्या आहे त्यापेक्षां अधिक लोकसंख्या हिंदुस्थानांत असून उत्तर हिंदुस्थानांत पाकिस्तान म्हणून पंजाब, सिंध, सरहद्द व व बंगाल येथें जीं एक अथवा अनेक मुसलमान राज्यें स्थापायचीं त्यासुद्धां सर्व मुसलमान राष्ट्रांचा हा सर्व मुलूख एकत्र केला तर फार प्रचंड होतो. पंजाब व बंगाल यांचीं पाकिस्तानें बनविल्यावर पंजाब व बंगाल या दोन पाकिस्तानांना जोडणारा लांब पट्ट्याचा मुलूखही ( कॉरिडोर ) जिना मागत आहेत. हा जोडणारा पट्टा म्हणजे गंगा, यमुना या नद्या व उत्तर यमुनेचा कांहीं पश्चिम भाग असा होत असून, याचे उत्तरेकडचा व पूर्वेकडचा सगळा प्रदेश हळूहळू हिटलरच्या पद्धतीनें पाकिस्तानांत जमा होणार हें उघड आहे. पुढें सर्व मुसलमानी राष्ट्रांच्या एकीकरणाची धामधूम उठेल. आणि ज्यांत इराक व इराण येथील जगप्रसिद्ध तेलाच्या खाणी आहेत, ज्यांत नाइल, टैग्रिस, युफ्रेटिस, सिंधु या नद्या आहेत, ज्यांत ईजिप्त, सुएझ, सीरिया, इराक, पॅलेस्टाइन, अरबस्तान, इराण, अफगाणिस्तान बलुचिस्तान, सिंध, सरहद्द, पंजाब, काश्मीर, सं. प्रांत आसाम, बंगाल एवढा प्रचंड मुलूख आहे, ज्यांत गंगा, यमुना या प्रचंड नद्यांखालचा सुपीक प्रदेश आहे, तो सर्व मुलूख महंमदाच्या अनुयायांचें अखंड एक राष्ट्र बनेल. युरोप व आशिया या जोडखंडास युरेशिया म्हणतात. म्हणून या मुसलमान साम्राज्यास मध्ययुरेशियन साम्राज्य म्हणतां येईल. मग त्यांत सहजच बाकीचें हिंदुस्थान, रशियाचा कांहीं भाग, युरोपचा कांहीं भाग, असे हळूहळू सामील करण्यांत येतील. हिटलरच्या कल्पनेपेक्षांही हें सारें भव्य दिसतें आणि जिनासारखा पुरुष हा खरा विश्वकर्मा ब्रह्मदेव असला पाहिजे असें क्षणभर वाटतें.

* * *

पण हें घडविण्याइतका दम जिनांत मुळींच नाहीं. मोर नाचतो तसें नाचून लांडोर आपली फजीती करून घेते त्यांतला हा प्रकार आहे. हिटलरची नक्कल करण्याचा जिनांचा मूळचा हेतु असला तरी अखेर रशियाच्या झारचीच ती नक्कल होणार आहे. ज्या समाजांत कांहीं थोडे लोक सुखी, गबर व बेफिकीर

असून एकंदर बहुसंख्य समाज दरिद्री, मागसलेला आणि क्षुब्ध होण्याच्या मार्गावर असतो त्या समाजाचें भवितव्य दोनपैकीं एक मार्ग अनुसरतें. एकंदर समाजाला चतकोर भाकर अधिक मिळावी, पण वरिष्ठ वर्गाचा खिसा कापला न जातां तो अधिक भरावा यासाठीं साम्राज्यवर्धन करणें हा एक मार्ग असतो; आणि तें अशक्य झालें तर बहुसंख्य समाज वरिष्ठ वर्गास वरिष्ठ पदावरून खेचून खालीं पाडतो, समाजक्रांति करतो व आपल्या प्रगतीचा मार्ग आपल्या मनगटानें बांधतो. रशियाचा झार साम्राज्य वाढविण्यासाठींच शेंकडों वर्षें लढला. १९०५ व १९१७ या सालच्या युद्धांत त्याचा पराभव होऊन साम्राज्य वाढणें अशक्य झालें व तेथल्या जनतेनें झार व सरंजामदार यांस उलथून टाकून आपल्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला. हिंदुस्थानांतील वरिष्ठ वर्गापुढें आज हाच प्रसंग आहे. मोगल राज्यांतील मुसलमानी अवशेष व ब्रिटिशांनीं पोसून वाढविलेले कांहीं बडे मुसलमान संस्थानिक, अमीर वगैरे असून हिंदु संस्थानिक व जमीनदार तर खूपच आहेत. या सर्वांपुढें हाच प्रश्न आहे. रशियाच्या झारला परराष्ट्रांपासून संरक्षण व साहाय्य अप्रत्यक्ष-पणें घ्यावें लागे. येथील हे हक्कदार इंग्रजांचे अंकित व इंग्रजांनींच संरक्षिलेले आहेत. पण दिवसानुदिवस ब्रिटिश सत्ता दुर्बल झाली व जनतेचा जोर वाढला हें यांना दिसतें आहे. यामुळें केवळ ब्रिटिशांचें संरक्षण यांना अपुरें वाटत असून लोकांवर दाब ठेवणारा एकादा पुढारी यांना त्यांचें रक्षण करण्यासाठीं हवा आहे. हिंदूंत असा पुढारी मिळत नाहीं, कारण हिंदु भांडवलदारांचें ब्रिटनशींच वितुष्ट आलें असून, जनताच ब्रिटनविरोधी होत आहे. मुसलमान समाज अ-जागृत असून त्यांत उद्योगधंदेवाला वर्ग व सुशिक्षित मध्यम वर्ग हे फारसे नाहींत. यामुळें राजकारणाचें सूक्ष्म स्वरूप मुसलमानांना कळत नाहीं आणि त्यांच्या प्राचीन राज्यकर्तृत्वाच्या स्वाभिमानास चिडवून स्वतंत्र मुसल-मानी स्वराज्याची व साम्राज्याची आकांक्षा जिना हे त्यांच्यांत चेतवितात. पण असें करतांना हिंदुमुसलमान संस्थानिक, अमीर, जमीनदार व इतर हक्क-दार यांच्या मिराशीस धक्का लावण्याची गोष्टही जिना बोलत नाहींत. हें वर्तन हिटलरसारखें नसून झारसारखें आहे. हिटलरनें सर्व वरिष्ठ वर्गाविरुद्ध जनतेला चेतवून दिलें होतें व युद्धाच्या गरजेनुसार खरोखरच त्यानें वरिष्ठ वर्गाला नामो-हरम करून कनिष्ठ वर्गाचा संतोष करण्याचा प्रयत्न केला आहे. उलट झारनें

वरिष्ठ वर्गांना कवटाळून त्यांना टिकविण्याचा प्रयत्न केला व शेवटीं त्यांच्याबरोबर स्वतःही तो रसातळास गेला. जिनांना मुख्यतः क्रांतिकारक शक्ति दडपून टाकून सरंजामशाही टिकवायची आहे व मुसलमानांना झुलविण्यासाठीं साम्राज्य वाढवावयाचें आहे. पण हिटलरप्रमाणें त्यांची भिस्त स्वतांवर नसून ब्रिटिशांवर आहे. युद्ध संपेपर्यंत ब्रिटिशांनीं सत्ता सोडूं नये, मुस्लिम लीगला हातीं धरून येथील सत्ता चालवावी आणि येथील सरंजामशाही टिकविण्यास मुस्लिम लीगला मदत करावी असें त्यांचें म्हणणें दिसतें. त्यांतल्या त्यांत साधेल तितक्या प्रमाणांत वर सांगितलेली प्रचंड मुस्लिम साम्राज्याची कल्पना चालू युद्धकालांत व नंतर रुजवीत आणि पसरीत जावें असें त्याचें एकंदर धोरण आहे.

* * *

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मार्गांत—विशेषतः युद्ध चालू असतांच राष्ट्रीय सरकार निर्मिण्याच्या मार्गांत—जिनांच्या या धोरणानें अडथळा आणला आहे. यामुळें सर्व विचारवंतांचें लक्ष त्याकडे लागलें आहे. 'पाकिस्तानचें तत्त्व तूर्त मान्य करा मग तपशीलाचा विचार करूं, सध्यां राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याच्या योजनेंत जिनांना गुंतवून घेऊं' असा मानभावी अथवा भोळा उपदेश पुष्कळ लोक करीत आहेत. पण ही गोष्ट इतकी सोपी नाहीं. वायव्य आणि पूर्व सरहद्दीवर पाकिस्तान निर्मिण्यासाठीं सगळ्या हिंदुस्थानांतील मुसलमानांचें मतदान घ्यावें, पण भावी पाकिस्तानांतील मुसलमानेतरांचें मत मागूं नये ही जिनांची अट आहे. साध्या स्वाभिमानाच्या दृष्टीनेंही ही अट कोणी मानणें शक्य नाहीं. पण ही अट कबूल करूनही राष्ट्रीय सरकारांत जिनांना घेतलें तर ज्या योगें भावीकालांत पाकिस्तान बनणें अशक्य होईल अशा पद्धतीनें युद्धप्रयत्न करण्यास जिना तयार नाहींत. युद्ध हा उद्योग असा असतो कीं, राष्ट्र हें एकजूट व एकजीव बनवूनच तो करावा लागतो. हिंदुस्थानांत हिंदु व मुसलमान असे पृथक् मुलूख व पृथक् राष्ट्रें अस्तित्वांत नाहींतच. युद्धासारखा सर्व राष्ट्राची सर्व शक्ति एका कढईत वितळून व एका मुशींत घडवून टाकणारा उद्योग यशस्वीपणें सिद्धीस जाईल त्या वेळीं हिंदुस्थान व पाकिस्तान अशी या मूळच्या अखंड देशाची फाळणी करण्याची कल्पनाही ठार मरून जाईल. जिनांना हा धोका दिसतो आहे. म्हणून एकजुटीच्या

कोणत्याही युद्धयोजनेंत मुसलमानांच्या संरक्षणाच्या सबबीवर ब्रिटिश सत्तेची पाचर ठोकल्यावांचून जिना हे पुढें पाऊल टाकूं देणार नाहींत. चालू युद्ध हा अखेर समाजक्रांतीचा खेळ होणार हें जिना जाणतात. ज्यांना समाजक्रांति नको असते असे पुढारी समाजक्रांति टाळण्यासाठीं स्वातंत्र्याचे बाबतींत ही तडजोड करूं चाहतात. जिना ब्रिटिशांशीं आज तेंच वर्तन करीत आहेत व उद्यां परक्यांशीं असेंच न वागतील असा भरंवसा मुळींच नाहीं.

अशा परिस्थितींत जिनांशीं समेट करण्याची उतावीळी व्यर्थ आहे. जिनाशीं समेट झाला तरी ब्रिटिश सरकार पूर्ण सत्ता देण्याला तयार नाहीं इतकेंच नव्हे, तर ब्रिटिश सरकारच्या प्रेरणेनेंच जिना हे पूर्ण सत्ता घेण्याला विरोध करीत आहेत. पूर्ण सत्तेवांचून युद्ध यशस्वितेनें लढतां येणारही नाहीं. म्हणून जिनांच्या अटींवर समेट करणेंच योग्य नाहीं. जनतेकडे तोंड फिरविणें हाच खरा मार्ग आहे. पाकिस्तानचें मृगजळ जनतेची भाकरीची व संस्कृतीची तहान भागविणार नसून, या देशांत खेरखुरें अखिल जनतेचें राज्य निर्माण करण्यासाठीं स्वातंत्र्यप्राप्ति व स्वातंत्र्यरक्षण यांचा लढा चालविण्याचा मंत्र जनतेला शिकविला पाहिजे. झारच्या जनतेला अखेर साम्राज्यशाहीचा तिटकारा येऊन तिनें क्रांति केली तीच गोष्ट येथील जनतेच्या व आंतरराष्ट्रीय जनतेच्या दडपणानें, युद्धाच्या दडपणानें घडून येईल असे प्रयत्न केले पाहिजेत. या देशांत भरपूर भौतिक विकास व संस्कृतिरक्षण होऊं शकेल असें आश्वासन सर्व जातींच्या जनतेला दिलें पाहिजे, जनतेच्या जीवनाशीं पुढाऱ्यांनीं सात्म्य पावून जनतेचीं भौतिक दुःखें निवारण्यासाठीं संघटितपणें लढण्याला जनतेस शिकविलें पाहिजे. ही संघटना करतांकरतांच धार्मिक वेडें व पाकिस्तानसारखे धूर्त डाव उधळले जातील. चालू युद्धासंबंधाचें धोरण या दृष्टीनें अमलांत आणल्यास आज डोंगरासारखे दिसणारे जिना उद्यां कालाच्या ओघांत नामशेष होतील. कालाच्या वाहत्या पाण्यावर 'पाकिस्तान' हीं अक्षरें शिल्लकही राहणार नाहींत.

—समीक्षक, दिवाळी-अंक, १९४२.

# जिनांचें पाकिस्तान व कम्युनिस्टांचा स्वयंनिर्णय : : १२

भ्रम अथवा जाणूनबुजून केलेला खोटा मतप्रसार ही एक बलवान् अशी ऐतिहासिक शक्ति असते. खोटीं तत्त्वें व खोटे पुढारी यांनीं इतिहासांत मानवजातीवर महान संकटें आणलेलीं आहेत. तोतये पुढारी व तत्त्वज्ञानें यांच्याशीं अखेर भयानक शस्त्रयुद्धें खेळल्यावांचून त्यांचा नायनाट होऊं शकत नाहीं इतकें बळ त्यांना येतें. पाकिस्तान हें एक असत्य आहे असें गांधींनीं म्हटलें आणि तें अगदीं खरें आहे. तथापि तेवढ्यावरून तें निरुपद्रवी ठरेल अथवा खोट्याचें खोटेपण जगास आपोआप कळून येईल असें नव्हे. खोट्याचा खोटेपणा जगास कळण्यापूर्वीं जगावर किती तरी अनर्थ ओढवूं शकतात. कदाचित् खोट्याचा खोटेपणा जगाच्या प्रत्ययास कधींच येत नाहीं व त्यापासूनच्या अनर्थांत समाजाचा विध्वंस होऊं शकतो. मृगजळामागें धावणारीं हरणें अखेर त्यांचा भ्रमनिरास होण्यापूर्वींच धावून धावून थकून मरून पडतात. असें माणसाच्या इतिहासांतही अनेकवार घडतें. माणसास बुद्धि असल्यामुळें त्याच्या आयुष्यांतील मृगजळांचा निरास बुद्धिद्वारा करून पाहणें शक्य असतें. त्यामुळें ते भ्रम सर्वस्वी नष्ट न झाले तरी, त्यांचें सामर्थ्य थोडें-फार कमी होतें. पाकिस्तान हें हिंदी राजकारणांत असेंच एक मृगजळ म्हणजे

भ्रम होऊन बसलें आहे. कदाचित् त्यामुळें या देशांत यादवीही माजेल अशी भीति वाटते. तो अनर्थ टाळण्यासाठीं अथवा त्याची भयानकता बरीचशी कमी करण्यासाठीं तरी पाकिस्तान कल्पनेंतली चूक बौद्धिक दृष्ट्या स्पष्ट करून दाखविणें अवश्य झालें आहे. पाकिस्तान-कल्पनेचे पुरस्कर्ते जे बॅ. जिना यांच्याच हातीं ही कल्पना आतांपर्यंत राहिली असती तर ती कदाचित् मेलीही असती. पण हिंदी कम्युनिस्टांनीं ब्रिटिश साम्राज्यशाहीची फुकट हमाली करण्याचें पत्करल्यापासून या पाकिस्तान-कल्पनेचा त्यांनीं विशेष जोमानें पुरस्कार चालविला आहे. त्यामुळें या वादांत नवे मुद्दे व नवे घोटाळे उत्पन्न झाले आहेत. पाकिस्तान-कल्पनेंतील या नव्याजुन्या मुद्द्यांचा व घोटाळ्यांचा येथें संक्षेपानें विचार करायचा आहे. कम्युनिस्ट हे जरी जिनांना पाठिंबा देत असले तरी जिनांची मागणी व कम्युनिस्टांची मागणी यांत मूलभूत फरक आहेत. म्हणून प्रथम जिनांच्या मागणीचें स्वरूप समजून घेऊन मग कम्युनिस्टांच्या मुद्द्यांचा विचार येथें केला आहे.

* * *

१९०६ सालीं मुस्लिम लीग स्थापन झाली. त्यानंतरचें ३५ वर्षांचें मुस्लिम लीगचें आयुष्य मुसलमानांना नोकऱ्या मिळवून देण्यांत, ब्रिटिश साम्राज्यशाहीपुढें 'हांजी' 'हांजी' करण्यांत आणि ब्रिटिश सरकारकडून व काँग्रेसकडून मुसलमानांसाठीं गैरवाजवी सवलती मिळविण्यांत गेलें. शेवटीं परिस्थिति अशी आली, कीं केवळ अल्पसंख्य म्हणून अधिक सवलती आतां मिळणेंच शक्य राहिलें नाहीं. 'अल्पसंख्य या नात्यानें आणखीही ज्या सवलती हव्या त्या एकदांच मागून घ्या आणि घटनासमितिद्वारा स्वातंत्र्याच्या मागणीस पाठिंबा देण्यासाठीं पुढें या' असें काँग्रेसनें मुस्लिम लीग व मुसलमान जनता यांना आव्हान दिलें. या घटनासमितीस व स्वातंत्र्याच्या मागणीस मुसलमान जनतेकडून विरोध होण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण मुस्लिम लीगचे पुढारी जिना व त्यांचे पाठीराखे असे मुसलमान नबाब आणि अमीर हे स्वातंत्र्यद्रोही आहेत. ब्रिटिश सत्तेचें पाठबळ नष्ट होतांच आपली परंपरागत प्रतिष्ठा आणि धनसत्ता जनतेकडून उधळली जाईल याची त्यांना भीति वाटते. म्हणून काँग्रेसच्या स्वातंत्र्याच्या मागणीकडून कांहीं तरी हुलकावणीनें मुसलमानांचें तोंड फिरवावें यासाठीं मुस्लिम लीगचे अध्यक्ष व पुढारी जिना यांनीं १९४०

च्या मार्चमध्यें अकस्मात् पाकिस्तानमागणीस पाठिंबा दिला. पाकिस्तान-कल्पना पूर्वी कित्येक वर्षें हवेंत होती. जिनांनीं तिचा पुरस्कार केला नव्हता. पण स्वातंत्र्याच्या मागणीपासून मुसलमानांना परावृत्त करून कधींच प्राप्त न होणाऱ्या मृगजळामागें त्यांना कायमचें धावत ठेवतां यावें या दृष्टीनें जिनांनीं ही पाकिस्तानची मागणी पुरस्कारिली.

* * *

मुसलमानांच्या स्वाभिमानास फुलवून जिना हे पाकिस्तानचा पुरस्कार करीत असल्यानें, मुसलमानांवर त्यांची बरीच छाप पडत आहे यांत मुळींच संशय नाहीं. मुसलमान ही एक अल्पसंख्य जमात नसून तें एक इतिहास-सिद्ध राष्ट्र आहे, हा मुसलमानांच्या भावनेस गुदगुल्या करणारा युक्तिवाद जिनांनीं मुसलमानांपुढें मांडण्यास सुरवात केली आहे. हा युक्तिवाद खरोखर मोहक असून वरवर पाहतां खरा वाटतोही. युरोपांतील कांहीं राष्ट्रांत अल्प-संख्यांच्या प्रश्नाचें स्वरूप चालू युद्धापूर्वी मोठें तीव्र झालें होतें. अल्पसंख्य या शब्दास युरोपांत दोन विशिष्ट अर्थ आहेत. ब्रिटिश पार्लमेंटांत कोणत्याही एका अथवा अनेक प्रश्नांवर बहुसंख्य व अल्पसंख्य असे गट पडतात, पण ते क़ायम नसतात; त्यांचें नेहमीं परिवर्तन होत असतें. एकाच अथवा अनेक प्रश्नांवर लोकमत बदलत राहतें. अल्पसंख्यांचे बहुसंख्य आणि बहुसंख्यांचे अल्पसंख्य नेहमीं होत असतात. हें जें अल्पसंख्य अथवा बहुसंख्य लोकमत त्याचें स्वरूप संख्यात्मक असतें. उलट पूर्व युरोपांत अल्पसंख्य हा शब्द विशिष्ट जमात या अर्थानें वापरण्यांत येतो. उदाहरणार्थ जर्मनींत व झेकोस्लोव्हाकियांत पोल्स हे अल्पसंख्य गणण्यांत येत. याचा अर्थ असा होता कीं, त्यांची लोकसंख्या जर्मनींत व झेकोस्लोव्हाकियांत जी कांहीं ५-१० टक्के असे ती आपलें भिन्नराष्ट्रत्व कायम ठेवण्याचा आग्रह धरी व जर्मन्स अथवा झेक्स हेही त्यांना भिन्नच ठेवीत. पण त्यांची संख्या फार थोडी व देशभर विखुरलेली असल्यानें त्यांचा वेगळा मुलूख तोडून त्यांचें स्वतंत्र राज्य अथवा पोटराज्य करणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांना फक्त संरक्षणाचे कांहीं विशिष्ट हक्क देण्यांत येत. कायदेमंडळांत अमुक इतक्या राखीव जागा, शाळाकॉलेजांतून, विद्यापीठांतून त्यांच्या शिक्षणाच्या विशिष्ट सोयी, मंत्रिमंडळांत व नोकऱ्यांत अमुक जागा अशा कांहीं कायमच्या सवलती त्यांना देण्यांत येत. युरोपांत जर्मन्स, पोल्स, स्लोव्हॅक्स, कार्पा-

थिअन्स, सर्ब्स, क्रोट्स वगैरे अनेक अल्पसंख्य पूर्वयुरोपांतील राष्ट्रांत आहेत. त्यांचे समाधान अखेर कोणत्याच योजनेनें झालें नाहीं आणि झेकोस्लोव्हाकियांतील अल्पसंख्य अशा सुडेटन जर्मनांनीं चालू युद्धाचे सुरुंग पेरले हें आतां सर्वांना माहीत आहे. युरोपमध्यें स्वित्सलँडांत अल्पसंख्यांचा प्रश्न समाधानकारकपणें सुटला आहे, रशियांत सुटला आहे. पण इतर कोठेंही तो तसा सुटलेला नाहीं. हिंदुस्थानांत हा प्रश्न समाधानकारकपणें सोडविण्याचे आजवरचे प्रयत्न व्यर्थ गेले याचें कारण हिंदुमुसलमानांत दुही ठेवण्यांत ब्रिटिश सत्तेचें हित आहे. म्हणून प्रथम ब्रिटिश सत्ता येथून गेली पाहिजे व त्यासाठीं मुसलमानांनीं आपणांस पाठिंबा द्यावा अशी गांधींनीं व कॉंग्रेसनें मागणी केली- मुसलमान जनताही स्वातंत्र्यास अधीर असल्यानें कॉंग्रेसच्या हाकेस 'ओ' देईल अशी जिनांना भीति वाटली आणि म्हणून मुसलमान जनतेला पाकिस्तानच्या हाकेनें जिनांनीं मागें खेचलें.

* * *

'तुम्ही हिंदुस्थानांत अल्पसंख्य नसून स्वतः एक प्रबळ राष्ट्र आहांत' अशी जिनांनीं मुसलमानांपुढें घोषणा केली. हिंदुस्थानांत ४० कोटी लोकसंख्या आहे त्यापैकीं ८ ते १० कोटी मुसलमान आहेत. रशिया सोडला तर युरोपांतल्या कोणत्याही राष्ट्रांपेक्षां ही लोकसंख्या मोठी आहे. एकट्या जर्मनीपेक्षां ती मोठी असून बाकीच्या दोन दोन युरोपीय राष्ट्रांएवढी ही लोकसंख्या आहे. तेव्हां हिंदुस्थानांत अल्पसंख्य म्हणून हिंदी सरकारकडून मिनतवारीनें हक्क मागून घेण्यापेक्षां हिंदुस्थानांत मुसलमानांसाठीं मुलूख तोडून घेऊन स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें आपण जगूं या असें आवाहन जिनांनीं मुसलमानांना केलें आहे. 'हिंदुस्थानांत आपणा मुसलमानांचें पूर्वीं साम्राज्य होतें तेथें आपण अल्पसंख्य म्हणून बहुसंख्यांपुढें दीन होऊन जगायचें काय?' असा प्रश्न जिनांनीं मुसलमानांपुढें टाकला आणि प्रथम दहा कोटी मुसलमानांचें राष्ट्र बनविण्यास कॉंग्रेसनें संमति द्यावी, मग स्वातंत्र्याचा विचार, असें कॉंग्रेसला उत्तर दिलें. सध्यांच्या युद्धपरिस्थितींत जिनांनीं ही मागणी केली तीमुळें तिला फार महत्त्व आलें आहे. हिंदुस्थानांत राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनवून युद्धांत संयुक्तांच्या बाजूनें सामील व्हावें या गोष्टीस कॉंग्रेसनें संमति दिली होती. पण त्यापूर्वीं कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांची एकजूट होणें अवश्य होतें. अशी

एकजूट झाल्यावर ही मध्यसत्ता पूर्णपणें राष्ट्रीय मंत्रिमंडळास मिळेल असें नाहीं. पण मग मध्यसत्तेसाठीं करावा लागणारा राष्ट्रीय लढा हिंदुमुसलमानांकडून एकजुटीनें केला जाईल व त्यास यशही खात्रीनें येईल हें सर्वांना मान्य आहे. म्हणून जिनांच्या या पाकिस्तानमागणीस मान्यता द्यावी व स्वातंत्र्यलढा आणि युद्धसहकार्य या कामीं त्यांचें सहकार्य मिळवावें असा युक्तिवाद सहज सुचणारा आहे. आज फक्त पाकिस्तानचें आश्वासन द्या, पाकिस्तान युद्धानंतर मिळालें तरी चालेल अशीही सवलत देण्यास जिना तयार आहेत. अखेर परतंत्र असा अखंड हिंदुस्तान पत्करण्यापेक्षां या देशाचे अनेक तुकडे झाले, पण सर्व तुकडे स्वतंत्र झाले तर तें खात्रीनें हितकर होईल. मग जिनांच्या पाकिस्तानला संमति कां देऊं नये असा प्रश्न बरेच सुज्ञ लोकही विचारीत आहेत.

* * *

पण जिनांनीं वर एक सवलत दिली असें म्हटलें पण तिच्या पोटांत त्यांनींच एक मेख मारली आहे तिनें स्वातंत्र्यवादाचा पूर्णपणेंच निकाल लागतो. पहिली गोष्ट ही आहे कीं पाकिस्तान हें ब्रिटिशांनीं आपल्या सैन्यबलानें म्हणजे आपल्या सत्तेखालीं निर्माण करून दिलें पाहिजे अशी जिनांची मागणी असून ती त्यांनीं अनेकवार मांडली आहे. 'आधीं स्वातंत्र्य मग पाकिस्तान' या भूमिकेस पं. नेहरूंनीं कांहींशी मान्यता दिली होती. पण जिनांनीं ती भूमिका कधींच मान्य केली नाहीं. उलट पाकिस्तानला कॉंग्रेसनें मान्यता दिली म्हणजे-ही मध्यसरकारांत राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनविण्याचे कामीं जिनांनीं ज्या अटी घातल्या आहेत त्यामुळें ब्रिटनची अथवा दुसऱ्या कोणाची तरी परकी सत्ता येथें कायमच राहणार आहे. पाकिस्तानला कॉंग्रेसनें संमति दिल्यावर जें मध्य-सरकार स्थापावयाचें त्यामुळें युद्धानंतर पाकिस्तान 'प्री-जज्' अथवा 'प्रेज्युडिस' होणार नाहीं, म्हणजे युद्धानंतर पाकिस्तान अशक्य होणार नाहीं अशा प्रकारें मध्यसरकार स्थापलें जावें व तसाच त्याचा कारभार चालावा अशी स्पष्ट अट जिनांनीं घातली आहे. जिनांची ही अट वरवर दिसते तशी सोज्वळ नाहीं. सध्यांच्या काळीं हिंदुस्थानांत राष्ट्रीय मध्यसत्ता स्थापायची म्हटलें म्हणजे तिला येथील ब्रिटिश साम्राज्यसत्ता आणि सरहद्दीवरील परचक्र या दोहोंशींही निकराचा सामना द्यावा लागेल. या दोन लढ्यांत फरक कोणताही असो, जनता, सर्व राजकीय पक्ष आणि प्रांतिक व मध्य मंत्रिमंडळें यांना निर्धाराच्या

एकजुटीनें लढावें लागेल. फॅसिस्ट शत्रूशीं लढण्यासाठीं राष्ट्राची जी एकजूट करावी लागते तीसाठीं राष्ट्रांतील सर्व फुटी, भेद व भिन्नता कढईत घालून ऐक्यभावनेच्या जास्तींत जास्त उष्णतेनें वितळून टाकाव्या लागतील. अशा या झगड्यानंतर हिंदुस्थानांत जातीय व धार्मिक भेदभाव शिल्लकच राहणार नाहींत व जिनांच्या पाकिस्तानला कोणी पाठिंबाच देणार नाहीं. जिना यालाच पाकिस्तान 'प्री-जज्' व 'प्रेज्युडिस' होणें असें म्हणतात. तें टाळण्यासाठीं मंत्रिमंडळ स्थापन झाल्यापासूनच जिना हे ब्रिटिश हस्तक्षेपाची पाचर येथल्या राज्यकारभारांत मारून ठेवणार आणि हिंदु सैन्य–मुसलमान सैन्य, हिंदु कारखाने–मुसलमान कारखाने, हिंदु पोलिस–मुसलमान पोलिस– सारांश हिंदु व मुसलमान अशी देशांतील सर्व जीवनाची आज नसलेली फारकत आरंभापासूनच करूं लागणार. यामुळें ब्रिटिश साम्राज्यसत्ता येथें दृढ होईल. अंतर्गत फुटीमुळें देश दुर्बल राहून जपानपुढें कदाचित् पराभवही खावा लागेल, आणि विजय मिळाला तरी तो ब्रिटिश सत्तेला मिळून ब्रिटिश सरकारच येथें फॅसिस्ट होईल.

* * *

कम्युनिस्टांना हा सर्व धोका दिसतो कीं नाहीं कळत नाहीं. पण जिनांचें मागणें एकदां मान्य करा म्हणजे मग ते स्वातंत्र्यलढ्यासाठीं सज्ज न झाल्यास आपण त्यांचें प्रतिगामी स्वरूप मुसलमान समाजास उघडें करून दाखवूं असें कम्युनिस्टांचें म्हणणें असतें. हा शुद्ध भ्रम आहे. जिनांचें मागणें एकदां मान्य केलें कीं जिनांचा तो फार मोठा विजय होय असा डांगोरा जिना व ब्रिटिश मुत्सद्दी फार जोरानें पिटतील. जिना हे मुसलमानांचे अनभिषिक्त राजेच ठरतील. मुसलमान जनतेची त्यांच्याबद्दलची अंधश्रद्धा अधिकच वाढेल आणि मग स्वातंत्र्यवाद्यांना मुसलमानांच्या सभेंत भाषण करण्यासाठींही जिनांची परवानगी लागेल. जर्मनींत हिटलरला ज्यांनीं सवलतीनें वागविलें त्यांनीं त्याचा भाव जनतेच्या दृष्टीनें वाढविला व स्वतांचा सर्वनाश करून घेतला. जिनांच्या मागण्या मान्य करण्यानें मुसलमान जनतेंत जिनांचा भाव निष्कारण वाढेल. जिना हे स्वातंत्र्यविरोधक आहेत असें लक्षांत घेऊन मुसलमान जनतेनें जिना व त्यांचे साथीदार यांचा पाडाव केला पाहिजे. मुसलमान जनता हें दिव्य करील तेव्हांच मुस्लिम लीगची अडचण दूर होईल. पारतंत्र्यानें

मुसलमान जनतेचा कोंडमारा झाला व लढ्याचा अनुभव मिळत गेला म्हणजे मुसलमान जनताच जातीय प्रश्नापेक्षां राष्ट्रीय प्रश्न श्रेष्ठ हा मुद्दा लक्षांत घेईल व जिनांचा पाडाव करून राष्ट्रीय लढ्यांत सामील होईल. हा मार्ग दूरचा वाटला तरी अखेर तोच जवळचा ठरेल आणि युद्धानें जगाचा वेग एवढा वाढविला आहे कीं, या गोष्टी घडून येण्यास कदाचित् फारसा वेळही लागणार नाहीं. यासाठीं जातीय दृष्टि सोडून राष्ट्रीय दृष्टीनें जनतेशीं बोलणारे शेंकडों निष्ठावंत कार्यकर्ते मिळाले पाहिजेत. ते जनतेला संघटित करतील. जिनांच्या आर्जवांत व्यर्थ शक्ति खर्चूं नये.

* * *

जिना अथवा मुस्लिम लीगचे दुसरे कोणीही पुढारी यांनीं पाकिस्तान म्हणजे नेमका अमुक एक मुलूख असें केव्हांच सांगितलेलें नाहीं अथवा पाकिस्तानांत जे अनेक अल्पसंख्य असणार त्यांना संरक्षण कसें द्यायचें याचाही खुलासा कधीं केला नाहीं. हिंदुस्थानच्या वायव्येस आणि पूर्वेस मुसलमान बहुसंख्य असणाऱ्या मुलुखांचीं स्वतंत्र राज्यें व्हावीं अशी त्यांची मोघम मागणी आहे. यावरून साधारणतः सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द व पंजाबचा पश्चिमेकडचा दोनतृतीयांश भाग मिळून एक राज्य आणि पूर्व बंगाल व आसामचा कांहीं भाग मिळून एक राज्य अशीं दोन पाकिस्तानें होतील. पण मुसलमान हें ८ कोटींचें राष्ट्र आहे हा जिनांचा सिद्धांत येथें खोटा ठरतो. ८ कोटी मुसलमानापैकीं तीन ते साडेतीन कोटी मुसलमान या पाकिस्तानबाहेरच्या हिंदुस्थानांत राहतील. पाकिस्तानांतही प्रत्येकीं फार तर अडीच कोटीहून अधिक मुसलमान राहणार नाहींत. मुसलमानेतरांची म्हणजे मुख्यतः हिंदूंची (व पंजाबांत शिखांची) लोकसंख्या एक सरहद्द प्रांत सोडला तर प्रत्येक जिल्ह्यांत व तालुक्यांत आहे. पूर्व बंगालच्या पाकिस्तानांत मुसलमानेतरांची संख्या ३३ टक्क्यांहून अधिक भरेल एवढी मोठी असून वायव्य पाकिस्तानांत ती २० ते २५ टक्के खास भरते. जिनांच्या मतें या अल्पसंख्यांचें मत मुळींच न विचारतां फक्त या प्रदेशांतील मुसलमानांच्याच मतानें पाकिस्तान जन्मास यावें. अखिल हिंदुस्थानांत २५ टक्के असलेल्या मुसलमानांच्या मतास एवढी किंमत द्यायची कीं, त्यांच्या इच्छेनुसार हिंदुस्थानची चिरफाड करायची ! आणि जीं नवीं पाकिस्तानें निर्माण करायचीं त्यांतील २५ ते ३३ टक्के

अल्पसंख्यांचें मत मात्र विचारायचें नाहीं! सुखासुखी या अन्यायास कोणीही संमति देणार नाहीं. ताकद असल्यास जिनांनीं बाबराप्रमाणें हिंदुस्थान शस्त्र-बलानें जिंकून घ्यावें, मग त्यांना कोणाच्याही संमतिविना येथें हुकुमशहा होतां येईल.

* * *

पाकिस्तानचे विरोधक आतां मुसलमानांतहि निर्माण होऊं लागले आहेत. आर्थिक दृष्टया पाकिस्तानचे मुलूख हे दरिद्री असून मुसलमान जनतेचें त्यामुळें नुकसान होईल ही गोष्ट अनेक विचारी मुसलमानांना पटूं लागली आहे. आज पाकिस्तानला नव्हे पण मुस्लिम लीगला ब्रिटिश सरकारच उचलून धरीत असल्यामुळें पाकिस्तान यशाच्या मार्गावर आहे असा थोडा भास होतो. पण अखेर स्वतंत्र पाकिस्तान ब्रिटिशांपासून घ्यायचें असून त्यांच्याशीं लढल्या-वांचून पाकिस्तान मिळणार नाहीं व ती ताकद जिनांच्या ठिकाणीं नाहीं. यामुळें वास्तविक पाकिस्तानचें महत्त्व दिवसानुदिवस कमी कमी होत जातें. पण ब्रिटिश साम्राज्यशाहीचे नवे हस्तक असे जे हिंदी कम्युनिस्ट त्यांनीं या पाकिस्तानांत एक नवीन विष निर्माण करण्यास सुरवात केली आहे. रशियानें अल्पसंख्यांचा म्हणजे तेथील उपराष्ट्रकांचा प्रश्न जसा सोडविला तसा येथें सोडविला जावा असें त्यांचें मागणें आहे. झारच्या रशियन साम्राज्यांत सुमारें ४० ते ४५ टक्के लोकसंख्या जिंकलेल्या उपराष्ट्रकांची होती. तीं झारच्या जुलुमाविरुद्ध शेंकडों वर्षें जळत होती. बोल्शेव्हिक अमलांत या सर्व उपराष्ट्र-कांच्या मुलुखांत पूर्ण स्वायत्त अशीं प्रजासत्ताक राज्यें स्थापन झालेलीं असून मध्यवर्ती सोव्हिएट संयुक्त घटनेंत तीं सामील करण्यांत आलेलीं आहेत. यांना भाषा, संस्कृति, रीतरिवाज वगैरे बाबतींत बरेंच व्यापक असें स्वातंत्र्य देण्यांत आलेलें आहे. हिंदुस्थानची रचना या पद्धतीवर करण्यास खरोखर कांहींच हरकत नाहीं. पण ही सोव्हिएट रचना व जिनांची मागणी यांचा कांहींही संबंध नाहीं. जिनांचें समाधान करण्यासाठीं जेव्हां कम्युनिस्ट अशी रचना मागतात तेव्हां ते अप्रामाणिक आहेत कीं मूर्ख आहेत याचाच घोटाळा पडतो.

* * *

सांस्कृतिक, राष्ट्रीय, भाषाविषयक तत्त्वावर स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणें

हिंदुस्थानची फाळणी करावी म्हणजे मुस्लिम लीगचें समाधान होईल असें कम्युनिस्टांचें म्हणणें आहे. पण हिंदु व मुसलमान हीं येथें दोन राष्ट्रें आहेत, अथवा या दोन संस्कृति आहेत, अथवा या दोन भाषा आहेत, अशी वस्तुस्थिति मुळींच नाहीं. सरहद्दीवरील मुसलमान, बंगाली मुसलमान आणि मद्रासी मुसलमान यांची भाषा, संस्कृति, वंश, वर्ण, आकृति, सवयी, स्वभाव यांत कांहींही साम्य नाहीं. उलट या प्रत्येक प्रांतांतील हिंदु व मुसलमान भाषा, वर्ण, आकृति, वंश, संवयी, स्वभाव या दृष्टीनें त्या त्या प्रांतांत सारखे आहेत. हिंदुस्थानांतील नऊदशांश मुसलमान मूळचे या देशांतलेच आहेत. परदेशांतून येथें आलेले मुसलमानही येथल्या मुसलमानांत मिसळलेले आहेत. संस्कृति आणि धर्म यांचा संबंध फारसा नसतोच. संस्कृति याचा अर्थ माणसाची राहणी, विचारसरणी, सवयी, स्वभाव इत्यादि हा असतो. या दृष्टीनें पाहिलें तर जिना, नेहरू व सावरकर या सर्वांची संस्कृति सारखीच उच्च आहे आणि रस्त्यावर लोकांच्या वहाणा शिवण्यासाठीं दिवसभर उन्हांत ताठकळणारा हिंदु अथवा मुसलमान चांभार याची संस्कृति सावरकर, जिना व नेहरू या तिघांहूनही वेगळी आहे. संस्कृतीसंबंधानें हाच दृष्टिकोन खरोखर योग्य असून या दृष्टीनें पाहिलें असतां कोणत्याहि प्रांतांत श्रीमंतांपासून दरिद्र्यांपर्यंत जे थर खालीं खालीं दिसतात ते उच्च संस्कृतीच्या लोकांपासून हीन संस्कृतीच्या लोकांपर्यंतचे थर असतात. त्यांचें स्वरूप प्रादेशिक व धार्मिक नसून ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक असतें. रशियांत भिन्नराष्ट्रत्व जेथें जेथें आहे तेथें तेथें भिन्न भाषा हेंच त्याचें मुख्य लक्षण आहे. कम्युनिस्टांची जी मागणी आहे ती भिन्न संस्कृति, भिन्नराष्ट्रत्व, भिन्नभाषा असेल तेथें तेथें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर स्वतंत्र राज्यघटना बनवावी अशी आहे. याप्रमाणें पाहतां बंगाली भाषेचा बंगाल हा प्रांत, पंजाबी भाषेचा पंजाब हा प्रांत, सिंधी भाषेचा सिंध हा प्रांत, पुस्तु भाषेचा सरहद्द हा प्रांत–सारांश, भाषापरत्वें प्रांत पाडणें एवढाच याचा निष्कर्ष ठरतो. असें प्रांत पाडण्याला कॉंग्रेसनें पूर्वींच संमति दिली असून कॉंग्रेसचे प्रांत तसे आहेतही. पण मुसलमानांच्या पाकिस्तानशीं याचा कांहींही संबंध नाहीं. तसेंच या प्रांतांना स्वतंत्र राज्यें बनविण्याचा हक्क देणें एकंदर देशाच्या बचावाच्या दृष्टीनें गैर होईल. सोव्हिएट रशियांत असें स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे तें नाममात्र आहे. एखादा

स्वायत्त घटक फुटून निघतो म्हणेल तर त्यास तसें करूं देण्यांत येणार नाहीं हें सांगणें नकोच.

* * *

रशियांतील निरनिराळीं उपराष्ट्रकें तीं तीं भाषा बोलणारीं आहेत व एकेका सलग मुलखांत राहणारीं आहेत. जिनांचीं हिंदुमुसलमान राष्ट्रें अशीं नाहींत. सर्व प्रांतांत हिंदु-मुसलमान सरमिसळ राहत आहेत. शिवाय झारच्या अमलांत उपराष्ट्रकांच्या प्रश्नाचें जें स्वरूप होतें तें सोव्हिएट अमलांत मुळींच राहिलें नाहीं. या उपराष्ट्रकांवर झारचा जुलूम चाले. त्यांची स्वातंत्र्याची चळवळ नेहमीं चालू असे व तिला अत्याचाराचें स्वरूप येई. रशियन राज्यक्रांतीची उठावणी झाली तसतसे या चळवळीचें स्वरूप बदलत गेलें. उपराष्ट्रकांतील कामकरी व शेतकरी झारशाहीविरुद्ध लढले, तरी अखिल रशियन संघटनेंतून फुटून निघण्याचा पूर्वींचा हट्ट त्यांनीं सोडून दिला व सोव्हिएट पुनर्घटनेंत उपराष्ट्रकें सामील झालीं. येथेंही परकी सत्तेविरुद्ध अखिल जनतेचा लढा जेव्हां सुरू होईल तेव्हां जनता पाकिस्तानवाद्यांना फाटा देऊन अखंड व स्वतंत्र राष्ट्र निर्माण करील. जनतेचें लक्ष स्वातंत्र्यावर वेधणें हाच येथें खरा उपाय आहे.

* * *

जिनांना प्रामाणिकपणें स्वतंत्र पाकिस्तान हवें असेल तर त्याला एकच मार्ग आहे. सिंध, बंगाल, आसाम, पंजाब, सरहद्द या सर्व मुसलमान-बहुसंख्य प्रांतांत जिनांचीं हस्तक मंत्रिमंडळें स्थापन झालीं आहेत. या सर्व प्रांतांचें—ब्रिटिश सत्तेपासून स्वतंत्र असें या पांच प्रांतांचें—मुसलमानी मध्यराज्य स्थापन करावें व स्वतां त्याचा प्रजासत्ताक अध्यक्ष व्हावें. पांच प्रांतांतून ब्रिटिश साम्राज्यसत्ता त्यांना काढून टाकतां आल्यास त्यांचें कॉंग्रेस अभिनंदनच करील. पण ब्रिटिशांचे गुलाम झालेले जिना हें धाडस करणार नाहींत.

—'भरारी', दिवाळी अंक, १९४३

# कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा सर्वोत्तम निर्णय : : १३

बार्डोलीस एक आठवडाभर कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं गांधी-जींच्यां समवेत वाटाघाट व विचारविनिमय करून जे ठराव प्रसिद्ध केले आहेत ते सर्व निरपवाद उत्तम आहेत. नेहमींच कॉंग्रेसवर प्रातिकूल टीका करणाऱ्यांचें आणि ज्यांना प्रचलित राजकारणाचें गतिस्थितिशास्त्र कळत नाहीं अशांचें या निर्णयानें समाधान होणार नाहीं. पण कॉंग्रेसकडे आशेनें, आस्थेनें आणि आत्मीयतेनें पाहणाऱ्या कोणांलाही आतां कुरकुरण्याचें अथवा दोष शोधण्याचें कारण उरलें नसून, कॉंग्रेस-निर्णयाच्या बजावणीसाठीं सिद्ध होण्याचा निकराचा प्रसंग कॉंग्रेसनें आणून दिला आहे. 'कॉंग्रेस वर्किंग कमिटी चूक करीत नाहीं' असें जवाहरलाल मागें एकदां कांहींशा विनोदानें, कांहींशा उपरोधानें, कांहींशा श्रद्धेनें बोलले होते. त्यांचें बोलणें थोडें गूढही होतें. पण जगाच्या व हिंदुस्थानच्या अत्यंत अवघड प्रसंगीं आज कॉंग्रेस वर्किंग कमिटी-नें जो निर्णय घेतला आहे तो खरोखर अचूक असा आहे. कॉंग्रेसची आज-वरची जी थोर व तत्त्वविशुद्ध परंपरा तिला तो साजेसा आहे. हिंदुस्थानपुढें जें संकट येऊन उभें राहिलें आहे त्याविषयीं कॉंग्रेस बेफिकीर नाहीं. जनतेच्या जीवनाची आणि इभ्रतीची व राष्ट्रीय स्वातंत्र्याची जबाबदारी कॉंग्रेसच्या

शिरावर आहे, याबद्दलची पूर्ण जाणीव कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें व्यक्त केली असून ती पार पाडण्यासाठीं कॉंग्रेसनें कंबर बांधली असें या ठरावानें स्पष्ट होत आहे.

* * *

मुंबईच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचा ठराव व त्यांतूनच निर्माण झालेला सत्याग्रह व त्याची शपथ-पत्रिका यांसंबंधानें ना. ग. गोरे यांनीं जी भूमिका घेतली तशीच भूमिका जवाहरलाल गटानें बार्डोलीस घेतली आणि तिचा आतां वर्किंग कमिटीनें स्वीकार केला इतकेंच नव्हे, तर एक अनिष्ट पाऊल पुढें टाकून गांधींचें नेतृत्वही तहकूब अथवा रद्द केलें आहे. ज्यांनीं त्या वेळीं गोरे यांना दोष दिला आणि गोरे यांच्यावर (आणि निष्कारण आमच्येवरही) कुभांडें रचलीं, ते आतां कोठें बसणार आहेत 'देव' जाणे. गोरे हे सत्याग्रह-पत्रिका परत घेऊन स्वस्थ न बसतां कांहीं सहकाऱ्यांसह शेतकरी-संघटना व स्वयंसेवक-संघटना हीं कामें करीत आहेत. याच कामांना आतां सत्याग्रहापेक्षांही अधिक महत्त्व दिलें पाहिजे. सरकार कांहींही करो, स्वातंत्र्यलढा व परचक्रप्रतिकार यांची पूर्वतयारी कॉंग्रेसनें स्वतंत्रपणें करूं लागावें असें आम्हीं गेले कांहीं महिने पुनः पुन्हा प्रतिपादिलें. कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें ही विचारसरणी आतां आपल्या ठरावांत स्पष्ट शब्दांनीं मांडली आहे. गांधींना पुढारीपणाच्या जबाबदारींतून मुक्त केलें हें एका दृष्टीनें थोडें वाईटच झालें. पण एक तर गांधींसारख्या ध्येय-निष्ठ सत्पुरुषाला हवें तें व्यक्तिस्वातंत्र्य देणें हें वर्किंग कमिटीचें कर्तव्य होतें आणि दुसरी व महत्त्वाची गोष्ट अशी कीं, कॉंग्रेसला गांधींचा सल्ला केव्हांही मिळण्यासारखा असून निकराच्या प्रसंगीं खास गांधींचें सहकार्य लागणार व मिळणार अशी कॉंग्रेसपुढाऱ्यांना खात्री आहे. म्हणून आजच्या गांधी-कॉंग्रेस-वियोगास फक्त कांहींसें शाब्दिक महत्त्वच आहे.

* * *

गांधीजींच्याबद्दल आम्ही दाखवितों ती आस्था निव्वळ औपचारिक अथवा खुशामतीची नाहीं. गांधींचें सहकार्य आणि नेतृत्व यापुढें अतिशय निकडीनें लागणार आहे असें आम्हांला ठामपणें वाटतें. हिंदुस्थानच्या भवितव्यासंबंधानें आमचा असा अंदाज आहे कीं, आंतरराष्ट्रीय आगीचा डोंबाळा हिंदुस्थानास

पोंचून येथील समाजाची त्यांत उकडहंडी झाल्यावांचून राहणार नाहीं. कदाचित् चालू युद्ध ही उकडहंडी होण्यापूर्वी संपलें तर केवळ हिंदुस्थानला युद्धांत गोंवण्यासाठीं ताबडतोब दुसरें मोठें युद्ध होईलच. ब्रिटिशांशीं निकराचा सामना देऊन त्यांच्या येथील साम्राज्याचा शेवट करणें अथवा त्यांच्यापुढें माघार घेऊन 'हाराकिरी' करणें याखेरीज इंग्लंडच्या साम्राज्यवादी प्रतिस्पर्ध्यांना गत्यंतर राहिलेलें नाहीं. हिंदुस्थान स्वतंत्र होणें हें आजच्या जगांतील वणवा थांबविण्याच्या दृष्टीनेंही अवश्य आहे असें वार्किंग कमिटीच्या एका ठरावांत जे शब्द आहेत ते या दृष्टीनें मार्मिक आहेत. परचक्र अशा प्रकारें हिंदुस्थानवर सर्व बाजूंनीं येऊन कोसळलें म्हणजे आत्मसंरक्षण कसें करायचें हा खरा प्रश्न आहे. गांधींची गरज आहे ती येथेंच.

*　　　*　　　*

आजचें युद्ध शस्त्रास्त्रांनीं लढलें जांत आहे अशा वेळीं परचक्रनिवारणास गांधींचा काय उपयोग? सशस्त्र प्रतिकार करण्यास गांधी तयार नाहींत; आणि वर्किंग कमिटीनें गांधींना याच कारणासाठीं काँग्रेसपासून दूर जाऊं दिलें. असें असतां गांधींच्या निःशस्त्रप्रतिकारपद्धतीचा स्वीकार काँग्रेस कसा करणार आणि खुद्द गांधी तरी हा प्रतिकार करणार कसा? ही शंका बरोबर आहे आणि तिचें उत्तर वर्किंग कमिटीच्या ठरावांतच दिलें आहे. काँग्रेसनें अहिंसा हें आपलें धोरण सोडलेलें नसून स्वयंसेवक-दळें अहिंसातत्त्वावर संघटित करावयाचीं आहेत. शत्रुसैन्यें चालून आल्यास नागरिकांची पळापळ, मालमत्तेची नासधूस, चोऱ्या, हल्ले असले प्रकार होऊं नयेत, लोकांनीं शांतपणें व संघटितपणें परिस्थितीस तोंड द्यावें यासाठीं संघटित स्वयंसेवकदलांनीं समाजाचें नियंत्रण करावयाचें आहे. त्याचप्रमाणें शत्रुसैन्यांचा वेढा पडला असतां खेड्यांची उपासमार व दाणादाण होऊं नये यासाठीं खेड्यांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व नैतिक दृष्ट्या संघटित व दमदार बनवायचें आहे. वर्किंग कमिटीच्या ठरावांत हें सर्व स्पष्टपणें आहे. आमच्या मतें हें विधायक काम करण्यास गांधींचें विभूतिमत्व, गांधींची स्फूर्ति आणि त्यांचें प्रत्यक्ष नेतृत्व यांचा जितका उपयोग होईल तितका दुसऱ्या कोणाचाही होणार नाहीं. त्यांनींच गेल्या वीस वर्षांत लाखों नाहीं—तरी हजारों कार्यकर्ते सर्व हिंदुस्थानभर आपल्या शिकवणीनें व स्फूर्तीनें विधायक कार्यास लावले आहेत. ते कामें करीत आहेत

आणि गांधींनीं काँग्रेस सोडली तरी हे सर्व लोक गांधींना आणि गांधी त्यांना सोडूं शकत नाहीं. गांधींनीं दिलेल्या मुलाखतींत ही गोष्ट स्पष्ट झालीही आहे.

* * *

अशा रीतीनें गांधींचें व काँग्रेसचें सहकार्य अपरिहार्य होणार असतां गांधींना काँग्रेसपासून दूर होऊं देण्याचें 'नाटक' कां केलें असा प्रश्न सहजच कोणी विचारील; त्याचा विचार केलाच पाहिजे. खरोखर हिंदुस्थानजवळ बाँबगोळे आणि मशिनगन्सच्या ढिगांचे ढीग पडलेले असून वाया चालले आहेत तरी त्यांचा गांधी उपयोग करूं देत नाहींत व शत्रूस घरांत येऊं देतात अशी वस्तुस्थिति मुळींच नाहीं. खुद्द ब्रिटिश सरकारची शत्रूस आजच सशस्त्र प्रतिकार करून त्यास मागें हटविण्याइतकी तयारी नाहीं आणि काँग्रेसच्या अध्यक्षास आज अगदीं व्हाइसरॉय केलें म्हणून तो आपल्या सिंहासनाखालून जादूनें बाँबगोळे निर्माण करील असें नाहीं. अशा स्थितींत परचक्र आलें तर काय करायचें हा सरकारचाच केवळ प्रश्न नसून जनतेचाही आहे. आणि शस्त्र नसलेल्या जनतेनें निःशस्त्र प्रतिकाराची संघटना करणें एवढेंच स्वाभाविक व शक्य आहे. येथें हिंसाअहिंसा हा तात्त्विक वाद येत नाहीं. अशा संघटनेस प्रत्यक्ष मदत करण्याचें सोडून गांधी नुसतीच सत्याग्रहाची जपमाळ ओढीत बसण्याइतके मंत्रचळे नाहींत. 'गांवोगांव जीं माणसें वरील प्रकारच्या कार्यास अवश्य आहेत त्यांना मी सत्याग्रहास पाठविणार नाहीं' असें गांधींनीं सांगितलें आहे तें याच अर्थानें होय.

तरी पण एक विशिष्ट कुप्रसंग उद्भवण्याचा संभव दिसत असून त्याच प्रसंगासाठीं गांधींना आपण सोडीत आहों असें नेहरूंना म्हणावें लागलें असें दिसतें. गांधी आणि नेहरू यांचे तात्त्विक मतभेद त्यांच्या सहकार्याइतकेच जुने आहेत. ते त्यांनीं आपल्या स्थायी स्वरूपाच्या लिखाणांत नमूद केलेही आहेत. पण प्रत्यक्ष व्यावहारिक दृष्ट्या गांधींच्या नेतृत्वाखालीं राजकारणाची प्रगति होत असतां उठल्या सुटल्या मतभेद दाखविण्याचें वेड अथवा व्यसन नेहरूंनीं लावून घेतलेलें नाहीं. गेल्या वीस वर्षांत नेहरू-गांधींचा अमूल्य एकोपा यामुळें टिकला व दुसऱ्या कशानेंही झाली नसती इतकी प्रगति या एकोप्यामुळें झाली. आतां मात्र हा मतभेद दाखविणें जरूर अशी कुवेळ येऊं घातली आहे. अशी ही कुवेळ कोणती ? आमच्या लेखणीमागें

कायद्याचे लगाम आहेत. त्यांच्या कैचींतून लिहितां येईल तेवढें लिहितों. लिहिलें आहे त्याहून वाचकांनीं अधिक समजून घ्यावें.

* * *

मलयांत ब्रिटिशांची पीछेहाट होत आहे. ही होतां होतां कोठवर येईल हें कोणीं सांगावें? पार्लमेंटचा सल्ला घेणें अशक्य होईल तर तो न घेतां व्हाइसरॉयनीं राज्य कसें करावें याची तरतूद अमेरींनीं केली आहे. पण व्हाइसरॉय अथवा गव्हर्नर यांचाही सल्ला स्थानिक अधिकाऱ्याला घेतां न आला तर? आणखी जरा स्पष्ट बोलायचें म्हणजे पीछेहाट पावणाऱ्या सैन्यालाच, केवळ अधिकाऱ्यांचे हुकूम धीर धरण्यास अपुरे पडून राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तोंडाकडे सैन्यानें काकुळतीनें पाहिलें तर? सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं सैन्याचा धीर खचूं नये, राष्ट्ररक्षणापासून त्यांनीं परावृत्त होऊं नये अशासाठीं अशा वेळीं सैन्याचें नेतृत्व घेण्याची तयारी काँग्रेसनें दाखविली नाहीं तर राष्ट्राचा व सैन्याचा काँग्रेसनें विश्वासघात केला असें जनतेला व सैनिकांना वाटेल. त्याचा परिणाम फार भयंकर होईल. अशा वेळीं गांधी काय करतील हें कोणासच माहीत नाहीं. आपण सशस्त्र प्रतिकाराच्या वाऱ्यासही उभे राहणार नाहीं एवढें अकरणात्मक धोरण त्यांनीं सांगितलें आहे. आझाद व नेहरू यांजसारख्या राजकीय दृष्ट्या सर्व धोरणांचा विचार करणाऱ्या पुढाऱ्यांनीं अशा प्रसंगास आमची तयारी आहे हें जनतेस सांगणें अवश्य आहे. खरोखरच सैन्य व युद्धकार्य यांचें नेतृत्व काँग्रेसकडे कोणत्या कायद्यानें येणार हें आज सांगतां येत नाहीं. व्हाइसरॉय आपल्या हातानेंच तें देईल असें समजूं, अथवा 'सिंहाला जंगलराज्याची गादी कोणी देत नाहीं, पराक्रमानें तो ती मिळवतो' हें सूत्रवाक्य ध्यानांत ठेवूं. गांधींना नेतृपदापासून निवृत्त होण्याची परवानगी काँग्रेसनें दिली ती या सर्वभयानक प्रसंगास तोंड देतां यावें म्हणून दिली. पण या एका प्रसंगाखेरीज बाकीच्या हजारों प्रसंगीं व स्थळीं गांधींचें साहाय्य अपरिहार्यच आहे.

* * *

स्वतां गांधींना या सर्व संकटाची जाणीव आहे. त्यांनीं दिलेल्या मुलाखतींत सरकारनें काँग्रेसच्या धोरणास अनुकूलता दर्शवावी असें जें म्हटलें आहे तें काँग्रेसला करतां येईल तें सर्व साहाय्य करण्याच्या बुद्धीनेंच म्हटलें आहे.

आपल्या एकनिष्ठ अनुयायांना आजच काँग्रेस सोडून न जातां काँग्रेसशीं सहकार्य करण्यास त्यांनीं सांगितलें आहे. काँग्रेसची एकजूट फुटलेली नाहीं, उलट जास्तींत जास्त एकजुटीनें कार्य करण्याची वेळ आली आहे. काँग्रेसनें कृतीचा आराखडा दिला आहे; सेवादलसंघटना, ग्रामोद्योग, खेड्यांत जागृति, शहरांत संरक्षणाच्या तजविजी वगैरे सर्व गोष्टी काँग्रेसनें करावयाच्या आहेत. देश आपला आहे. सरकारकडे न पाहतां आपण आपली संघटना करणें अवश्य होत आहे, स्वातंत्र्य मागण्याची वेळ जात चालली असून लोखंडाच्या तापलेल्या गोळ्याप्रमाणें तें डोकीवर कोसळूं पाहत आहे. अधांतरीं हवेंत झेलून तें पोळत्या हातांतच चोळून चोळून निवविलें नाहीं तर राष्ट्रीय जीवनाचा चक्काचूर झाल्यावांचून राहणार नाहीं. काँग्रेसनें अतिशय जबाबदारीची आणि सरकार व जनता या दोघांच्या हिताची भूमिका घेतली आहे. सरकारनें खोट्या इभ्रतीच्या घोड्यावर बसून भारत संरक्षण कायद्याच्या तरवारीनें लढण्याची ऐट न दाखवतां काँग्रेसचें स्वाभिमानाचें सहकार्य स्वीकारावें. खुद्द इंग्रजांचे न्याय्य हितसंबंध शाबूत राहण्यासही आतां एवढा एकच मार्ग आहे.

—लोकमान्य, १ जानेवारी १९४२

## वर्ध्याच्या रणांगणावरील उभय पक्षांचें स्वरूप : : १४

बार्डोलीस कॉंग्रेस वर्किंग कमिटीनें जो ठराव केला तसा सर्वोत्तम ठराव झाल्यावरही त्याच्या पाठींत वार करून तो ठराव उलथून पाडण्याचा खटाटोप कांहीं मतलबी पुढाऱ्यांकडून केला जात आहे हें देशाचें दुर्दैव होय. या दुर्दैवाची परमावधि होत आहे ती ही कीं, महाराष्ट्रांतले कांहीं सत्याग्रहवादी भोळे तत्त्वज्ञ आणि कांहीं कॉंग्रेस सोशॅलिस्टही या खटाटोपी कारस्थानांत सांपडत आहेत. बार्डोलीचा ठराव उलथून पाडून पं. नेहरूंचा पाडाव करावा यासाठीं जें कारस्थान रचलें जात आहे तें अतिशय खुबीचें आहे. बार्डोलीच्या ठरावांत सरकारशीं युद्धसहकार्य करण्याची भाषा कोठेंही नाहीं. त्या ठरावाचें समर्थन पं. नेहरू स्वतः सर्वथैव करीत आहेत. असें असतांही राजगोपाळाचारी जो चुकीचा अर्थ त्यावर लादीत आहेत तोच त्याचा खरा अर्थ असें सोइस्करपणें मानून बार्डोली ठराव ही राजाजींची भूमिका असल्याचें भासविण्यांत येत आहे. आणि त्यावरून 'बार्डोली पक्ष वि. विरोधी पक्ष' म्हणजे 'राजाजी पक्ष वि. वल्लभभाई-देव-राजेंद्र पक्ष' असा हा वाद बार्डोलीस होणार असा गैरसमज कांहीं लोक भोळेपणानें व कांहीं मुत्सद्देगिरीनें पसरवीत आहेत. वर्ध्यास जाणाऱ्या प्रतिनिधींचा असा गैरसमज यशस्वीपणें

करतां आल्यास कॉंग्रेसपैकीं कम्युनिस्टांखेरीज कोणीही बिनशर्त युद्धसहकार्यास तयार नसल्यानें बार्डोली ठराव सहज उलथून पाडला जाईल आणि पुढारी-पणाच्या किल्ल्यांचा हातपालट होण्याचा धोका टळेल असें या कारस्थानाचें स्वरूप आहे.

* * *

वर्ध्यास रण माजावें व त्यास तीव्र स्वरूप यावें हें आम्हांस मुळींच इष्ट वाटत नांहीं. तथापि अशा प्रसंगीं, आपला नेहमीं ज्यांच्याशीं संबंध येतो, सत्य, अहिंसा व साधुत्व यांची मक्तेदारी आपणाकडेच आहे असें जे वेळीं अवेळीं शब्दांनीं व पेहरावानें दाखवीत असतात तीं माणसें खरोखर कशीं असतात हें समजून घेणेंही अत्यवश्य आहे. शिवाय ज्यांनीं या ना त्या पक्षाला मतें द्यायचीं त्यांनीं तीं वस्तुस्थितीबद्दल गैरसमज करून घेऊन देऊं नयेत अशीही आमची इच्छा आहे. म्हणून वर्ध्यास ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक भरण्यापूर्वी वादांतील उभय पक्षांच्या खऱ्या भूमिका काय आहेत हें येथें आम्ही एकवार स्पष्ट करणार आहों. आमचा पहिला मुद्दा असा आहे कीं, बार्डोली ठराव कोणींही लिहिलेला असो, त्यांतील प्रत्येक शब्द नेहरूंना मान्य आहे. नेहरू व आझाद रोज एकमुखानें निरनिराळ्या ठिकाणीं त्या ठरावाचें समर्थन व खुलासा करीत आहेत. ठरावाच्या भाषेंत बसणाराच अर्थ ते सांगत आहेत. स्वतंत्र हिंदुस्थानच राष्ट्ररक्षणाची जबाबदारी घेईल असा त्या ठरावाचा अर्थ आहे व तोच ते सांगत आहेत. राजाजी सहकार्याच्या ज्या अटी सांगतात तो अर्थ त्यांतून मुळींच निघत नाहीं. अर्थात् स्वतंत्र भारताचें रक्षण आजच्या परिस्थितींत शस्त्रास्त्रें घेऊन करणार असें आझाद व नेहरू यांचें म्हणणें आहेच हें खरें, पण तेवढ्यामुळें राजाजी व नेहरू या दोघांच्या भूमिका एक होत नाहींत. शिवाय राजाजी बार्डोली ठरावाचा अर्थ कांहींही करोत, ठरावां-तील स्पष्ट शब्दांस संमति देतांना ते नेहरूंना शरण गेले आहेत. म्हणून ठरावांत व्यक्त होणारी भूमिका नेहरूंची व आझादांची आहे हें उघड होय.

* * *

म्हणून बार्डोली ठरावावर होणाऱ्या रणांतील एक बाजू युद्धसहकार्याची म्हणजे राजाजींची व दुसरी बाजू असहकार्याची म्हणजे पटेलांची असा समज कोणींही करून घेऊं नये. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अहिंसेचा. गांधी हे

कृतिशूर आहेत. त्यांच्या अहिंसानिष्ठेवर आमचा आक्षेप नाहीं, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष अहिंसाआचरणाचा जो कार्यक्रम ते आंखीत आहेत त्याला सर्व प्रकारचा पाठिंबा देणें अवश्य असल्याबद्दल आम्हांला खात्री आहे. पुरेशीं शस्त्रास्त्रें नसलेल्या राष्ट्रानें परचक्रापुढें लोटांगण घालायचें नसेल तर निःशस्त्र प्रतिकाराची संघटना हा एकच मार्ग असतो. गांधी या दृष्टीनें प्रत्यक्ष कार्यक्रम पुढें मांडीत आहेत. पण हा कार्यक्रम हातीं घेण्यास बार्डोलीचा ठराव उलथला पाहिजे असें खुद्द गांधींनाही वाटत नाहीं. शंकरराव देव, सरदार पटेल, राजेंद्रबाबू यांपैकीं ज्या कोणाला गांधींचा हा कार्यक्रम पसंत असेल त्यांनीं तो ताबडतोब हातीं घ्यावा आणि काँग्रेसमधील सर्वांनीं त्यांच्या निशाणाखालीं जमावें हें इष्ट आहे. खरोखर शस्त्रास्त्रांनीं राष्ट्ररक्षण करण्याचा प्रश्न तूर्त तरी तात्त्विकच असून निःशस्त्र प्रतिकाराची संघटनाच आज सर्वांनीं करणें अवश्य आहे. याचसाठीं अहिंसाप्रधान अशी स्वयंसेवकसंघटना जागोजाग उभारण्याची खटपट नेहरू करीत आहेत. ज्यांच्या टाळयास बार्डोलीचा ठराव अगदींच चिकटत असेल, ज्यांना त्यांत हिंसेची घाण येत असेल त्यांनीं हें अहिंसाप्रधान संघटनेचें काम तांतडीनें हातीं घ्यावें. तें ज्या मानानें यशस्वी होईल त्या मानानें हिंसेची गरजही कमी होईल.

* * *

पण खरोखर बार्डोलीचा ठराव हिंसावादी आहे म्हणून त्यास आपण विरोध करतों असें म्हणणारे देव, पटेल, राजेंद्रबाबू, बाळासाहेब खेर हे स्वतां कोण आहेत ? त्यांनीं आपल्या धोरणांत निर्भेळ अहिंसा पाळली आहे काय ? गेलीं वीस वर्षें आम्हीं अहिंसा पाळली असें राजेंद्रबाबू व देव म्हणतात. इतकीं मोठीं माणसें ढोंगी आहेत अथवा खोटें बोलतात असें कसें म्हणावें ! पण धर्मराजसुद्धां खोटें बोलला तेव्हां इतर कोणाची कथा काय ? वीस वर्षांत सत्याग्रहांच्या प्रसंगीं काँग्रेसनें अहिंसा पाळली हें खरें. पण राज्यकर्ते या नात्यानें जेव्हां सत्ता गाजविण्याची पाळी आली तेव्हां वरीलपैकीं प्रत्येकानें गोळीबाराचेंही समर्थन केलें. एकदां काँग्रेस-मंत्र्यांनीं केलेला गोळीबार तर अन्याय्य होता. सध्यां काँग्रेस अधिकारस्वीकार करील तर पुन्हा पार्लमेंटरी बोर्डांत, मंत्रिमंडळांत अथवा अप्रत्यक्ष नियंत्रकांत हींच माणसें नेमकीं आढळतील. खरोखर बार्डोली ठराव उलथून पाडण्यांतही हेतु दिसतो तो हा कीं,

काँग्रेसपासून गांधी थोडे दूर झाल्यास आपलीं सत्तापदें डळमळतील आणि मग त्यामुळें देशाचा घात होईल असें यांना प्रामाणिकपणें वाटतें. सारांश, बार्डोली ठरावास अहिंसेच्या नांवानें विरोध करणाऱ्यांना आपल्यावांचून काँग्रेसचें व राष्ट्राचें वाटोळें होईल अशी भीति वाटते म्हणून त्यांना बार्डोली ठराव उलथून पाडून गांधींचें व मग आपलेंही स्थान आणि अर्थात् राष्ट्राचें कल्याण टिकवावयाचें आहे. हिंसा-अहिंसावाद हा खरा नव्हे. सुदैव आहे तें हें कीं, बार्डोली ठराव उलथला गेला तरी त्यानें घालून दिलेला कार्यक्रम अमलांत आणण्यास कोणीही हरकत घेऊं शकत नाहीं, म्हणून वर्ध्याच्या रणाकडे पाठ फिरवून कार्यकर्त्यांनीं आतां कामाला लागावें.

—लोकमान्य, १४-१-४२

# मलायांतील पीछेहाटीनें काय शिकविलें? : : १५

**"मलायांत ब्रिटिश साम्राज्यास ज्या अडचणी येत आहेत त्या तेथील धनोत्पादन-साधनांचे मालक राष्ट्ररक्षणापेक्षां स्वतःच्या नफ्याची काळजी अधिक घेतात यामुळें येत आहेत."**

**—ऑस्ट्रेलियन मुत्सद्दी मि. फॉल यांचे उद्‌गार.**

मलायांत ब्रिटिशांची जी पीछेहाट होत आहे ती जशी अनपेक्षित तशीच चिंताजनक आहे. सिंगापूरचा आरमारी तळ, वैमानिक तळ, आणि इतर सर्व प्रकारचीं तेथलीं संरक्षणसाधनें अभेद्य आहेत असा गिल्ला आज कित्येक वर्षें चालू आहे. तो खरा कीं खोटा हें अजून ठरायचें आहे. पण सिंगापूरवर समुद्राकडून नव्हे तर जमिनीकडून, मलाया द्वीपकल्पांतून हल्ला होत आहे आणि जमिनीचे बाजूस सिंगापूरची मजबुती असावी तशी नाहीं. यामुळें सिंगापूरचें यशस्वितेनें रक्षण करतां न आल्यास तें आपल्याच हातांनीं उध्वस्त करावें लागणार अथवा शत्रूच्या हवालीं–सुपूर्त करावें लागणार असा दुर्धर प्रसंग ब्रिटनवर आला आहे. ब्रिटनप्रमाणेंच ऑस्ट्रेलियन सरकारही या भावी संकटामुळें फार घाबरलें आहे. पण ऑस्ट्रेलियन मुत्सद्दी सीनेटर फॉल

यांनीं मलायांतील पीछेहाटीची जी मीमांसा केली आहे ती ऑस्ट्रेलिया व ब्रिटन यांच्या घाबरगुंडीपेक्षां अधिक महत्त्वाची आहे. जहाज बुडत असतां धीर खचून व भांबावून जाऊन जो माणूस बुडत्या जहाजालाच चिकटून राहतो त्याचें भवितव्य त्या जहाजाबरोबर बुडून मरणें हेंच असतें. पण जहाज बुडत आहे त्याला सोडून देऊन तुफान समुद्रांत जो होडी सोडतो—लाकडाचा ओंडा पकडतो अथवा दुसरें कांहीं तरंगणारें साधन पकडून झगडण्याची सिद्धता करतो तो जगण्याचा संभव असतो. निदान मरण अपरिहार्य ठरलें तरी लढत लढत मरण्याचा त्याचा आनंद कोणीही हिरावून घेत नाहीं. सीनेटर फॉल यांनीं मलायांतील पीछेहाटीची केलेली मीमांसा हें केवळ एक रडगाणें नव्हे. पीछेहाटीची ती शास्त्रशुद्ध चिकित्सा आहे. त्यांची इच्छा असो नसो, हल्लींच्या अनर्थांतून सुटण्याचा एक महत्त्वाचा मार्ग त्या चिकित्सेंतून सूचित होत आहे.

* * *

सीनेटर फॉल यांचे उद्गार वर आम्हीं दिलेच आहेत. मलायांत रबराच्या इस्टेटी प्रचंड असून या रबराच्या मळेवाल्यांत जपानी, चिनी, मलायी, ब्रिटिश, ऑस्ट्रेलियन वगैरे सर्व देशचे भांडवलदार आहेत. हिंदुस्थानांत ज्या प्रकारचे सातशें संस्थानिक आहेत, तसेच अनेक संस्थानिक तेथें असून ब्रिटिशांनीं त्यांच्या रक्षणाची जबाबदारी घेतली आहे व या सर्व संस्थानिकांची संयुक्त घटना बनून मलाया फेडरेशन झालें आहे. यांतील सामान्य जनतेला, भांडवलदारांना अथवा संस्थानिकांना स्वदेशरक्षण करणें म्हणजे काय, तें कां करावें आणि स्वदेशाभिमान कशाशीं खातात यांपैकीं कशाचीही जाणीव नाहीं. गोठ्यांतलीं गुरें जशीं पराधीन असतात, निरभिमानी असतात आणि दावें धरून सोडणारा मारील त्याची हमाली करतात, तसें वर्तन मलायांतील जनता करीत आहे. या गुरांच्या अंगावरील गोचिंड्या त्यांचे अंगावर बसून जसें रक्त शोषीत व लठ्ठ होत असतात तसें मलायांतील भांडवलदार रबर उत्पन्न करण्याचे कामीं जनतेला राबवून तिचें रक्त शोषीत आहेत. गुरें हीं कोणाच्या मालकीचीं आहेत याची गोचिड्यांना जशी पर्वा नसते, तशींच मलायन जनतेवर राज्य कोणाचें आहे याची पर्वा मलायन भांडवलदार करीत नाहींत. आणि सोनेरी पिंजऱ्यांतील हिऱ्याच्या काकणावर बसून झोके घेत घेत मधुर फळें आयतीं

खाणारा पोपट ज्याप्रमाणें आपला पिंजरा काल कोणाचा होता, आज कोणाचा आहे व उद्यां आपणास कोण संभाळणार याबद्दल बेगुमान असतो, त्याप्रमाणें मलायांतील अनेक सुलतानांची अवस्था आहे. गुरें, गोचीड आणि पोपट यांचा मालक जो गुराखी त्याच्या घरावर दरोडा पडला तर गुरें, गोचीड आणि पोपट दरोड्याचा प्रतिकार करूं शकणार नाहींत; त्यांना असली कांहीं जाणीव असणेंही अशक्य आहे.

* * *

आम्हांला कांही तरी अलंकारिक लेखनाची लहर आली म्हणून आम्ही हें लिहीत नाहीं. सिनेटर फॉल यांनीं अल्प शब्दांत जें सांगितलें त्याचाच हा जरा स्पष्ट व कांहींसा क्रूर दिसणारा खुलासा आम्ही येथें करीत आहों. आम्हांस जी गोष्ट येथें ठासून सांगायची आहे ती ही कीं, इंग्लंडचें शस्त्रास्त्रबल कमी पडलें म्हणून मलायांत इंग्लंडला माघार घ्यावी लागत आहे, या मुद्द्यापेक्षां मलायांतील गोचीडवृत्तीच्या भांडवलदारांच्या नफेबाजीमुळें आपला पराभव होत आहे ही गोष्ट सीनेटर फॉल यांना महत्त्वाची वाटते. ही नफेबाजीची वृत्ति आजकाल मलायांतच प्रथम उत्पन्न झाली असें नव्हे. आजच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समाजाच्या बुडाशीं आरंभापासूनच ही वृत्ति गोचिडीप्रमाणें डसलेली आहे. जपान व जर्मनी यांचें सर्व शस्त्रास्त्रबल विदेशी धनिक राष्ट्रांतल्या धनिकांनीं त्यांना दिलेल्या भांडवलांतून व कर्जांतून निर्माण झालें आहे. जपानचा हल्ला ब्रिटिश साम्राज्यावर होणार हें गेलीं दहा वर्षें उघड दिसत असतां, जपानला ब्रिटिश-अमेरिकन धनिकांनीं सर्व प्रकारचें युद्धसाहित्य पुरविलें आणि तें केवळ खासगी नफ्यासाठीं पुरविलें. जर्मनी व जपान येथें शस्त्रास्त्र-कारखाने जोरांत चालू असतां ब्रिटिश शस्त्रास्त्र-धंद्यांत आणि इतर सर्व कारखानदारींत बेसुमार बेकारी माजून जहाजें बांधण्याच्या गोद्या व सर्व प्रकारचे कारखाने उजाड पडले होते. युद्ध सुरू होऊन एक वर्ष होऊन जाईपर्यंत इंग्लंडांत ही परिस्थिति पालटली नाहीं. युरोपांतील युद्ध सुरू होऊन एक वर्ष झाल्यावरही इंग्लंड, हॉलंड व अमेरिका यांतून जपानला सर्व युद्धसाहित्य मिळत होतें. सीनेटर फॉल यांना मलायांत दिसणारा रोग सगळ्या जगांत असून मलायांत फक्त त्याचें गळूं पिकलेलें दिसत आहे.

* * *

'हीं जुनीं गाऱ्हाणीं आज उकरून काढून युद्ध जिंकण्यास काय मदत होणार? आधीं शस्त्रास्त्रें वाढवून युद्ध जिंकूं या, मग नवी समाजरचना करूं" असें आतां सर्वजण सुचवीत आहेत. पण शस्त्रास्त्रें वाढवावयाचीं तरी त्याला हा जुना रोगच आड येईल. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांपुरतेंच बोलायचें म्हटलें तरी दोन्ही देशांत पगारखाऊ नोकरशाही आणि नफाखाऊ भांडवलदार यांच्याच हातीं राज्यसत्ता व युद्धतंत्र आहे. युद्ध जिंकण्यासाठीं कार्यक्षमता वाढविण्यापेक्षां या नोकरशाहीची नजर लठ्ठ पगार शाबूत ठेवण्यावर अधिक आहे, अशी कबूली आतां 'टाइम्स ऑफ इंडिआ'नेंही दिली आहे. सरकारला भांडवलदारांकडून मिळणारें युद्धसाहाय्य हेंही स्वातंत्र्यप्रीतीनें मिळत नसून नफ्याच्या लोभानें मिळत आहे. जमीनदार व संस्थानिक यांना पिंजऱ्यांतल्या पोपटाहून अथवा मलायांतील संस्थानिकांहून अधिक किंमत देतां येणार नाहीं. कोट्यवधि शेतकऱ्यांना 'कर्ज' नांवाचा धनप्रकार तेवढा माहीत आहे. युद्ध जिंकण्यास ही सगळी संघटना कुचकामाची आहे. युद्ध संपल्यावर नव्हे तर युद्ध जिंकण्यासाठीं जनतेचा स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रेम जागृत करून जबरदस्त तयारी करतां यावी म्हणूनच ही संघटना मोडली पाहिजे. सोशॅलिझम अथवा कम्युनिझमचें कोलीत येथें आम्ही दाखवीत नाहीं. सीनेटर फॉल हे कांहीं कम्युनिस्ट नव्हेत. परिस्थितीचा हा रोकडा सवाल आहे. युद्ध जिंकण्यासाठीं कॉंग्रेसनें हल्लींच्या मध्यसत्तेंत शिरावें असें जे म्हणतात त्यांना हल्लींची मध्यसत्ता किती कुचकामाची आहे आणि जनतेच्या पुढाऱ्यांना केवढी प्रचंड उलथापालथ युद्ध जिंकण्यासाठींच करावी लागणार आहे याची कल्पनाच नाहीं.

—लोकमान्य, २४-१-४२

# नवें जग आणि नवीं तत्त्वें : : १६

“ महायुद्धांतून जें नवें जग निर्माण होत आहे त्यांत कोणतीं तत्त्वें टिकून राहतील आणि कोणतीं तत्त्वें ( नवीं वा जुनीं ) नव्या जगाच्या प्रस्थापनेसाठीं आणि अभिवृद्धीसाठीं उपयोगी पडतील ” या प्रश्नांची चर्चा करण्यास मला माझे मित्र प्रभाकर पाध्ये यांनीं सांगितलें आहे. खरोखर हिमालयाला घेरण घेतण्यासारखा हा प्रचंड विषय आहे. स्वतांच्या गाढ विद्वत्तेबद्दल आणि मुत्सद्दीगिरीबद्दल पुरेशी खात्री ( अथवा पुरेसा भ्रम ) असल्याविना हा विषय कोणीं हाताळूं नये असें एखाद्यास वाटेल. पण व्यवहाराचा अनुभव जसजसा अधिक येऊं लागतो तसतसें असें वाटूं लागतें कीं, निवळ व्यावहारिक विषयांत एखाद्या पंडितापेक्षां व मुत्सद्द्यापेक्षां सामान्य माणसास पुष्कळदां अधिक कळतें. व्हर्साय तहापासून चालू महायुद्धापर्यंत पंडितांनीं व मुत्सद्द्यांनीं किती मूर्खपणा व आततायीपणा केला हें पाहिलें म्हणजे सामान्य माणसास आपण कांहीं फारच फार मूर्ख नाहीं अशी खात्री वाटूं लागते. पंडितांनींही ग्रंथांचीं केलेलीं पारायणें थोडा वेळ बाजूस ठेवून व्यवहारी माणसाशीं जिव्हाळ्यानें बोलणें केलें तर व्यावहारिक अडचणी दूर करण्याचा मार्ग त्यांना लवकर सुचतो. सामान्य माणसें जितक्या अधिक प्रमाणांत विचार करूं लागतील, बोलूं लागतील, विचार आचरणांत आणून स्वतः अनुभवतील

चुक्या निरहंकारपणें कबूल करून दुरुस्त करतील, तितक्या प्रमाणांत शांतता, संस्कृतिविकास व लोकशाही यांचा विकास अधिक होईल. म्हणून केवळ विचार करण्याची थोडीशी संवय असलेला एक सामान्य नागरिक या नात्यानें मी या जगड्व्याळ विषयाची चर्चा येथें करणार आहे.

* * *

या लेखांत मी लिहितों आहें ते माझे पक्के ठाम विचार असतील असें मला वाटत नाहीं. 'माझे विचार पक्के होण्यासाठीं मी ही प्रस्तावना लिहितों' असें प्रो. वा. म. जोश्यांनीं एक प्रस्तावना लिहितांना म्हटलेलें आहे. पण मी हा लेख लिहितांना जे विचार माझ्या लेखणींतून उतरणार आहेत (अजून मलाही ते सगळे माहीत नाहींत) ते विचार लिहून झाल्यावरहि माझे पक्के ठरलेले असतील अशी मला खात्री वाटत नाहीं. पूर्ण विचार केल्यावांचून लिहूं नये आणि जें लिहिलें तें भावी पिढ्यांनाही मार्गदर्शक होईल असें लिहावें हा उपदेश फार चांगला आहे. पण वृत्तव्यावसायिकाला हा उपदेश कोणींही करूं नये. रोज सकाळीं उठल्याबरोबर ज्याला 'ठाम विचारा'चें नवें पार्सल वाचकासाठीं उलगडावें लागतें तो पूर्ण विचार करणार केव्हां आणि त्यानें छापलेली 'पलावळ' पुढील पिढी मोठी होईपर्यंत शिल्लक ठेवणार कोण ? रोजच्या मामुली व्यवहारासंबंधानें कांहींसें निश्चयानें बोलतां येतें. (निदान तसा आव आम्हांला आणावा लागतो.) पण माझ्यापुढें असलेल्या जगड्व्याळ विषयासंबंधानें असें ठाम बोलतां येणार नाहीं, किंबहुना एकट्यानें मनांतल्या मनांत पुरेसा विचारही करतां येणार नाहीं. म्हणून कांहींसा 'मोठ्यानें विचार करण्या'च्या हेतूनेंच मीं हा लेख लिहिण्याचें पत्करलें आहे. अनेकांनीं अनेक विचार जसे मनांत येतील तसें बोलण्यानें विचारविनिमय शांतपणानें व खेळीमेळीनें होतो, ठाम विचारानंतर येणारा अहंकार व दुराग्रह अशा विचारविनिमयांत येत नाहीं आणि सर्वांच्या मतांत थोडा थोडा बदल होऊन शेवटीं सामुदायिक निर्णय ठरतो तो जास्तींत जास्त सर्वसंमत व शहाणपणाचा असतो. मला स्वतःला 'ठाम मत'वाल्यांची धास्तीच वाटते. आणि स्वतः या 'ठाम मत'वाल्यांना वेताच्या लवचीक खुर्चीवर बसल्याचा आनंद कधींही भोगतां येत नसून पायापासून डोकीपर्यंत लोखंडी पहारीला बांधून घातलेल्या कैद्याप्रमाणें त्यांना ताटकळल्यासारखें वाटत असावें असा माझा समज आहे. असो.

* * *

चालू युद्धानंतरच्या जगापुढें कोणता एक प्रश्न प्रामुख्यानें मांडलेला असेल तर 'युद्धें कशीं थांबवावीं ?' हा तो प्रश्न होय. हिंदुस्थानांत काँग्रेसचे पुढारी व पत्रकार या प्रश्नाचें उत्तर 'आमच्या महात्माजींची अहिंसाच युद्धें थांबवील' असें अगदीं दडपून देत असतात. आणि आजच्या अग्रलेखांत गांधींच्या अहिंसेची टाळी पिटल्यानंतर उद्यांच्या अग्रलेखांत हिटलरच्या शौर्याची व हिंसेची थाळी पिटण्यांत त्यांना कांहींही विसंगति वाटत नाहीं. खुद्द गांधींना आणि त्यांच्या दूरच्या व जवळच्या उपासकांना आणि पुजाऱ्यांना असे अप्रामाणिक टाळपिटे अधिक विश्वसनीय वाटतात. अहिंसेचे विवेकी आक्षेपक आणि विवेकी उपासक यांना विस्मृति अथवा उपेक्षा यांच्या केरांत ते लोटीत असतात. पण खरोखर जे विवेकी असतील त्यांनीं या पुजाऱ्यांची पर्वाही करूं नये आणि त्यांचा हेवाही करूं नये. पंढरपूरला जाणाऱ्या यात्रेकरूंत अस्पृश्य हेच खरे भक्तिमान् होत. बडवे त्यांना देव पाहूं देत नाहींत आणि बडव्यांच्या गराड्यांतून देव या अस्पृश्य भक्तांना भेटायला कधीं बाहेर येत नाहीं. पण अस्पृश्य वारकरी दोघांचीही पर्वा अथवा हेवा करीत नाहींत. ते शेंकडों मैलांवरून पंढरपुरास येतात तें फक्त देवळाच्या कळसाचें दर्शन घेण्यासाठीं येतात आणि दर्शन घेऊन समाधानपूर्वक परत जातात. मी स्वतः गांधींच्या अहिंसेचा असा अस्पृश्य वारकरी म्हणजे विवेकी आक्षेपक व विवेकी उपासक असावा असें मला अलीकडे भासत आहे. 'अलीकडे' म्हणण्याचें कारण माझे यासंबंधींचे विचार गेल्या दोन-अडीच वर्षांपासून अधिक स्पष्टपणें माझे मलां ऐकूं येऊं लागले आहेत. "गांधींनीं तरुणांना स्वार्थत्याग करून राजकारणांत खेचलें एवढा एक मुद्दा सोडला तर गांधींच्या राजकारणांतील प्रत्येक बाबीनें हिंदी राष्ट्राचें पाऊल राजकारणांत मागें खेचलें आहे." अशा अर्थाचें एक विधान मी माझ्या 'समाजवादाचा ओनामा' या पुस्तकांत ६ वर्षांपूर्वी केलें तें अगदीं चूक आहे. त्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींतही मीं तें विधान शिल्लक ठेवलें. इतकें भयंकर व चुकीचें विधान मीं त्या पुस्तकांत कसें केलें असेल हें माझें मलाच आतां उलगडत नाहीं. तें असो. माझें आतां म्हणणें असें कीं, 'अहिंसा-तत्त्व' ही फार मोठी देणगी गांधींनीं जगाला दिली आहे यांत संशय नाहीं. ख्रिस्त, बुद्ध, टॉलस्टॉय वगैरे ऐतिहासिक थोर पुरुषांनीं हीच शिकवण जगाला दिली. पण गांधींनीं अनेक प्रकारें तिचा आचार हजारों लोकांना करायला

लावून लक्षावधि लोकांना तिजसंबंधीं विचार करायला लावलें आहे. 'अहिंसेनें हिंदुस्थानला स्वराज्य मिळालें नाहीं हाच अहिंसा फसल्याचा पुरावा होय' असें जयकर म्हणतात. अगदीं वेडगळपणाचें हें बोलणें आहे. एखाद्या उत्कृष्ट औषधानेंही एकाद्याचा रोग बरा न झाला तर तेवढ्यावरूनच तें औषध निरुपयोगी आहे असें म्हणतां येत नाहीं. जयकरांसारख्या न्यायाधीशानें तरी पुरेशा व शास्त्रशुद्ध पुराव्यावांचून अहिंसेला इतकें सहजपणें फांशी द्यायला नको होतें.

* * *

मला स्वतःला गांधींच्या भूमिकेंत दोष दिसत नाहींत असें नाहीं. पण अहिंसेवांचून जगाची धडगत नाहीं अशी माझी खात्री होत चालली आहे. आज हिंदुस्थानपेक्षां युरोप खंडांतील राष्ट्रांची परिस्थिति अधिक करुणाजनक आहे. युरोपीय जनता यापुढें हिटलरशीं शस्त्रास्त्रांनीं लढून स्वतंत्र होईल ही आशा व्यर्थ होय. कोणा परकी राज्यसत्तेकडून हिटलरशाहीचा शस्त्रबलाच्या जोरावर पाडाव झाला तर त्या राज्यसत्तेचें प्रचंड शस्त्रास्त्रबल युरोपच्या उरावर बसेलच. हे नवे राज्यकर्ते अनेक युरोपीय राष्ट्रांना खुषीनें शांतता व लोकशाही निर्मून देतील तर तें त्यांचें भाग्य होय. पण तसें त्यांनीं न केलें आणि हिटलर-सारखाच जुलमी अंमल युरोपवर स्थापला तर युरोपीय जनता काय करील याचा विचार मी करतों आहें. अशा कोणत्याही शस्त्रास्त्रसत्तेस उद्देशून मी 'हिटलरशाही' हा शब्द आतां केवळ सांकेतिक म्हणून वापरतों. मला वाटतें बाहेरून कोणी कितीही शस्त्रास्त्रांचा पुरवठा केला तरी 'हिटलरशाही'च्या रुळाखालीं सांपडलेल्या पंचवीस कोटि ( मी यांत जर्मनांचाही अंतर्भाव करतों ) जनतेला त्या शस्त्रास्त्रांच्या बलावर आपला राजकीय मोक्ष घडवून आणतां येणार नाहीं. महाराष्ट्र इंग्रजांसाठीं महारांनीं जिंकला याबद्दल आंबेडकरांना मोठा अभिमान वाटतो आणि इंग्रजांनीं हा उपकार विसरूं नये म्हणून ते सरकारला मोठा इशारा देत असतात. हिंदुस्थानांत अस्पृश्य मानलेली महार जात सगळीच कांहीं अशी नाहीं. उलट महाराबाहेरच्या किती तरी जमातींनीं, राजे-रजवाड्यांनीं, सरदार-जमीनदारांनीं सर्व काळीं व सर्व देशांत परकी सत्तेला घरांत घेण्याचें कार्य केलें आहे. हिंदुस्थानांत अस्पृश्यता-निवारण कधींकाळीं झालें तर 'महार' शब्दांतला रूढ ध्वनि सगळा नाहींसा होईल. मला वाटतें,

महार जमातीनें त्या वेळीं आपलें जमात-नांव बदलावें आणि आंबेडकरांसारख्यांना ज्या गुणाचा अभिमान वाटतो त्या गुणाचा निदर्शक म्हणून तो गुण अंगीं असणाऱ्या सर्वांना मग 'महार' हा शब्द लावावा. मला सांगायचें आहे तें हें कीं, युरोपीय जनतेला केवळ परकी 'हिटलरशाही'च्या शस्त्रास्त्रांशींच लढायचें नसून, निरनिराळ्या राष्ट्रांत हिटरशाहीनें शस्त्रास्त्रसज्ज केलेल्या त्या त्या राष्ट्रांतील लक्षावधि 'महारां'च्या ज्या पलटणी त्यांच्याशीं लढावयाचें आहे. सगळ्या युरोपीय राष्ट्रांतल्या या 'महारां'नीं आज आपापले देश हिटलरच्या हवालीं केले असून, या लाखों 'महारां'च्या पलटणी आतां रशियाशीं लढत आहेत. चालू युद्धानंतर जो कोणी युरोपवर शस्त्रास्त्रसत्ता ऊर्फ 'हिटलरशाही' गाजवील त्याला तशी सत्ता गाजविण्यास त्या त्या राष्ट्रांतील या 'महार' पलटणी उपयोगी पडतील. अशा शस्त्रास्त्रसत्तेशीं युरोपीय जनता शस्त्रास्त्रांनीं झुंजू शकेल काय, असा प्रश्न मी माझ्या मनाला विचारीत आहें.

* * *

युरोपीय जनता शस्त्रास्त्रसत्तेशीं शस्त्रास्त्रांनीं झुंजून यशस्वी होईल अशी कल्पनाही मला करवत नाहीं. प्राचीन शस्त्रास्त्रें आणि आधुनिक शस्त्रास्त्रें यांत जो फरक आहे त्यामुळेंच ही गोष्ट अशक्य होत आहे. औरंगजेब व शिवाजी यांच्या शस्त्रास्त्रबलांत फारसा फरक नव्हता. दोघांच्या बंदुकी, तरवारी व भाले जवळजवळ सारख्याच सामर्थ्याचे होते. औरंगजेबाजवळ तोफखाना असेल तेवढा शिवाजीसारख्या सामान्य सरदाराजवळ आरंभीं नव्हता. पण वाहतुकीचीं व दळणवळणाचीं आजचीं साधनें तेव्हां नसल्यानें दिल्लीच्या औरंगजेबाला आपला जुलमी अंमल अगदीं सख्तपणें पुण्याच्या मराठ्यांवर गाजवितां येत नसे. जोतिबा फुल्यांच्या आजोबांनीं सातारा जिल्ह्यांत एका कुलकर्ण्याचा खून केला आणि तेथून पळून ते पुण्यास येऊन राहिले आणि पुढें त्यांनीं पेशव्यांच्या वाड्यांत पार्वतीबाईसाहेबांकडे फुलांचा पुडा पोंहोचविण्याचें काम मिळविलें असा उल्लेख केळकरकृत टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडांत आहे. हें कांहीं अपवादात्मक उदाहरण नव्हे. कोणत्याही राज्यसत्तेचे शासक, अन्याय-निदारक अथवा जुलमी हात त्या वेळीं राज्यसत्तेच्या केन्द्रापासून फार दूरवर पोंचत नसत. हिंदुस्थानांत पूर्वी जुलमी राज्यसत्ता असली तरी राजधानीपलीकडे दूरवरच्या खेड्यापाड्यांतून पूर्ण स्वायत्तता असे, असें मोठ्या अभिमानानें

सांगितलें जात असतें. पण तेव्हां दुसरें कांहींही असूं शकलेंच नाहीं. दूरच्या दिल्लीश्वराचा महाराष्ट्रांतील अधिकारी महाराष्ट्रीय प्रजा बेदिल झाल्यास दिल्लीची मदत तातडीनें मागवूं शकत नसे. त्यामुळें त्याचा चट्कन पाडाव होई आणि कोणी तरी स्थानिक बहाद्दर तेथें सत्ताधिश बने. याचाही हात खुद्द स्वतःच्या प्रांतांतल्या खेड्यापाड्यापर्यंत पोंचूं शकत नसल्यानें त्या त्या गांवांतले अधिकारी खेडुतांच्या दयाबुद्धीवर अवलंबून राहत. गुंडगिरी, घालमेली नेहमीं चालत. पण दीर्घकाल बली कोणीही राहूं शकत नव्हता.

* * *

आज हें सर्व पालटलें आहे. हिंसक शस्त्रास्त्रांचें प्रमाण फार प्रचंड झालें असून, दळणवळणाचीं साधनेंही प्रचंड झालीं आहेत. राज्यसंस्थेखेरीज तीं खरेदी करणें व वापरणें कोणाही खाजगी व्यक्तीस शक्य नाहीं आणि खाजगी व्यक्तीस व संस्थांस सरकार तसें करूं देणार नाहीं. हिंदुस्थानास सरकारनें निःशस्त्र केलें आहे म्हणून आपण सरकारवर टीका करतों व ती रास्तही आहे. पण खरी परिस्थिति अशी आहे कीं, राज्यकर्त्यांशीं तुलना करून पाहतां जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, रशिया या प्रचंड शस्त्रास्त्रधारी राष्ट्रांतली जनताही खरोखर निःशस्त्र व दुबळी आहे. जनतेजवळ फार तर बंदुका, पिस्तुलें, तरवारी, मोटारी असतील. पण राज्यसत्तेजवळ तोफा, मशिनगन्स, बॉंबगोळे, बॉंबफेकी विमानें, लढाऊ जहाजें, विषारी गॅस, टॅंक्स, आगगाड्या वगैरे हिंसासाधनें एवढीं प्रचंड सामर्थ्याचीं व एवढ्या प्रचंड प्रमाणांत आहेत कीं त्यापुढें प्रजा ही केवळ निःशस्त्रच आहे. परचक्र आलें असतां राज्यसत्ता व प्रजाजन यांची एकजूट असते त्यामुळें राज्यसत्तेचें सर्व शस्त्रास्त्रबळ प्रजा व राज्यकर्ते सहकार्यानें वापरीत असतात. पण स्वतः राज्यकर्ते (स्वकीय अथवा परकीय) जेव्हां प्रजेवर जुलूम करतात तेव्हां प्रजा केवळ निस्त्राण व हताश असते. इतिहासाचें सूक्ष्म अवलोकन करणाऱ्यांना हें माहीत आहे कीं, परचक्रामुळें होणाऱ्या आंतरराष्ट्रीय युद्धामुळें मानवजातीवर ओढवणाऱ्या आपत्ति भयानक असतात, तशाच राज्यकर्त्यांनीं प्रजाजनांवर चालविलेल्या जुलुमामुळें ओढवणाऱ्या आपत्तीही भयानक असतात. त्या युद्धापेक्षां अधिक वारंवार येतात, जगांतल्या सर्व राष्ट्रांत येतात आणि त्यामुळें भौतिक ऱ्हासापेक्षांही सांस्कृतिक व नैतिक ऱ्हास अधिक होत असतो. परचक्रनिवारणाचे बाबतींत शस्त्रास्त्रबल

किती उपयोगी पडतें हा प्रश्न सध्यां बाजूस ठेवूं. पण स्वकीय अथवा परकीय संस्थापित राज्यसत्तेविरुद्ध प्रजेला शस्त्रास्त्रबलानें यशस्वी बंड करतां येण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत ही गोष्ट सहज लक्षांत येते. एखाद्या दुर्बल राज्यसत्तेविरुद्ध प्रजाजन बंड करून यशस्वी होतीलही; पण त्यापूर्वींच तें दुर्बल राज्य परकीय प्रबळ राज्यांकडून जिंकलें जाण्याचा संभव अधिक आहे. तसें पूर्वींच घडलें नसलें तर प्रजेच्या बंडाच्या काळांतही प्रबळ परचक्राचा हल्ला येईल अथवा बंड यशस्वी झाल्यानंतरही परचक्र येऊन नव्या राज्यसत्तेस बुडवील आणि त्याचा मुलूख गिळंकृत करील. सर्वसामान्यतः अलीकडील इतिहासांतल्या असंख्य उदाहरणांवरून, संस्थापित अशा स्वकीय अथवा परकीय राज्यसत्तेविरुद्ध जनतेचें शस्त्रास्त्रबल लटकें पडतें असा अनुभव सार्वदेशीय आहे हें कबूल करण्यास अडचण राहूं नये.

* * *

सामान्य जनतेच्या या निस्त्राण व हताश परिस्थितींत राज्यसत्तेच्या जुलमास टक्कर देऊन राज्यसत्ताप्रकार बदलण्याचें यशस्वी तंत्र गांधींनीं जगास दिलें असें मला म्हणायचें आहे. हिंदुस्थानांतील गेल्या वीस वर्षांतल्या अहिंसा-प्रयोगाचें ऐतिहासिक विवेचन करून जयकरांची खात्री करणें मला जमेलसें वाटत नाहीं. येथील अहिंसा-प्रयोगही गांधींच्या व इतरांच्या दोषामुळें आणि चुक्यांमुळें व्हावा तसा झालेला नाहीं. आणि कोणत्याही व्यावहारिक तत्त्वांचे प्रयोग असेच चुकत चुकत व दुरुस्त होत कालांतरानें यशस्वी व्हायचें हें ठरलें आहे. तथापि येथें झालेल्या प्रयोगावरूनही अहिंसाबलाच्या यशस्वितेबद्दल मला अधिकाधिक विश्वास वाटूं लागला आहे. मी मांडतों ही उपपत्ति गांधींना कदाचित् न पटली तर कदाचित् जावडेकरांच्या विवेकबुद्धीस पटेल. त्यांनाही न पटली तर या बाबतींत अगदीं एकाकी राहण्यास मी तयार होईन. सरकारनें प्रचंड दडपशाही केली नाहीं म्हणून गांधींची 'अहिंसायुक्त' टुरटूर चालू शकली असा एक आक्षेप नेहमीं येत असतो. १९३० सालच्या सत्याग्रहांत गांधींनीं सरकारला एक महिना आगाऊ नोटीस दिली आणि दररोज थोडीथोडी मजल दरमजल करीत दांडीचें रणांगण गांठलें. "आयर्विन मूर्ख आहे, नोटीस येतांच गांधीला त्यानें अडकविलें असतें तर पुढला सगळा बखेडा टळला असता" असे उद्गार एका महाराष्ट्रीय पुढाऱ्यानें त्या वेळीं

खाजगी रीतीनें काढलेले मला आठवतात. "मी जर व्हाइसरॉय असतों तर..." वगैरे बोलून समस्यापूर्ति करण्याचा मोहही त्या पुढाऱ्यास आवरला नाहीं. मी त्या वेळीं जनांतिकपणें जवळच्या इसमाला म्हटलें, "म्हणूनच ब्रिटिश सरकारनें यांना व्हाइसरॉय केलें नाहीं!" सदर पुढाऱ्याचें बोलणें अगदींच खोटें नव्हतें. पुढें दुसऱ्या सत्याग्रहाच्या वेळीं विलिंग्डनसाहेबानें गांधी व वर्किंग कमिटी यांना तांतडीनें अटक करून सत्याग्रहाचा बॅंडबाजा मोडून टाकला व वरील महाराष्ट्रीय पुढाऱ्याची बढाई खरी करून दाखविली. आमच्या या पुढाऱ्यासारखीं माणसें इंग्लंडांत पुरेशीं असल्यानें ब्रिटिश सरकारनें विलिंग्डनना येथें पाठविलें व आमच्या पुढाऱ्यांना व्हाइसरॉय होण्याची पाळी त्या वेळीं आली नाहीं आणि बहुधा कधींही येणार नाहीं. तें असो. पण गांधींच्या सत्याग्रहाची तात्त्विक भूमिका आयर्विनच्या सौम्य धोरणानें बळकट झाली असो नसो, पण विलिंग्डनच्या 'शूर' धोरणानें उखडली-ही गेली नाहीं असें मला वाटतें.

प्रस्थापित राज्यसत्ता स्वकीय असो कीं परकीय असो, ती राज्यसत्ता व प्रजाजन यांचेमध्यें जें एक नातें व्यवहारानें निर्माण होतें त्या नात्यांत अहिंसेचें बल उत्पन्न होत असतें. राज्यसत्तेला प्रजेसंबंधीं जीं अनेक भौतिक, नैतिक सांस्कृतिक, आध्यात्मिक अथवा इतर अनेक प्रकारचीं कर्तव्यें करावीं लागतात तीं त्या राज्यसत्तेकडून होवोत अथवा न होवोत, पण प्रजेंतील बहुसंख्य श्रमजीवी जनतेकडून धनोत्पादनाचें कार्य सुसूत्रपणें घडवून आणणें हें राज्यसंस्थेला स्वतः जिवंत राहण्याच्या दृष्टीनेंच आद्य कर्तव्य असतें. सरकारला मिळणारे कर या धनोत्पादनावांचून मिळूं शकत नाहींत. आणि ज्या एक अथवा अनेक वर्गांकडून राज्यसत्तेला पाठिंबा हवा असतो, म्हणजे जे वर्ग राज्यसत्ता स्वतःच्या फायद्यासाठीं निर्माण करतात व चालू ठेवतात त्यांना भरपूर आर्थिक फायदा मिळावा यासाठीं धनोत्पादनव्यवहार सुसूत्रपणें व वाढत्या कार्यक्षमतेनें चालेल अशी परिस्थिति टिकवावी लागते. राज्यकारभार चालविण्याचा खर्च सरकारला मिळणाऱ्या करांहून अधिक होईल आणि म्हणून कर देणाऱ्या वरिष्ठ वर्गांना डोईजड कर भरावे लागतील तर ते राज्यसत्तेचें अन्न तोडून तिला बुडवितील अथवा ती बदलून टाकतील. म्हणून राज्यसत्तेला आपला खर्च आयांत ठेवावा लागतो. समाजांतील उत्पादनकार्य व्यवस्थित चालेल

अशा प्रकारें कायदा व सुव्यवस्था राखावी लागते. अर्थात् समाजांत किरकोळ अन्याय, जुलूम कोठें होत असल्यास त्याची खबर घ्यावी लागते. याला बिनखर्चाचा उपाय म्हणजे अन्याय अथवा जुलूम ज्यांवर होईल त्यांना त्याविरुद्ध ओरड करूं देणें हाच होय. राज्यसंस्थेचे शेंकडों हजारों अधिकारी असतात. ते खाजगी फायद्यार्थी जनतेवर जुलूम करतील, आणि त्याविरुद्ध ओरड करण्यास जनतेला वाव मिळणार नाहीं तर पुढेंमागें तो असंतोष रोगासारखा भडकून राज्यसंस्थेस धोका आणील याची वरिष्ठ वर्गांना दखल घ्यावी लागते.

* * *

सांगण्याचा मुद्दा असा कीं, राज्यसंस्था आणि जनता यांचें आर्थिक परस्परावलंबन असतें. समाजाची आर्थिक संघटना शाबूत ठेवण्याची जबाबदारी राज्यकर्त्या वर्गांना बाळगावी लागते. राज्यकर्त्या वर्गांत थोडीफार आपसांत चुरस असते. प्रत्येक गट जनतेला आपल्या बाजूला ओढण्यासाठीं झटत असतो. यामुळें जनतेच्या सांस्कृतिक, संघटनात्मक व आर्थिक प्रगतीस वाव मिळत असतो. यामुळें अन्यायाविरुद्ध करावयाच्या संघटनेस थोडथोडा वाव मिळत असतो. कांहीं अगदीं थोड्या लोकांनीं अन्यायाविरुद्ध अत्याचार करण्याचें योजल्यास एकंदर राज्यसंघटनेच्या विध्वंसाची भीति बहुसंख्यांना वाटूं लागते. जनतेंतील वरिष्ठ वर्गांना व दलितवर्गांतील पुष्कळांनाही हा विध्वंस मान्य नसतो. यामुळें राज्यकर्त्यांना अमानुष दडपशाही माजविण्यास वाव मिळतो. जनता त्यामुळें भेदरून जाते आणि सर्व सांस्कृतिक विकासच खुंटतो. पण उलट अगदीं हळूहळू लोकजागृति करीत राहून जनतेला संघटनेचें शिक्षण प्रत्यक्ष आचरणानें दिलें व राज्यसंस्था संकटांत न येईल अशा प्रकारें अन्यायनिवारणाचे लढे पद्धतशीरपणें, शांततेच्या मार्गानें लढविले तर सरकारच्या दडपशाहीला जनतेचें पाठबळ मिळत नाहीं. दडपशाहीमुळें आर्थिक संघटना दुखावली जाईल अशी भीति वरिष्ठ वर्गांनाच वाटत असते. आणि वरिष्ठ वर्गांच्याच जिवावर जगणाऱ्या राज्यसंस्थेला त्या वर्गांच्या मताविरुद्ध दडपशाही माजवितां येत नाहीं. आयर्विननें गांधींना प्रथम पकडलें नाहीं आणि विलिंग्डननें गांधींना पकडलें यांत एक सौम्य व दुसरा शूर ठरला हें म्हणणें खरें नसून इंग्लंड व हिंदुस्थान येथील वरिष्ठ वर्गांच्या मतांत पडलेला फरक हें त्या फरकाचें कारण होतें.

* * *

पण विलिंग्डनसारख्याच्या दडपशाहीमुळें सत्याग्रह थोडा वेळ मागें हटला तरी कायमचा मरत नाहीं. आणि सरकारलाही अशी दडपशाही वारंवार करतां येत नाहीं. राज्यसंस्था व प्रजाजन यांचे दरम्यानचा आर्थिक संबंध नीटपणें समजून घेतल्यास संयमानें व शांततेनें हळूहळू जनतेची शक्ति व जागृति वाढवीत गेल्यानें सरकारला त्या गोष्टीस फारसा अडथळा करतां येणें शक्य होत नाहीं हा अनुभव गांधींच्या चळवळीनें दिला आहे. हा मुद्दा आतां विशेष तपशीलानें मांडीत नाहीं. चळवळीचें बळ वाढतां वाढतां लढ्याच्या अनेक मोहिमा होतात. त्या फोल ठरल्या तरी चळवळीची लाट पुढें जाते आणि आर्थिक विकासक्रमानें क्रांतीची वेळ जेव्हां येते तेव्हां राजकर्त्यांच्या शस्त्रास्त्रखात्यांतील माणसें क्रांतिपक्षास सामील होतात. हिंदुस्थानसंबंधानें मौन धरून युरोपसंबंधानेंच थोडें बोलतों. युद्ध संपल्यावर जो कोणी 'हिटलर' तेथें सत्ताधारी होईल त्याला केवळ आर्थिक दृष्टीनेंही शस्त्रास्त्र-संभार कमी करावा लागेल आणि आर्थिक व्यवहार सुसूत्रपणें चालू द्यावे लागतील. त्या-बरोबरच शांततायुक्त संघटनेस थोडथोडा वाव मिळत जाईल. तिच्या वाढीचा क्रम येथें सांगतां येणार नाहीं व तशी जरूरीही नाहीं. युरोपांत आर्थिक विकास खुंटूं लागला तर शांततायुक्त संघटनेनें क्रांतीचें बळ वाढत जाईल. अगदीं आंकड्यांत बोलायचें तर युरोपमध्यें शांततायुक्त सत्याग्रह करून कारावास भोगणारे एक कोटि सैनिक तयार झाले तर युरोपांतील राज्यसत्तेस त्यांना तुरुंगांत घालणें परवडणार नाहीं. लढा शांततायुक्तच करायचा म्हटलें म्हणजे निर्वैरत्वादि ज्या व्यक्तिगुणांचा आग्रह गांधी धरतात तो अगदीं योग्य आहे. या शांततायुक्त सैनिकांच्या आत्मक्लेशामुळें हिटलरी सैनिकांचा हृदय-पालट होऊन ते शस्त्रास्त्रें चालविण्याचें नाकारतील हेंही गांधींचें म्हणणें अगदीं खरें आहे. आणि ज्या युरोपांत इतरांची व स्वतःची हत्या अत्यंत क्रूरपणें करून धनाच्या पर्वतप्राय राशींचा विध्वंस करण्यासाठीं एक कोटीहून अधिक सैन्य आजच उभारतां आलें त्या युरोपांत सत्याग्रहार्थ कराव्या लागणाऱ्या अल्पत्यागासाठीं एक कोटी सैनिक मिळणार नाहींत असें वाटत नाहीं.

* * *

गांधींचें हें तंत्र राज्यसत्ता व तिचे प्रजाजन यांचे दरम्यान उपयोगी पडणारें आहे, हें मात्र ध्यानांत घेतलें पाहिजे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं असा

अहिंसात्मक सामना द्यायचा म्हटलें तर तें शक्य होणार नाहीं. कारण, राज्यसत्ता व प्रजाजन यांचे दरम्यान जो आर्थिक व राजकीय संघटनात्मक संबंध असतो, त्यांचेमध्यें जो एक प्रकारें एकजीव झालेला असतो तशी परिस्थिति दोन भिन्न राज्यांत नसल्यामुळें एका राज्याच्या शांततायुक्त प्रतिकारावर दुसरा राज्यकर्ता शस्त्राघात करून त्यास गिळून टाकूं शकतो. गांधींना या परिस्थितीची जाणीव असावी असें मला वाटतें. म्हणूनच ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें हे परस्परांना परदेश असून ब्रिटिश हिंदुस्तानांतल्या कॉंग्रेसनें संस्थानांत ढवळाढवळ करूं नये असें त्यांनीं मागें सांगितलें. हिंदुस्थान सरकारला आपल्या मुलुखांतील सत्याग्रहाला दडपून टाकणें अवघड होईल, पण संस्थानांत तेथल्या विशिष्ट परिस्थितींत कॉंग्रेस दडपली जाऊन चळवळीची हानि होईल हें त्यांचें मत महत्त्वाचें आहे. दांडीमोर्चाचे वेळीं बडोदा हद्दीसंबंधानें गांधींनीं जी खबरदारी घेतली व राजकोटमध्यें जी माघार घेतली त्यांत मूळ मुद्दा होता तो हा. ज्यांना तो मुद्दा कळला नाहीं त्यांनीं त्याची चेष्टा केली अथवा असद्धेतूंचा संशय घेतला. पण ज्यांनीं गांधींचें समर्थन केलें अशांपैकीं पुष्कळांना कांहींही कळलें नव्हतें. कॉंग्रेसनें संस्थानांत सत्याग्रह करूं नये तरी संस्थानी प्रजेनें तेथल्या तेथें केवढ्याही अवघड परिस्थितींत अगदीं समाजसेवेचें काम करीत संघटना करावी असेंही गांधींचें सांगणें असतें. 'पण झेक नागरिकांनीं जर्मनीला शस्त्रास्त्रयुक्त विरोध करायला नको होता, निःशस्त्र प्रतिकारच करायला हवा होता' असें गांधी म्हणतात तें काय? जर्मनी हें परराष्ट्र असतां गांधींनीं निःशस्त्रप्रतिकार कां सांगितला? ही शंका येथें नेमकी येते. तिचें स्पष्ट उत्तर असें आहे कीं, दोन युद्धयमान राष्ट्रांत ज्याचें शस्त्रास्त्रबल अधिक त्याशीं दुसऱ्यानें लढूं नये, त्याच्या राज्यांत सामील व्हावें, राज्यसत्ता व प्रजाजन असे संबंध निर्माण होऊं द्यावे आणि मग वर सांगितल्याप्रमाणें प्रजाकीय स्वातंत्र्याचा शांततेचा लढा चालू करावा असा गांधींचा अभिप्राय असेल असें वाटतें. गांधींना हें म्हणणें असें स्पष्टपणें पटणार नाहीं कदाचित्; पण तरी अहिंसात्मक लढ्याला हा क्रम आवश्यक आहे असें मला वाटतें. स्त्रिया अगदीं प्राचीन काळीं पुरुषांच्या स्वाधीन झाल्या त्या वेळीं जें घडलें असेल तसा कांहींसा हा प्रकार आहे. पुरुष स्त्रियांसाठीं आपसांत लढत, स्त्रियांशीं लढत आणि यामुळें स्त्रियांना अनेक विपत्ति

सोसाव्या लागत. या विपत्ति टाळण्यासाठीं स्त्रियांनीं पुरुषांचे अंकित व्हावयाचें ठरविलें. यामुळें पुरुष स्त्रीस पूर्वीप्रमाणें इजा करीनासा झाला. त्यांच्यांत परस्परावलंबन उत्पन्न झालें. परस्परापासून सुखोत्पत्ति होऊं लागली. खरोखर आज विद्यमान असलेल्या सुसंस्कृत कुटुंबसंस्थेची सुरुवात अशी विचारपूर्वक झाली आहे असें नाहीं. पण पुरुष व स्त्रिया 'भिन्न राष्ट्रें' होतीं त्या वेळीं जो विध्वंस व हालअपेष्टा होत होत्या त्या जाऊन 'कुटुंबसंस्था' या एकराष्ट्रांत व एकराज्यांत शांततेचे उपाय उपयोगी पडूं लागले, असा मुद्दा या स्त्री-पुरुष उदाहरणावरून मला सुचवायचा आहे.

* * *

झेक राष्ट्रानें हिटलरला शरण जायला हवें होतें अथवा अजून जावें असें मी म्हणत नाहीं. आज युरोपांत हिटलर व हिटलरशाही यांचा नाश व्हायला पाहिजे हा प्रश्न आतां वादातीत आहे. पण युरोपचें राजकीय एकीकरण आतां झालेंच पाहिजे. तेथें राज्यसत्ता-प्रकार चालू युद्धानंतर कोणताही स्थापन होवो, पण तेथें आतां अखंड एकच एक राज्यसत्ता स्थापन झालीच पाहिजे. बैलगाडीच्या काळांत अखिल हिंदुस्थानवर एकछत्री अंमल गाजवूं म्हणणाऱ्याच्या साम्राज्याचे शतशः तुकडे होणें अपरिहार्य होतें. त्याउलट आतां आगगाडी, विमानें, कारखाने व यांत्रिक शेती यांच्या काळांत युरोप खंडांत अठरा तुकडे पाडले तरी जो त्या देशांत अधिक प्रबल असेल तो त्यांना एकजूट केल्यावांचून सोडणार नाहीं. हिटलरचा पराभव झाल्यावर इंग्लंडला अथवा रशियाला युरोपचें एकीकरण करावें लागेल. हाच क्रम पुढें चालून सर्व जगाचें एकराज्य होणें हेंही आतां इतिहासांत अपरिहार्य होत आहे. त्यासाठीं आणखी एखादें युद्ध होणार, कीं या युद्धाकडूनच तें कार्य होणार हें सांगतां येत नाहीं.

'चालू युद्ध हें राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांसाठीं चाललेलें युद्ध आहे' असें सर्वजण म्हणतात आणि ती रूढि पाळण्यासाठीं मींही गेल्या दोन वर्षांत सुमारें शंभर वेळां असें लिहिलें आहे. पण त्या सर्व वेळीं माझें मन मला खात असे. उंदरासारखीं आणि बेडकासारखीं राष्ट्रें स्वातंत्र्य स्वातंत्र्य म्हणून डरांव डरांव करीत राहिलीं तर तें इष्ट आहे काय? इतक्या स्वतंत्र राष्ट्रांची गर्दी माजल्यावर युद्धें वाढतच राहणार आणि लोकशाही नष्टच होणार. खरोखर 'राष्ट्रीय स्वातंत्र्य' आणि 'लोकशाही' हे शब्द आतां परस्परविरोधी झाले आहेत.

ज्यांना खरोखर 'लोकशाही' हवी त्यांनीं जगाचें एकराज्य बनविण्याच्या क्रमास विरोध न करतां राज्यकर्त्यांचा व धनिक वर्गाचा अन्याय हटविण्यासाठीं शांततायुक्त लढे लढण्याची तयारी करावी. उद्यां हिटलरचा पाडाव झाल्यावर युरोपचें जो कोणी एकीकरण करील त्याच्या त्या एकीकरण-क्रियेस शस्त्रास्त्रांनीं विरोध करण्याचें सोडून देऊन युरोपीय जनता जर निःशस्त्र प्रतिकार करील तर युरोपांत लोकशाही स्थापन करणें खालीनें शक्य होईल. आणि मग लोकशाहीचे हक्क मिळाल्यानंतर राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मूर्ख हट्ट कोणीही धरणार नाहीं. युरोपांत आज शस्त्रास्त्रांची विफलता सिद्ध झाली असें अनेक लोक म्हणतात तें एका अर्थानें खरें आहे. सगळ्या युरोपीय राष्ट्रांनीं, प्रत्येकानें स्वतंत्र राहण्यासाठीं शस्त्रास्त्रें सज्ज ठेवलीं. पण युरोपचें एकीकरण आर्थिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या अपरिहार्य झाल्यानंतर एका बलिष्ठ राष्ट्राच्या शस्त्रास्त्रांपुढें सर्वांचा चुराडा झाला. अजून लढा चालू आहे, त्यांत दोन्ही बाजूंचीं शस्त्रास्त्रें उध्वस्त होत आहेत. जुनें स्वतंत्र पोलंड आणि स्वतंत्र झेकोस्लोव्हाकिया हीं कायमचीं मेलीं आहेत. अखेरीस कोणीही जिंको त्यास युरोपचें एकीकरण हें करावेंच लागेल. आणि मग युरोपीय जनतेला लोकशाही निर्माण करण्यासाठीं शस्त्रास्त्रांचा नाद सोडून शांतिप्रधान संग्रामच करावा लागेल. या अर्थानें शस्त्रास्त्रें विफल ठरलीं आहेत असेंच म्हणावें लागतें.

* * *

हिटलर व हिटलरशाही यांचा नाश झाला पाहिजे व होणारच हें इष्ट व अपरिहार्य आहे. पण जगाच्या राजकीय एकीकरणाचें हिटलरचें तत्त्व आणि आर्थिक व राजकीय लोकशाहीच्या संस्थापनेसाठीं गांधींचें सत्याग्रहाचें तत्त्व यांचा युद्धोत्तर काळांत संयोग करावा लागेल व करतां येईल असें मला वाटतें. प्रचंड यांत्रिक धनोत्पादन असावें कीं नसावें हा खरोखर समाजरक्षण व लोकशाही यांची जोड घालण्याचा प्रश्न आहे. गांधींना चरख्यावर आधारलेली लोकशाही हवी आहे. पण ते यंत्रोपयोगाच्या पूर्णपणें विरुद्ध नाहींत एवढें लक्षांत घेतल्यास गांधींच्याशीं तात्त्विक मतभेद असण्याचें कारण नाहीं अथवा 'चरख्यानें स्वराज्य मिळेल' असें मानणारे तेवढेच अहिंसावादी असें मानण्याचेंही कारण नाहीं. उद्योगधंदे फार प्रचंड प्रमाणावर झाले म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य

व लोकशाही यांना अपाय होतो ही गोष्ट मार्क्सवाद्यांना मान्य असून अति प्रचंड शहरें व अगदीं लहान खेडी यांच्या दरम्यान वसत असतील अशीं मध्यम उत्पादन-केंद्रें निर्मावीं असें एन्जल्सनें म्हटलेंच आहे. मार्क्सवाद्यांना अवश्य वाटणारा वर्गलढाही शांततेनें लढला गेला पाहिजे. त्यानेंच लोकशाही टिकेल व त्याच क्रमानें एन्जल्सला मान्य असणारी राज्यसंस्था जीर्ण होत होत मरून जाण्याची अवस्था प्राप्त होईल. गांधींच्या अहिंसावादांत व मीं मांडलेल्या अहिंसावादांत जो फरक आहे तो सोशॅलिस्टांत असणाऱ्या 'युटोपीय' म्हणजे 'काल्पनिक' व सायंटिफिक म्हणजे 'शास्त्रशुद्ध' यांमधील फरकासारखा आहे. माझें हें विधान मी येथें अधिक सिद्ध करीत नाहीं. वर मांडलेल्या विचारसरणीवरून वाचकांना त्याचा थोडासा बोध होईल व विचारास थोडी चालना मिळेल असें मानून तूर्त ही चर्चा येथेंच थांबवितों.

धनुर्धारी, दिवाळी अंक, १९४१

---

# चालू महायुद्धांतून विकास पावणारा हिंदुस्थान : : १७

'काँग्रेसचें युद्धविरोधी धोरण' हा अथवा अशा अर्थाचा मथळा हजारदां वाचून लोकांचे डोळे सरावले आहेत. हजारदां छापलेला हा मथळा काँग्रेसच्या धोरणाचें वर्णन जें करतो तें मात्र नेहमींच चुकलेलें असतें. काँग्रेस फक्त 'साम्राज्यशाही युद्धास विरोधी' आहे. नुसती 'युद्धविरोधी' नाहीं. ब्रिटननें हिंदी जनतेस स्वामित्वानें फॅसिझम्‌विरुद्ध लढतां यावें अशी सत्ता दिली तर केवढाही त्याग करून आणि निकराचा शस्त्रास्त्रलढा करून परचक्रास तोंड द्यावें असें काँग्रेसचें म्हणजे मुख्यतः पं. नेहरूंचें धोरण आहे. मला तर हें युद्ध म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ति व समाजक्रांति करण्याची अपूर्व संधि आहे असें वाटत असून ब्रिटिशांच्याकडून सत्ता काढून घेणें, परचक्राविरुद्ध लढा उभारणें आणि त्यासाठीं समाजक्रांति घडवून आणणें हें हिंदी जनतेनें तांतडीनें करण्याचें अखंड, एकजिनसी कार्य आहे असें वाटतें. महायुद्धानें जागतिक व्यवहारास जी एक गति दिली आहे तिची दिशा हीच असून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा, फॅसिझम्‌विरोधी लढा, आणि समाजक्रांति या सर्व गोष्टी या जागतिक कार्याचेंच एक अवश्य अंग आहेत. 'युद्धानंतरचें जग', 'युद्धानंतरचें हिंदुस्थान' या शब्दांस कांहींच अर्थ नाहीं. युद्धांतच मानवसमाजाची

जास्तींत जास्त गतिमानता दिसून येत असून त्याच वेळीं जगाला जो कोणता आकार द्यायचा असेल तो देतां येतो, द्यावा लागतो. कुंभार मातीचें भांडें करतो तें हातावर मातीचा गोळा घेऊन व स्वस्थपणें त्याला आकार देत बसून करीत नाहीं. मातीचा गोळा चाकावर घालून तो चाकाला जोरदार गति देतो आणि गोळा त्या गतींत असेल त्याच वेळीं त्या गोळ्याला जो आकार द्यायचा असेल तो देतो. लोखंड तापलेलें असतें तेव्हांच वाकतें. मनुष्यसंघटना कर्तृत्वसंपन्न करायची, रूपांतरित करायची असल्यास हल्लींच्या युद्धासारखी संधि ही अमोलिक असते. हजारों वर्षें मळ्यासारखा जड झालेला हा देश सचेतन, कर्तृत्वसंपन्न करायचा असल्यास स्वामित्वानें राष्ट्ररक्षण करण्याची संधि आपण निर्माण केली पाहिजे. राष्ट्ररक्षण केलें पाहिजे व त्यासाठीं समाजक्रांति केली पाहिजे.

* * *

कांहींच्या मतें जर्मनी आणि जपान यांनीं बहुतेक युद्ध जिंकलें आहे, अशा आजच्या स्थितींत हिंदुस्थाननें हल्लींची सत्ता हातीं घेऊन युद्धाचा धोका पत्करूं नये. यांतील 'हल्लींची सत्ता हातीं घेऊन' या शब्दांचा अर्थ समजून घेतला पाहिजे. हल्लींचें राज्ययंत्र असेंच्या असें ठेवून त्यांत सामील होणें हें केव्हांही चूकच आहे. पांच रुपयांच्या कामाला पन्नास रुपये खर्च करून लठ्ठ पगार व लठ्ठ नफा यांसाठीं चाललेलें हें सरकार जपानसारख्या, जनतेच्या पाठिंब्यानें पोट बांधून लढणाऱ्या राष्ट्रांशीं प्रजेच्या पाठिंब्यावांचून लढण्याला असमर्थ आहे. या राज्यसंस्थेचें स्वरूपच असें आहे कीं तिच्या कवचांतील समाजाचें बळ आतां वाढूं शकत नसून गेलीं कित्येक वर्षें तें खचत चाललें आहे. दहा कोटी प्रजा येथें देशी संस्थानांत आहे. हीं संस्थानें पूर्वीं कोणत्याही हेतूनें शाबूत ठेवण्यांत आलेलीं असोत, पुढील काळांत ब्रिटिश अधिकाऱ्यांना खुशाल चरण्याचीं ठिकाणें असेंच त्यांचें स्वरूप राहिलें. मलयांतील संस्थानांतली पंचावन्न लक्ष प्रजा जशी मागासलेली, अशिक्षित, देशाभिमानशून्य, दरिद्री होती तशीच जवळजवळ हिंदुस्थानांतल्या या संस्थानांतील दहा कोटी प्रजा आहे. खालसांतील जमीनदारांची कित्येक कोटी प्रजा अशीच मागासलेली आहे. खालसांतील बहुसंख्य शेतकरी वर्गही सावकार, सरकार व दुकानदार यांनीं पार नागवलेला आहे. पीक येवो न येवो, नफा-नुकसान जें होतें तें सावकार,

सरकार, दुकानदार यांचेंच होतें. शेतकरी खंकऱ्या खंक राहतो. कॉंग्रेसनें त्यांच्यांत राजकीय जागृति केली. पण शेती सर्व मागासलेली असून उद्योग-धंदे फारसे वाढलेले नसल्यानें शेतकऱ्यांचें दारिद्र्य दूर झालेलें नाहीं. उत्पन्न होणाऱ्या धनाचा वांटा प्रचंड प्रमाणांत परदेशी लुटींत वाहून जातो. लष्करी शिक्षण लोकांना मुळींच नाहीं. चाळीस कोटी लोकसंख्येच्या देशाचें देशी सैन्य युद्धाच्या पहिल्या दिवसापर्यंत अवघें १ लक्ष ६० हजार होतें. प्रातिनिधिक राज्यसंस्थेचे देखावे खूप उभारण्यांत आले, पण खरीखुरी सत्ता येथील लोकांना कधींही मिळालेली नाहीं. स्वदेशासाठीं लढणें व मरणें यासाठीं जो तीव्र देशाभिमान, ध्येयवेड आणि रणविद्येचा प्रसार वगैरे गोष्टी लागतात त्या सर्व या सरकारनें वाढविण्याऐवजीं खचीच केल्या आहेत. ही राज्यसंस्था व समाजव्यवस्था फॅसिस्टांसारख्या प्रचंड परचक्रास तोंड देण्यासाठीं उभारण्यांत आलेलीच नाहीं. दीडशें वर्षांपूर्वीं ब्रिटिशांनीं ती निर्मिली ती इंग्लंडला भरपूर नफा देणारें प्रचंड हिंदी रान संभाळण्यासाठीं निर्मिली. म्हणून ती जर्मनी व जपान यांसारख्या जबरदस्त शत्रूशीं तोंड देण्याला असमर्थ आहे. असली ही जी राज्यघटना व समाजघटना तिच्या यंत्रांतला एक भाग होण्यानें फॅसिस्टांवर विजय मिळणार नाहीं अथवा देशाची प्रगति होणार नाहीं.

* * *

पण वर राज्यघटनेचे व समाजघटनेचे जे दोष सांगितले आहेत, त्यांतले कोणतेही दोषच चटकन् दूर होण्यासारखे नाहींत. चालू घटनाकायदा बदलण्यास तर ब्रिटन तयारच नाहीं. तथापि ब्रिटननें तो बदलला तरी समाजघटनेंतले दोष त्यामुळें चटकन् कसे बदलणार? ते बदलणार नाहींत म्हटलें म्हणजे युद्ध खात्रीनें जिंकू शकेल असें ज्या आजच्या राज्यघटनेसंबंधानें म्हणतां येत नाहीं तींत सामील तरी कां व्हावें? त्यापेक्षां जयापजयाची जबाबदारी सरकारवर टाकावी आणि युद्ध संपल्यावर इंग्लंडचें, जपानचें अथवा जर्मनीचें ज्या कोणाचें सरकार येथें असेल त्याचेपासून स्वातंत्र्य मिळवावें म्हणजे झालें, असें मानणारा एक अल्पसंख्य पक्ष या देशांत आहे. ज्यांना हें मत मान्य नाहीं व युद्धसहकार्य करावेंसें वाटतें त्यांनाही, हल्लींचें राज्ययंत्र व युद्धयंत्र निरुपयोगी असून ब्रिटिश सरकार तें बदलण्यास तयार नाहीं म्हणून युद्ध होईपर्यंत स्वस्थ राहावें हें नाइलाजानें अपरिहार्य वाटतें. पण 'युद्ध संपल्यानंतर

कोणतेही पालट घडून येणेंच कठीण आहे, आणि तेव्हां पालट करण्याची योग्य वेळ निघूनही जाईल' असे वेंडेल विल्की यांनीं नुकतेच काढलेले उद्गार येथें लक्षांत ठेवले पाहिजेत. चालू युद्धानंतर जगाचें स्वरूप कसें असावें यासंबंधानें अनेकांनीं अनेक चित्रें काढलीं आहेत. अमेरी यांना हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्याची बाजारपेठ बनवून या साम्राज्यास कांहींसें फॅसिस्ट स्वरूप द्यायचें आहे, हिटलरला जगावर गोरा फॅसिझम् स्थापायचा आहे, जपानला आशियाटिक लष्करशाही स्थापायची आहे, गांधींना जगांत अहिंसाशाही निर्मायची आहे, नेहरूंना समाजशाही हवी आहे आणि स्टालिनला जिकडे तिकडे सोव्हिएट बागशाही उठवायची आहे. पण या सर्वांनीं मनश्चक्षूंपुढें रेखाटलेलीं हीं कल्पनाचित्रें चालू युद्ध निकालांत निघाल्यानंतर स्वस्थपणें सत्यसृष्टींत ओतूं म्हटल्यानें होणार नाहीं. ज्याला जी शाही हवी आहे त्यानें विजय मिळवून युद्धाचा निकाल प्रथम आपल्या बाजूनें लावून घेतला पाहिजे. आजच्या किती तरी घटना त्या विजयासाठीं आणि आजच्या युद्धकालांतच मोडींत घातल्या पाहिजेत, व युद्धकालांतच त्यांना नवीं रूपें दिलीं पाहिजेत. विल्की म्हणतात वसाहतराष्ट्रांना युद्धकालीं स्वतंत्र करून तेथल्या सामान्य जनतेचें प्रत्यक्ष साहाय्य युद्धकालींच मिळविलें पाहिजे, तरच विजय मिळणें सोपें होईल. याचा अगदीं संकुचितही अर्थ असा होतो कीं ब्रिटिश साम्राज्य हें संयुक्त राष्ट्रांच्या विजयासाठीं मोडींत घातलें पाहिजे. थोडी व्यापक दृष्टि स्वीकारून वर वर्णिलेल्या हिंदुस्थानच्या समाजघटनेकडे पाहिलें तर युद्ध जिंकण्यासाठीं येथें नुसतें स्वातंत्र्य स्थापूनच चालणार नाहीं तर समाजक्रांतिही करावी लागेल ही भूमिका स्वीकारावी लागते. परचक्र हें संकटच असें प्रचंड आहे कीं त्यापुढें अंतर्गत राज्यघटना व समाजघटना अत्यंत प्रखर कसोटीवर घासल्या जातात व त्या युद्धांतून शाबूत बाहेर पडायचें असेल तर समाजघटना व राज्यघटना जितकी अधिक दुर्बल तितका तिचा नाश अधिक निश्चितपणें करून क्रांतिच करावी लागते. इतिहासांतला हा महत्त्वाचा सिद्धान्त बोल्शेव्हिक क्रांतीनें जगापुढें प्रथम मांडला. त्या दृष्टीनें इतिहासाचें अधिक संशोधन झालें म्हणजे या सिद्धांताची शेंकडों उदाहरणें सोपपत्तिकपणें देतां येतील. येथें तूर्त बोल्शेव्हिक क्रांतीचें सिद्ध झालेलें उदाहरण घेऊं.

* * *

गेल्या महायुद्धाचे आरंभीं झारनें युद्धांत उडी घेतली तेव्हां रशियानें साम्राज्य वाढवावें आणि भांडवलदार, मजूर व शेतकरी यांना दडपून आपली सरंजामी गादी मजबूत करावी असें तो चिंतीत होता. भांडवलदारवर्गास युद्धाची संधि साधून झारला इंग्लंडप्रमाणें सनदशीर राजा बनविण्याची इच्छा होती आणि बोल्शेव्हिकांना झार व भांडवलदार या दोघांसही उलथून पाडून कामगार-सत्ता स्थापायची होती. युद्ध जसजसें निकराला येऊं लागलें तसतशी झारची सरंजामी सेना कच खाऊं लागली. सरंजामदारांचा शेतकरी हाच बऱ्याच प्रमाणांत सैनिकही होता. शेतकऱ्याला पिढ्यानुपिढ्या पोटभर अन्न मिळत नव्हतें. युद्धाचा माल निर्माण करणारे भांडवलदार गबर होत होते. युद्ध भडकूं लागलें तसें जीवनावश्यक जिनसांचे भाव वाढत जाऊन त्यांचा तुडवडा पडूं लागला. भांडवलदार व जमीनदार गबर होऊं लागले. पण महागाई व टंचाई यामुळें कामगार चिडले. रणांगणावरील पराभव आणि देशांत होणारी उपासमार यामुळें शेतकरी, कामकरी व सैनिक युद्धास कंटाळले. या वेळीं जो युद्ध थांबवील त्याचे हातीं सत्ता येईल अशी परिस्थिति होती पण ती गोष्ट फारशी सोपी नव्हती. झार युद्ध थांबवील तर इंग्लंड, फ्रान्स इत्यादि मित्रराष्ट्रांचा विश्वासघात होत होता आणि त्या राष्ट्रांचें दडपण आणून भांडवलदार झारला पदच्युत करतील ही झारला भीति वाटली. भांडवलदारांच्या विरुद्ध झारपक्षानें शेतकरी-कामकऱ्यांची मदत घ्यावी असे प्रेमाचे संबंध इतिहासकालांत त्यांचे कधींच नव्हते. यामुळें आपली गादी टिकविण्यासाठीं त्यास युद्ध चालू ठेवणें भाग पडलें. भांडवलदारवर्गानें युद्ध थांबविण्याचा प्रयत्न केला असता तर युद्धसाहित्याच्या कारखान्यांतून त्यांना क्रोडो रुबल्स नफा मिळत होता तो बुडाला असता. आणि जर्मनीचा पराभव झाल्यावर नवीन मुलुखांतला जो वाटा रशियन भांडवलदारवर्गाच्या भांडवलासाठीं मिळाला असता तो मिळणें शक्य नव्हतें. झारवर दडपण आणून त्यास लगाम घालणें हें युद्धाच्या कैचींत झार सांपडला आहे अशा परिस्थितींतच शक्य होतें. शिवाय जनता इतकी कंगाल, त्रस्त आणि जागृत झाली होती कीं युद्धांतून तिचा हात मोकळा होतांच भांडवलदार व जमीनदार या दोघांनाही ती उध्वस्त करील अशी भीति झार, सरंजामदार व भांडवलदार या सर्वांनाच वाटत होती. रशियांत स्वदेशी भांडवलशाहीची

सबळ वाढ कधींच झालेली नसल्यानें भांडवलदार अथवा त्याचे लगामीं असलेला, सुशिक्षित मध्यम वर्ग यांचेकडे सर्वसामान्य जनतेचें नेतृत्व कधींच आलें नव्हतें. म्हणून युद्ध थांबविण्याची जबाबदारी कोणीच घेईना. अशा परिस्थितींत खालून शेतकरी-कामकऱ्यांचें दडपण वाढूं लागलें व त्यामुळें प्रथम झारचें सिंहासन ढासळलें. जमीनदार-भांडवलदारांचें जें नवें सरकार स्थापन झालें त्यानेंही युद्ध आणि जमीनमालकी हे दोन प्रश्न वर सांगितलेल्या कारणासाठीं सोडविण्याचें नाकारलें, तेव्हां हें सरकारही उलथून पडलें व बोल्शेव्हिकांचें सरकार तेथें स्थापन झालें. युद्ध थांबविणें व शेतकऱ्यांना जमिनी देणें या घोषणांवरच बोल्शेव्हिकांनीं आपणांस जनतेचा पाठिंबा मिळविला होता. सत्ता हातीं येतांच या गोष्टी त्यांनीं केल्या आणि पुढेंमागें आपणांस विरोध करूं शकेल अशी भांडवलशाहीही जमीनदारशाहीबरोबर उध्वस्त केली. युद्धकाळांत युद्धाच्या दडपणानेंच ही गोष्ट घडली.

* * *

हिंदुस्थानाला चालू युद्धांतून बाहेर पडण्यासाठीं रशियाच्या या क्रमानुसारच जावें लागेल असें वाटतें. बोल्शेव्हिकांचें धोरण आणि येथलें धोरण यांत सकृद्दर्शनीं मात्र महत्त्वाचा फरक दिसून येणार आहे. बोल्शेव्हिक हे पराभववादी होते. रशियानें युद्धांतून पराभव पत्करून अंग काढून घ्यावें असें त्यांचें मत होतें. येथें बरोबर याच्याविरुद्ध भूमिका आम्हांला स्वीकारावी लागेल. फॅसिस्टविरोधी युद्ध चालविण्याकरितांच पूर्ण सत्ता काबीज करून फॅसिझम्‌चा पाडाव करण्यासाठीं लढावें व त्याचसाठीं समाजक्रांति करावी लागणार आहे. याचें कारण उघड आहे. आज जे पक्ष, वर्ग व गट युद्धसहकार्यवादी म्हणून मानले जात आहेत ते सर्व कमीअधिक प्रमाणांत पारतंत्र्यवादी आहेत. ब्रिटिश सत्ता राहावी, ती नच राहिली तर जी सत्ता येथें येईल तीपुढें मान लववावी व त्या सत्तेनें आपली समाजव्यवस्था व तीमधला आपला ठेवा दुखवूं नये असें त्यांचें मत आहे. युद्धांत विजय मिळविण्यापेक्षां समाजव्यवस्था टिकवणें हें त्यांना अधिक प्रिय आहे. ब्रिटननें फॅसिझम्‌चा नायनाट करण्यापूर्वींच कांहीं तरी समेट करून युद्ध थांबविलें तर यांच्याइतका आनंद कोणासही होणार नाहीं. आज देशांत कॉंग्रेसच्या नांवावर जी वावटळ उठली आहे तीमुळें क्रांतीची भीति त्यांना वाटूं लागली आहे. युद्ध लवकर

थांबलें तर काँग्रेसला चिरडणें राज्यकर्त्यांना ( मग तें राज्य कोणाचेंही असो ) शक्य होईल व आपल्या दौलती सुरक्षित राहतील असें यांना वाटतें. पण आजच्या हिंदी समाजव्यवस्थेच्या अंगीं प्रगतीची शक्ति मुळींच उरलेली नाहीं. यापुढें ही समाजव्यवस्था कायम राहिली तर हा देश स्वतंत्र होणेंच शक्य नाहीं; इतकेंच नव्हे तर याची परिस्थिति अधिकाधिक वाईट होत जाईल. समाजक्रांति हा एकच राष्ट्रीय व सामाजिक कुचंबणेंतून निघण्याचा मार्ग आहे. आणि ही क्रांति, युद्ध चालू राहिलें व फॅसिझम्‌चा पूर्ण नायनाट होईपर्यंत तें चालू ठेवणें शक्य झालें तरच घडून येईल. बोल्शेव्हिकांची भूमिका 'युद्धविरोधा'ची असली तर ही 'युद्धकार्या'ची आहे असें म्हणावें लागेल. खरोखर येथील काँग्रेसची भूमिका ही 'युद्धविरोधा'ची नव्हेच, 'साम्राज्यशाही युद्धविरोधा'ची आहे. हिंदुस्थानास युद्धकाळांत स्वायत्तता मिळाली कीं, हिंदुस्थानपुरतें युद्धाचें साम्राज्यशाही हें स्वरूप नष्ट होईल व तें लोकयुद्ध होईल आणि मग काँग्रेस फॅसिझम्‌विरोधी युद्धकार्यांत सामील होईल हें काँग्रेसनें युद्धारंभींच सांगितलें आहे.

* * *

बोल्शेव्हिकांच्या भूमिकेंत व येथल्या भूमिकेंत दिसणारा हा विरोध समजून घेत असतां त्यांत आणखी थोडें खोल गेलें पाहिजे. खरोखर रशियानें युद्धांतून अंग काढून घ्यावें आणि पराभव पत्करावा हें जें बोल्शेव्हिकांचें धोरण होतें तें स्वतः झारनें यशस्वितेनें अमलांत आणलें असतें तर? तशा स्थितींत लेनिन, ट्रॉट्स्की वगैरेंना रशियांत येतां आलें नसतें. फेब्रुवारी-क्रांतिही झाली नसती. आणि भांडवलदार व जनता यांच्या उठावणीपासून आपला बचाव करून घेण्यासाठीं झारनें जर्मनीचें अथवा पुढें अँग्लो-फ्रेंचांचें उघड अथवा प्रच्छन्न पारतंत्र्य पत्करलें असतें. झारनें जर्मनीशीं गुप्त तह करण्याच्या खटपटी केल्याही होत्या. त्याच्या दुर्दैवानें त्या फसल्या. पुढें झारचा पाडाव झाल्यानंतर तात्पुरत्या सरकारनें जरी जर्मनीशीं झटपट तह केला असता तरी बोल्शेव्हिकांना लेनिनच्या नेतृत्वाखालीं क्रांति करतां आली नसती. बोल्शेव्हिकांनीं युद्धविरोधी धोरण पुकारल्यामुळें त्यांना जनतेचा पाठिंबा मिळाला ही गोष्ट जशी महत्त्वाची आहे तशीच बोल्शेव्हिकांची मागणी राज्यकर्त्यांनीं मान्य न करतां युद्ध चालू ठेविलें म्हणूनच लेनिनला क्रांति करतां आली हीही गोष्ट

महत्त्वाची आहे. हिंदुस्थानांतही फॅसिझम्‌विरोधी युद्ध बराच काळ चालू राहिलें तरच ही क्रांति करतां येणार आहे. रशियन क्रांतीला अंतर्गत परिस्थितीची जशी अनुकूलता मिळाली तशीच आंतरराष्ट्रीय परिस्थितीचीही विशिष्ट अनुकूलता मिळाली. जर्मनी त्या वेळीं दोन आघाड्यांवर लढत असल्यानें रशियन आघाडी बंद व्हावी यासाठीं उतावीळ होता. यामुळें बोल्शेव्हिकांपासून जर्मनीनें मुलूख खूप घेतला तरी बोल्शेव्हिक रशियाचें स्वातंत्र्य मान्य केलें. रूसो-जर्मन तहानंतर आणखी एक वर्ष जर्मनी इंग्लंड–फ्रान्स–अमेरिका यांच्याशीं लढत राहिला, यामुळें बोल्शेव्हिकांना आपलें आसन मजबूत करण्यास अवधि मिळाला. पुढें जर्मनीचा पराभव होऊन जर्मनीची शक्ति पार खची झाली. यामुळें बोल्शेव्हिक समाजघटनेविरुद्ध जर्मन चढाई होण्याचा संभव टळला. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांच्या मदतीनें परागंदा रशियन सरदारांनीं व सैनिकांनीं रशियांत यादवी माजविली. या वेळीं रशियन लोक सरदारवर्गाशीं पराक्रमानें लढले. यामुळें लेनिनला आपलें आसन मजबूत करायला संधि मिळाली. बोल्शेव्हिकांचा पाडाव झाल्यास रशियावर वर्चस्व कोणीं गाजवायचें यासंबंधानें अँग्लो-फ्रेंचांत चुरस लागली आणि रशियन प्रतिक्रांतिकारकांना साम्राज्यलोभास्तव अँग्लो-फ्रेंच सरकारें मदत करीत आहेत असा आरोप त्या त्या देशांतील मजुरांकडून करण्यांत येऊं लागून त्या त्या राज्यकर्त्यांची नाचक्की होऊं लागली. महायुद्धानंतर इतके प्रचंड आर्थिक घोटाळे माजले कीं रशियांत सैन्यें आणि पैसा पाठवून यादवी लढविण्याचा उपद्व्याप हळूहळू अँग्लो-फ्रेंचांना सोडून द्यावा लागला. या सर्व अनुकूलतेमुळें रशियन क्रांति यशस्वी झाली. हिंदुस्थानांत अशी क्रांति घडून येण्यासाठीं राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीची अनुकूलता कशी काय आहे तें आतां पाहूं.

* * *

क्रांतीनें झारशाहीचा पाडाव होण्यापूर्वींच रशियाचा पूर्ण पराभव होऊन जर्मनीनें रशियांत राज्यच स्थापलें असतें तर पुढें क्रांति अशक्यच होती. पण तसें घडलें नाहीं. १९१७ सालच्या दोन्ही क्रांत्या होऊन यादवीपूर्वीं एक वर्ष परचक्राचा घाला आला नाहीं; यादवींत प्रतिक्रांतिकारकांना परशत्रूची मदत मिळाली, पण प्रत्यक्ष परचक्र आलें नाहीं. पोलंडशीं १९२० सालीं झालेल्या

युद्धांत रशियाचा पराजय झाला तरी बोल्शेव्हिकांचें राज्य गेलें नाहीं. परदेशांतील लोकमत कम्युनिझमला अनुकूल होत गेलें. या कारणामुळें अंतर्गत क्रांति यशस्वी करण्यास अवसर मिळाला. येथें सर्व असेच्या असें घडून येईल असें नव्हे. हिंदुस्थानचें पुढें काय होणार याचें सगळें भविष्य आज सांगतां येणार नाहीं. पण चालू युद्धांत व नजीकच्या काळांत जर्मनी व जपान यांचा पश्चिमेकडून व पूर्वेकडून एकदम हल्ला आल्यास हिंदुस्थानची धंडगत दिसत नाहीं खास. ही घटना घडलीच तर लवकरच घडणार असल्यानें तिच्या प्रतिकाराची सरकारी तयारी जी कांहीं असेल ती खरी. कोणत्याही राजकीय पक्षास आजची सत्ता स्वीकारणें व पैजेचा विडा उचलून युद्धास उभें राहणें कठीण आहे. पूर्ण सत्ता मिळाली तरी तें अशक्य आहे. अर्थात् पूर्ण सत्ता मिळाली तर घ्यावीच आणि लढावेंच हा भाग निराळा. पण हिंदुस्थानवर अगदीं दोनतीन महिन्यांत दोन बाजूंनीं प्रचंड हल्ला आला तर तो आजच्या सरकारनेंच निवारला पाहिजे. जनतेनें मनापासून केलेलें साहाय्यही, सरकारी तयारी मूळची भक्कम असेल तरच, उपयोगीं पडेल.

* * *

पण जर्मनीचा हल्ला इराणमधून हिंदुस्थानवर नजीकच्या काळांत येईल असें वाटत नाहीं. याला अनेक कारणें आहेत. (१) रशियाची चढाईची शक्ति कमी झाली तरी हिवाळा संपेपर्यंत रशिया जर्मनीस सतावल्यावांचून राहणार नाहीं. उलट हिवाळ्यांत रशियन विरोधास मागें हटवून कॉकेशस ओलांडणें जर्मनीस कठीण आहे. (२) ईजिप्तकडून सुएझवरून जर्मनी येऊं शकेल. पण रशियन आघाडीवर शस्त्रास्त्रें कमी पडतात म्हणून तीं इजिप्शन आघाडीवरून जर्मनीनें नेलीं. अर्थात् दोन आघाडींवर एकदम तुंबळ रण माजविण्याइतकें रणसाहित्य जर्मनीजवळ नाहीं हें उघड दिसतें. (३) जर्मनीस हिंदुस्थानकडे यायचें तर इराण, तुर्कस्थान व ईजिप्त यांपैकीं एक अथवा अनेक मुसलमान राष्ट्रें पायाखालीं तुडवूनच यावें लागेल. पण आजवर जर्मनीनें तुर्कस्तानच्या आणि इतर कोणत्याही मुसलमानी राष्ट्राच्या (अल्बानिया खेरीज) तटस्थतेचा भंग केलेला नाहीं. मुसलमानी राष्ट्रांचे सर्व आधार तोडायचे आणि त्यांच्यावर आक्रमण न करतां त्यांना शरण आणायचें असा हिटलरचा विचार दिसतो. यामुळेंच हिंदुस्थानकडे तो सध्यां येणार नसावा.

(४) हिंदुस्थानच्या दिशेनें जर्मन सैन्यें पुढें सरकूं लागलीं कीं त्यांची आघाडी प्रचंड प्रमाणांत लांबत व रुंदावत जाते. यामुळें युरोपांतील जर्मन-सत्ता ढिली पडून तेथें बंडें माजतील अथवा फ्रान्सवर इंग्लंड आणि अमेरिका चाल करतील हेंही जर्मनीला मोठें भय आहे. (५) रशिया युरोपांत दुबळा झाला असला तरी जर्मनी हिंदुस्थानांत आल्यास रशिया इराणांतून हिंदुस्थानाकडे येईल व हिंदी जनतेची आपल्या स्फूर्तीनें आणि नेतृत्वाखालीं संघटना करून मराठ्यांनीं औरंगजेबास सतावलें तसें जर्मनीस रशिया व हिंदुस्थान सतावतील ही जर्मनीला भीति आहे. (६) हिंदुस्थान घेणें ही जपानच्या कार्यक्रमांतली एक महत्त्वाची बाब आहे. पण जपाननें सगळा अथवा बराचसा हिंदुस्थान जिंकल्यास तो पुढें जर्मनीसहि भारी होईल. म्हणून जर्मनीला जपाननें हिंदुस्थान जिंकावा हें पसंत नाहीं. पण जपानला प्रतिकार करणेंही आज जर्मनीला शक्य नाहीं. म्हणून इंग्लंड व अमेरिका यांनीं जपानचा परभारें समाचार घेतला तर जर्मनीस हवाच आहे. सगळा युरोप जर्मनीनें जिंकल्यास व आपल्या काबूंत ठेवल्यास ब्रिटिशसत्ता हिंदुस्थानांतून केव्हांही हुसकून लावतां येईल. कदाचित् जपानचा चूर्ण पाडाव अँग्लो-अमेरिकनांनीं केल्यास गोऱ्या लोकांचें साम्राज्य जगावर स्थापण्याची हिटलरची जी महत्त्वाकांक्षा तिच्या पूर्तीसाठीं तो अँग्लो-अमेरिकनांशीं समेट करण्यासही तयार होईल. हें दूरचें धोरण यशस्वी व्हायचें तर आज हिंदुस्थानकडे तोंड न फिरवतां युरोपांत पाय घट्ट रोवून कांहीं महिने बचावाचें धोरणच हिटलर पत्करील असें वाटतें. वरील अंदाज खरा ठरेल तर हिटलरचा हल्ला येथें बहुधा कधींच येणार नाहीं. पण त्या हल्ल्याचा धाक मात्र नेहमींच राहील व येथील सत्तासंक्रमणाचा प्रश्न सुटण्यास या दहशतीच्या टांगलेल्या तरवारीचा पुष्कळ उपयोग होईल.

* * *

जपान काय करील ? आज जपान सॉलोमन व न्यूगिनी बेटांत मार खात बसला आहे. अधिक चढाई करूं शकत नाहीं. या बेटांतील युद्धांत जपानचा नाशही पुष्कळ होत आहे. तथापि तेवढ्यामुळें जपान दुबळा झाला असें नाहीं. समुद्रांतलीं नाक्याचीं व धनसंपन्न अशीं शेंकडों बेटें जपाननें घेतलीं आहेत. समुद्रांतल्या बेटांचा माऱ्याच्या दृष्टीनें जसा चांगला उपयोग होतो

तसा उलट त्यांना बचावही अतिशय कठीण असतो. या सर्व बेटांवर तटबंदी, विमानतळ बांधणें हें बचावाच्या दृष्टीनें अवश्य आहे. त्या कामीं जपानची शक्ति आज खर्च होत आहे. तेल, रबर खोबरें व इतर नाना प्रकारचे उद्भिज्ज व खनिज पदार्थ काढून पिकवून जपानला नेणें, तेथें त्यांचें युद्ध-साहित्य बनविणें आणि परत तो माल हजारों मैल सभोंवार पसरलेल्या अनेक रणक्षेत्रांवर पोंचविणें हें काम जपानला करावयाचें आहे. तें सतत व वाढत्या प्रमाणावर चालू आहे. त्यामुळें जपानची शक्ति वाढत असावी अशीच भीति वाटतें. कारण सॉलोमन व न्यूगिनी बेटांत जपान मोठ्या जिकीरीनें लढत असतांही ब्रह्मदेशाच्या बाजूनें ब्रिटिश युद्धयंत्र हल्ला करीत नाहीं याचा एरवीं अर्थ काय ?

* * *

हें जपानचें बळ पुरेसें वाढलें तर जपान हिंदुस्थानवर चढाई करील काय ? तसा संभव फारसा दिसत नाहीं. जपानसंबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं भरपूर फितुरीवांचून जपानला हिंदुस्थानसारखा जागृत देश जिंकतां आला तरी फार काळ आपल्या कांबूत ठेवणें परवडणार नाहीं. मलाया व ब्रह्मदेश येथील सामान्य जनता ब्रिटनविद्वेषी असेल अथवा नसेल, तथापि पूर्ण स्वातंत्र्यप्रेमी नव्हती. येथें कॉंग्रेसनें गेल्या पन्नास वर्षांत प्रचंड जागृतीचें जें कार्य केलें आहे तें ब्रह्मदेश-मलाया यांत मुळींच झालें नव्हतें. म्हणून जपानचा हल्ला येणार असें दिसलें तेव्हां बहुसंख्य जनता बेफिकीर राहिली आणि अर्धवट जागृत व ब्रिटनविरोधी असे जे वर्ग ते सहजच जपानला अनुकूल झाले. हिंदी लोकांनीं ब्रिटिशांच्या आश्रयानें ब्रह्मदेशांत जें आर्थिक वर्चस्व स्थापन केलें, त्याविरुद्धही ब्रह्मी लोक चिडले होते. म्हणून त्यांनीं हिंदी लोकांना साफ लुबाडून हाकून लावण्याचें साधन म्हणूनही जपानला मदत केली. वरील सर्व कारणांमुळें जपानशीं लढावें ही इच्छा मलाया व ब्रह्मदेश येथील जनतेंत नव्हतीच. मलाया तर अतिशयच मागासलेला आहे. तेथील सुलतान व जनता फक्त शरीरानेंच माणसें असून जागृतीच्या दृष्टीनें जनावरेंच आहेत. हिंदुस्थानची अवस्था अशी नाहीं. जागृतीच्या दृष्टीनें गेलीं पन्नास वर्षें कॉंग्रेसनें महत्त्वाची कामगिरी केली. गेल्या वीस वर्षांत राजकीय स्वातंत्र्यासाठीं अखिल राष्ट्रीय स्वरूपाचे अनेक झगडे कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालीं

सामान्य जनतेनें देशभर केले आहेत. त्यामुळें राजकीय जागृति, लढ्याचें तंत्र आणि स्वातंत्र्यनिष्ठा हे थोर राष्ट्रीय सद्‌गुण जनतेच्या अंगीं बिंबले आहेत. अशी ही जनता ब्रिटनविद्वेषी आहे तरी जपानला फितुर होऊं शकत नाहीं. उलट युद्ध सुरू झाल्यापासून परचक्राशीं स्वामित्वानें लढायला मिळावें यासाठीं जनता झगडते आहे. आज हा झगडा अगदीं निकरास आला असून त्याचें स्वरूप अक्राळविक्राळ झालें आहे. तथापि जनता जपानला फितुर झाल्याचें तें लक्षण नव्हे. पूर्ण स्वतंत्र होऊन परचक्राशीं स्वामित्वानें लढावें ही ईर्षा दडपली गेल्यानें लोक चवताळले आहेत. लोक जर खरोखर फितुर असते तर त्यांनीं फक्त निमूटपणें राहायला हवें होतें. ब्रिटिश सरकार त्यामुळें गाफील राहिलें असतें आणि ब्रह्मदेशांतल्याप्रमाणें येथेंही आजवर जपानचें आक्रमण होऊन ब्रिटिशांचा पराभव झाला असता. पण जनतेचें आजचें प्रखर स्वातंत्र्यप्रेम आणि अचाट कर्तृत्व पाहून जपान हिंदुस्थानांत पाऊल टाकण्यापूर्वी विचार करीत आहे. हिंदी लोकांना दंगल माजविण्यास जपान आज जें एकसारखें उत्तेजन देत आहे तें ब्रिटिशांचें राज्य येथून जावें म्हणून नव्हे. हिंदी लोकांत असेलनसेल तें प्रतिकारबळ ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीखालीं चिरडलें गेलें म्हणजे जनता पूर्ण दुर्बल व हताश होईल आणि त्या वेळीं ब्रिटिशांचा सूड घेण्याची जनतेची भावना पेट घेऊन जपानच्या बाजूकडे जनतेला वळवील असा विश्वास जपानला वाटत आहे. इथल्या मूर्ख आणि क्षुद्र नोकरशाहीला मुळींच दूरदृष्टि नसल्यामुळें ती अजाणता जपानचें खेळणें होऊन येथें दडपशाही गाजवितें व जपानचा रस्ता मोकळा करीत आहे.

* * *

हिंदुस्थानवर जपानची स्वारी केव्हां येईल? येथील सरकारी अधिकारी सांगतात कीं हल्लींची ही दंगल म्हणजे जपानला आमंत्रणच आहे. ती आणखी जोरानें उसळली कीं जपानची स्वारी येईलच. पण हा समज सपशेल चुकीचा आहे. या दंगलीपासून धोका नाहीं असें नाहीं, व म्हणून दंगे थांबविले पाहिजेत हें सरकारचें म्हणणें एका दृष्टीनें सयुक्तिक वाटतेंही. पण लोकांची दंगे करण्याची ही प्रवृत्ति दंडुक्यांनीं आणि तोफांनीं साफ नेस्तनाबूद जर करण्यांत आली तर त्यापासून अधिकाधिक धोका आहे. कारण त्यामुळें जनतेचा पाठिंबा युद्धप्रयत्नास मिळणार नाहींच, पण उलट जपान जसजसा जवळ येईल, तसतशी

जनता जपानला अधिकाधिक अनुकूल होईल. ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीनें पूर्णपणें ठेंचून निघालेली जनता हीच जपानच्या चढाईस खरी संधि आहे. माझा अंदाज असा आहे कीं, येथील जनता जोंवर दंगल करीत आहे व सरकार तिला झोडपून काढीत आहे तोंवर जपान चढाई करणारच नाहीं. जनतेचें सामर्थ्य पूर्ण चिरडलें जाण्यापूर्वींच जर जपाननें चढाई केली तर ब्रिटिश सरकार जनतेशीं समेट करील व राष्ट्रीय एकजुटीचें सरकार येथें अधिकारावर येईलही. जपानला तें मुळींच फायद्याचें नाहीं. जनतेचा हा उद्रेक अजीबात नष्ट करून जनतेला पूर्ण मेषपाल बनविण्याची व येथें स्मशानशांतता निर्माण करण्याची ताकद येथल्या सरकारमध्यें आहे असें जपानला वाटतें. अशी स्मशानशांतता येथें निर्माण झाली कीं जपान हिंदुस्थानवर स्वारी करील असा संभव दिसतो. ही भयानक परिस्थिति जें ब्रिटिश सरकार उघड्या डोळ्यांनीं येथें निर्माण करीत आहे त्याला स्वतःला त्याचे अनर्थावह परिणाम दिसतील अशी आशा सध्यां वाटत नाहीं. जनतेच्या मदतीवांचून येथल्या सरकारला जपानविरुद्ध युद्ध जिंकतां आलें तर अमेरीनीं रेखाटलेलें त्याचें सुखस्वप्न खरें झालेलें त्यांना पाहायला मिळेल. पण जनतेच्या पाठिंब्यावांचून हें सरकार युद्ध जिंकू शकेल असा भरंवसा नाहीं. आणि पराभव पत्करावा लागला तर अमेरिकेचेंही त्यामुळें वाटोळें होईल. आतां अमेरिकाही ब्रिटिशांप्रमाणें डोळ्यांवर कातडें ओढून जनतेला नेस्तनाबूद करण्याचें हें कार्य चालू देणार आहे काय?

* * *

अमेरिकेच्या सद्यःस्थितीसंबंधानें एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं यापुढें जपान व जर्मनी अथवा यांपैकीं कोणीही एक राष्ट्र चालू युद्धांत विजयी होऊं देणें अमेरिकेला हितकर नाहीं. अमेरिका अजून युद्धोत्सुक नाहीं हें सत्य जितकें दुर्दैवी आहे तितकेंच अमेरिकेचें धनोत्पादनयंत्र जपान अथवा जर्मनी यांच्या विजयाशीं तडजोड करूंच शकत नाहीं हें सत्य भाग्याचें आहे. फ्रान्सच्या बँकवाल्यांनीं त्यांच्या इस्टेटींच्या सर्वनाशाची वेळ आली तेव्हां देशाचें स्वातंत्र्य विकून हिटलरची गुलामगिरी पत्करली. हिटलर आतां त्यांचेकडून युरोपच्या बँकांची संघटना करून घेईल. अमेरिकन धंदेवाल्यांना अशी वेळ आलेली नाहीं. सर्व युरोप हिटलरनें जिंकला तरी अमेरिका जिंकणें त्याला फार दुष्कर आहे. पण अमेरिकन धंदेवाल्यांना हिटलर

विश्वविजयी होईल असा धाक आतां स्पष्टपणें वाटूं लागला आहे. जर्मनीचें धनोत्पादनसामर्थ्य प्रचंड, पण अमेरिकेचें उत्पादनसामर्थ्य अधिकच प्रचंड असल्यानें अमेरिकेला जो जगाचा अफाट बाजार लागतो तो हिटलर लुबाडील ही भीति अमेरिकन कारखानदाराला आतां वाटूं लागली आहे. जपानबद्दलही हाच धाक अमेरिकेस वाटूं लागला आहे आणि अमेरिकेनें आपलें युद्धसामर्थ्य वाढविल्यावांचून सुटका नाहीं ही गोष्ट अमेरिकेला आतां पटूं लागली आहे. हेन्री फोर्डसारखे कारखानदार जर्मनी व जपान यांच्या वाढत्या शक्तीची आजवर उपेक्षा करीत आले असून, ब्रिटिशांच्या साम्राज्यलोभामुळें जगांत युद्धें होतात असें मानीत व इंग्लंडचीं युद्धें इंग्लंडनें पाहून घ्यावीं असें म्हणत असत. पण आतां हे शत्रु इंग्लंडला आटपत नाहींत, अमेरिकेनें ते अंगावर घेऊन त्यांचा फडशा पाडला पाहिजे असे ते मानीत आहेत. या दृष्टीनें वेंडेल विल्की यानें मॉस्को व चुंकिंग येथें जीं मतें प्रतिपादिलीं तीं फार महत्त्वाचीं आहेत. रूझवेल्ट हा आरंभापासूनच चेंबरलेनच्या धोरणाला विरुद्ध आणि चर्चिलला अनुकूल आहे. याचा अर्थ तो युद्धाला अनुकूल होता असाच होतो. तो युरोपीय युद्धांत अमेरिकेला खेचीत आहे असा प्रचार गेल्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकींत रूझवेल्टविरुद्ध केला जात असून वेंडेल विल्की हाच रूझवेल्टचा प्रतिस्पर्धी होता. हेन्री फोर्ड वगैरे प्रचंड कारखानदार रूझवेल्टविरुद्ध असून विल्कीच्या बाजूस होते. हळूहळू युरोपीय युद्धांत इंग्लंडची बाजू जशी कमजोर होऊं लागली तसतसा विल्कीगट युद्धानुकूल होऊं लागला. हेन्री फोर्ड इंग्लंडसाठीं माल तयार करण्यासही राजी नसे. तो आतां जास्तींत जास्त माल संयुक्त राष्ट्रांना देण्याचा हिय्या बांधीत आहे. आतां इंग्लंडपेक्षांही अधिक युद्धोत्सुकता विल्कीगटाच्या ठिकाणीं आली आहे. जर्मनीनें अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारल्याचा हा परिणाम आहे हें खरेंच; पण जर्मनी व जपान यांच्या विजयांत अमेरिकेचा सर्वनाश आहे आणि जर्मनी व जपान यांचा पाडाव अमेरिकेनेंच पुढाकार घेऊन केला पाहिजे असें विल्की याला पटलें असून तें तो ओरडून सांगूं लागला आहे. अमेरिकेचें लोकमत युद्धाच्या बाजूनें इतकें जोरानें झुकलें हें, माझ्या मतें, चालू युद्धांतला एक जुना कालखंड संपून नवा कालखंड सुरू झाल्याचें द्योतक होय.

* * *

विल्कीच्या घोषणांचें आणखी एक वैशिष्ट्य आहे; तेंही चालू युद्धांतील एक कालखंड संपून दुसरा कालखंड सुरू झाल्याचेंच द्योतक आहे. या मुद्द्यावर ब्रिटिश मुत्सद्दी व विल्की यांचेमध्यें तीव्र मतभेदही होऊं लागला आहे. रशियाचे मदतीसाठीं दुसरी आघाडी सुरू केली पाहिजे, या बाबतींत लष्करी तज्ज्ञांचे मतामागें न दडतां लष्करी तज्ज्ञांनाच पाठीमागून ठोसे मारून दुसऱ्या आघाडीला प्रवृत्त केलें पाहिजे असें विल्की म्हणतो. इंग्लंडांत हल्लीं असा एक मतवाद ऐकूं येतो कीं लष्करी खात्यात साम्राज्यवादी मुत्सद्द्यांचा भरणा विशेष असून ते युरोपांतल्या दुसऱ्या आघाडीपेक्षां ब्रिटनचें जगावरील प्रभुत्व कसें टिकून राहील याचा विचार करीत आहेत. टॉम विंट्रिंगहॅम याच्यासारखा आधुनिक रणविद्येचा अनुभव असलेला समाजवादी लेखक सांगतो कीं, यापुढें इंग्लंडांत समाजवादी क्रांतीच्या दिशेनें पाऊल टाकल्यावांचून—साम्राज्याचा त्याग व संयुक्त राष्ट्रांचा सामुदायिक विजय असें ध्येय ठेवल्यावांचून–जिव्हाळ्याचा संग्राम होणारच नाहीं. दुसऱ्या आघाडीचा प्रश्न हा ब्रिटिश साम्राज्याच्या गळ्याशीं भिडला असून त्या दृष्टीनें तो ब्रिटन-पुरता तरी राज्यक्रांतीचा प्रश्न होऊन बसला आहे हें येथें लक्षांत येईल. वेंडेल विल्की यानें दुसऱ्या आघाडीचा तांतडीनें पुरस्कार केल्याबरोबर ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या खुराड्यांत इतका फडफडाट कां झाला हेंही यावरून समजून येईल. विल्कीच्या घोषणेंतून मीं हें ओढूनताणून अनुमान काढलें असें कोणास वाटायला नको. चुंकिंग येथील मुलाखतींत विल्कीनें स्वतः सगळ्या साम्राज्य-शाहीखालीं नांगर घातला आहे. तो म्हणतो “ अटलांटिक सनदेवर कोणाचा-ही विश्वास नाहीं. पासिफिकभोंवतालच्या राष्ट्रांना ती लावणार कीं नाहीं असें लोक मला विचारतात. निरनिराळ्या राष्ट्रांतील सामान्य जनतेनें जिव्हाळ्याचें साहाय्य मिळाल्यावांचून युद्ध जिंकणें अतिशय कठीण आहे आणि युद्धोत्तर शांतता निर्माण करणें जवळ जवळ अशक्यच आहे...संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत सामील होणाऱ्या वसाहतराष्ट्रांना लोकशाहीप्रधान व स्वतंत्र बनविणें हें संयुक्त राष्ट्रांचें कर्तव्य आहे. कांहीं लोक म्हणतात, युद्धांत विजय मिळेपर्यंत ही बाब दडपून ठेवूं. पण याच्या अगदीं उलट गोष्टच अवश्य आहे. युद्धानंतर पालट व्हायचे ते फार थोडे होतील आणि तोंवर योग्य वेळ निघूनही जाईल.” विल्कीला हिंदुस्थानांत येऊं देण्यास ब्रिटिश सरकारचा

विरोध होता हें गौप्य आतां उघड झालें आहे. त्याच्या वरील उद्‌गारांत हिंदुस्थानचा नामनिर्देश नाहीं. पण वसाहतराष्ट्रें असा उल्लेख करून सर्व अंकित राष्ट्रांना युद्धकालींच स्वातंत्र्य व लोकशाही द्या असें तो सांगतो आहे. त्यांत हिंदुस्थानही त्याला अभिप्रेत आहे यांत शंका नाहीं. येथील कॉंग्रेसच्या मागणीलाच त्यानें पाठिंबा व्यक्त केला असा याचा स्पष्ट अर्थ आहे. विशेषतः चॅंग-कै-शेक याच्याशीं विल्कीची मुलाखत झाल्यानंतर विल्कीनें ही मुलाखत दिली आहे व चॅंगनें हिंदुस्थानसंबंधानें आपलें मत विल्कीला कळविलें असलें पाहिजे, असें समजण्यास मुळींच हरकत नाहीं.

* * *

विल्की हिंदुस्थानला स्वातंत्र्य देणार असा प्रचार करण्याचा हेतु येथें नाहीं. एवढे मोठे ऐतिहासिक प्रश्न एखाद्या व्यक्तीच्या मतावरून सुटत नसतात. उद्यां विल्की अमेरिकेंत गेल्यावर वेगळी भाषा बोलेल अथवा त्याचे अनुयायी त्याचा त्याग करतील हें शक्य आहे. पण विल्कीच्या उद्‌गारांना वाऱ्याची दिशा दाखविण्याच्या दृष्टीनें महत्त्व आहे. हिंदुस्थानांतील कॉंग्रेसची मनोवृत्ति, ब्रह्मदेश व मलाया येथें जनतेचा पाठिंबा नसल्यामुळें ब्रिटनला मिळालेला पराजय आणि जनतेच्या पाठिंब्यामुळें रशियन सरकारनें गाजविलेली मर्दुमकी या सर्व गोष्टींमुळें फॅसिस्टविरोधी लढयांत जनतेच्या पाठिंब्याची तीव्र गरज असते ही गोष्ट अमेरिकेस पटूं लागली आहे. जर्मनी व जपान यांना नेस्तनाबूद केलें पाहिजे ही गोष्ट आतां अमेरिकन मुत्सद्दी व कारखानदार यांना पटलीच आहे. त्यासाठीं जगावरच्या सर्व रणांगणांवर पुरतील एवढीं शस्त्रास्त्रें बनविण्याची धमक त्यांच्यांत आहे. पण अमेरिकन सैनिकांना हिंदुस्थान व चीन या देशांत येऊन, येथील जनता स्वस्थ असतां, या देशाच्या रक्षणासाठीं लढण्यास उत्साह वाटणेंच शक्य नाहीं. खुद्द अमेरिकेच्या रक्षणाला बरेच अमेरिकन सैनिक हवेत आणि युरोपांत चढाई करावयाची असो नसो, त्या नांवानें कांहीं सैनिक राखून ठेवायला हवेतच. हिंदुस्थानवर परचक्र आल्यास (व ते दोहींकडून येईल असें धरून चाललें पाहिजे,) जवळपास पाऊण कोट सैन्य येथें उभारलें गेलें पाहिजे. आजच्या सरकारला अजून पंधरावीस लक्षांहून अधिक सैन्य उभारतां आलेलें नाहीं. नागरिकांचा पाठिंबाही हल्लींच्या सरकारला मिळतो आहे तो अगदीं थोड्या प्रमाणांत मिळतो आहे. हिंदुस्थानचें

सर्व सुप्त सामर्थ्य व्यक्त करून युद्धांत ओतल्याशिवाय रण यशस्वी होणार नाहीं ही गोष्ट अमेरिकेस पटली आहे. इंग्लंडवर अमेरिकेनें याबाबत सक्ती करणें हें सोपें नाहीं आणि अमेरिकन कारखान्यांतून शस्त्रास्त्रें फारच जास्त प्रमाणांत बाहेर पडून सैनिकांविना शस्त्रास्त्रें बेकार पडूं लागलीं अशी अवस्था अजून आली नाहीं. तितकी परिस्थिति येतांच आपलीं शस्त्रास्त्रें बेकार पडल्यानें धंदा नुकसानींत येऊं नये या साध्या वैयक्तिक स्वार्थासाठींही हेन्री फोर्ड ब्रिटनचा कान पिळून त्याला काँग्रेसशीं तडजोड करायला लावील. जपानचें आक्रमण तांतडीनें आलें, आणि ( अथवा ) येथील जनतेच्या आकांक्षेचा जोर वाढला तर ही घटना बरीच लवकर घडून येण्याचाही संभव आहे.

* * *

अमेरिकन लोकमतासंबंधानें मीं हें जें चित्र काढलें आहे तें जाणूनबुजून जास्त आशावादी असें काढलें आहे. अमेरिकेंतला एक विचारप्रवाह ठळकपणें लक्षांत यावा म्हणून हें असें काढलें आहे. पण रोगी मेला आणि डॉक्टर येऊन पोंचला असें घडणार नाहीं असें नाहीं. ब्रिटिश सरकार हल्लीं ज़नतेच्या उद्रेकावर अघोर दडपशाही करते आहे. यामुळें जनता व अधिकारीवर्ग यां-मधील तेढ वाढते आहे. दंगल जी माजली तिच्यामागें, जपानशीं स्वामित्वानें लढण्याची तीव्र इच्छा दडपली गेली याचा त्वेष हा स्फूर्तिदाता होता. क्रिप्स-सारख्या समाजवाद्यानें ही फसगत केली याची ती चीड होती. या भावनेंत देशद्रोह नव्हता, देशप्रेम होतें. तिजकडे सरकारनें सहानुभूतीनें व ममतेनें पाहणें अवश्य होतें. पण सरकारला वाईट सल्लागार लाभले, आणि अधिकाऱ्यांनीं अनन्वित कृत्यें केलीं. आतां याचा परिणाम म्हणून लोकांच्या भावना जर चेतल्या गेल्या, तर चळवळ दबल्यासारखी दिसेल, पण तिच्या पोटीं ब्रिटिशद्वेष भडकेल आणि ब्रिटिशांचा सूड घेण्याची भावना दृढ होत जाऊन ती जपान-ला आमंत्रण करील. अमेरिकन लोकमत जागृत होऊन हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यापूर्वींच ही गोष्ट घडली तर अमेरिकन लोकमत जागृत होण्यापूर्वींच हिंदुस्थान जपानच्या अमलाखालीं गेलाही असेल. रोगी मेला आणि डॉक्टर आला अशी ही अवस्था होईल. पण मग या परिस्थितीवर कांहींच इलाज चालणार नाहीं. म्हणून तिचा विचारही मी टाळतों आहे. ज्याला कांहीं तरी करायचें आहे त्यानें पुढील मार्ग स्पष्ट दिसत नसला तरी निष्क्रियता

व नाइलाज यांनीं सर्व रस्ता बंद होईपर्यंत आशादायी व कर्तृत्वपर राहावें आणि कर्तव्य करण्याचा मार्ग शोधावा. आशातंतु जेथें दिसेल तेथें तो धरून पुढें पाऊल टाकावें. निराशा गृहीत धरण्याचा कांहींच उपयोग नसतो. येथें आशादायी परिस्थिति कोणती आहे? आज हिंदुस्थानांतील भांडवलदार-कारखानदारवर्ग कॉंग्रेसला पाठिंबा देत आहेत. ते अमेरिकेला जागृत करीत आहेत. हिंदी लोकांचे क्लेश जसजसे वाढतील तसतसा त्यांचा परिणाम ब्रिटिशांवर व अमेरिकेवरही होऊं लागेल. येथल्या भांडवलदारांची आणि बहुसंख्य जनतेची सहानुभूति स्वातंत्र्याच्या झगड्यास भरपूर आहे. येथली सत्ता ब्रिटिशांपासून लोकप्रतिनिधींच्या हातीं आणणें हें फॅसिस्टविरोधासाठीं अवश्य आहे. फॅसिस्टविरोधी युद्धासाठींच येथली साम्राज्यशाही, विल्की म्हणतात त्याप्रमाणें, आजच नाहींशी करणें जरूर आहे. त्यासाठीं साम्राज्यविरोधी झगडाही चालू ठेवला पाहिजे. तथापि सरकारनें केवढेंही अमानुष वर्तन केलें तरी जपानच्या अथवा जर्मनीच्या सहकार्यानें ब्रिटिश सत्ता येथून घालविण्याची मनोवृत्ति देशभक्तांत निर्माण होऊं नये ही गोष्टही फार महत्त्वाची आहे. हें कार्य अतिशय बिकट आहे. पण तेंच केलें पाहिजे. ब्रिटिश सत्तेकडून क्रूरपणें दडपलें जात असतां आणि राज्यसत्ता मिळणें अशक्य होत असतांही लोकांनीं जपानानुकूल होऊं नये हें कितीही कठीण असलें तरी त्याचा प्रचार करणें हें पुढाऱ्यांना व कार्यकर्त्यांना अत्यवश्यच आहे. जपानचा हल्ला थोपवून येथें सत्ताक्रांति घडवून आणण्यास त्यानेंच अवधि मिळणार आहे. हा समतोल संभाळून दीर्घकाल राजकारण रेटल्यास ब्रिटिशांच्याच हातून सर्व सत्ता येथें प्राप्त होईल, निदान याहून भिन्न संभवाची कल्पना असह्य होते व ती निरुपयोगीही आहे.

* * *

स्वामित्वानें युद्ध चालविण्याची आकांक्षा तर तीव्र होत जावी, त्यासाठीं ब्रिटिश सरकारशीं जनतेनें भांडतही राहावें, पण कितीही अपयश आलें तरी परचक्राला अनुकूल अशी मनोवृत्ति येथें निर्माण होऊं देऊं नये, जपानला येथें आपणास भुसभुशीत जमीन मिळेल असें वाटूं देऊं नये, अशी तीव्रता आणि असा समतोल येथल्या राजकारणांत ठेवणें जर प्रचारकांना शक्य झालें तर पूर्ण सत्ताप्राप्ति, समाजक्रांति व युद्धांत विजय या गोष्टी आपणांस करतां

येतील. या सर्व गोष्टी परस्परावलंबनानेंच घडतील. त्यांचा आराखडा अथवा वेळापत्रक देतां येणार नाहीं. । लोकांना या सर्व गोष्टींची स्पष्ट कल्पना एकदम येणारही नाहीं. तथापि लेनिनच्या भाषेंत सांगायचें म्हणजे युद्धाच्या दडपणानेंच लोक या सर्व तत्त्वांस अनुकूल होतील व तीं हस्तगत करण्याच्या प्रयत्नांत साहाय्य करतील. अमेरिकेचा लढण्याचा निर्धार असून तिचें वाढतें सामर्थ्य अफाट असल्यानें युद्ध दीर्घकाल चालेल. दिल्लीस आज ना उद्यां राष्ट्रीय सरकार स्थापन होणारच आहे. पण तें स्थापन न झालें तर त्याची पर्वा करूं नये. परचक्राचा धाक जसा वाढूं लागेल, तसतशीं खेड्यापाड्यांतूनच राष्ट्रीय सरकारें स्थापन झालीं पाहिजेत. जिनांचें समाधान करून हिंदुमुसलमान ऐक्य घडविण्याचे चाळे आतां पुरे झाले. खेड्यांतून सर्व जनतेचीं ग्रामरक्षणमंडळें आणि स्वयंसेवकमंडळें स्थापन झालीं पाहिजेत. सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या मदतीशिवाय ग्रामरक्षण करतां येणार नाहीं आणि त्यांचें साहाय्य घेतल्यावांचून अधिकाऱ्यांचें चालणार नाहीं. ब्रह्मदेशांतली जनता अजागृत होती; तिनें व अधिकाऱ्यांनीं परचक्र येतांच एकमेकांचा त्याग केला. हा प्रकार येथें होऊं देऊं नये. गांवोगांवच्या पुढाऱ्यांना जनतेचें संघटन परचक्रानिवारणासाठीं जेव्हां करावें लागेल त्या वेळीं जनतेला राष्ट्रीय लढ्यांत महत्त्व वाटण्यासाठीं सावकारीचे प्रश्न व हक्कदारीचे प्रश्न सलोख्यानें—सलोख्याच्या सत्तीनें—सोडवावे लागतील. धनोत्पादन मोठ्या प्रमाणांत व्हावें, यासाठीं शेतकऱ्यांना जमिनींत अधिक ठेवा उत्पन्न करून द्यावा लागेल. यासाठींच सावकारी व जमीनमालकी यांत क्रांति करावी लागेल. एक ठळक उदाहरण घ्यायचें म्हटलें तर बंगालचें घेतां येईल. बंगालवर परचक्र आल्यास तेथील जनतेला युद्धोत्सुक करण्यासाठीं गांवोगांवच्या पुढाऱ्यांना जमीनदारी खालसा करून शेतकऱ्यांना जमिनी देऊन टाकाव्या लागतील. सावकारीचे दस्तैवज अंशतः तरी फाडावे लागतील.

* * *

ब्रह्मी जनता जपानी सत्तेस अनुकूल झाली याचें एक महत्त्वाचें कारण असें होतें कीं, ब्रह्मदेशांत हिंदी व ब्रिटिश सावकार आणि इस्टेटदार जे होते व ज्यांनीं गेल्या पाऊणशें वर्षांपासून तेथील जनतेची पिळणूक केली होती, त्यांच्या दौलती म्हणजे कर्जरोखे व मालकनामे भस्मसात् होणार आणि आपल्या डोकी-

वरील ऋणाचा असह्य भार नाहींसा होणार ही आशा जनतेला वाटूं लागली. हा भार अन्यायाचा होता. राजकीय गुलामगिरींत जनतेला पकडून तो लादण्यांत आला होता. येथील जमीनदारी व सावकारी यांचें जनतेवरील ओझें असेंच आहे. तें आमच्या हातानें कमी करून पुन्हा असा अन्याय होणार नाहीं अशी समाजव्यवस्था जनतेला दिली पाहिजे. ही समाजक्रांतीची हांकच जनतेला खरोखर युद्धोत्साहित करणारी आहे, आणि हजारों वर्षांच्या पारतंत्र्याच्या व सांस्कृतिक गलिच्छपणाच्या बेड्या तोडण्याचें कर्तृत्व जनतेच्या अंगीं निर्माण करणारी आहे. दहा कोटि संस्थानी प्रजेंत युद्धाचा उत्साह निर्माण करण्याची निकड निर्माण झाली कीं कोणतेही तहनामे त्या वेळीं आड येणार नाहींत. मलायंतील संस्थानिकांनीं व त्यांच्या अज्ञ प्रजेनें जपानपुढें लोटांगण घातलें त्या वेळीं एकाही संस्थानिकानें ब्रिटिशांशीं झालेला तहनामा वाचून पाहिला नाहीं अथवा ब्रिटिश मुत्सद्दयांनीं पार्लमेंटांत त्याचा उल्लेख केला नाहीं. जबाबदार राज्यपद्धतीची सक्ती करण्यापासून संस्थानें, जहागिरी व त्यांतील विविध हक्कदाऱ्या खालसा करण्यापर्यंत केवढेंही कृत्य, जनतेला जागृत व उत्साहित करण्यासाठीं केलें तरी त्यांत कांहीं अत्याचार नाहीं. परचक्राचा पराभव करणें व पुढें परचक्राचा असंभव होईल इतकें समाजसंघटनेचें बल वाढविणें या ध्येयासाठीं क्रांतिच अवश्य आहे व ती केलीच पाहिजे. येथील भांडवलदारी व कारखानदारी यांचें काय होणार हें आजच समजत नाहीं. कारखानदार राष्ट्रीय स्वातंत्र्य व परचक्रविरोध यांस अनुकूल दिसताहेत, यामुळें कामगार-कारखानदार असा वर्गविरोध न होतांही कामगारहिताच्या अनेक योजना अमलांत आणतां येतील असा संभव आहे. सार्वजनिक आवश्यकतेचे कारखाने व साधनें सार्वजनिक मालकीचीं करणें हें कराचीच्या कॉंग्रेस ठरावाप्रमाणेंच आवश्यक ठरेल. पण या सर्व तपशीलाच्या बाबी आहेत. युद्ध चालविण्यासाठींच क्रांतीच्या दिशेनें जाणें अपरिहार्य व इष्ट आहे आणि युद्ध चालविणें हीच क्रांति घडवून आणण्याची संधिही आहे एवढें कळण्याला इतकी त्रोटक चर्चा पुरे. युद्ध संपल्यानंतर यांतलें कांहीं करूं म्हटल्यानें होणार नाहीं. युद्धाच्या दडपणानेंच या गोष्टी घडवून आणतां येतील व त्यास अवधि मिळेल एवढेंच मला येथें दर्शवावयाचें आहे.

* * *

मध्य सरकारांत संयुक्त जबाबदारीचें तत्त्व जर मान्य झालें तर ब्रिटिश सरकारशीं युद्धकालांत समेट करून राष्ट्रीय सरकार स्थापन करावें, याहून अधिक पूर्ण स्वातंत्र्याचा हट्ट आज धरूं नये असें मला वाटतें. अमेरिकेची मदत येवो न येवो स्वामित्वानें लढतां यावें इतकी किमान सत्ता मात्र आपण आपल्या बळानें मिळविलीच पाहिजे आणि जनतेला हताश व जपानला अनुकूल होऊं न देतां ती मिळविली पाहिजे. या कामीं यश येईल इतकी तरी जागतिक परिस्थिति अनुकूल आहे खास. जगाची मदत प्रत्यक्षपणें आज मिळणार नाहीं. पण हळूहळू जग राष्ट्रीय स्वातंत्र्यालाच नव्हे तर समाजक्रांतीलाही अनुकूल होत आहे. रशिया हा आजच्या जागतिक समाजाचा फार मोठा घटक आहे. त्याचें शस्त्रसामर्थ्य कमी होऊन आज तो पांगळा झाल्यासारखा झाला असला तरी त्यामुळेंच क्रांतिकारक ध्येयवादाचें बळ वाढविणें हें त्यास अत्यवश्य झालें आहे. जगाचे प्रश्न नुसता जर्मनीचा पराभव करून व युरोपला अटलांटिक सनद लावून सुटणार नाहींत. अखेर जर्मनी व जपान यांनीं जिंकलेल्या जनतेलाही समाजवादाचें आश्वासन देऊन व त्याचसाठीं प्रत्यक्ष मदत करून फॅसिस्टांचा पाडाव करावा लागेल. रशियाला युद्धोत्तरकालांत पुनश्च युद्धाचा प्रसंग लवकर न यावा यासाठीं अथवा आलाच तर त्यांत टिकून राहण्याइतकें बळ वाढविण्यासाठीं समाजवादी राष्ट्रें निर्माण करून त्यांची प्रचंड संघटना बांधली पाहिजे. स्टॅलिन जगत्क्रांतीचें ध्येय सोडील, अथवा आज शस्त्रदुर्बल झाल्यानंतर क्रांतिसामर्थ्य हें जें त्याचें एकटें एक सामर्थ्य तें तो सोडूं शकेल असें मला वाटत नाहीं. हिंदी लोकांनीं फॅसिस्टांशीं लढायचें, स्वामित्वानें लढतां यावें यासाठीं ब्रिटिशांपासून पूर्ण सत्ता हिसकून घ्यायची, ही सत्ता घेण्यासाठीं जपानची अथवा शत्रूची मदत घ्यायची नाहीं आणि स्वातंत्र्यलढा लढतां लढतां त्यासाठीं समाजक्रांति करायची असा चतुर्विध निर्धार केल्यास आंतरराष्ट्रीय परिस्थिति या कार्यासाठीं अनुकूल होत आहे. या कार्यांत हिंदुस्थानला यश येईलही. आपला देश एवढा मोठा व महत्त्वाचा आहे कीं जगाच्या समाजवादी पुनर्घटनेचें नेतृत्वही हिंदुस्थानकडे येऊं शकेल.

—धनुर्धारी, दिवाळी अंक, १९४२

# अहिंसावादाचें भवितव्य : : १८

ता. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं गांधींना अटक झाल्यानंतर जे बाँबगोळे कांहीं काळ उडत राहिले त्यांनीं गांधींची अहिंसा निजधामास गेली असें पुष्कळांचें मत आहे. ता. ८ ऑगस्टनंतरचें 'बंड' हें अहिंसाप्रधान होतें कीं नाहीं याबद्दल मी येथें वाद घालूं इच्छीत नाहीं. पण गेल्या तेवीस वर्षांत गांधींनीं ज्या अहिंसात्मक चळवळी केल्या तशा चळवळी यापुढें शक्य नाहींत अशी माझी खात्री झाली आहे. गांधींनीं सरकारला कायदेभंगाची आगाऊ नोटीस द्यावी, विचाराला व तयारीला सवड द्यावी, कायदेभंगाचा प्रकार कळवावा, त्याच्या मर्यादा कळवाव्या, सरकारनेंही बरीच सहिष्णुता दाखवावी, सत्याग्रहाची तयारी व प्रचार गांधींना व काँग्रेसला करूं द्यावा, गांधींना बराच काल खुलें ठेवावें, मागाहून त्यांना अटक केल्यावर आसुरी दडपशाही करून चळवळ दडपून टाकावी, गांधींच्या अनुयायांनीं गांधीजी तुरुंगांतून येईपर्यंत नवीन धोरण अमलांत आणायचें नाहीं म्हणावें, चळवळींत शैथिल्य आलें कीं सरकारनें गांधींना व काँग्रेसला बंधमुक्त करावें, मग हळूच सनदशीर राजकारणानें डोकें वर काढावें, त्याची कांहीं काल चलती व्हावी, पुन्हा निराशेची लाट येऊन सत्याग्रहाच्या दिशेनें राजकारण धावूं लागावें व ही दुसरी फेरी पहिल्याचसारखी पण अधिक वेगानें चालू व्हावी, असा प्रकार

गेल्या तेवीस वर्षांत दोनदां झाला. गोफण वाटोळी वाटोळी अनेकवार फिरविली कीं तिच्यांतील धोंड्याला वेग चढत जातो व तो वेग पुरेसा चढला कीं, तो धोंडा सोडून देण्यांत येतो व तो मग भयानक वेगानें फार दूर अंतरावर फेकला जातो. ८ ऑगस्ट १९४२ रोजीं गांधींच्या इच्छेनें म्हणा अनिच्छेनें म्हणा, त्यांच्या गोफणींतला धोंडा निसटला व तो भयानक वेगानें गेला; पण त्याच्या वेगांत गोफणही गांधींच्या हातून निसटली असें वाटत आहे.

* * *

गांधी आणि सरकार या दोघांनींही एकमेकांना बिनतोड परिस्थितींत कोंडलें आहे. हिंदुस्थानांत जनतेच्या विश्वासांतलें मध्यसरकार स्थापल्यावांचून जपानविरुद्ध लवकर विजय मिळविणें अँग्लो-अमेरिकनांना बरेंच कठीण आहे. पण एकदां लोकांच्या विश्वासांतलें मध्यसरकार स्थापन केलें कीं युद्ध लढतां लढतांच हिंदी लोक स्वतंत्र होतील हा ब्रिटिशांना धोका आहे. पण जपानविरुद्ध लवकर विजय न मिळाल्यास युद्धाच्या दडपणाखालीं युद्धजन्य आपत्तीमुळें हिंदुस्थानांत भयानक अशी समाजक्रांति होईल व त्यामुळेंही ब्रिटिश साम्राज्य लयास जाईल हा धोका आहेच. म्हणून गांधींचें म्हणजेच कॉंग्रेसचें मागणें मान्य तर करवत नाहीं आणि तें मान्य केल्यावांचून क्रांति टाळण्याचा दुसरा उपाय तर शिल्लक नाहीं अशा अडचणींत ब्रिटिश सरकार सांपडलें आहे. उलट गांधी व कॉंग्रेसही बऱ्याच अडचणींत पडलीं आहेत. गांधी, त्यांची विचारसरणी, त्यांचें तंत्र व त्यांचे मंत्र सर्व साफ चिरडून टाकण्याचा दृढ निर्धार केलेले चर्चिल व अमेरी हल्लीं ब्रिटनमध्यें हुकूमशहा आहेत. त्यांना जिनासारखा तितकाच आडमुठा व त्यांच्या तंत्रानें चालणारा साथीदार मिळाला आहे. यापुढें सनदशीर राजकारण जर कॉंग्रेसला करायचें असलें तर जिनांच्या पाकिस्तानला म्हणजे ब्रिटिश साम्राज्यशाही वर्चस्वाला पाठिंबा देण्याहून कॉंग्रेसला गत्यंतरच नाहीं. पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, ८ ऑगस्टचा ठराव कॉंग्रेसनें परत घेऊन प्रांतांत पूर्वीप्रमाणें मंत्रिमंडळें बनविण्यास संमति दिली तर सरकार ९३ कलमाचा अंमल थांबवून कॉंग्रेस मंत्रिमंडळें अधिकारावर येऊं देईल. पण ही भूल आहे. पुन्हा पूर्वीचें कॉंग्रेस मंत्रिमंडळ येईल तर त्याविरुद्ध आपण बंड करूं असें जिनांनीं

जाहीर केलें असून ब्रिटिश सरकारनें जिनांना या कामीं फूस दिली आहे. अशा स्थितींत, जिनांच्यापुढें लोटांगण घालण्यावांचून गांधींना व काँग्रेसला मंत्रिमंडळ मिळवितां येणार नाहीं. पण या मार्गांतून पुढें स्वातंत्र्यलढा निर्माण होणेंच अशक्य असल्यामुळें गांधी ही तत्त्वत्यागाची भूमिका कधींच घेणार नाहींत. त्यामुळें यापुढें गांधींचें उरलेलें आयुष्य तुरुंगवासांत अथवा पूर्णपणें अ-राजकीय अशा कार्यांत जाईल कीं काय अशी भीति वाटत आहे.

* * *

गेल्या तेवीस वर्षांत गांधींनीं जें अहिंसातंत्र अवलंबिलें तें यापुढें अशक्य आहे असें ठरलें तर हिंदी स्वातंत्र्यास आतां दुसरा मार्ग उरला आहे काय? आणि अहिंसा ही हिंदी स्वातंत्र्यासाठीं नव्हे तर एकंदर जगाच्या स्वातंत्र्या-साठीं एकच एक असा रामबाण उपाय आहे असें गांधींनीं पूर्वी म्हटलें त्यांत आतां कांहीं अर्थच उरला नाहीं कीं काय? पण अहिंसेचा मार्ग उरला नाहीं असें म्हटलें तरी शस्त्रमार्ग तरी उपलब्ध आहे काय? गांधींच्या अटके-नंतर जे बाँबगोळे उडाले त्यांना यश आलें नाहीं. एवढ्यावरूनच शस्त्रमार्गा-बद्दल ही शंका मी विचारतों आहे असें नव्हे. आजच्या आंतरराष्ट्रीय युद्धांत शस्त्रमार्गाचा अवलंब होतोच आहे आणि असें आपण तूर्त धरून चालू कीं, ज्याचें शस्त्र अखेर बलाढ्य ठरेल तोच जिंकील. म्हणून शस्त्रमार्ग कोणासच उरला नाहीं असें म्हणण्याचें तूर्त कारण नाहीं. पण खरा प्रश्न हा नव्हे. मूळ प्रश्न हिंदुस्थानच्या परिस्थितींतून उद्भवला. हिंदुस्थानला ब्रिटनच्या अमलांतून शस्त्रप्रहारानें बाहेर पडतां येईल काय? हा खरा प्रश्न आहे आणि खरोखर साऱ्या जगापुढें असलेला प्रश्न याच स्वरूपाचा आहे. आंतरराष्ट्रीय युद्धें १०-१२ वर्षांनीं सतत निरनिराळ्या राष्ट्रांत होत आलीं आहेत. पण खरा झगडा बहु-संख्य मानवजातीस आपापल्या देशांतच खेळावा लागतो. हिंदुस्थान हें इंग्लंड-चें अंकित राष्ट्र आहे, म्हणून इंग्लंड हिंदुस्थानची पिळणूक करतें. पण खुद्द हिंदुस्थानांत येथील वरिष्ठवर्गाकडून सामान्य जनतेची पिळणूक होत असते आणि स्वतंत्र मानल्या गेलेल्या सर्व राष्ट्रांत वरिष्ठ अशा मूठभर वर्गाकडून प्रचंड बहुजनसमाजाची पिळणूक होत असते. खरोखर भयानक अशीं जीं आंतरराष्ट्रीय युद्धें त्या युद्धांनाही ही अंतर्गत पिळणूकच कारण होत असते. स्वदेशांतील जनतेची भांडवलदार राष्ट्रें पिळणूक करतात आणि तद्द्वारा

मिळणारा नफा परदेशांत गुंतविण्यासाठीं मुलूख हवेत म्हणून आपसांत भांडतात. त्या भांडणांस लहानमोठ्या युद्धांचें स्वरूप येतें. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका, जपान वगैरे सर्व भांडवलदार राष्ट्रांनीं प्रथम स्वदेशांतील जनतेची पिळणूक केली आणि त्यांतून मिळालेला नफा गुंतविण्यासाठीं मुलूख हवेत म्हणून हीं राष्ट्रें आजवर युद्धें खेळत आलीं आहेत. या आंतरराष्ट्रीय युद्धांतही अखेर जगांतील बहुसंख्य जनताच मरते. तेव्हां आंतरराष्ट्रीय युद्धें जर्शी थांबलींच पाहिजेत तर्शींच त्यांना कारण होणारी त्या त्या राष्ट्रांतील बहुसंख्य जनतेची पिळणूक व नफेबाजी हींही प्रथम थांबलीं पाहिजेत. पैकीं आंतरराष्ट्रीय युद्धें तूर्त तरी सशस्त्र अथवा निःशस्त्र उपायांनीं थांबण्याची आशा नाहीं. शस्त्रास्त्रणांत ज्यांचें शस्त्र दुबळें ठरेल त्यांनीं पराभूत होऊन शरण जाणें अथवा सर्वनाश करून घेणें एवढाच उपाय त्यांचेपुढें दिसतो. या क्रमानें विजयी राष्ट्रांचे मुलूख वाढत जातील, लहान राष्ट्रें हळूहळू नामशेष होतील. पुढें होणाऱ्या युद्धांत दोन्ही पक्षीं अधिकाधिक मोठमोठीं राष्ट्रें दोन्ही बाजूस पडून युद्धांचा भयानकपणा वाढत जाईल व जग एका कोठल्या तरी राष्ट्राच्या अमलाखालीं येईल अथवा सर्वांचाच यादवांप्रमाणें संहार होईल. तें कसें होईल व केव्हां होईल तें होवो. हे दोन्ही परिणाम भयंकर आहेत, पण तेथें निःशस्त्र उपायांचा अवलंब अशक्य आहे. ते परिणाम टाळण्याचा उपाय कोणता असला तर त्या त्या राष्ट्रांतील अंतर्गत पिळणूक हें जें आंतरराष्ट्रीय युद्धांचें प्रमुख कारण तें नष्ट करणें हाच एक आहे. ही पिळणूक थांबविण्यास सशस्त्र अथवा निःशस्त्र असा मार्ग उरला आहे काय?

* * *

समाजाची पिळणूक करणारा जो एक मूठभर वर्ग असतो तोच राज्यसत्ताधारी अथवा राज्यसत्तेच्या वशिल्याचा असतो हें उघड आहे. अर्थात् पिळवणुकीविरुद्ध करावयाचा झगडा हा अखेरीस राज्यकर्त्यांविरुद्धच करावा लागतो. राज्यकर्त्यांशीं प्रजाजनांना सशस्त्र लढा देतां येईल काय असा प्रश्न येथें उद्भवतो. त्याचें स्पष्ट उत्तर असें आहे कीं, राज्यकर्त्यांविरुद्ध सशस्त्र लढा आतां शक्य नाहीं. शिवाजीनें मुसलमान राजांविरुद्ध सशस्त्र लढा केला तो काल वेगळा होता. दळणवळणाचीं व वाहतुकीचीं साधनें, आणि मनुष्यहत्येचीं व मालमत्तेच्या विध्वंसाचीं शस्त्रास्त्रें त्या वेळीं राज्यकर्त्यांजवळ जीं असत

तीं प्रजेपेक्षां फारशीं अधिक चलवान् नसत. बैलगाडी व घोडा हा राजापासून रंकापर्यंत सर्वांना मिळे आणि औरंगजेबाच्या सैनिकाची बंदूक शिवाजीच्या बंदुकीहून फारशी वेगळी नसे. आज नुसता जमाव करणाऱ्या प्रजेवरही राज्यकर्ते निर्दयपणें विमानांतून मशिनगनचा मारा करूं शकतात. सरकारनें परवानगी न दिलेलें साधें हत्यारही चोरून जवळ बाळगणें आणि वापरणें अशक्य व्हावें इतकें राज्यकर्त्यांचें पोलीसयंत्र कसोशीचें झालें. उलट राज्यकर्त्यांनीं कोणतेंही शस्त्र वापरण्यास परवानगी दिली तरी शस्त्रास्त्रांचा खर्च इतका अफाट झालेला आहे कीं, खाजगी व्यक्तीला तीं शस्त्रास्त्रें खरेदी करणें परवडणारच नाहीं. मशिनगन, यांत्रिक तोफा, टँक्स, विमानें वगैरे शस्त्रास्त्रें हजारों लाखों रुपये खर्चाचीं असतात. खाजगी व्यक्तींना तीं घेणें अशक्य असतें व राज्यकर्त्यांना मात्र तीं घेणें परवडतें. अशीं प्रचंड शस्त्रें धारण करणाऱ्या राजकर्त्यांशीं प्रजाजनांनीं यापुढें यशस्वी लढा करण्याची बाब अशक्य कोटींतील मानावी लागणार आहे.

* * *

दोन शस्त्रधारी राज्यांत युद्ध माजलें असतां एका देशांतील जनतेनें स्वतः-वरील राज्यकर्त्यांविरुद्ध शत्रुराज्यकर्त्यांची शस्त्रास्त्रांची मदत घेणें हा एक उपाय आहे असें हल्लीं सर्वत्र मानलें जातें. हिटलरनें व्यापलेल्या युरोपांतील जनतेस अँग्लो-अमेरिकन राष्ट्रें व रशिया शस्त्रास्त्रांची मदत करून बंडास प्रवृत्त करूं इच्छींत आहेत. पण हा उपाय अखेर युरोपियन जनतेस खरेंखुरें स्वातंत्र्य लाभण्याच्या दृष्टीनें कितीसा उपयोगी पडेल याबद्दल शंका वाटते. परस्परांशीं शत्रुत्व गाजविणारे राजकर्ते शत्रुराष्ट्रांतील पिळल्या गेलेल्या जनतेची पिळणूक पूर्णपणें थांबावी या गोष्टीस सहसा राजी होत नाहींत. अँग्लो-अमेरिकन्स हे आज जर्मनीचे शत्रु आहेत तरी युरोपांतल्या जनतेची पिळणूक करणारी सरंजामशाही अथवा भांडवलशाही पूर्णपणें नष्ट व्हावी या मतास संमति देणार नाहींत. यामुळें अँग्लो-अमेरिकनांची मदत युरोपियन जनतेस आपली पिळणूक थांबविण्याविरुद्ध पूर्ण यशस्वी लढा करण्यास उपयोगी पडणार नाहीं. शिवाय नाझी राज्यकर्त्यांचें राज्यतंत्र इतकें क्रूर, बलवान् व कार्यक्षम आहे कीं, शत्रुराष्ट्रांकडून शस्त्रास्त्रांची येणारी मदत बंडवाल्यांना पोंहोचणें हेंच आधीं मुष्किल होईल. अशी मदत पोंहोचूं शकली तरी तीसाठीं त्यांना हालहाल

भोगावे लागतील. या मदतीचा यथायोग्य उपयोग करणें तसेंच कठीण होईल त्यासाठीं तत्त्वाचे बाबतींत अनेक तडजोडी स्वीकाराव्या लागून अखेर बंडाचें यश कोणा तरी सैतानाच्या हातीं जाण्याचा दृढ संभव आहे. आधुनिक शस्त्रास्त्रबळाचें तंत्रच असें आहे कीं, तीं शस्त्रास्त्रें जितकीं अधिक यशस्वी होतात तितकीं तीं अधिक खर्चाचीं असावीं लागतात आणि म्हणून तीं अखेर अगदीं मूठभर लोकांच्याच हातीं राहतात. लक्षावधि लोकांच्या जीवनावर सत्ता चालविण्याचें सामर्थ्य साहजिकच त्यांना येतें आणि मग ही सत्ता मुठींत ठेवून तिचा स्वार्थासाठीं उपयोग करण्याची दुर्बुद्धि त्यांच्या ठिकाणीं सहजच उदय पावते. प्रचंड शस्त्रास्त्रें आणि राज्यसत्तेचें केंद्रीकरण या गोष्टी आधुनिक जगांत परस्परांपासून अभेद्यच आहेत असें आतां धरून चालण्यास हरकत नाहीं.

* * *

या केंद्रीभूत शस्त्रसत्तेस तोलून धरणारी व यशस्वितेनें प्रतिकार करणारी निःशस्त्रशक्ति अखिल जनतेजवळ आहे काय याचा तपास केला पाहिजे. शस्त्रसत्ताधाऱ्याचें सामर्थ्य त्याच्या शस्त्रांत असतें हें वरवर पाहतां अगदीं उघड वाटतें. पण शस्त्र हें स्वतः निर्जीव आहे हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. शस्त्र स्वतः होऊन कोणतेंही हत्याकार्य अथवा विध्वंसकार्य करूं शकत नाहीं. त्याचा उपयोग माणसानें करावयाचा असतो. हीं माणसें त्यांच्याजवळ असणारीं शस्त्रास्त्रें व दारूगोळा खाऊन जगूं शकत नाहींत. शस्त्रधारी हा शस्त्रावर जगतो व शेतकरी हा शेतीवर जगतो असें आपण म्हणतों. पण थोडें खोल पाहिल्यास शस्त्रधारी हा धान्य खाऊनच जगतो आणि शेतकरी हाही धान्य खाऊनच जगतो, हें म्हणणें अधिक अचूक होईल. असें बोलण्यांत एक विशिष्ट हेतु आहे शेतकरी हा स्वतःचें धान्य पिकवून शिवाय शस्त्रधाऱ्यांसाठीं धान्य पिकवितो. कापड-कामकरी हा स्वतःसाठीं कापड तयार करून शिवाय शस्त्रधाऱ्यांसाठीं तयार करतो. म्हणून शस्त्रधाऱ्याला जगण्याला आवश्यक असें अन्नवस्त्र मिळतें ही गोष्ट येथें विशेषेंकरून लक्षांत घ्यावयाची आहे. शस्त्रधारी हा शस्त्राचा धाक दाखवून शेतकऱ्यांकडून व कापडकामकऱ्यांकडून अन्नवस्त्र सक्तीनें घेतो हा हल्लींचा रिवाजच आहे. तरीपण शस्त्रधाऱ्याला शेतकऱ्यांवर व कामकऱ्यांवर आपल्या चरितार्थासाठीं अवलंबून राहावें लागतें ही गोष्ट

येथें स्पष्ट होतेंच. आज शेतकरी व कामकरी हा शस्त्रधाऱ्यांचा गुलाम बनलेला आहे, त्याऐवजीं तो जेव्हां शस्त्रधाऱ्यांबद्दल निर्भय होईल, शस्त्रधाऱ्याला उपाशी मारण्याचा धाक घालूं शकेल त्या वेळीं शस्त्रधारी हा निर्बल होऊन शेतकरी-कामकऱ्याला शरण जाईल असें निदान तर्कानें तरी येथें म्हणतां येतें.

* * *

पण हा निवळ तर्कही नव्हे. या युक्तिवादास इतिहासाचा आधार आहे. रशियांतील १९१७ ची राज्यक्रांति जी यशस्वी झाली ती गांधींच्या अर्थानें निःशस्त्रक्रांति होती असें कोणीच म्हणत नाहीं. लेनिन, ट्रॉट्स्की हे तिचे पुरस्कर्ते व पुढारी गांधींच्या अर्थानें अहिंसावादी होते असें कोणीच मानीत नाहीं. तथापि त्या क्रांतीचें थोडेसेंही परीक्षण केलें असतां स्वतंत्रपणें काय दिसून तें पहा. या क्रांतींत शेतकरी, कामकरी व सैनिक यांनीं पुढाकार घेतलेला होता. पण सैनिक हे क्रांतींत अगदीं अखेरीस सामील झाले. प्रथम कामकरी व शेतकरी यांनींच क्रांतीची सुरवात केली. कामकरी आणि शेतकरी यांना झारशाही व जमीनदारशाही यांच्या अंमलांतलें जीवन असह्य झालें. जर्मनीशीं रशियाचें जें युद्ध चालू होतें त्यांत झारच्या सैन्याला रणांगणावर एकसारखा पराभव खावा लागत होता. सर्व देशांत दारिद्र्य व उपासमार यांचा वणवा पेटला होता म्हणून युद्ध बंद करा आणि जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्यांना जमीनदारांच्या जमीनी देऊन टाका अशा मागणीवर कामकऱ्यांनीं व शेतऱ्यांनीं झारशाही व जमीनदारशाही याविरुद्ध बंडास सुरुवात केली. झार, जमीनदार व भांडवलदार यांनीं सैनिक व पोलीस यांच्या साहाय्यानें बंड दडपून टाकण्याची शिकस्त केली. सैनिकांनीं बंडवाल्या कामगारांवर निर्घृण शस्त्रप्रहार केले. कामगारांजवळ शस्त्र नसल्यानें त्यांना सैनिकांचा प्रतिकार करतां आला नाहीं. पण सैनिकांकडून प्रहार होत असतांही कामकऱ्यांनीं आणि शेतकऱ्यांनीं आपला क्रांतीचा हट्ट सोडला नाहीं. हळूहळू सैनिकांच्या अंतःकरणासही क्रांतीची धग लागूं लागली. सैनिक हा कांहीं आभाळांतून उतरलेला कोणी राक्षसी मारेकरी नव्हता. तो व त्याचे भाईबंद मूळचे शेतकरी होते. तो रणांगणावर लढत असतां त्याचे आईबाप, बहीणभाऊ व बायकामुलें जमीनदाराच्या शेतीवर राबत होतीं; जमिनीचें उत्पन्न जमीनदाराच्या घरीं पोंचवून स्वतः उपाशीं मरत होतीं. युद्धामुळें वाढलेल्या भावानें जमीनदार

धान्य विकून अफाट नफा मिळवीत होता हें सैनिकाला दिसत होतें. रणांगणावर एकसारखा होत असलेला पराभव त्याचें चित्त बेजार करीत होता. कामगारांच्या श्रमांनीं भांडवलदार अफाट नफा मिळवीत असतां, कामकरी उपाशी मरत आहेत हेंही सैनिकाला दृष्टीआड करतां येत नव्हतें. हा कामकरीही आपल्याचसारखा मूळचा शेतकरी आहे हें तो विसरूं शकत नव्हता. शेतकरी व कामकरी यांची व आपली उपासमार थांबविण्याचें सामर्थ्य आपल्या शस्त्रांत नाहीं, युद्ध थांबवा व शेतकऱ्यांना जमिनी द्या या कामकरी-शेतकऱ्यांच्या मागणींतच अखेरीस उपासमार थांबविण्याचें सामर्थ्य आहे ही गोष्ट सैनिकाला पटली आणि म्हणून सैनिकांनीं बंडवाल्या कामकरी-शेतकऱ्यांवर शस्त्र चालविण्याचें नाकारलें तेव्हांच क्रांति यशस्वी झाली. एवढयावरच प्रकरण थांबूं शकलें नाहीं. अखेर क्रांतीस पूर्ण यश मिळविण्यासाठीं सैनिकांना कामकरी-शेतकऱ्यांच्या बाजूनें शस्त्र चालवावेंच लागलें ही गोष्ट खरी. तथापि मुख्य मुद्दा येथें लक्षांत घ्यावयाचा तो हा कीं, कामकरी-शेतकरी हे आपल्या आर्थिक बलाच्या जोरावर सैनिकांस अडवूं शकले, सैनिकांचा हृदयपालट करूं शकले यांतच शस्त्रबलापेक्षां एका विशिष्ट परिस्थितींत तरी आर्थिक बळ म्हणजेच निःशस्त्रबल हें प्रभावी ठरूं शकतें ही गोष्ट सिद्ध होत आहे. हाच निःशस्त्रबलाचा प्रयोग अधिक शास्त्रशुद्ध रीतीनें, जाणीवयुक्तपणें आणि अगदीं कसोशीनें अमलांत कसा आणावयाचा हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

* * *

या अहिंसाबलाचा प्रयोग हिंदुस्थानांत यशस्वितेनें कसा करावयाचा हें सांगणें अनेक कारणांनीं बरेंच अडचणीचें आहे. म्हणून तूर्त युरोपसंबंधानें आपण बोलूं. चालू युद्धानंतर युरोपचें कोणत्या तरी लष्करशाही अमलाखालीं एकीकरण झालें आहे असें आपण समजूं. अशा परिस्थितींत युरोपियन जनतेनें या शस्त्रशाहीचा प्रतिकार करून स्वातंत्र्य कसें स्थापन करावयाचें याचें उत्तर प्रत्यक्ष सृष्टींत दृश्य स्वरूपांत मिळविणें कठीण असलें तरी कल्पनेनें समजून घेणें मुळींच कठीण नाहीं. शस्त्रधाऱ्याचें जीवन अखेर शेतकरी-कामकरी यांनीं निर्मिलेल्या अन्नवस्त्रांनींच पोसलें जातें असें आपण वर म्हटलें. पण हा मुद्दा आणखी खोल जाऊन पाहिला असतां शस्त्रधाऱ्याचें सर्व जीवन अगदीं

ठायीं ठायीं शेतकरी-कामकऱ्यांवर अवलंबून असतें हें आपल्या लक्षांत येईल. शेतीचें अन्न शेतकरीच तयार करतो. वाहतुकीचीं व दळणवळणाचीं साधनें कामकऱ्यांच्याच हातीं असतात. त्यांच्याच हातून तीं चालतात. खुद्द शस्त्रास्त्रें निर्मिण्याचे कारखाने हेही कामकऱ्यांच्या हातूनच चालत असतात. कामकऱ्यांनीं आगगाडी चालविण्याचें नाकारलें तर शस्त्रधारी सैन्यांची हालचालही अशक्य होतें. त्यांचें खाण्यापिण्याचे जिन्नसही त्यांच्यापर्यंत पोंहचूं शकत नाहींत. सैनिकांचीं शस्त्रेंही कामकरी शस्त्रास्त्रकारखानांच्या द्वारा अडवूं शकतात. आणि आपणही समाजाचा अवयव आहों, शेतकरीकामकरीसमाजाहून भिन्न असें ध्येय आपणांस असूं शकणार नाहीं हें सैनिकाला पटवतां येतें ही गोष्ट रशियन क्रांतीच्या अनुभवाकरून दिसून आली आहे. माझ्या मतें युरोपांतील क्रांतिकारक पुढाऱ्यांना निःशस्त्रक्रांतीची आवश्यकता, शक्यता व अपरिहार्यता दृढपणें पटली तर ते निःशस्त्रक्रांतीच्या संघटनेस सुरवात करूं शकतील. युरोपांत कसलाही लष्करशाही अंमल स्थापन होवो, त्या राज्यकर्त्यास शेतकरीकामकऱ्यांच्या सहकार्यावांचून आपला अंमल चालवितां येणार नाहीं. प्रत्येक शेतकऱ्याच्या व कामकऱ्याच्या मागें एकएक सैनिक लावून त्याच्याकडून सक्तीनें धनोत्पादन करावयाचें म्हटलें तर एक रुपयाच्या मालास दहा रुपये खर्च येईल. कोणत्याही लष्करशहाला असें धनोत्पादन परवडणारच नाहीं. अशा उधळपट्टीनें धनोत्पादन केल्यास दारिद्य वाढून रणांगणावर त्या लष्करशहाचा तावडतोब पराभव होईल.

* * *

आज हिटलरला कमींत कमी खर्चांत जास्तींत जास्त धनोत्पादन करतां आलें हेंच त्याच्या यशाचें फार मोठें रहस्य आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. हें घडवून आणण्यासाठीं केवळ शस्त्रधाकानें नव्हे तर लोकांच्या मनावर व बुद्धीवर प्रभुत्व चालवून त्यांच्या उत्साही खुषीनें त्याला धनोत्पादन करवावें लागतें. शेतकरी-कामकऱ्यांची लष्करशाहीची सेवा करण्यासाठीं मिळणारी ही जी उत्साहयुक्त खुषी ती नाहींशी करणें हें निःशस्त्र क्रांतिकारकांचें प्रमुख कर्तव्य आहे. लोकजागृति हें ह्या कार्याचें प्रमुख साधन आहे. ही लोकजागृति शास्त्रशुद्ध मतप्रचारानें केली पाहिजे. इतिहासाचा क्रम, आर्थिक संघटनेचें स्थान व बल यांचें ज्ञान जनतेस करून दिलेलें असलें पाहिजे.

बारीकसारीक अन्यायांच्या बाबतींतही एकजुटीनें लढण्याचे अनुभव शेतकरी-कामकरी जनतेला मिळालेले असले पाहिजेत. अशा लहान लहान लढ्यांतून अधिकाधिक मोठ्या झगड्यांबद्दलचा आत्मविश्वास कामकरी-शेतकऱ्यांमध्यें येऊं शकतो. पण ही तत्त्वनिष्ठा व आत्मविश्वास एखाद्या थोर पुढाऱ्याच्या कल्पनाशक्तींतून अखिल जनतेच्या मनांत, बुद्धींत व कर्तृत्वांत संक्रमित करण्याचें कार्य एकटीदुकटी व्यक्ति करूं शकणार नाहीं. एखाद्या मोठ्या तलावाचें पाणी दूर अंतरावर नेऊन लक्षावधि लोकांच्या घरोघर पोंचविण्यासाठीं पाण्याच्या नळांची जशी प्रचंड संघटना करावी लागते, तशी पुढाऱ्यांचा निःशस्त्र प्रतिकाराचा संदेश व आत्मविश्वास बहुसंख्य कामकरीशेतकरी जनतेपर्यंत पोंहोचवून व त्यांच्या ठिकाणीं बिंबवून त्यांच्या कर्तृत्वांत तो उतरविण्यासाठीं प्रचारकांची फार मोठी संघटना करणें आवश्यक असतें. हा विचार कांहीं नवीन नाहीं हें मी येथेंच सांगतों. लेनिननें, क्रांतिकारक पक्षसंघटना असल्यावांचून क्रांति होत नाहीं, असें जें म्हटलें आहे त्याचाच हा फक्त अनुवाद मी येथें करीत आहें. पण हा जुनाच सिद्धान्त पुनः पुन्हा बोलला गेला पाहिजे. हिंदुस्थानांत अशा प्रकारचा क्रांतिकारक पक्ष स्थापन होऊन त्यानें निःशस्त्र क्रांतिकार्य अंगावर घेतलें पाहिजे असें माझें म्हणणें आहे.

* * *

हल्लींची कॉंग्रेस आहे अशीच हें कार्य करूं शकेल काय ? ती तें कार्य करूं शकणार नाहीं असें मला वाटतें. आजच्या कॉंग्रेसमध्यें शेतकरी-कामकरी फारशा मोठ्या प्रमाणांत नाहींत हें तर उघड आहे. पण त्याहून विशेष महत्त्वाची बाब म्हणजे कॉंग्रेसकार्यकर्ते, कॉंग्रेसपुढारी म्हणून आपण ज्यांना म्हणतों त्यांतील पुष्कळसे निःशस्त्र क्रांतिकारकपक्षाचे सदस्य होण्याला पात्र नाहींत. ज्याचा त्याचा कांहीं तरी एक व्यवसाय आहे आणि तद्द्वारा त्यांचे हातपाय प्रचलित राज्यव्यवस्थेंत व समाजव्यवस्थेंत जखडलेले आहेत. राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था यांची मोडतोड—मग ती अहिंसेच्या मार्गानें का होईना—केली तर या कार्यकर्त्यांच्या अथवा पुढाऱ्यांच्या जीवनाची मोडतोडही त्याबरोबर होत असते ही गोष्ट तो वर्ग विसरूं शकणार नाहीं. या विशिष्ट कार्यकर्त्यां व पुढारीवर्गास क्रांतिप्रसाराचें दैनंदिनकार्य महिनोगणती आणि वर्षोगणती करावें लागलें तर तें करण्यास अवश्य इतका वेळही नाहीं. चोवीसही

तास आणि असे बाराही महिने हें क्रांतिप्रसाराचें व क्रांतिसंघटनेचें कार्य करण्यास लक्षावधि धंदेवाईक क्रांतिकारक निर्माण झाले पाहिजेत. त्यांनीं कॉंग्रेस सोडावी असें माझें म्हणणें नाहीं. मीं वर मांडलेली सर्व विचारसरणी कॉंग्रेसच्या एकंदर ध्येयनिष्ठेशीं सुसंगतच आहे. म्हणून हा धंदेवाईक क्रांतिकारकांचा वर्ग कॉंग्रेसमध्येंच राहिला पाहिजे. कॉंग्रेस सर्वस्वी त्यांचीच झाली पाहिजे असें जरी नव्हे तरी कॉंग्रेसवर त्यांचें प्रभुत्व स्थापन झालें पाहिजे ही गोष्ट मात्र निश्चितपणें इष्ट आहे.

* * *

महाराष्ट्रांत जी राष्ट्रवादी स्वयंसेवकसंघटनेची चळवळ हल्लीं सुरू आहे ती अशा अहिंसावादी धंदेवाईक क्रांतिकारकांची संघटना व्हावी व तिला अखिल भारतीय स्वरूप यावें असें माझ्या मनांत नेहमीं येतें. स्वयंसेवकसंघटनेच्या जुन्या कल्पना आपणांस थोड्या बदलल्या पाहिजेत. नुसते कवाईत शिकलेले तरुण ही जी स्वयंसेवकसंघटनेची जुनी कल्पना आहे ती अतिशय अपूर्ण आहे. कवाईतशिक्षणाचें महत्त्व फार आहे यांत शंकाच नाहीं. शारीरिक व मानसिक चपलता, तांतडी, अनेकांनीं एकसमयावच्छेदेंकरून एकाच प्रकारची क्रिया शिस्तीनें व वक्तशीरपणें करण्याची संवय, हुकुमतींत राहण्याचा गुण, जागरूकता, सामुदायिक अहंकार इत्यादि उत्तम गुणांची निपज, जोपासना व वाढ कवाईतशिक्षणानें होते. ढुल्या व ढिल्या समाजास कर्तृत्वप्रधान अशी नवी संस्कृति या कवाईतशिक्षणानें मिळते यांत मुळींच संशय नाहीं. प्रत्येक क्रांतिकारक कार्यकर्त्याच्या अंगीं हें कवाईतशिक्षण भिनलेलें असलेंच पाहिजे. पण हें केवळ त्या क्रांतिकारकाचें एक अंग होय. त्यांची बौद्धिक तयारी हें त्याचें दुसरें महत्त्वाचें अंग आहे. हिंदी जनतेपुढील तात्कालिक प्रश्न राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करणें हा आहे. या दृष्टीनें या क्रांतिकारकांना राष्ट्रवादाचें ऐतिहासिक व तात्त्विक असें शिक्षण देण्यांत आलें पाहिजे. हिंदुस्थानचा व जगाचा इतिहास, आजच्या जगांतील हिंदुस्थानचें स्थान, विद्यमान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण, हिंदुस्थानच्या राष्ट्रवादी मागणीचें स्वरूप, भांडवलशाही, साम्राज्यशाही, सोव्हिएट समाजपद्धति वगैरेचें तात्त्विक ज्ञान, या सर्व विषयांचा अभ्यास त्यांच्याकडून करवून घेतला पाहिजे. कवाईत आणि हें बौद्धिक शिक्षण या दोहोंचा उपयोग अर्थातच जनतासंघटनेसाठीं

करावयाचा आहे. स्वयंसेवकसंघटनेंत वरील प्रकारचें प्राथमिक शिक्षण कांहीं दिवस घेतलेल्या तरुणांना शेतकरीकामकऱ्यांमध्यें संघटनेसाठीं नेऊन शेतकरी-कामकऱ्यांच्याही स्वयंसेवकसंघटना काढणें व त्यांची आर्थिक व सामाजिक, त्याचप्रमाणें राजकीय गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं त्यांची संघटना करणें हीं कामें या क्रांतिकारक स्वयंसेवकांकडून करवून घेतलीं पाहिजेत. हे स्वयंसेवक प्रथम मुख्यतः विद्यार्थी व सुशिक्षित मध्यमवर्ग यांतूनच येतील हें स्वाभाविक आहे व इष्टही आहे. वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या व्यवसायांत पडलेल्या काँग्रेसकार्यकर्त्यांना आपापल्या व्यवसायामुळें क्रांतिकार्यास फुरसत मिळत नाहीं व वर्गहितविरोधी क्रांतिकार्य करवतही नाहीं. पण कोणत्याही व्यवसायांत अजून सामील न झालेल्या विद्यार्थ्यांना व तरुणांना क्रांतिकार्याकडे वळवून घेतल्यास क्रांतिकार्यांतच आयुष्य घालविणारे हजारों तरुण प्रथमपासूनच या कार्यांत मिळण्याचा संभव असतो. कांहीं लोक थोडे दिवस क्रांतिकार्य करून मग व्यवसायांत पडतात. पुष्कळसे क्रांतिकार्यास व्यवसायाचा विरोध येणार नाहीं अशी आपल्या व्यवसायाची व्यवस्था करून घेतात अथवा व्यवसायाकडे वळल्यानंतरही क्रांतिकार्याला द्रव्यसाहाय्य वगैरे देऊन क्रांतिकार्यास हातभार लावतात. सारांश, जुन्या काँग्रेसपरंपरेपासून थोडासा अलग असा हा नवीन क्रांतिकारकांचा एक वर्गच निर्माण होणें अवश्य आहे.

* * *

अशा संघटनेंत थोडीशी रणनीतिही आहे ती येथें उघडपणें सांगून टाकतों. ही चळवळ अहिंसाप्रधान ठेवावयाची असल्यानें तींत वैचारिक गोप्य कांहींही नसावें हें मला अवश्य वाटतें. माझ्या समजुतीप्रमाणें स्वयंसेवकसंघटना ही उघड व कायदेशीर काम करणारी अशी ठेवली गेल्यास सरकारला ती दडपून टाकणें शक्य होणार नाहीं. कवाईत शिकविणें व अभ्यासमंडळें चालविणें एवढेंच आपलें कार्य अशा संघटनांनीं मर्यादित करून घ्यावें. या स्वयंसेवकांनीं जें प्रत्यक्ष संघटनेचें काम करावयाचें तें करतांना जरूर वाटल्यास संघटनेशीं संबंध सोडून द्यावा. कवाईतशिक्षण व अभ्यासमंडळें एवढेंच कार्य स्वयंसेवक-संघटनांनीं चालविल्यास सामान्यतः एकंदर मध्यमवर्गाचा अशा चळवळीस पाठिंबा मिळतो. दुकानांवरील पिकेटिंग, कामगारांचे संप, शेतकऱ्यांची खंड-बंदी, अशा चळवळींमुळें समाजांतील मध्यमवर्ग रुष्ट होतो व त्याला मदत

करण्याच्या निमित्तानें हातीं आसूड घेऊन राज्यकर्ते चळवळ्यांना दडपून टाकूं शकतात. पण केवळ कवाईतशिक्षण व अभ्यासमंडळें चालविणें ही चळवळ तरुणांत चांगल्या संवयी, संघशक्ति, शिस्तप्रियता, अभ्यासपरता वगैरे गुण वाढविणारी असल्यामुळें मध्यमवर्गास ही चळवळ स्वाभाविकच प्रिय वाटते. ती त्यांच्या दैनंदिन व्यवसायाच्याही आड येत नाहीं व म्हणून सरकारनें ही चळवळ दडपून टाकावयाची म्हटलें तरी समाजांतील मध्यमवर्गाचा--इतकेंच नव्हे तर सरकारी अधिकारी आणि नोकर वर्गाचाही—पाठिंबा मिळूं शकत नाहीं. गांधींनीं गेल्या तेवीस वर्षांत खादीप्रसार, अस्पृश्यतानिवारण, मद्यपानबंदी, स्वदेशीव्रत वगैरे अशाच सद्‌गुणवर्धक व सकृद्दर्शनीं निरुपद्रवी वाटणाऱ्या चळवळींचा भावनाप्रधान व देशभक्त कार्यकर्त्यांत प्रसार करून हजारों देशभक्तसैनिक काँग्रेसकार्याला मिळवून दिले. यांनीं अखेर स्वातंत्र्य-लढयांत आत्मार्पण करावयाचें आहे ही गोष्ट गांधींनीं कधींहि लपविली नव्हती. पण प्रत्यक्ष क्रांतिकार्याशीं संबंध नसणाऱ्या गांधींच्या या इतर चळवळी सरकार दडपून टाकूं शकलें नाहीं. त्यामुळेंच या क्रांतिकार्यासाठीं हजारों सैनिकांचा होणारा पुरवठाही सरकार अडवूं शकलें नाहीं. याच दृष्टीनें स्वयंसेवकसंघटनेची चळवळ वर सांगितलेली मर्यादा पाळली गेल्यास व संघटनेचें तंत्र पूर्ण उघड ठेवल्यास सरकार ती चळवळ दडपूं शकणार नाहीं असें मला वाटतें.

* * *

गांधींच्या अहिंसात्मक राजकारणाहून मीं येथवर मांडलेली विचारसरणी व दर्शविलेलें तंत्र कांहीं भिन्न स्वरूपाचें आहे काय, असा प्रश्न येथें उद्‌भवतो. तें भिन्न स्वरूपाचें आहे किंवा नाहीं याबद्दल मी आग्रहानें कांहींच बोलत नाहीं. पण गांधींच्या विरुद्ध माझा जो एक आक्षेप आहे व जी एक तक्रार आहे ती स्पष्टपणें मांडतों. गांधींच्या राजकारणांत जो गूढवाद आहे म्हणजे कार्यकारणभावाचा त्यांच्या एकंदर विचारसरणींत जो अभाव असतो तो मला मान्य नाहीं. खादीनें गरिबांची बेकारी नाहींशी होईल म्हणून मला खादी मान्य; पण खादीनें स्वराज्य मिळेल हें खोटें आहे. समाजांत निरनिराळे जे वर्ग असतात त्यांचें बलाबल पारखून कोणत्या वर्गामार्फत क्रांतिकार्य यशस्वी होईल याचा विचार केला पाहिजे. देशाची लोकसंख्या चाळीस कोटि असली

तरी त्यांतील अवघे तीसचाळीस लक्ष जे कामगार त्यांच्या हातीं सबंधच्या सबंध औद्योगिक संघटना असल्यामुळें सर्व समाजयंत्राची किल्ली त्यांच्या हातीं असते. हे कामकरी आणि समाजाला अन्न पुरविणारे शेतकरी यांची संघटना झाल्यास क्रांतिकार्य यशस्वी होईल. या क्रांतिकार्यांत स्वाभाविकपणेंच कामकरी वर्गाचें वर्चस्व राहील तर यशाची खात्री अधिक दृढपणें दिसेल. या कामकरीशेतकऱ्यांच्या संघटनेचें कार्य मुख्यतः मध्यमवर्गीय धंदेवाईक क्रांतिकारकांनीं करावयाचें आहे. जनता क्रांतिकार्यास प्रवृत्त होते ती केव्हांही चुटकी वाजविली कीं त्यासरशी प्रवृत्त होत नाहीं. आर्थिक व राजकीय परिस्थितीमध्यें इतिहासक्रमांत राष्ट्रीय व जागतिक कारणांनीं पेचप्रसंग निर्माण होऊन तो बिनतोड झाला, जनतेच्या जीवनाचा पूर्ण कोंडमारा होऊं लागला म्हणजे जनता एक तर क्रांतिकार्यास प्रवृत्त होते अथवा गुलाम होते म्हणजे मरून जाते. आगाऊ पुष्कळ दिवसांपासून क्रांतिकारकसंघटनेचें शिक्षण जनतेस मिळालें असेल तर ती क्रांतिकार्यास प्रवृत्त होते. असें शिक्षण मिळालें नसेल तर पुढारी तुरुंगांत जातांच जनता गुलामपणें परिस्थितीस शरण जाते. म्हणून धंदेवाईक क्रांतिकारकांनीं जनतेची क्रांतिकारक संघटना करीत करीत क्रांतिकालाची मार्गप्रतीक्षा करणें अवश्य असतें. या विचारसरणींत मीं जो सरळ कार्यकारणभाव मांडला आहे तसा गांधींनीं कधींही मांडला नाहीं अथवा अशा भौतिक दृष्टीच्या क्रांतिकारकांची संघटना केली नाहीं व होऊं दिली नाहीं. त्यांच्या क्रांतीचें तत्त्व नेहमींच गूढ राहिलें. त्यामुळें तें एकतंत्री राहिलें. वेळोवेळीं त्यांनीं जे बदल केले ते कां केले याचा बुद्धिनिष्ठ उलगडा कधींच न करतां ईश्वरी संदेशाचा निर्वाळा त्यांनीं दिला. या सर्वांचा परिणाम असा होत आला आहे कीं, गांधीजी तुरुंगांत गेल्यामुळें पुढें धोरण कसें आंखावयाचें यासंबंधानें स्वतंत्रपणें कोणीच विचार करीत नाहीं. गांधी केव्हां तरी सुटून येतील व आम्हांस आपल्या अलौकिक कर्तृत्वानें मार्ग दाखवतील असें जो तो धरून चालला आहे. गेलीं तेवीस वर्षें हा दोष शिल्लक राहिलेला आहे. हा निवळ हताश दैववाद असून त्याला कधींच यश येणार नाहीं.

* * *

मीं या लेखांत आंतरराष्ट्रीय राजकारण व चालू युद्धपरिस्थिति यांचा विचार

मुद्दामच केला नाहीं. हिंदुस्थानांतील समाजक्रांतीच्या प्रश्नाची चर्चाही केली नाहीं. निष्कारण वादग्रस्त होणारे प्रश्न टाळून निर्विवाद मुद्द्यांवर पण प्रामाणिक व उघड भूमिकेवर प्रमुख लोकांनीं एकत्र यावें अशा प्रकारें मीं एकंदर भूमिका मांडली आहे. यापुढें एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं, ८ ऑगस्ट १९४२ चा ठराव काँग्रेसनें परत घेतला व प्रांतिक मंत्रिमंडळें स्थापन करण्याचें कबूल केलें तरी सरकारच आतां ती गोष्ट कबूल करणार नाहीं. जिनांशीं समेट केल्यावांचून सनदशीर मंत्रिमंडळें निर्माण करूं देण्यास सरकार तयार नाहीं व जिनांशीं समेट करणें म्हणजे साम्राज्यशाहीला शरण जाणें, स्वातंत्र्याची मागणी कायमची सोडून देणें हेंच आहे. म्हणून सनदशीर राजकारणाचा मार्ग यापुढें कायमचा बंद झाला हें लक्षांत ठेवलें पाहिजे. काँग्रेस-लीग एकजूट ही कम्युनिस्टांची घोषणा देशाला मृगजळामागें लावून विश्वासघात करणारी आहे. तसेंच फक्त बाँबगोळे वापरून शस्त्रधारी सत्तेचा पराभव आपण करूं शकूं, ही विचारसरणीही आपण सोडली पाहिजे. अहिंसेची मर्यादा वेळोवेळीं किती व कोणती ठरवावी हें मी येथें सांगत नाहीं. फक्त स्थूल मानानें मी बोलतों आहें. शस्त्र केव्हांच व कोणतेंही वापरावें लागणार नाहीं असें मी म्हणूं शकत नाहीं. अहिंसा ही व्यवहारांत सापेक्ष असते हें गांधीजींनाही अनेकवार अनुभवास आलें आहे. त्यानें मूळ सिद्धान्त बाधित होत नाहीं. पण गांधींच्या राजकारणांतील गूढवाद आपण सोडला पाहिजे. गांधींसारख्या एका व्यक्तीच्या मुठींत व बुद्धींत चळवळीचीं सूत्रें ठेवणें हें अखेरीस आपल्या प्रतिपक्षाच्या उपयोगी पडतें हा अनुभव आलेला आहे. हजारों लाखों धंदेवाईक क्रांतिकारकांच्या मार्फत जनतेला क्रांतिकार्याचें शिक्षण मिळालें तर पुढारी तुरुंगांत गेले तरी चळवळींचें जीवन व ध्येय सुरक्षित राहतें. रशियांत क्रांति अगदीं कळसास पोंहचली असतां पुढारी तुरुंगांत होते अथवा भुईखालीं गेले होते. क्रांतीचा दृष्टिकोन व अनुभव बोल्शेविक पक्षाच्या साहाय्यानें मिळवून जनतेनें आपल्या कर्तृत्वानें क्रांति घडवून आणली. रशियन राज्यक्रांतीच्या इतिहासाचा हा फार महत्त्वाचा बोध आहे. महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांना मीं वर मांडलेली विचारसरणी पुढील मार्ग शोधण्यास उपयोगी पडेल अशी आशा बाळगून सध्यां येथेंच थांबतों.

नवयुग, दिवाळी अंक, १९४३

# गांधींच्या तत्त्वज्ञानावर 'क्ष' किरण : : १९

[ खालील संवाद 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकांत १९३४ सालीं लिहिला होता. त्यांतून १९३९ सालीं अग्रणींत अनुवादिला. या संवादांत महात्मा गांधींच्या तोंडीं घातले आहेत तसे विचार महात्मा गांधींनीं कधीं बोलून दाखविलेले नाहींत. फक्त कल्पनेच्या साहाय्यानें महात्मा गांधींच्या कृतीची उपपत्ति लावण्याचा हा प्रयत्न आहे. 'प्रश्न' लेखकाचा व 'उत्तर' गांधीजींचें असें समजावें. ]

**प्रश्न**—गांधीजी, आपणांला वसाहतीचें स्वराज्य पुरेसें वाटतें, कीं पूर्ण स्वातंत्र्यच हवें ? मद्रास कॉंग्रेसनें संपूर्ण स्वातंत्र्य हें दूरचें ध्येय आहे एवढेंच दर्शविणारा ठराव केला, तरी त्यावर तुम्हीं अतिशय कडक टीका केली होती. असें असतांही तुम्ही लाहोरला संपूर्ण स्वातंत्र्य हेंच हिंदुस्थानचें ध्येय आहे असें जाहीर करण्याइतक्या दुसऱ्या टोंकाला गेलां हें कसें ? त्यानंतर पुन्हा माघार घेऊन स्वातंत्र्याचें सार आपणांला मिळालें म्हणजे पुरे, असेंही तुम्ही कां म्हणाला ? १९३० च्या फेब्रुवारी-मार्चमध्यें मध्य-असेंब्लींत जकातीच्या बिलांवर चर्चा सुरू असतां हिंदी सभासदांनीं साम्राज्यसवलतीच्या धोरणास पाठिंबा देऊं नये असें तुम्हीं 'यंग इंडिया'त लिहिलें. पण गोलमेज परिषदेसाठीं तुम्हीं विलायतेंत गेलां होतां तेव्हां 'इंग्लंडनें जर हिंदुस्थानची स्वातंत्र्याची

मागणी मान्य केली, तर लँकाशायरच्या कापडाला हिंदी बाजारांत सवलत देऊं' असें तुम्हीं म्हणाला हें कसें? जेव्हां हिंदुस्थान स्वतंत्र होईल तेव्हां इंग्लंडासुद्धां सर्व परकीयांना आपण सारखेच परकी कां लेखूं नये?

**उत्तर**—माझ्या तोंडून कोणती कबुली मिळवायचा तुमचा हेतु आहे तें मी उमगलों. तुम्हांला अगदीं प्रांजलपणें सर्व सांगतों. इंग्लंड व हिंदुस्थान स्वाभिमानपूर्वक एकत्र नांदूं शकतील, तर ते विभक्त व्हावेत असें मला वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर इंग्रजांशीं आयुष्यभर जो माझा संबंध आला, त्यावरून माझ्या प्रेमळ व समजुतीच्या मार्गानें मी इंग्रजांना तडजोडीस तयार करूं शकेन असा त्यांच्या शीलासंबंधानें व स्वभावासंबंधानें मला विश्वास वाटतो. पण लाहोरला त्या वेळेच्या परिस्थितीनें तरुणांचीं मनें भडकलीं होतीं. वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. या तरुण माणसांना काँग्रेसमधून बाहेर जाऊं देणें हें अपायकारक होतें. इंग्लंडचा व हिंदुस्थानचा स्नेह आणि हिंदी स्वातंत्र्य या दोनही दृष्टींनीं तें वाईट झालें असतें. लवकरच वसाहतीचें स्वराज्य स्वातंत्र्यप्रायंचें आहे व हे दोन शब्द समानार्थी आहेत असें लोकांनीं मानावें अशी वेळ येईल अशी मला तेव्हां खात्री होती. लाहोर व कराची या दोन्ही काँग्रेसच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत मोठ्या तत्परतेनें वेळीं तसें सूचितही केलें होतें. तेव्हां 'स्वातंत्र्याचें सार' आम्हांला मिळालें म्हणजे पुरे असें जें मीं मागाहून म्हटलें त्या वेळीं 'मीं माघार घेतली' असें तुम्ही म्हणतां तें खरें नव्हे. मी होतों तेथेंच नेहमीं होतों व आहें.

आतां साम्राज्यसवलतीसंबंधीं सांगतों. मी साम्राज्यसवलतीस विरोध करतों तो त्यांतील 'साम्राज्य' या शब्दामुळें. ज्यामुळें इंग्लंडचें वर्चस्व आमच्यावर आहे असें मला दिसेल असें कांहींही मी पत्करणार नाहीं. आजच्या परिस्थितींतून वसाहतीच्या स्वराज्याच्या दर्जास पोंचेपर्यंतच्या संधिकाळांत, इंग्लंडची मदत हवी म्हणून, कांहीं सवलतीही मी इंग्लंडला देईन. पण मी त्या खुषीनें देईन. इंग्लंडनें सक्तीनें लादल्या तर पत्करणार नाहीं. आपण एखादा परदेशी तज्ज्ञ बोलावला म्हणजे त्यास अधिक पगार देतों व त्याचें थोडेंसें वर्चस्वही पत्करतोंच कीं नाहीं? तसेंच पूर्ण स्वतंत्र होण्यापूर्वींच्या संधिकाळांत इंग्लंडची मदत हवी म्हणून इतर देशांच्या व्यापाऱ्यांपेक्षां लँकाशायरला मी अधिक सवलती देईनही.

**प्रश्न**—स्वराज्याची किंमत म्हणूनच या सवलती द्याल ना ?

**उत्तर**—छे, छे ! मी स्वराज्याचा सौदा करणार नाहीं. लोकमान्य टिळक म्हणत त्याप्रमाणें मी स्वराज्य हें जन्मसिद्ध हक्क म्हणूनच घेईन. पण इंग्रजांसारख्यांचा सन्मान्य स्नेह मला हवा म्हणून मी त्यांना या सवलती देईन.

**प्रश्न**—ब्रिटिश साम्राज्य हें पापावर उभारलें आहे हें माहीत असूनही तुमचें त्यावर प्रेम आहे असें मीं समजावें काय ?

**उत्तर**—'होय' अथवा 'नाहीं' असें एकेरी उत्तर या प्रश्नास मी अगदीं देणार नाहीं. इंग्रजांनीं आम्हांला जिंकलें हेंच त्यांचें पाप असें तुमचें म्हणणें असलें तर आपण त्यांस जिंकूं दिलें हें आमचेंही पापच नव्हे काय ? अर्थात् ही साम्राज्याची इमारत पापावर रचली असें तुमचें म्हणणें असलें तर त्या पापाचे वाटेकरी इंग्रज व आपण दोघेही आहोंत हें कबूल करा. पण या इमारतीस न दुखावितां हिचा पापात्मक पाया काढून टाकून तेथें स्नेह व सौजन्य यांचा पाया बांधतां येईल अशी माझी खात्री आहे. अथवा याच स्नेह व सौजन्य यांच्या बळावर सर्व जुनी इमारत अगदीं नवीन स्वरूपांत आणतां येईल.

**प्रश्न**—पण इंग्रजांचा संबंध ठेवण्यासाठीं एवढा अट्टाहास कां ? एकदम इंग्लंडचा संबंध तुटून चालू परंपरा खंडित झाली तर काय बिघडेल ?

**उत्तर**—परंपरेचा मुद्दा मला महत्त्वाचा वाटतोच; पण तो गौण म्हणून सोडून देऊं. माझ्या मनांत याहून अधिक महत्त्वाचे मुद्दे आहेत. अहिंसेचा प्रसार हें माझ्या आयुष्याचें एकच एक पवित्र व्रत आहे हें तुम्हांस माहीतच आहे. माझ्याकडे या एका चष्म्यांतून कोणी पाहील तर माझ्या वर्तनांतील सर्व कोडयांचा खास उलगडा होईल. मी हें व्रत ईश्वराच्या आज्ञेनें पत्करलें असून त्याच्या सिद्धीसाठीं जें हातास येईल त्या सर्वांचा मी यज्ञ करीन. हिंदुस्थानचीही पर्वा करणार नाहीं. माझ्या या कार्यास जगांतल्या आजच्या कोणत्याही संस्थेपेक्षां ब्रिटिश साम्राज्याचें मला अधिक साहाय्य होईल. ब्रिटिश साम्राज्य हें इतकें पवित्र आहे असें म्हणण्याचा माझा हेतु नाहीं. इंग्रज हे कांहीं सत्पुरुष आहेत असें माझें म्हणणें नाहीं. इतर सामान्य माणसांचे सर्व बरे-वाईट गुण त्यांच्याही अंगीं आहेतच, पण त्यांच्या साम्राज्याची राजकीय व आर्थिक संघटना आणि परंपरा अशी आहे कीं, सर्व राष्ट्रांच्या अंतर्व्यवस्थेंत व राष्ट्राराष्ट्रांच्या परस्परसंबंधांत शांतता राखण्यासाठीं

झटणें हें साम्राज्यरक्षणाच्या दृष्टीनें त्यांचें पहिलें कर्तव्य ठरतें. अनेक वजनदार ब्रिटिश मुत्सद्दयांनीं या धोरणाचा अवलंब केला आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें रिपन, हार्डिंज, आयर्विन, या याच प्रकारच्या तीन मुत्सद्दयांचीं नांवें मी सांगू शकेन. हे मुत्सद्दी युद्धांत पडतात तेव्हांही त्यांचा अंतिम हेतु शांततास्थापन हाच असतो असें माझें मत आहे. यामुळेंच गेल्या महायुद्धांत व दाक्षिण आफ्रिकन युद्धांत इंग्रजांना मीं मदत केली. अलीकडे माझी ही श्रद्धा थोडीशी ढळली आहे. पण त्याचा अर्थ मीं हा सिद्धांत सोडूनच दिला आहे असा नव्हे. गुलामी मनोवृत्तीच्या लोकांवर दहशत बसवून इंग्रज शांतता स्थापन करितात हें खरें; पण यावर उपाय म्हणजे माझ्यासारख्या धर्मसेवकांनीं जनतेंत स्वाभिमान उत्पन्न करून इंग्रजांच्या दहशतवादास प्रतिकार करण्यास त्यांना उद्युक्त करणें आणि त्या योगें इंग्रजांनाही प्रजेच्या स्वाभिमानास मान देण्यास शिकविणें हाच. पण अशा प्रकारें प्रजेस सरकारी दहशतीचा प्रतिकार करण्यास शिकविण्याची अहिंसात्मक चळवळ मीं केली तरी, हल्लींच्या सरकारची सत्ता उलथून पडेल व शांततेच्या मार्गानें ती सत्ता हिंदी लोकांस आपल्या अंगावर पेलून धरण्याइतकी ताकद न आल्यानें गुंडांच्या हातीं समाज जाऊन तो उध्वस्त होईल, इतका धोका त्या चळवळीमुळें येणार असेल, तर असली शांतताप्रधान चळवळही मी करणार नाहीं. माझ्या हातीं सत्ता आली तरी ताबडतोब मी पोलिस व सैनिक बरखास्त करीन असें नव्हे. अहिंसा हा माझ्या तत्त्वनिष्ठेचा विषय आहे हें खरें; पण अहिंसा कांहीं मीं मनांत आणतांच आभाळांतून हातीं पडेल असें नाहीं. सगळ्या जगांतल्या विविध माणसांच्या मनावर, संवयींवर व स्वभावांवर सतत कृतीनें आणि शिकवणीनें परिणाम करीत राहून सावकाश अथवा जलद कशी शक्य होईल तशी अहिंसा लोकांच्या मनावर बिंबवायची आहे. पण कांहीं झालें तरी ती अकस्मात् निर्माण होणार नाहीं. या कार्यासाठीं माझ्या मतें हल्लींचें ब्रिटिश राज्य हें फार उपयुक्त आहे. मी पूर्ण अराज्यवादी आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, जेव्हां जनता आचार, विचार व उच्चार यांत पूर्ण अहिंसात्मक होईल त्या वेळीं आजच्या राज्यसंस्था निरुपयोगी पडून आपोआप जीर्ण होतील.

**प्रश्न**—तुमच्या चळवळींत सामर्थ्य आणण्याकरितां तुम्ही कामगारचळवळ कां करीत नाहीं ?

**उत्तर**—कामगारवर्ग हा समाजांतला मोठा स्फोटकवर्ग आहे. अहिंसात्मक चळवळीस केव्हां केव्हां बळजोरीचें स्वरूप येत असलें तरी बळजोरी हें अहिंसेचें वैशिष्ट्य नसून मतपरिवर्तन हें तिचें वैशिष्ट्य आहे. दडपल्या गेलेल्या वर्गांना त्यांच्या शत्रूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त न करतां शत्रूचें मन आत्मबलाच्या मार्गानें आळवून दडपल्या गेलेल्या वर्गापुढें त्या शत्रूंनीं सौजन्यपूर्वक मान लववावी असें घडवून आणण्यास मी प्रवृत्त करीन. यासाठीं दडपल्या गेलेल्या वर्गांत जे शांतवृत्तीचे वर्ग असतात त्यांनाच हातीं धरावें लागतें. हल्लीं शेतकरी हा असा वर्ग आहे. शेतकऱ्यांना या अहिंसामार्गानें यश आलें म्हणजे कामकऱ्यांचीही त्या मार्गावर श्रद्धा वाढेल व आपलें भवितव्य सुधारण्यासाठीं त्या मार्गाचा ते अवलंब करतील. जुलुमग्रस्त माणसें बेफाम होण्यापूर्वीच जुलूम करण्याऱ्यांना आपली चूक कळून येऊन त्यांनीं कर्तव्यतत्पर व्हावें अशी माझी नेहमीं इच्छा असते. ह्याच दृष्टीनें इंग्रजांनीं हिंदी लोकांस सौजन्यपूर्वक स्वराज्य द्यावें, सनातनींनीं हरिजनांना प्रेमानें आपल्या इतक्या उच्च दर्जास पोंचवावें आणि भांडवलदारांनीं मजुरांना राजीखुषीनें आपल्या नफ्यांत भागीदार करावें, असा माझा सतत प्रयत्न असतो.

यापुढें असंतुष्ट असे सुशिक्षित मध्यमवर्गीय तरुण जातीय भेदभाव विसरून शेतकरी-कामकऱ्यांची वर्गतत्त्वावर संघटना करतील. परदेशांतील उपद्रवकारक पंथ आगींत तेल ओततील. चीन-जपानच्या क्षितिजावर आज लहानसा दिसणारा अपशकुनी काळा ठिपका वाढतां वाढतां लवकरच सर्व आंतरराष्ट्रीय आकाश काळेंकुट्ट करून टाकील. पुढील महायुद्ध साधारण दहा वर्षांत येईल आणि तें गेल्या महायुद्धांपेक्षांही अधिक भयानक असेल. इंग्लंड अधिकाधिक दुर्बल होत चाललें आहे. येथें लोकमतांस असंमत व दिवाळखोर असें सरकार असेल, आणि युद्ध आमचे दाराशीं येऊन ठेपेल. अशा वेळीं पुढें काय होणार हें इतिहासानें अनेकदां रक्ताच्या शाईनें लिहून ठेविलें आहे हें माझें बोलणें म्हणजे केवळ भयानक कल्पनेचें पिशाच्च असेलही. पण इतिहास कितीदां तरी कल्पना पिशाच्चापेक्षांही अधिक भयंकर असा राक्षस असल्याचें आढळून आलें आहे. लोकांना भेडसावण्यासाठीं अथवा दिङ्मूढ करण्यासाठीं मी नुसती भीतीची आरोळी उठवितों असें नव्हे. सर्व कांहीं

आपोआप ठीक होत जाईल अशा आशावादीपणांत रममाण झालेल्यांना अजूनही सावध होऊन भावी अरिष्टांस तोंड देण्याची तयारी करणें शक्य आहे.

**प्रश्न**—या भावी अनर्थांचे वेळीं तुम्ही काय कराल? केवळ दूर जाऊन अहिंसेचा जप करीत बसणें हेंच तुम्हांस सुरक्षित वाटेल का?

**उत्तर**—छे छे! येणारी राज्यघटना कशीही असो, तिच्याशीं जबाबदार पुढारी असहकार पुकारतील तर देशावर फारच लवकर व खात्रीनें अनर्थ ओढवेल.

**प्रश्न**—तर मग घटना बनविण्याच्या वाटाघाटी सुरू असतां तुम्ही बेफिकिरपणें स्वस्थ बसतां हें कसें? अजून घटना पूर्ण बनली नाहीं तोंच तींत जरूर ते फेरफार तुम्ही कां करून घेत नाहीं?

**उत्तर**—त्याचें कारण, इंग्रज लोक मला वादविवादाचीं खुसपटें काढून घटना मागून घे म्हणतात व मग युक्तिवादांत अडचणींचे पाढे वाचून हिंदी लोक स्वराज्यास नालायक आहेत म्हणून स्वराज्य देणार नाहीं असें सांगतात हें होय. त्यांच्यावर व आमच्यावर कोसळू पाहणारें जें संकट त्याची तें उद्धटपणें उपेक्षा करीत आहेत. म्हणून त्यांना ही वावदूकता रुचते. भावी संकट त्यांना दिसूं लागावें अशी माझी इच्छा आहे. तसें तें त्यांना दिसल्यास हिंदुस्थान हा भावी संकट टाळणारा फार मोठा ठेवा आहे हें इतर कोणाहीपेक्षां इंग्रजांनाच अधिक माहिती आहे. हिंदुस्थानच्या उणीवा व दोष काढीत न बसतां इंग्लंड व हिंदुस्थान एक होतील तर जगाचें तारूं त्या संकटांतून सुरक्षितपणें पार पाडण्याचें सामर्थ्य त्यांच्या एकजुटींत आहे हेंही त्यांना पटेल. पण हल्लींच्या मनोवृत्तींत इंग्रज आहेत तोंवर त्यांच्याशीं हें बोलणें व्यर्थ आहे. इंग्रजांनीं प्रथम आपण सत्ताधारी आहों हा गर्व सोडून स्नेहभावानें आम्हांस वर येण्यास हात दिला पाहिजे. आमच्यावर विश्वास टाकून व आमच्या अडचणींत आम्हांला मदत करून आमचें दारिद्र्य दूर करण्यासाठीं त्यांनीं स्वार्थत्याग केला पाहिजे. यालाच मी हृदयपालट म्हणतों. हल्लींची त्यांची सावकारी मनोवृत्ति दोघांवरही अनर्थ आणील. अजूनही प्रसंगास योग्य अशी उच्च भूमिका इंग्रज राज्यकर्ते घेतील अशी मी आशा करतों. मी आयुष्यभर त्यांच्याशीं स्नेह ठेवला आहे. पण अखेर ते मला दगाच देणार असतील तर निदान ईश्वर तरी मला दगा देणार नाहीं. ब्रिटिश लोक, सनातनविर्ग, भांड

वलदार व जमीनदार यांना 'तुम्ही ज्यांना आपले विरोधक समजतां त्यांना मित्र मानून त्यांच्यापुढें नमतें घ्या आणि त्यांचें बंड होऊन जगावर कोसळणारा अनर्थ टाळा' असें शिकविण्यासाठीं मी प्राण जाईपर्यंत झटेन व त्यासाठीं प्राणही वेचीन. माझ्या साधनांवर माझा पूर्ण विश्वास आहे. भावी अनर्थांपासून जगाचें संरक्षण याच साधनांनीं होईल, दुसऱ्या कशानेंही तें होणार नाहीं.

**प्रश्न**—तुम्हीं सत्याग्रह थांबविला म्हणून सारा देश तुमचें अभिनंदन करतो आहे खरा; पण तुमचेच कट्टे अनुयायी यामुळें तुम्हांपासून दूर जात आहेत, हें तुमच्या लक्षांत आलें आहे का ?

**उत्तर**—माझ्या कांहीं अनुयायांनीं माझ्या निर्णयाबद्दल नापसंती दर्शविली आहे हें खरें पण तेवढ्यावरून ते मजपासून दूर चालले असें म्हणणें योग्य होणार नाहीं. ते मजवर आज असंतुष्ट असले तरी ते मला सोडणार नाहींत. मला जरूर त्या त्या वेळीं त्यांचा आधार मिळणारच असें मी नेहमींच धरून चाललों आहें.

## सत्याग्रह व संख्याबळ

**प्रश्न**—केवळ एकट्याच्या सत्याग्रहानें तुम्ही ब्रिटिश साम्राज्याशीं लढूं पाहतां हें कसें शक्य होईल ? असा त्यांचा तुम्हाला प्रश्न आहे.

**उत्तर**—भौतिक बलाला भौतिक बल भिडवायचें असतें तर हा प्रश्न रास्त होता. पण सत्याग्रहांत भौतिक बलाला स्थानच नाहीं, संख्येलाही स्थान नाहीं.

**प्रश्न**—आपण काय म्हणतां तें मला समजत नाहीं. हल्लीं सत्याग्रहचळवळ जी अपेशी झाली आहे, तो ब्रिटिशांच्या भौतिक बलानें सत्याग्रही वीरांच्या भौतिक बलाचा केलेला पराभवच नव्हे तर काय ?

**उत्तर**—मी नाहीं हें मान्य करीत. केवळ हिंदुस्थानांतला ब्रिटिशांचा राज्यकारभार उध्वस्त करून टाकणें एवढाच प्रश्न माझ्यापुढें असता तर ती गोष्ट मी जनताचळवळीच्या बळावर खात्रीनें घडवून आणली असती हें इंग्रजांनीं गेलीं पंचवीस वर्षें माझ्या चळवळी पाहिलेल्या असल्यानें त्यांनाही मान्य करावेंच लागेल.

**प्रश्न**—म्हणजे सत्याग्रहाच्या चळवळींत हजारों, लाखों स्त्री-पुरुषांचा व मुलांचा सरकारनें चिडून जाऊन छळ केला, इतका तीव्र सत्याग्रह करतांनाही

सरकारला ठोकर देणें हा तुमचा हेतु नव्हताच म्हणावयाचा? सरकारचा पराभव करायची इच्छा नसतांच सत्याग्रह-युद्ध तुम्हीं सुरू केलें होतें काय?

**उत्तर**—इंग्रजांना आजवर मीं त्यांचा छळ केला असेंच वाटतें. पण इतका सर्व त्यांचा 'छळ' करतांना त्यांचा पराभव करावा अशी माझी इच्छा नव्हती, इतकेंच नव्हे तर त्यांच्याशीं लढावें असाही कधीं माझा हेतु नव्हता. मत-प्रसार करतांना सामान्यतः रूढ अशी कोणतीही भाषा मीं वापरली असेल, पण आफ्रिकेंत व गेल्या महायुद्धाच्या वेळीं मी जसा त्यांचा मित्र होतों असें इंग्रजांना वाटे, तसाच त्यांचा मी अजूनही मित्र आहें असें मला वाटतें.

## उदार मताची परंपरा

**प्रश्न**—तुमचा भ्रमनिरास होऊन इंग्रज हे स्वार्थसाधु आहेत अशी तुमची अजून खात्री झाली नाहीं का?

**उत्तर**—इंग्लंडांतील लोकमतावर इंग्लंडमधल्या कोणत्या लोकांचा पगडा आहे आणि वेळोवेळीं राज्यसूत्रें कोणाच्या हातीं आहेत यावर तुमच्या प्रश्नाचें उत्तर अवलंबून राहील. बाल्डविन, आयर्विन, सेसिल या मनोवृत्तीच्या माणसांना इंग्लंडमधील लोकमतावर व हिंदुस्थान सरकारवर वजन ठेवतां आलें, तर ब्रिटिश साम्राज्याची थोर परंपरा अजूनही पाळली जाईल आणि मानव-जातीची प्रगति शांततेनें व सुव्यवस्थेनें होण्यास हें साम्राज्य मदत करील असें मला अजूनही वाटतें.

**प्रश्न**—ही कोणती थोर परंपरा?

**उत्तर**—लिबरॅलिझमच्या तत्त्वानें घालून दिलेली परंपरा. गेल्या शतकांत ब्रिटिश लिबरलपक्षानें तरवारीच्या बळावर ब्रिटिश शिपायांना व व्यापाऱ्यांना इंग्लंडचें साम्राज्य वाढविण्याची मुभा दिली. त्या वेळीं जित राष्ट्रांत, स्वातंत्र्य, समता आणि व्यवस्थित प्रगति यांचा संदेश प्रसृत करण्याचें कार्यही या शिपायांपुढें त्यांनीं ठेविलें होतें आणि या तत्त्वांपासून या दूरच्या जित राष्ट्रांतल्या अधिकाऱ्यांनीं च्युत होऊं नये या दृष्टीनें ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं त्यांचें थोडेंफार नियंत्रणही केलें.

**प्रश्न**—पंजाबांत ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं केलेले अत्याचार हें याचें उदाहरणच म्हणा ना?

**उत्तर**—नव्हे नव्हे! तुमच्या या टोमण्यानें मी गोंधळेन असें समजूं नका.

मनुष्य हा अपूर्ण आहे, तो चुकतो हें तुम्हांला कबूल असेलच. इंग्रजही माणसेंच नव्हत का ?

## इंग्रज उदार कां?

**प्रश्न**—मग तत्त्वच्युतीचे असे अपवादात्मक प्रसंग सोडले तर सगळ्या जगांत इंग्रज हेच फार तत्त्वनिष्ठ लोक आहेत असें तर तुमचें म्हणणें नाहीं ना ?

**उत्तर**—हो, मला तसें वाटतें. म्हणजे इंग्रजांच्या अंगीं विशेष प्रकारचे वैयक्तिक सद्गुण आहेत म्हणून ते असे वागतील असें नव्हे. पण त्यांच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या साम्राज्याच्या रक्षणासाठीं समजूत, विचारविनिमय, सहिष्णुता, संयम, विनय आणि केव्हा केव्हां धूर्तपणानें का होईना पण सौजन्यपूर्वक नमतें घेणें या मार्गांचा अवलंब करण्यावांचून गत्यंतरच राहत नाहीं. आणि केव्हां केव्हां पंजाबप्रकरणासारखे भयंकर अत्याचार त्यांनीं जसे केले आहेत त्याप्रमाणें वरील प्रकारचे उदार गुणही त्यांनीं व्यक्त केले आहेत.

**प्रश्न**—पण इंग्लंडची ही उदारवृत्ति बाल्डविन-आयर्विन-सेसिल या मनोवृत्तीचे लोक अधिकारावर असतील तरच राहील असें तुम्ही म्हणालां ना ?

**उत्तर**—ते अधिकारावर असतील तर ठीकच. पण निदान लोकमतावर वजन ठेवणें तरी त्यांना शक्य झालें पाहिजे.

**प्रश्न**—पण मग ही बाब हिंदुस्थानच्या भवितव्यावर परिणाम करणारी असूनही हिंदुस्थानच्या आटोक्याबाहेरची नव्हे का ?

**उत्तर**—इंग्लंडांतल्या प्रधान-मंडळाची घडामोड करणें हें आम्हांस शक्य नाहीं खरेंच. पण ब्रिटिश लोकमतावर मंत्रिमंडळ अवलंबून असतें आणि ब्रिटिश लोकमतावर आपण थोडेंफार वजन टाकूं शकतों.

## राक्षसी अंश चेतवूं नका

**प्रश्न**—आणि तरीही तुम्ही परराष्ट्रीय प्रचारास विरुद्ध आहां ना ?

**उत्तर**—त्याचें कारण ब्रिटिश लोकमतावर वजन टाकण्यासाठीं परराष्ट्रांत मतप्रचार करणें हा उपाय मला पटत नाहीं हें होय.

**मी इंग्रजांच्या कोणत्याही वैयक्तिक सद्गुणावर विसंब्रत नसून साम्राज्य संरक्षिण्यासाठींच त्यांना जें उदार धोरण ठेवणें अवश्य** आहे त्यावर मी विसंबितों हें मी तुम्हांला आतांच बोललों. हिंदुस्थानांतील

इंग्रजांची सत्ता ही त्यांची फार मोठी ठेव आहे. आणि स्वायत्त वसाहती आतां फुटून ज़ाऊं पाहत असल्यानें, हिंदुस्थान ही त्यांची एकच एक मौल्यवान् ठेव होऊं पाहत आहे. येथला ब्रिटिश राज्यकारभार उलथून पाडला म्हणजे तेवढ्यावरून आम्ही स्वतंत्र होऊं असें नका समजूं. त्यामुळें गोंधळ, बेबंदशाही रक्तपात सर्व कांहीं होईल. माणसाच्या मनोवृत्तींतील राक्षसी अंश बेताल होईल. इंग्रजांना जर आम्हीं बळजोरीनें हिंदुस्थान सोडून जायला लावूं तर त्यांच्याही मनोवृत्तींतला राक्षसी अंश भडकेल आणि येथील सत्ता व धन यांचा त्याग करतांना ते सगळा विध्वंस करून टाकतील. म्हणून मला हिंदी राजकीय चळवळ अशा पद्धतीनें चालवावयाची आहे कीं तीमुळें इंग्रजांना हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदी लोकांच्या हवालीं करण्यांतच आपलें हित आहे हें पटेल.

## त्यांची माणुसकी आळवा

**प्रश्न**—आणि अखेर या धोरणानें तुम्ही लांडग्याला कोंकराशीं स्नेह करायला लावणार म्हणतां ?

**उत्तर**—नव्हे, तसें नव्हे. इंग्रजांच्या मनोवृत्तींतला लांडग्याचा अंश चेतवून जागृत करूं नका असें मी तुम्हांला सांगतों; त्यांनाही माणुसकीच्या पातळीवर ठेवा. हिंदी लोक जर आपल्या चळवळीनें येथला ब्रिटिश राज्यकारभार तावडतोब उध्वस्त करण्याची दहशत इंग्रजांना घालतील तर त्यामुळें इंग्रज भयभीत होतील आणि इंग्रजांना सामोपचाराचा युक्तिवाद न पटून चर्चिल-मॉरलेप्रभृति माणसें इंग्लंडांत अधिकारावर येतील. शांततेनें समेट होण्याचा संभव मग अगदींच नष्ट होईल. आपण निष्क्रिय व्हावें हें मला केव्हांच मान्य नाहीं. पण त्याबरोबरच इंग्रजांना विचार करण्याइतकी उसंत आपण नेहमींच दिली पाहिजे व आपल्या आध्यात्मिक बुद्धीनें त्यांच्याही आध्यात्मिक बुद्धीलाच आळविलें पाहिजे.

**प्रश्न**—पण महात्माजी, आपणांला हें माहीतच आहे कीं, इंग्लंडची आंतरराष्ट्रीय परिस्थिति चोहोंकडून जिकिरीची होत आहे. त्यांच्या निर्यात मालाने बाजार बंद होत आहेत. त्यांच्या बॅंकिंग धंद्याचें पूर्ववैभव मावळत आहे, जहाजांचा धंदा बुडूं लागला आहे, विदेशी बाजारांत जपान त्यांना मागें हटवीत आहे आणि इंग्लंडच्या अंकित प्रदेशांवर लवकरच परचक्र

येण्याची भीति उत्पन्न झाली आहे. एवढ्यामुळेंही ब्रिटिश लोक भेदरून जाऊन चर्चिलला अधिकारावर आणणार नाहींत काय?

**उत्तर**—तें माझ्या लक्षांत नाहीं असें नाहीं. पण उलट त्यासाठींच इंग्रजांना विचार करण्याइतकी उसंत देऊन शक्य तितक्या लवकर इंग्लंड व हिंदुस्थान यांचा समेट घडवून आणणें अगत्याचें आहे.

## समानभूमिकेवरील सख्य

**प्रश्न**—पण त्यामुळें इंग्लंडच्या मनांतील आंतरराष्ट्रीय भीति नष्ट होईल हें कशावरून?

**उत्तर**—हिंदुस्थानचें सुद्धां सामर्थ्य एवढें प्रचंड आहे कीं, इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या प्रचंड बळास विरोध करण्यापूर्वीं कोणत्याही परराष्ट्रास दहा वेळां विचार करावा लागेल. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या प्रचंड बळास सगळ्या जगाच्या राजकारणांत वजन उत्पन्न होईल आणि मग आंतरराष्ट्रीय राजकारणांतील वाद मिटविण्यासाठीं शस्त्रसाधनाचा आश्रय न करतां दुसऱ्या एखाद्या उपायाचा अवलंब करावा असें जगांतील राष्ट्रांना वाटेल. अहिंसेच्या यशाच्या दृष्टीनें इंग्लंड-हिंदुस्थानचें समानभूमिकेवरचें सख्य ही फार मोठी प्रगति होईल असें मला वाटतें.

**प्रश्न**—सध्यां प्रसिद्ध केलेला राज्यघटनेचा 'सफेत खर्डा' ते सुधारणार नाहींत हें खरें ना?

**उत्तर**—खरें आहे. ते तो सुधारणार नाहींत.

**प्रश्न**—मग हीच राज्यघटना हिंदुस्थानांत सुरू झाली म्हणजे येथील गोंधळ अधिकच तीव्र होणार नाहीं का?

**उत्तर**—हिंदुस्थान सरकारला प्रतिकार करण्यासाठीं संघटना, शिस्त व आत्मबल आपण किती वाढवूं यावर हें अवलंबून आहे. ही तयारी आपण भरपूर करूं अशी मला उमेद आहे. अशा या परिस्थितींत आंतरराष्ट्रीय महायुद्ध सुरू झालें तर इंग्लंडांतील शहाण्या मुत्सद्द्यांना हिंदुस्थानचें राजकीय दृष्ट्या समाधान करावें लागेल. हिंदी लोकांनीं स्वतः स्वदेशरक्षणाची जबाबदारी पत्करल्यावांचून साम्राज्याचें रक्षण होऊं शकणार नाहीं हें इंग्रजांना तेव्हां पटेल.

## महायुद्ध पेटलें तर—

**प्रश्नः**—पण हिंदुस्थानांतले व्हाइसरॉय व नोकरशाही यांची यासंबंधानें

खात्री करणें ब्रिटिश मुत्सद्द्यांना कसें शक्य होईल? कीं ब्रिटिश पार्लमेंट घटना-कायदा बदलूनच हिंदुस्थानकडे पाठवील असें तुम्हांस वाटतें?

**उत्तर**—घटनेचा प्रसिद्ध झालेला सफेत खर्डा प्रतिगामी आहे हें खरेंच, पण हिंदुस्थानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर यांनीं मनांत आणल्यास वसाहतींचें स्वराज्य त्यांतून काढण्याइतका हा सफेत खर्डा ताणतां येईल. नुसत्या वहिवाटीनेंही ती गोष्ट करतां येईल. अर्थात् हिंदी लोकांचें समाधान न झाल्यास शांततेनें, शिस्तीनें व आत्मबलानें लढा चालविण्यास तयार राहिलें पाहिजे. मध्य-सरकारांत गव्हर्नर-जनरलच्या मंत्रिमंडळांत गव्हर्नर-जनरलच्या बरोबरीनें मताधिकार असलेला एकही 'राखीव' खात्याचा मंत्री नाहीं. तसेंच 'राखीव' खात्यांचे बाबतींत लोकनियुक्त मंत्रिमंडळास जास्तींत जास्त प्रमाणांत विश्वासांत घेऊन योग्य वाटेल त्याप्रमाणें त्याचा सल्लाही त्यानें ऐकावा अशी गव्हर्नर-जनरलला सूचना करण्यांत आली आहे. इंग्लंडांत शहाणे मुत्सद्दी अधिकारावर असले तर त्यांच्या विश्वासांतलाच गव्हर्नर-जनरल येथें असेल. अशा घटनेच्या वेळीं आंतरराष्ट्रीय युद्ध सुरू झालें आणि सगळ्या राष्ट्रांचा पाठिंबा असणाऱ्या मंत्रिमंडळानें अमुक इतके अधिकार असल्यावांचून राज्यकारभारांत सहकार्य करणार नाहीं असें म्हटलें तर त्यांच्या मदतीवांचून राज्यकारभार हांकणें गव्हर्नर जनरलला अशक्य होऊन तो हिंदी मंत्रिमंडळांस जरूर ते अधिकार देण्याचा प्रघात पाडील. त्यास नोकरशाही विरोध करूं शकणार नाहीं. शांततेनें राज्यसत्तेस प्रतिकार करण्याची तयारी किती असेल आणि आंतरराष्ट्रीय संकट किती गंभीर असेल त्यावर गव्हर्नर जनरल किती उदार धोरण स्वीकारतो हें अवलंबून राहील.

## हिंदु-मुस्लीम वाद थांबेल

**प्रश्नः**—पण जातीयवाद व संस्थानें या अडचणींचें निवारण तुम्ही कसें करणार?

**उत्तरः**—आपण जनतेची तयारी कशी करतों यावरच सर्व गोष्टी अवलंबून आहेत. आपण जनतेची तयारी भरपूर केल्यास संतुष्ट हिंदुस्थान आपल्या वैभवाचें व जागतिक शांततेचें प्रमुख साधन आहे, ही गोष्ट इंग्रजांना पटेल व जातीय वाद, संस्थानें वगैरे सर्व अडचणी तेच आमच्यासाठीं निवारतील. **जातीय वादाचीं मुळें जनतेंत खोल रुजलेलीं नाहींत. हे वाद**

**पुढाऱ्यांचे आहेत. या पुढाऱ्यांना समेट घडवून आणण्यास ब्रिटिश सरकारच भाग पाडील.** कारण सरकारला सोइस्कर होतें तेव्हां त्यानेंच पुढाऱ्यांचीं हीं भांडणें माजविलीं आहेत. म्हणून शिस्त, शांतता व आत्मबल यांच्या आधारावर आपण जनतेची लढण्याची तयारी कितपत करतों व त्याबरोबरच इंग्रजांना दहशत बसून त्यांचीं डोकीं भडकणार नाहींत इतक्या संयमानें आपण कसें वागूं शकतों हाच काय तो मुख्य मुद्दा आहे.

## समाजवादाचा परिणाम

**प्रश्न**—कम्युनिझम व मजूरचळवळी यासंबंधानें तुमचें धोरण काय राहील ?

**उत्तर**—कम्युनिझमचा जो रूढार्थ आहे त्याच्याशीं मला कांहींही कर्तव्य नाहीं. पण मजूरचळवळीवर कम्युनिस्टांना वर्चस्व स्थापतां आलें व सरकार व भांडवलदार यांनीं मजुरांना कम्युनिझमकडे आपल्या कटु कृतीनें लोटलें तर तें दुर्दैव होय.

**प्रश्न**—कम्युनिस्टांनीं तुमचा सल्ला मागितला तर त्यांना तुम्ही काय सांगाल ?

**उत्तर**—आधीं आडमुठेपणा सोडून सलोख्यानें बोलूं लागा असें मी त्यांना म्हणेन. नंतर 'ब्रिटिश सत्ता येथून तुम्ही हांकलून लावाल खरी, पण तुमच्या मनाजोगी हुकूमशाही जर तुम्हांस स्थापतां न आली तर काय होईल ?' असें मी त्यांना विचारीन. लेनिनला ज्या विशिष्ट परिस्थितीमुळें आपली सत्ता स्थापन करतां आली ती परिस्थिति येथेंही उत्पन्न होईल अशी कम्युनिस्टांना खात्री आहे का ? या बाबतींत चीनमधील कम्युनिस्टांच्या अपयशापासून कांहींच बोध घेतां येणार नाहीं का ? कम्युनिस्टांशीं युक्तिवाद करून त्यांचें मत बदलणें हें फार कठीण आहे हें मी जाणतों. पण क्रांतिकारक व ब्रिटिश सरकार यांचें मतपरिवर्तन करण्यासाठीं जशी मीं खटपट केली तसेंच यांचेंही मतपरिवर्तन करण्यासाठीं मी मनापासून झटेन. मजुरांना आपल्या नेतृत्वाखालीं ओढून घेण्याचा मी प्रयत्न करीन व त्यांना सत्याग्रह शिकवीन. सर्व जग अहिंसेनें व प्रेमानें चालावें हें माझ्या जीविताचें ध्येय आहे व तें सत्याच्या बळावर मी साध्य करीनच करीन असा मला विश्वास आहे.

**अग्रणी, २३ व ३० ऑक्टोबर, १९३९**

परिशिष्ट

# जगावें कीं मरावें? किंवा मानवकुलाचा शेवट

We, humans, cannot dictate to the principles of Justice, Right and Humanity that they shall command us thus far and no further. We may disobey but we cannot pretend not to hear their commands.

*P. M. BAPAT*

**( एक धर्मसंमूढ व एक हिंदु साधु यांमधील धार्मिक चर्चा )**

धर्मसंमूढः—साधुमहाराज, आपला धर्म कोणता?

हिंदुसाधुः—कोणता म्हणजे? मी सनातन हिंदुधर्मीय आहे.

धर्मसंमूढः—आपण जन्मानें हिंदु आहां म्हणूनच या धर्मांत राहिलां कीं आपणांला विचारपूर्वक तो धर्म पटला हेंही एक कारण आहे?

हिंदुसाधुः—अलबत्! विचारपूर्वक पटला म्हणून. सर्व धर्मांत हिंदुधर्म श्रेष्ठ आहे अशी माझी खात्री झाली आहे.

ध. सं.:—याचें थोडेंसें स्पष्टीकरण कराल काय?

हिं. सा.:—होय; असें पहा कीं, आज जगांत हिंदु, बौद्ध, महंमदी, खिस्ती असे चार धर्म प्रामुख्यानें नांदत आहेत. या चारही धर्मांत हिंदुधर्म पुरातन

आहे. आज सुमारें चार हजार वर्षें सर्व प्रकारच्या संकटांतून तो वांचला आहे हाच त्याच्या श्रेष्ठपणाबद्दल भरपूर पुरावा आहे. हिंदुधर्माच्या उतरत्या काळांत मध्येंच बौद्धधर्मानें आपला पुष्कळच अंमल बसविला, पण हिंदुधर्म पुन्हा जागा होतांच, त्यानें बौद्धधर्माची पार पीछेहाट केली, व आज दीड हजार वर्षें बौद्धधर्म परत आला नाहीं, आणि पुढेंही येण्याची आशा नको. हिंदुधर्म व बौद्धधर्म यांच्या धार्मिक आज्ञांत व्यवहार्यतेच्या दृष्टीनें फारच फरक आहे. बुद्धानें अहिंसेचें तत्त्व इतकें परमोच्च कोटीला नेलें कीं, ते त्याचे नियम धर्मग्रंथांतून बाहेर व्यवहारांत आणावयाचे म्हणजे मनुष्यानें जगणेंच अशक्य झालें. धर्माचें मुख्य कार्य धारणेचें; पण हा धर्म-मुळीं मरणापासूनच सुरू होतो व अर्थात् तेथेंच थांबतो.

महंमदी धर्मांतील सक्तीचें तत्त्व मनुष्यास पशुकोटींत नेऊन सोडणारें आहे. धर्म ही शारीरिकापेक्षां अधिक मानासिक गोष्ट आहे. पण मुसल्मान लोकांना तरवारीच्या जोरावर धर्मप्रसार करण्याची आज्ञा असून बाह्य संस्कार हेंच धर्मस्वीकरणाचें मुख्य अथवा उपलक्षण मानलें जातें. यामुळें मानसिक उन्नति हा जो एक धर्माचा हेतु तो साध्य होत नाहीं. धर्माचीं तत्त्वें काय आहेत हें कोणाच्या गांवींही नसतें. उलट कोणताही सामान्य हिंदु घेतला तरी ईश्वराची व्यापकता, परोपकारित्व दिसेल तेथें पूज्यभाव, सर्वभूतानुकंपा, वगैरे हिंदुधर्माचीं महातत्त्वें त्याच्या रोमरोमांत भिनलेलीं दिसतील. पण ज्या धर्मांत तरवार हेंच धर्मप्रसाराचें साधन आहे, त्या धर्मांत दया, क्षमा, शांति, यांस कितपत अवसर मिळेल हें दिसतेंच आहे. दया, क्षमा, शांति हीं तर जगाचे धारणास अत्यंत आवश्यक आहेत. सारांश, बुद्धधर्म फाजील अहिंसात्मक म्हणून अव्यवहार्य व दुसरा नुसता विध्वंसक व तामसी म्हणून टाकाऊ.

ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें अशींच बौद्धधर्माप्रमाणें अव्यवहार्य असून त्यांत केवळ श्रद्धा हाच आदि व श्रद्धा हाच अंत आहे. त्यामुळें बुद्धीला व तर्काला त्यांत कोठेंच जागा नाहीं. यामुळें धर्माच्या आज्ञा व व्यवहार अगदींच वेगळे इतकेंच नव्हे तर परस्परविरोधीही दिसतात. असा धर्म असून नसून काय कामाचा?

ध. सं.:—पण हिंदुधर्मांत तरी श्रद्धेला महत्त्व नाहीं दिलें काय? 'अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण योजयेत्' वगैरे वचनें काय सांगतात?

हिं. सा.:—प्रश्न बरोबर आहे. श्रद्धेला महत्त्व देतात खरें, पण केव्हां?

तर्काची मर्यादा खुंटली म्हणजे मग. भक्तिमार्ग पुष्कळसा श्रद्धेचा मार्ग आहे. पण अखेरीस बुद्धीला ज्ञान झाल्याशिवाय नुसत्या भक्तीनें मोक्ष मिळत नाहीं. परमेश्वरस्वरूपाचा–ब्राह्मीस्थितीचा–साक्षात् अनुभव कसा आहे, हें तर्कानें अनुमानितां येत नाहीं. 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' अशी श्रुति आहे. पण येथपर्यंत म्हणजे बाह्य सृष्टींतून आत्म्याच्या शेवटच्या द्वारापर्यंत बुद्धीनेंच–तर्कानेंच–मजल मारलेली असते; व शेवटीं तर्कालाच आपल्याच्यानें पुढें जाववत नाहीं असें दिसूं लागून सत्पुरुषवचनावर श्रद्धा ठेवण्याची जरूर भासूं लागते. श्रद्धा ही तर्कांतूनच अशा रीतीनें उदय पावते. सायुज्य स्थितीचा अनुभव घेत असतां बुद्धि म्हणून वेगळें कांहीं राहत नसलें, तरी समाधिस्थ पुरुष पुन्हा देहावर आल्यास त्या समाधिस्थितीची त्याला बुद्धीनें आठवण असते. इतकें बुद्धिप्राधान्य हिंदुधर्मांत आहे. उलट ख्रिस्तानें आपल्या धर्माज्ञा सांगतांना प्रथमतः श्रद्धा असेल तर तरशील येथून सुरवात केली, चमत्कारानें लोक भुलविले व एका तोंडानें सन्मार्गानें वागा असें सांगून त्याच तोंडानें पुन्हा कोणी कसाही वागला तरी जगाच्या अंतापर्यंत सर्वांनाच थडग्यांत कुचमत पडावें लागेल व परमेश्वर शेवटीं सर्वांनाच क्षमा करील असें सांगितलें. हिंदूंचीं सर्व आचारतत्त्वें तर्कास पटलेलीं, अनुभवानें सिद्ध झालेलीं व परिस्थितीप्रमाणें सुधारत गेलेलीं आहेत.

ध. सं. :— हें सर्व मला कबूल आहे. तुमचें मघांचें बोलणें अपुरें होतें, तें पुरें करून घेण्याकरितां मध्येंच हा प्रश्न विचारला होता. माझा मुख्य विषय वेगळाच आहे. त्याकडेच आतां मी वळतों. आपल्या म्हणण्याचा एकंदरींत भावार्थ असा:—जगताचें धारण, पोषण हा जो धर्माचा मुख्य हेतु, त्या धारणेकरितां दया, क्षमा, शांति, अहिंसा यांची जरूरी आहे, व त्याचें व्यवहार्य स्वरूप फक्त हिंदुधर्मांतच सांपडतें. हिंदुधर्म सर्वांत अधिक तर्कप्रधान आहे व त्यास सात्त्विक श्रद्धेची जोड मिळाल्यामुळें दुधांत साखर पडल्यामुळें तोच धर्म अधिक गोड, पौष्टिक व मानसिक उन्नति करणारा झाला आहे, असेंच ना?

हिं. सा. :—अगदीं हाच माझ्या म्हणण्याचा भावार्थ.

ध. सं. :—पण साधुमहाराज, आपल्या बोलण्यांत अजूनही थोडा अपुरेपणा राहिला आहे. आपलें असेंही म्हणणें असलेंच पाहिजे कीं दया, क्षमा शांति, अहिंसा यांचा जगद्धारणेकरितां ज्याप्रमाणें हिंदुधर्मानें स्वीकार केला

आहे, त्याप्रमाणें हिंदुधर्मानें हिंसेसही योग्य स्थान दिलें आहे. कारण नुसतें दया, क्षमा, शांति, यांनीं जगद्धारण पुरें होत नाहीं. जगाच्या सुव्यवस्थेला अवश्य अशा गोष्टी म्हणजे साधुत्व, सौंदर्य, सत्य, न्याय यांच्या संरक्षणा-करितां यांवर आघात घालणाऱ्या दुष्टांचे निर्दालनार्थ रक्तपात, हिंसा करणेंही जरूर असतें. या वेळीं हिंसा ही धर्म्य म्हणजे जगद्धारणास पोषकच होते. सारांश, 'परित्राणाय साधूनां विनाशश्चोग्रकर्मणाम्॥' व या द्विविध कर्मानें 'धर्मसंस्थापन' करणें प्रत्येक हिंदु मनुष्याचें कर्तव्य आहे, खरें कीं नाहीं ? ('परित्राणं च साधूनाम् विनाशश्चोग्रकर्मणाम्। धर्मसंस्थापनं चेति कर्म वै भगवत्प्रियम्॥' –पां. म. बापट) सारांश, न्यायाचें सत्याचें संरक्षण, अन्यायाचें व असत्याचें निर्दालन, दीनावर दया व उपकार, शरणागतास क्षमा, आकाश कोसळून पडलें तरी समुद्रासारखें अढळ गांभीर्य व शांति आणि केवळ मनुष्यच नव्हे तर सर्वजीवसृष्टीवर सारखें प्रेम 'सर्वभूतहिते रतिः' इतकेंच नव्हे तर सर्व चराचर सृष्टींत परमेश्वराच्या अस्तित्वाची भावना, व म्हणून ज्ञानेश्वरांनीं म्हटल्या-प्रमाणें जें जें दिसेल त्याला त्याला नमस्कार करण्याइतकी सर्वत्र पूज्यबुद्धि, असा सर्व बाजूंनीं उच्च, सात्त्विक, सत्यप्रेमी, परमेश्वरमय असा हा सनातन-धर्म आहे असेंच कीं नाहीं ?

हिं. सा. :—निःसंशय ! माझें मनोगत आपण फार उत्तम रीतीनें मांडलेंत. आणखीही सांगतों कीं, याच तत्त्वाचा अंमल उत्तम रीतीनें व्हावा याकरितां वर्णाश्रमाची उत्पत्ति आहे. शमदमादि याचकरितां आहेत. शांति व संताप या दोन्ही परस्परविरोधी भावना एकत्र राहण्यास कठीण जाईल हें जाणून प्राचीन ऋषींनीं एकीस ब्राह्मणाचे व दुसरीस क्षात्रियाचे स्वाधीन करून परस्परांनीं परस्परांचें नियमन करावें व ताजवा समतोल राखावा अशी व्यवस्था करून ठेवली आहे.

ध. सं. :—ठीक-ठीक. मला हें सर्व कबूल आहे. पण साधुमहाराज, 'सर्वभूतहितरति' हें हिंदुधर्माचें मुख्य लक्षण आहे असें आपण म्हणालां किंवा कबूल केलें, याचीं कांहीं उदाहरणें देऊन आतां माझी खात्री कराल काय ?

हिं. सा. :—कां बरें ? तुमचें मन असें संशयग्रस्त कां ? मुक्या प्राण्यांवर दया करावी, जेवावयास बसतांना दारीं कुत्रें आलें तरी त्यास तुकडा टाकल्या-शिवाय अन्नभक्षण करूं नये, लहान लहान झाडांना पाणी घालून वाढवावें,

त्यांच्या मुक्या कळ्या तोडूं नयेत, मुंग्यांना साखर घालावी, गाई-वासरांवर पुत्रवत् प्रेम करावें, चिमण्यांना दाणे घालावे अशा एक कीं दोन, हजारों गोष्टींचे संस्कार पांच वर्षांच्या हिंदु मुलांच्या मनावर खोल उमटलेले तुम्हांस दिसतील. सामान्य प्राणिमात्रांचें राहोच, पण अत्यंत पापी व दुष्ट मानलेल्या 'सचाण्डालभूतपतितवायसांना' बलि दिल्याशिवाय हिंदु मनुष्य अन्नही भक्षण करीत नाहीं. मग त्यांत सर्वभूतरहितरति तुम्हांला कां दिसूं नये? गाईचें रक्षण करण्याकरितां आपलें शरीर दिलीपानें सिंहास खाण्यास दिलें, शरणागत कपोत पक्ष्याचें रक्षण करण्याकरितां आपल्या अंगचें मांस शिबीराजानें जिवंतपणीं तोडतोडून काढलें व शेवटीं तर स्वतःस उरलेल्या देहासकट अर्पण केलें. आतां आणखी भूतदया भूतदया म्हणून कांहीं वेगळ्या प्रकारची असते कीं काय?

ध. सं. :— कबूल आहे, पण मजजवळ याविरुद्ध दुसरीं पुष्कळ उदाहरणें आहेत. यज्ञामध्यें आपण निरपराधी पशूंची हिंसा करतों, राजे लोक वन्य-पशूंची शिकार करितात, झोंप चांगली लागावी म्हणून आपण ढेकूण मारतों किंवा त्यांना दूर फेकून देतों, अन्नांतून, पाण्यांतून किती तरी जीवजंतु आपण मारीत असतों. श्वासोच्छ्वासाबरोबर किती तरी प्राणी मरत असतात, इतकेंच काय, पण डोळ्याचें पातें लवत असतांही हजारों जीवजंतूंचे हातपाय मोडत असतात. आपण सांगितलेलीं उदाहरणें व मीं सांगितलेलीं उदाहरणें यांत विरोध दिसत नाहीं काय?

हिं सा. :—सकृद्दर्शनीं दिसतो खरा, पण मीं दिलेल्या उदाहरणांवरून सर्वभूताहितरति एकदां स्थापित झाल्यावर तुम्हीं सांगितलेल्या उदाहरणांचा माझ्या उदाहरणांच्या धोरणानेंच अर्थ लावला पाहिजे. बापाचें मुलांवर प्रेम आहे हें अनेक गोष्टींनीं एकदां सिद्ध झाल्यावर मग बापानें मुलांस ताडन केल्यास त्याचा पहिल्या प्रेमाच्याच दृष्टीनें आपण अर्थ लावतों कीं नाहीं? माळी झाडाची खच्ची करतो, मांजरी प्रसूत होतांच आपलीं पोरें खाते, यावरून माळी किंवा मांजरी हीं निर्दय असतात असें कोण म्हणेल? झाडांची वाढ चांगली होण्यास त्यांची खच्ची करणें व पिलांचें संगोपन करण्यास मांजरी जिवंत राहणें अवश्य आहे, तर झाडांना दुखवलेंच पाहिजे व एकदम मोकळ्या झालेल्या पोटांतील आग शमविण्याकरितां मांजरीनें कांहीं पिलें खाल्लींच पाहिजेत.

ध. सं.:—साधुमहाराज, दोन पक्ष वादास बसतात तेव्हां वादग्रस्त मुद्दयाच्या मुळाशीं असलेल्या मूलभूत तत्त्वाबद्दल दोन्ही पक्षांत एकवाक्यता असावी लागते हें खरें ना? असहकारिता चांगली कीं असह्यकारिता (ऑब्स्ट्रक्शन किंवा अडवणूक या अर्थी हा पुणेरी शब्द आहे) चांगली हा वाद चालला असतां स्वराज्य हवें ही गोष्ट दोन्ही पक्षांना मान्य असली पाहिजे; द्वैत व अद्वैत याबद्दल वाद घालणाऱ्या दोन्ही पक्षांनीं पहिल्यानें परमेश्वर आहे हें कबूल केलें पाहिजे. सेश्वरी व निरीश्वरी पक्षांनीं वादास बसतांना चराचर सृष्टीचें आपआपलें निरीक्षण कसें आहे याची चर्चा करून जेथें निरीक्षणाचें साधर्म्य असेल, तेंच मुद्दे आपआपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ घेतले पाहिजेत; सूर्य जगतास प्रकाश देतो ही गोष्ट प्रथम दोघांनीं मान्य केल्यावर मग म्हणून परमेश्वर आहे असें सेश्वरी म्हणेल व म्हणूनच परमेश्वर नाहीं किंवा निदान येवढ्यावरच परमेश्वर आहे असें सिद्ध होत नाहीं किंवा याचा परमेश्वराच्या अस्तित्वाशीं कांहींही संबंध नाहीं असें निरीश्वरी म्हणेल. पण सूर्य जगतास प्रकाश देतो, ही गोष्ट प्रथम दोघांनाही कबूल असली पाहिजे. दोन पुरुषांची उंची मोजतांना प्रथम त्यांना समान भूमिकेवर उभें करतात. असो, पाल्हाळ फार झाला. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, आपण दोघे एका भूमिकेवर नाहीं. आपण दिलेल्या उदाहरणांवरून 'सर्वभूतहितरति' एकदां सिद्ध झाल्यावर माझ्या उदाहरणांचा त्याच धोरणानें अर्थ लावावयास पाहिजे असें आपण म्हणाल. पण माझ्या मतें 'मीं दिलेल्या उदाहरणावरून स्वार्थलंपटता, सर्व भूतांबद्दल बेपर्वा, निर्दयता, क्रूरता सिद्ध झाली तर आपण दिलेल्या उदाहरणांचा' मीं माझ्या मतानुरोधानें अर्थ कां लावूं नये? आपण जी गोष्ट सिद्ध मानतां, तद्विरुद्ध गोष्ट मी सिद्ध मानतों; तेव्हां हा वाद मिटणार कसा? बापानें मुलास केलेल्या ताडनाचा आपण प्रेमाचे दृष्टीनें अर्थ केला तें योग्यच झालें. पण खाटीक बकरीचे पिलास खाऊं घालून पुष्ट करतो याचा अर्थ क्रूरतेच्या व स्वार्थाच्या दृष्टीनें लावणें हेंही तितकेंच योग्य नाहीं काय?

हिं. सा.:—अरेरे!! तुम्ही तर अगदींच पाखंडी बनलां. सनातनधर्माला तुम्ही खाटकाच्या पंक्तीस नेऊन बसवितां, यापेक्षां तुमच्या मनाचा अधःपात तो कोणता व्हावयाचा राहिला?

ध. सं.:—साधुमहाराज, रागावूं नका. हिंदुधर्माबद्दल मला एके काळीं

अत्यंत अभिमान होता व आतांही तो नष्ट झाला आहे असें नाहीं. पण मन साशंक झालें आहे त्याला मी काय करूं? हिंदुधर्म जर तर्कप्रधान आहे असें तुम्ही म्हणतां, तर वादास बसलें म्हणजे एकेरीवर आल्यास त्याचा कोणी राग कां धरावा? शूर योद्धयाला ज्याप्रमाणें शत्रूचे कुशल खड्गप्रहार आनंद देतात, त्याप्रमाणें मीं वादाच्या भरांत माझा मनोरथ स्पष्ट करण्याकरितां आपणा उभयतांसही पूज्य असलेल्या धर्माबद्दल कठोर शब्द वापरल्यास आपण न रागावतां मुद्दा बरोबर असेल तर अभिनंदन करून उलट त्याचें मुद्देसूद रीतीनेंच खंडण केलें पाहिजे. हिंदुधर्माबद्दल माझे मनांत शंका उत्पन्न झाली, याचें मला फार दुःख होत आहे. पण संदेह उत्पन्न झाला आहे त्यास इलाज नाहीं, किंवा शक्य तर हा संदेह नाहींसा होऊन पुन्हा हिंदुधर्माबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी यास इलाज म्हणूनच मी आज आपला अमूल्य वेळ घेत आहें. मी धर्मसंमूढ झालों, म्हणूनच आपल्या दारीं आलों आहे. मला निश्चित जें श्रेय असेल तें सांगून पावन करून घ्या, एवढीच विनंति आहे असो. पण तें कशाला? आपण 'सर्वभूतहिते रतिः', सत्यप्रेम, न्यायप्रेम, या दृष्टीनें माझ्या उदाहरणांचा अर्थ लावला पाहिजे असें म्हणाला. तसें कां होईना, मी म्हणतों आपणच तो अर्थ लावून दाखवाल व माझें समाधान कराल तर मजवर अनंत उपकार होतील.

हिं. सा.:—ठीक आहे. पशु मारून यज्ञयाग केल्यानें देव संतुष्ट होऊन मनुष्यांस इष्ट वस्तूंची प्राप्ति करून देतात. शिकार केल्यानें राजे लोकांची वृत्ति कायम राहून, धर्मरक्षणार्थ केव्हांही प्रसंग आला तर त्यांची तयारी राहते. श्वासोच्छ्वास, अन्नपाणी, नेत्रनिमेष यांत अनेक प्राणी मरत असले तरी मनुष्यानें जगायचें म्हटलें म्हणजे या गोष्टी अपरिहार्य आहेत. पण याखेरीज सर्व व्यवहारांत मीं आरंभीं दिलेल्या उदाहरणांप्रमाणें सर्वभूतानुकंपा व न्यायसेवाच तुम्हांला दिसून येईल. शिवाय देवांना संतुष्ट करून मिळविलेल्या वस्तु, शिकारीनें मिळविलेलें शौर्य व श्वासोच्छ्वास, अन्नपाणी, नेत्रनिमेष यांनीं रक्षिलेलें जीवित या सर्वांचा उपयोग जर परोपकार, धर्मसेवा यांत केला, तर ज्यांच्या हत्या झाल्या त्यांचे देह धर्मकारणीं पडले असें तुम्हांस कबूल करावें लागेल.

ध. सं.:—साधुमहाराज, आपलें भाषण ऐकून माझ्या अंगावर शहारे येतात. कोण क्रूरपणा हा! वनामध्यें स्वच्छंदानें विहार करणारीं सोन्यासारखीं

चकचकीत अशीं हजारों निरपराधी हरिणबालकें व हरिणदंपत्यें लहरी मानवी राजांचे युद्धकंडु शमविण्याकरितां प्राणांसकट बळी पडावीं, आणि याचें जगाचें धारण (?) करूं पाहणाऱ्या धर्मानें समर्थन करावें, इतकेंच नव्हे तर सद्धर्मसंरक्षक मानवी राजाला शूर चनविण्यास त्यांचे देह कारणीं लागले असें म्हणावें, हें साध्वीस भ्रष्ट करणाऱ्या नरपशूनें तुझ्या हातून परोपकारच घडला असें म्हणून तिचें सान्त्वन करण्याइतकेंच अधमपणाचें आहे. सुवर्णमृगाच्या कांतड्याची चोळी अंगांत घालण्याची आपली हौस पुरविण्याकरितां—अनेक जन्म महत्पुण्य संपादन करून त्याचे बळावर निरपराधी हरिणानें मिळविलेली जी सुवर्णमय काया तिचा नाश करण्याकरितां सीतादेवीनें पतीला आग्रह करावा, यापेक्षां स्वतःच्या सख्ख्या मुलास पृथ्वीचें राज्य मिळावें म्हणून सावत्र मुलास वनवासास धाडणारी कैकेयी कमी क्रूर, कमी अधम म्हटली पाहिजे. चोळीचा मोह राज्यमोहापेक्षां लक्षपट कमी; पण एक प्राणी जिवानिशीं मारणें हें दुसऱ्या एका प्राण्यास याच पृथ्वीवर एका ठिकाणाहून दुसऱ्या भीतिप्रद ठिकाणीं पाठविण्यापेक्षां लक्षपट क्रूरतेचें आहे.

हिं. सा.:—विशिष्ट प्रकारच्या हिंसेबद्दल तुमचें आमचें मत भिन्न असेलही. अशी मतभिन्नता प्राचीन काळापासून चालत आलीच आहे; व याच तत्त्वावर यज्ञीय पशु मारण्याची चाल अलीकडे बंद पडत चालली आहे. परंतु धर्माचें मुख्य कार्य जें जगद्धारण तें करण्याकरितां जर मनुष्यानें जगलें पाहिजे तर एका ना दुसऱ्या प्रकारची हिंसा तरी करावीच लागणार. जगायचेंच तर श्वासोच्छ्वास तरी करायला हवा ना?

ध. सं.:—कशाचें हो आलें आहे जगद्धारण? साधुमहाराज, तुमचें जगत्, जगत् तरी कोणतें? व त्याचें तुम्ही धारण तरी कसें काय करतां हें तरी मला समजूं दे.

हिं. सा.:—असें पहा कीं, सर्व चराचर सृष्टि हेंच जगत्; यांतील सर्व व्यवहार मनुष्यच करतो आहे कीं नाहीं? केवढालीं मोठमोठीं शहरें, वाडे, बगीचे, शेतें, देवळें, केवढा व्याप मनुष्यानें मांडला आहे! मनुष्यानें उत्पन्न केलेला दाणावैरण खाऊन किती तरी पशुपक्षी पोसले जात आहेत! पंचमहाभूतांच्या अंगचे गुण समजून घेऊन व त्यांचा उपयोग करून मनुष्यानें त्यांच्या गुणांचें सार्थक करून टाकलें आहे. हरिणें मारलेलीं मात्र तुम्हांला दिसलीं

पण हिंस्र व दुष्ट पशु मारून हजारों वन्य दुबळे पशु व वानप्रस्थ माणसें राजे लोकांनीं सुखी केलीं, हें तुम्हांस कसें दिसत नाहीं? हें जगद्धारणच नव्हे तर काय?

ध. सं.:—खरेंच नव्हे. हें जगद्धारण मुळींच नव्हे. सर्व चराचर सृष्टि हें जगत् असें जर तुम्हांला कबूल आहे, तर अशा या जगताचें वरील प्रकारच्या धारणावांचून कांहीं अडलें नव्हतें. मोठे वाडे, हवेल्या, शहरें, बागा, शेतें, सर्व मनुष्यानें केलीं, पण हें सर्व मनुष्यानें कुणाकरितां केलें? आपल्याकरितांच ना? दाणावैरण खाऊन पशु जगतात, पण दाणावैरण काय सर्वस्वी मनुष्यच उत्पन्न करतो? पाणी व जमीन हीं तर ईश्वरदत्तच आहेत व त्यांवर मनुष्याप्रमाणें पशूंचाही हक्क आहे; असें असतां शेतांत काम करतांना वर्षभर जें बैलाच्या पाठीचें घिरडें होत असतें तें त्या बैलाला पोटाला मिळावें म्हणूनच असेल नाहीं? याच बैलाचे पूर्वीचे वन्य पूर्वज किती तरी धिप्पाड होते व मनुष्याचे वैरणीवांचून ते कधींही उपाशी मेले नव्हते. या जाती मनुष्यानें धरून आणल्यापासून अधिक खुरटल्या व हीन झाल्या असें मनुष्यांतीलच शास्त्रज्ञांनीं ठरविलें आहे व आजही वनामधील यांचे बांधव पाहिले म्हणजे याचीच साक्ष पटते. हिंस्र पशु मारून कुणाचें संरक्षण करतां? वनामध्यें विहार करणारे पशु आपले कळप करून उत्तम तऱ्हेनें आपलें संरक्षण करतात. परमेश्वरानेंच अशी तेथें योजना करून ठेवली आहे. तेथें त्यांना वांचविण्यास मनुष्यानें जाण्याची कांहीं जरूरी नाहीं. आणि कोण हिंस्र? कुणी कुणाला मारायचें? वन्य हिंस्र आपल्या पोटापुरतें एकादें जनावर मिळालें म्हणजे संतुष्ट होतो. पण मानवी पशूची तृष्णा जशी कांहीं अघोर! तिनें अरण्येंच्या अरण्यें उजाड करून टाकलीं; पक्ष्यांपैकीं किती पक्षी तुम्ही तुमच्या धान्यावर पोसतां? एकंदर पक्ष्यांच्या जाती व संख्या घेतली तर लाखांत एक या प्रमाणांतही पक्षी तुमचें खात नसतील. आणि त्याला सुद्धां गोफणीचे तडाखे किती देत असाल हें तुम्हांलाच माहीत. पिंजऱ्यांत ठेवलेल्या पोपटाला भिजविलेली डाळ घालतां, पण तुम्हांला प्राणाहून प्रिय असें त्याचें स्वातंत्र्य हिरावून घेतां. स्वराज्य मागण्यांत हीच तुमची लायकी असेल नाहीं? पण एवढें सर्व कशाकरितां! तर म्हणे जगद्धारणाकरितां! कुठें आहे तें जग? एकंदर जगांतील फक्त जीवसृष्टीची जर गणती केली, तरी एक मनुष्यास लक्ष

जीव या प्रमाणांत, मनुष्याचा हातही ज्यांना पोंचत नाहीं असे मनुष्यानें धारण न करितां आयुष्य घालविणारे कोट्यवधि जीव ईश्वराच्या साम्राज्यांत खेळत आहेत. तरी पण जगाच्या धारणाची घमेंड कांहीं मनुष्य सोडीत नाहीं. सृष्टींतील जो जो भाग यांच्या हातीं लागला त्याचा त्याचा यानें जगद्धारणेच्या नांवाखालीं संहार व भ्रष्टाकार केला असेंच दिसून येईल. सर्व जीवसृष्टींत मनुष्यप्राणी कोटींस एक भरेल, पण या एकानें केवळ स्वतःस सुख व्हावें एवढ्याचकरितां सर्व सृष्टीचा नाश करावा व याला जगद्धारण, धर्म, दया, परोपकार वगैरे गोड गोड नांवें द्यावीं यापेक्षां क्रूरपणा तो कोणता? सारांश, माझ्या मतें दया, धर्म, परोपकार याची व्याप्ति मनुष्याचें संरक्षण येथपर्यंतच आहे. 'सर्वभूतहिते रतिः' हें निवळ थोतांड आहे.

हिं. सा.:—मग तुमचें म्हणणें तरी काय? सर्व मनुष्यजातीनें मरून जावें अशी तुमची इच्छा असली तर तसें एकदां सांगून टाका ना!

घ. सं.:—साधुमहाराज, असें त्रासतां कां? माझी मीं मारण्याची किंवा मनुष्यजातीला 'मर' म्हणण्याची अंतःकरणापासून इच्छा नाहीं. मला जगायचेंच आहे पण मी हिंदु म्हणवीत असल्यानें मला माझें जीवित जगताच्या कल्याणाकरितां असावें असें वाटतें व माझ्या जगण्यानें जर जगाचें कल्याण होत नसेल व मरण्यानें तें होणारें असेल तर इच्छा नसली तरी मीं किंवा साऱ्या मनुष्यजातीनें सुद्धां मरावें असें मीं म्हटल्यास त्यांत आपणांस वाईट कां वाटावें? एका मानवी व्यक्तीनें किंवा व्यक्तिसमूहानें मानवजातीच्या कल्याणाकरितां जर जरूर तर देहत्याग करावा, तर मग साऱ्या मनुष्यजातीनें आपल्यापेक्षां परिमाणानें किती तरी अधिक अशा जगताकरितां जर आत्मघात करणें जरूर आहे असें कोणीं तर्कानें सिद्ध केलें, तर त्यांत गैर काय झालें? शिबीचें वर्तन याचेंच प्रत्यंतर नव्हे काय? सर्व मानवी सृष्टीनें आपण केवळ क्षणोक्षणीं जगण्याकरितां आपल्यापेक्षां हजारोंनीं अधिक परमेश्वराच्या लेकरांचा संहार करावा तर इंग्लंडसारख्या सहा कोटींच्या राष्ट्रानें स्वतःच्या भरभराटीकरितां तीस कोटींच्या राष्ट्रास गुलामगिरींत ठेविलें, तर इंग्लंड अन्यायी–सैतानी कसें म्हणतां? सारांश, दया, क्षमा, शांति, 'सर्वभूतहिते रतिः', 'परित्राणं च साधूनाम् विनाशश्चोग्रकर्मणाम्', न्यायसेवा, दुर्बलांचें व निरपराध्यांचें संरक्षण व अशा रीतीनें नुसत्या मानवजातीचेंच नव्हे तर त्यापेक्षां कोटीपटीनें मोठ्या

जगताचें—सर्वत्र ईश्वराधिष्ठित ईश्वरमय अशा जगताचें धारण हीं हिंदुधर्माचीं मुख्य तत्त्वें किंवा स्वरूपें असून तीं सिद्ध करण्याकरितां जरूर त्या सर्व वस्तूंचा होम करावा ही हिंदुधर्माची आज्ञा आहे व या आज्ञेची अंमलबजावणी करण्याकरितां विचार करूं लागतां सर्व मनुष्यजातीनें जगून जगाचा संहार अधिक होतो त्यापेक्षां मरणानें जगाची धारणा अधिक होईल असें कोणी तर्कसिद्ध अनुमान काढील, तर तें केवळ मनुष्यास 'मर' म्हणतें म्हणून तें त्याज्य कीं काय ? मग राष्ट्राकरितां एखाद्या मनुष्यास 'मर' म्हटलें तर तें योग्य कसें ?

हिं. सा.:—तुमची विचारसरणी मला कर्मसंन्यास उर्फ निवृत्तिमार्गाची दिसते. पण हाही मार्ग श्रुतिस्मृतिप्रतिपादित असल्यामुळें तुम्ही नवीन तें काय सांगतां ?

ध. सं.:—कांहीं नवीनं सांगायचेंच असा माझा आग्रह नाहीं. हा जर निवृत्तिमार्ग असेल व मला वाटतो तसा तो बिनतोड असेलच तर विचारी लोकांनीं हल्लींचा जगद्विध्वंसक कर्मयोग सोडून द्यावा एवढेंच माझें म्हणणें आहे.

पण माझे मतें हा निवृत्तिमार्ग नव्हे. निवृत्तिमार्ग कर्म दोषवत् आहे, त्यानें मनुष्य सुखदुःखांच्या द्वंद्वांत सांपडतो, म्हणून तें त्याज्य होय, असें म्हणतो. व्यक्तिशः आत्मरत व आत्मतृप्त झाला त्याला यापुढें कांहीं कार्य किंवा जबाबदारी राहत नाहीं. जगांत प्राणिमात्र जीं सुखदुःखें भोगीत असतात, त्याकडे याचा कांहीं संबंध पोंचत नसतो, असें निवृत्तिपंथाचें मत आहे.

प्रवृत्ति अथवा कर्ममार्ग व्यक्तीची आत्मरति व आत्मतृप्ति येथें न थांबतां, यानंतर तर स्थितप्रज्ञ पुरुषावर जगद्धारणेची जबाबदारी अधिकच टाकतो. माझी विचारसरणी या जगद्धारणेच्या तत्त्वावरच उभारली आहे, असें मला आपणांस सांगायचें आहे. दया, क्षमा, शांति, न्याय, सत्यसेवा, 'सर्व भूतहिते रतिः' या जगद्धारणकारक तत्त्वांची अंमलबजावणी करायची म्हणजे मला वाटतो तो मार्गच मला सरळ व सयुक्तिक दिसतो. आपण मांडलेल्या मार्गांत वरील तत्त्वांची अम्मलबजावणी प्रामाणिकपणाची होत नसून मनुष्यप्राण्यानें केवळ स्वार्थदृष्टीनें त्यांची अम्मलबजावणी केली आहे, हें मीं वर आतांपर्यंत दाखविलेंच आहे.

शिवाय जगद्धारणेकरितां आपण होऊन मरून जाणें हें एक कर्मच आहे.

निवृत्तिमार्गी साधु, आत्मतृप्त झाल्यावर कांहीं कार्य राहत नसलें, तरी आत्महत्या करणें हेंही कर्म होऊन पुन्हा फल भोगावयास लावण्याकरितां आपल्या बोकांडीं बसेल, म्हणून आपोआप मृत्यु येईपर्यंत आयुष्य कंठीत बसतात. पण कर्मयोगाच्या या नवीन स्वरूपांत मनुष्यसृष्टीनें मरून जाणें हें भूतदयाप्रेरित, व जगद्धारणेच्छामूलक कर्म होतें.

सारांश, माझ्या मतें मला वाटतो तो निवृत्तिमार्ग नसून श्रुतिस्मृतिप्रतिपादित अशा कर्ममार्गाचेंच हें यथार्थ व प्रामाणिक स्वरूप आहे. व्यक्तीनें राष्ट्राकरतां मरणें हा जसा कर्मसंन्यासमार्ग नसून कर्मयोगमार्ग आहे, त्याप्रमाणें मनुष्यसृष्टीनें सर्व जीवसृष्टीकरितां प्राणत्याग करणें हा कर्ममार्गच होय.

हिं. सा.:—तुमचें म्हणणें क्षणभर कबूल केलें तरी जगांतील एकच एवढा बुद्धिमान् प्राणी नाहींसा होईल याची वाट काय ?

ध. सं.:—पुन्हा आपलें तेंच; सोन्याची सुरी झाली म्हणून काय उरांत खुपसून का घ्यायची आहे ? बुद्धिमान्, बुद्धिमान् झाला तरी त्यानें आजपावेतों आपण जगण्याकरितां जगाचा संहारच केला आहे ना ? हाच जर बुद्धीचा एकंदर उपयोग, तर मग ती असून नसून सारखी—नव्हे नसलेलीच बरी. बरें मनुष्यानें बुद्धीचा एवढा टेंभा कशास मिरवावा ? (१) आत्मसंवर्धन, (२) प्रजोत्पादन, (३) बालसंगोपन, (४) संघटन, व (५) शत्रूपासून आपलें व आपल्या संघाचें संरक्षण या सर्व गोष्टी मनुष्येतर सृष्टींत स्वाभाविकपणें घडत असलेल्या दिसून येतातच. त्यांस मनुष्याची कांहींच मदत लागत असते असें दिसत नाहीं. मनुष्य तरी यापेक्षां आपलें बुद्धिकौशल्य खर्चून काय जास्त करतो ?

हिं. सा.:—पण उत्क्रांतिवादाप्रमाणें आहे ही मनुष्यजात निःशेष झाली तरी पुन्हा इतर जीवसृष्टींतील मनुष्यजात उत्क्रांत होत येईलच. मग आहे तिलाच कां मारतां ?

ध. सं.:—मनुष्यजात पुन्हा उत्क्रांत होईल तर, त्या मनुष्यजातीस माझे विचार सुचूं पटूं लागून तीही अखेर खरोखरच 'उत्क्रांत' होण्याचा, मरून जाण्याचा विचार करील. ज्याप्रमाणें प्रत्येक जीवसृष्टींतून दररोज अनेक जीव मरत असतात, त्याप्रमाणें एकंदर जीवसृष्टींतून एक मानवी सृष्टि नित्य मरत

राहिल्यास काय बिघडलें ? मनुष्य जिवंत राहून होतो त्यापेक्षां जीवसंहार खचित कमी होईल.

हिं. सा.:—पण हें तुमचें म्हणणें कोणीच ऐकून घेणार नाहीं. गौतम बुद्धाप्रमाणें तुम्हीही अखेर अव्यवहार्य कोटींत निघाल.

घ. सं.:—कांहीं हरकत नाहीं. मनुष्यजगानें अव्यवहार्य कोटींत काढलें, तरी मनुष्यजग जोंपर्यंत माझें समाधान करीत नाहीं, तोंपर्यंत मला स्वतंत्रपणें विचार केलाच पाहिजे.

हिं. सा.:—पण 'सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः' या न्यायानें, जें प्राप्त झालें आहे त्यांतच राहून, जो व्यवहार करतां येईल तोच करीत रहा ना ? उगीच रिकामा काथ्याकूट कशाला ?

घ. सं.:—पण ज्या 'आरंभांत' कर्मांत कमी 'दोष' आहेत तोच पत्करावा कीं नाहीं ? व हिंदुधर्माचीं तत्त्वें ज्यांत अधिक साध्य होतील तो मार्ग स्वीकारणें हेंच, तुमच्या शब्दांत सांगायचें तर 'प्राप्त' नव्हे काय ?

हिं. सा.:—पण तें जर कोणीच कबूल केलें नाहीं तर त्याचा उपयोग काय ?

घ. सं.:—सर्वांनीं केलें तरच त्याचा उपयोग आहे हें मला कबूल आहे. पण त्या बाबींत मी आपल्याइतका निराशावादी नाहीं. सकृद्दर्शनीं असंभाव्य वाटणाऱ्या कित्येक गोष्टी शेंकडों वर्षांनीं हलके हलके स्वीकारल्या गेल्या आहेत हें दिसून येईल. विवाहसंस्था अस्तित्वांत नसतांना एखादी स्त्री एखाद्या पुरुषाची एकदां पत्नी झाल्यावर दुसऱ्यानें तिचा अभिलाष धरूं नये अशा प्रकारचे निर्बंध अमलांत येतील, असें कोणीं म्हटलें असतें, तर त्या वेळीं तो वेड्यांतच निघाला असता; पण आज त्या विवाहसंस्थेचें आश्चर्यही वाटत नाहीं. आपल्या राष्ट्राची भावी पिढी स्वतंत्र राहावी म्हणून, चालू पिढींतील लोक प्राण अर्पण करितात हें आज आपण प्रत्यक्ष पाहतोंच आहों. त्याचप्रमाणें सर्व जीवसृष्टीच्या संरक्षणाकरितां व संवर्धनाकरितां मनुष्यजातीनें नष्ट व्हावें ही गोष्ट तर्कसिद्ध असलीच तर ती कधीं काळीं मनुष्यजातीला पटणारच नाहीं व अमलांत येणारच नाहीं असें कां म्हणतां ? विचाराचें सामर्थ्य इतकें प्रचंड आहे कीं त्याचें एकदां चक्र सुरू झालें म्हणजे तो

राष्ट्रेंच्या राष्ट्रें इकडचीं तिकडे फेकून देतो. युरोपांतील भयंकर राज्यक्रांत्या विचाराच्याच जोरावर झाल्या हें आपण पाहतों. आतां विचाराचें कार्य शेंकडों-हजारों वर्षें चाललेलें असतें, पण व्यक्तींच्या इतिहासांत जशीं दहा, पांच वर्षें त्याप्रमाणें तत्त्वाच्या इतिहासांत हजार, पांचशें वर्षें यांची फिकीर नसते. माझ्या मनांत हे विचार येण्यापूर्वींच मी दुसऱ्या एका कार्यार्थ मला वाहून घेतलें आहे व या विचारांचा माझ्या कार्यावर चांगला किंवा वाईट परिणाम होणार हें मला माहीत नाहीं. पण हे विचार जर खोटे असतील तर माझें कोणी तरी तसें समाधान करावें अशी माझी फार फार इच्छा आहे. पण जर ते खरे तर्कसिद्ध असतील तर कधींकाळीं त्यांचा समाजावर पगडा बसेलही. माझा जन्म सवडीनुसार या दृष्टीनें केवळ विचार करण्यांतच जाणार असेल. पण माझ्या अंताबरोबर या विचारांचाही अंत होईलच असें नाहीं. असेच विचार पूर्वकालींही पुष्कळांस सुचले असतील, हल्लीं सुचत असतील, व पुढें सुचतीलही.

असो. सध्यां हे विचार माझ्या मनांत येत असल्यामुळें मधून मधून माझ्या मनाची अत्यंत तळमळ होते व मी जगून जगाचा केवळ विध्वंस करीत आहे, हें पाहून मला गहिंवर येतो. मी सहसा कोणापुढें असा गहिंवर येऊं देत नाहीं. पण एकदां असेंच देहभान सुटून माझ्या डोळ्यांत अश्रु आले; माझे हे विचार अगदींच चमत्कारिक असल्यामुळें माझ्या त्या वेळच्या मनःस्थितीचें कोणास आकलन होण्यासारखें नव्हतें. अर्थात् जमलेल्या मंडळींनीं मला ढोंगी म्हटलें. मी त्यापूर्वीं किंवा त्यानंतर कधींही जीवहत्या केली नाहीं असें नाहीं. या दृष्टीनें मला ढोंगी म्हणणाऱ्यांचें म्हणणें खरें भासतेंही. पण ज्या वेळीं मला उद्वेग आला होता, त्या वेळीं तो खरा होता हें खास. पुत्राचें प्रेत स्मशानांत जळतांना जें स्मशानवैराग्य येतें तें तास दोन तासही टिकत नाहीं. पण ज्या वेळीं तें येतें, त्यावेळीं तें खोटें असतें असें म्हणतां येणार नाहीं. जें अशाश्वत, तें असत्य असतेंच असें नाहीं.

२० जून १९२४

---

# देशसेवा

स्वदेशी माल वापरणें व देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें याचा प्रचार, प्रसार व पुरस्कार करण्यास लोकमान्य टिळकांनींच आरंभ केला.

**सह्याद्रि विमा कंपनी, लिं., नासिक,** ही आयुष्याच्या विम्याचें काम करणारी, भरभक्कम आर्थिक पायावर उभारलेली एक पुरोगामी राष्ट्रीय संस्था आहे. विमेदारांना भरपूर सवलती, सर्वांना सहज झेपतील असे किमान हप्ते, शास्त्रशुद्ध व काट-कसरीची व्यवस्था, मराठींत विमा-करार-पत्र, अत्यंत आकर्षक विमा-योजना इत्यादि गुणांमुळें लोकमान्य झालेली ही कंपनी आहे.

**एजन्सी :**—पॉलिसीप्रमाणेंच एजन्सीही याच कंपनीची अत्यंत फायदेशीर आहे. भरपूर कमिशन, इंग्रजीची गरज नाहीं. कर्तबगार एजंटाला ऑर्गनायझर, इन्स्पेक्टर, सेक्रेटरी वगैरे-सारख्या मानाच्या पगारी जागा दिल्या जातात. म्हणून मुख्य किंवा जोडधंदा म्हणून याच कंपनीची एजन्सी घ्या व बेकारी नष्ट करा.

कचेऱ्या :—**नासिक, मुंबई, पुणें, नगर, कोल्हापूर, बेळगांव, हुबळी, सावंतवाडी, मडगांव, धुळें, औरंगाबाद, नागपूर, इंदूर वगैरे.**

अधिक माहिती :—

नासिक शहर.<br>१५–९–१९४४.

**गो. ग. सौंदणकर,**<br>मॅनेजिंग डिरेक्टर.

## सह्याद्रि विमा कं., लि., नासिक

(Consent of the Central Government has been obtained to this issue under Defenee of India Rule 94 A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for financial soundness of any scheme or the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.)

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

शाखा : हॉर्नबी रोड, मुंबई. } प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग. { हेड-ऑफिस पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. | १०,००,००० |
| विक्री झालेलें भांडवल | ५,५७,१०० |
| जमा झालेलें भांडवल, | २,१०,११० |
| एकूण खेळतें भांडवल | ३०,००,००० वर |

रा. ग. रा. साठे,
चेअरमन.

रा. दा. ग. बापट,
व्हा. चेअरमन.

## — शेअर-विक्री चालू आहे. —

बँकेनें गतवर्षी करमाफ ४ टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

जी. डी. जोगळेकर,
बी. ए. (ऑ.), बी. कॉम्,
एल्एल्. बी., मॅनेजर.

चिं. त्रिं. चितळे,
मॅ. डायरेक्टर.

# यशाच्या वाटेवरील पुढचें पाऊल

अत्यंत रोमांचकारी व अद्भुत घटनांनीं बहरलेली
प्रेक्षकांच्या मनांतील उदात्त भावना हेलावणारीं

**नवयुग चित्रपट लि०ची**

एक वैशिष्टयपूर्ण प्रणयकथा

REFBK-0006471

दिग्दर्शक : **नकवी**

: भूमिका :

गीता निझामी, कुसुम देशपांडे, जयराज, डेविड वगैरे.

**लवकरच रूपेरी पडद्यावर येत आहे !**